# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

**सत्र–५ पेपर ११** DSE - E 75

# आर्थिक विचारांचा इतिहास–१

(History of Economic Thoughts-I)

**सत्र–६ पेपर १६** DSE - E 200

# आर्थिक विचारांचा इतिहास–२

(History of Economic Thoughts-II)

**बी. ए. भाग–३ : अर्थशास्त्र**

(शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०२२

बी. ए. (आर्थिक विचारांचा इतिहास) भाग - ३ करिता

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ३००**

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-57-4

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ अभ्यासमंडळ : अर्थशास्त्र ■**

अध्यक्ष – **डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

- **प्रा. डॉ. डी. सी. तळुले**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती विद्या कट्टी**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. संतोषकुमार बबनराव यादव**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. बाळासो पांडुरंग पाटील**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज, इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. नेताजी व्ही. पोवार**
  कमला कॉलेज, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. निवास जाधव**
  राजा शिव छत्रपती आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज,
  महागांव, जि. कोल्हापूर
- **डॉ. एस. एम. भोसले**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **प्रा. डॉ. जे. एफ. पाटील**
  अक्षय, बी–६, तारा टेसेसेस, एस.एस.सी. बोर्ड रोड,
  सम्राट नगर, कोल्हापूर
- **डॉ. विजय भिमाप्पा देसाई**
  राजर्षी शाहू आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, रुकडी
  जि. कोल्हापूर
- **डॉ. विजयकुमार आप्पासाहेब पाटील**
  आर्टस अॅण्ड सायन्स कॉलेज, आटपाटी,
  जि. सांगली
- **प्रा. डॉ. सिद्धाप्पा टिप्पान्ना बागलकोटे**
  डिपार्टमेंट ऑफ स्टडीज इन इकॉनॉमिक्स,
  कर्नाटक विद्यापीठ, धारवाड (कर्नाटक राज्य)
- **डॉ. राहूल शंकरराव म्होपरे**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर
- **श्री. सुर्यकांत बाबूराव पाटील–बुद्धिहाळकर**
  सागर, २१०३/७+८, ई वॉर्ड, रुक्मीनीनगर, कोल्हापूर
- **डॉ. संजय शंकरराव रुपे**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर

# प्रस्तावना

जून २००७ पासून शिवाजी विद्यापीठाने बहिःस्थ विद्यार्थ्यांसाठी दूर शिक्षण कार्यक्रम राबविण्याचे ठरविलेले आहे. यावर्षी बी. ए. भाग ३ (अर्थशास्त्र) या वर्गाच्या नवीन बदललेल्या अभ्यासक्रमानुसार सत्र-५ व ६ पेपर क्र. ११ व १६ आर्थिक विचारांचा इतिहास हे पुस्तक लिहिले आहे. अर्थशास्त्र या विषयातील विविध अभ्यासू व अनुभवी लेखकांनी वेगवेगळे घटक या पुस्तकांमध्ये लिहिले आहेत. या पुस्तकातील विषयाच्या विविध संकल्पना, सिद्धांत व आर्थिक नियोजन यांची मांडणी सोप्या व दर्जेदार भाषेत करून हा विषय विद्यार्थीभिमुख करण्याचा प्रयत्न केला आहे. बहिःस्थ विद्यार्थ्यांना या विषयातील विविध संकल्पना, सिद्धांत व धोरणे समजण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी कोष्टके व आकृत्या काढून विषय अधिक सोपा करून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

या पुस्तकात बी. ए. भाग-३ (अर्थशास्त्र) या वर्गाच्या बहिःस्थ विद्यार्थ्यांसाठी असलेल्या आर्थिक विचारांचा इतिहास सत्र-५ व ६ पेपर क्र. ११ व १६ या बदललेल्या सुधारीत अभ्यासक्रमाची एकूण आठ घटकांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. यामध्ये सत्र ५ साठी आर्थिक विचारांचा उगम, सनातनवादी आर्थिक विचार, फ्रेडरिक लिस्ट यांचा आर्थिक विचार, कार्ल मार्क्स यांचे आर्थिक विचार तर सत्र ६ साठी आल्फ्रेड मार्शल यांचे नवसनातनवादी आर्थिक विचार, भारतीय आर्थिक विचार, महात्मा गांधी, आधुनिक भारतीय अर्थशास्त्रज्ञांचे आर्थिक विचार यांची सविस्तर मांडणी केलेली आहे.

बहिःस्थ विद्यार्थ्यांना विषयाचे त्वरीत व मुद्देसूद आकलन व्हावे यासाठी घटकांची मांडणी एका विशिष्ठ पद्धतीने म्हणजेच उद्दिष्टे, प्रास्ताविक, विषय विवेचन, सारांश, पारिभाषिक शब्द तसेच प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयं अध्ययनासाठी प्रश्न व त्यांची उत्तरे सरावासाठी दीर्घोत्तरी प्रश्न व टीपा दिलेल्या आहेत. पुस्तकाच्या शेवटी अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तकांची नावे दिलेली आहेत. या पुस्तकाची मांडणी आणि विवेचन विद्यार्थ्यांना विषयाचे चांगले आकलन होण्यासाठी उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे.

या पुस्तकाचा वापर करणाऱ्या सर्व विद्यार्थी व शिक्षक वर्गाला आमची नम्र विनंती अशी की त्यांनी त्यांच्या सूचना प्रकाशक वा संपादकांकडे जरूर पाठवाव्यात. पुढील आवृत्ती अधिक बिनचूक, अद्ययावत व उपयुक्त करण्यासाठी त्याचा उपयोग होईल.

या पुस्तकाचे प्रकाशन करण्याच्या कामी मदत केलेल्या शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रातील सर्व कर्मचारी व प्रशासकीय अधिकारी यांना मनःपूर्वक धन्यवाद. या पुस्तकाच्या सर्व घटक लेखकांनी आपले घटक वेळेत पूर्ण केल्याबद्दल संपादक या नात्याने कृतज्ञ आहोत.

**■ संपादक ■**


**डॉ. ए. के. वावरे**
छत्रपती कॉलेज, सातारा,
जि. सातारा

**डॉ. संजय धोंडे**
आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा
ता. जावळी, जि. सातारा

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**आर्थिक विचारांचा इतिहास**
बी. ए. भाग–३ अर्थशास्त्र पेपर ११ व १६

**अभ्यास घटकांचे लेखक**

| **लेखन सहभाग** | **सत्र–५ घटक क्रमांक** | **सत्र–६ घटक क्रमांक** |
|---|---|---|
| **प्रा. किशोर गजानन सुतारा**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | १ | – |
| **डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | २ | – |
| **डॉ. अनिल सत्रे**<br>मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव,<br>ता. वाळवा, जि. सांगली | ३, ४ | – |
| **डॉ. प्रभाकर माने**<br>जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | – | १, २ |
| **डॉ. मनोहर कोरे**<br>विलिंग्डन कॉलेज, सांगली, जि. सांगली | – | ३, ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. ए. के. वावरे**
छत्रपती कॉलेज, सातारा,
जि. सातारा

**डॉ. संजय धोंडे**
आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा
ता. जावळी, जि. सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | पेपर–११ : सेमिस्टर–५ | |
| १. | आर्थिक विचारांचा उगम | १ |
| २. | सनातनवादी आर्थिक विचार | २६ |
| ३. | फ्रेडरिक लिस्ट यांचे आर्थिक विचार | ६२ |
| ४. | कार्ल मार्क्स यांचे आर्थिक विचार | ८१ |
| | पेपर–१६ : सेमिस्टर–६ | |
| १. | आल्फ्रेड मार्शल यांचे नवसनातनवादी आर्थिक विचार | १०७ |
| २. | भारतीय आर्थिक विचार | १२७ |
| ३. | महात्मा गांधी | १७४ |
| ४. | आधुनिक भारतीय अर्थशास्त्रज्ञांचे आर्थिक विचार | १८८ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी (क्र. ११ व १६) एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक : १
# आर्थिक विचारांचा उगम
# Origins of Economic Thoughts

**अनुक्रमणिका**

१.१ उद्दिष्ट्ये

१.२ प्रास्ताविक

१.३ विषय विवेचन

१.३.१ प्राचीन आर्थिक विचार, व्यापारवादाचा उदय, व्यापार वादाची वैशिष्ट्ये
(Early Economic Thought, Rise of Marcantilism, Features of Mercantilism)

१.३.२ निसर्गवादाचा अर्थ आणि त्याच्या उदयाची कारणे
(Meaning & Causes of Emergence of Physiocracy)

१.३.३ नैसर्गिक व्यवस्थेची संकल्पना आणि शेतीचे महत्त्व
(The Concept of Natural Order and Primacy of Agriculture)

१.३.४ आर्थिक तक्ता
(Tableau Economique)

१.४ सारांश

१.५ पारिभाषिक शब्दांचे अर्थ

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भसूची

**१.१ उद्दिष्ट्ये :** या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला पुढील बाबींचे आकलन होईल.

१. अर्थशास्त्रीय विचारांच्या इतिहासाचा अभ्यास म्हणजे काय हे समजेल.

२. अर्थशास्त्रीय विचारांचा उगम व विकास कसा झाला हे लक्षात येईल.

३. व्यापारवादी विचार समजावून घेता येतील.

४. निसर्गवादी विचार व आर्थिक तक्ता या संकल्पना समजतील.

## १.२ प्रास्ताविक :

अर्थशास्त्रीय विचारांचा अभ्यास करत असताना प्रथम आपणांस अर्थशास्त्रीय विचारांचा उगम आणि त्यांचा विकास कसा घडून आलेला आहे याबाबत आकलन होणे अत्यंत गरजेचे आहे. मानवाच्या उत्क्रांतीपासूनच विविध शास्त्रे उदयाला आलेली आहेत. अर्थशास्त्र हे त्यापैकी एक शास्त्र आहे. मानवाच्या उत्क्रांतीबरोबरच आर्थिक प्रश्न निर्माण झाले. अगदी रानटी अवस्थेत राहणाऱ्या माणसांपासून आर्थिक प्रश्नांची सुरुवात झाली आणि ते प्रश्न सोडविण्यासाठी आर्थिक संस्था निर्माण होत गेल्या. त्यातूनच आर्थिक विचार मांडण्याची गरज भासली. मानवी उत्क्रांती बरोबरच मानवाच्या गरजा वाढत गेल्या. अशा प्रश्नांची पूर्तता करणे व त्यातूनच आर्थिक प्रश्नांची निर्मिती झाली. गरज ही शोधाची जननी आहे. या उक्तीचा मानवाला पावलोपावली प्रत्यय आला. मानवाला त्या त्या परिस्थितीनुसार भेडसावणाऱ्या समस्यांची आर्थिक अंगाने उकल करण्यासाठी अर्थशास्त्रज्ञांनी वेळोवेळी जे उपाय सुचविले, ज्या कांही संकल्पना मांडल्या त्यातूनच आर्थिक विचारांचा उगम होऊन विकास घडून आला.

कालौघात परिस्थितीत अनेक बदल होत गेले. त्यानुसार आर्थिक प्रश्नांचे स्वरूप बदलत गेले. त्यानुसार बदलत्या परिस्थितीचा आढावा घेऊन नवीन पध्दतीने आर्थिक प्रश्नांची सोडवणूक कशी करावी त्याकरिता निरनिराळ्या आर्थिक विचारवंतांनी वेळोवेळी जे विचार मांडले व त्यांनी मांडलेल्या विचारांमध्ये परिस्थितीनुरुप जे बदल होत गेले त्यालाच अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास असे म्हणतात. प्रस्तुत घटकाद्वारे पुढील उप घटकांच्या अध्ययनाद्वारे आपणाला त्याची माहिती करुन घेता येईल.

## १.३ विषय विवेचन

आर्थिक विचारांचा उगम कसा झाला याचे ज्ञान आपणांस पुढील उप-घटकांच्या अध्ययनाद्वारे करुन घेता येईल.

### १.३.१ प्राचीन आर्थिक विचार :

अर्थशास्त्रीय विचारांचा उगम वरील नमुद केल्याप्रमाणे झाला असला तरी त्याचा भूतकाळातील नेमका उगम बिंदू सांगता येणे कठीण आहे. म्हणूनच मानवाच्या उत्क्रांती बरोबरच आर्थिक प्रश्नांचा उगम झाला असावा असे ढोबळ मानाने समजले जाते. आर्थिक विचारांचा उगम कशा रितीने होत गेला याचे विवेचन अगदी प्राचीन काळापासून करता येते. यामध्ये पुढील प्रमुख आर्थिक विचार येतात.

१. व्यापारवाद

२. निसर्गवाद

३. सनातन संप्रदाय

४. ऑस्ट्रीयन संप्रदाय

५. समाजवादी संप्रदाय

६. सनातनवादी संप्रदाय

७. नव-सनातनवादी संप्रदाय

८. आधुनिक आर्थिक विचार

वरीलपैकी आपण व्यापारवाद आणि निसर्गवाद या दोन संप्रदायाच्या विचारांचा अभ्यास प्रस्तुत घटकामध्ये करणार आहोत.

*** व्यापारवाद : (Mercantalism)**

१४व्या शतकाच्या शेवटी आणि १५व्या शतकाच्या सुरवातीला व्यापारवादी विचारसरणीचा उदय झालेला आहे असे मानले जाते. मात्र १७व्या शतकामध्ये व्यापारवादी विचारसरणी अत्यंत प्रभावी होती. १४व्या शतकाच्या शेवटी मध्ययुगाचा अंत झाला. मध्ययुगात सरंजामशाही अस्तित्वात होती. संपूर्ण समाजरचनेत सरंजामदारांचा प्रभाव होता. व्यापार आणि उत्पादन यादृष्टीने सरंजामशाहीत अत्यंत प्रतिकूल परिस्थिती होती. याच काळात मध्ययुगामध्ये कॅथोलिक पंथाचा प्रचंड प्रभाव होता. पैसा आणि भौतिक वस्तूंना अत्यंत कमी महत्त्व देणारा हा पंथ होता. पोप हा कॅथोलिक पंथाचा प्रमुख होता. त्या काळात राजांवरही पोपचे वर्चस्व होते. याच काळात कॅथोलिक पंथाच्या विचारांना विरोध करणारा प्रोटेस्टंट पंथ उदयाला आला. हा पंथ मानवी जीवनातील पैशाचे महत्त्व मान्य करणारा होता. त्याचबरोबर या प्रोटेस्टंट पंथाच्या विचारांना मान्य करणारा नवीन व्यापारी वर्ग युरोपात उदयाला आला. त्यातून प्रोटेस्टंट पंथाचे विचार आणि नवीन निर्माण झालेली व्यापारवादी विचारसरणी यांनी एकत्रितपणे सरंजामशाही आणि पोपशाहीच्या विचारांविरुध्द बंड केले. आणि त्याच्या समाजरचनेला उखडून टाकले. यातूनच व्यापारवादी विचारसरणी उदयाला आली. अशा प्रकारे १४ व्या शतकाच्या शेवटी युरोपात जी नवीन विचारसरणी उदयाला येऊ लागली आणि त्या विचारसरणीने मध्ययुगीन आचार-विचारांविरुध्द आणि धोरणांविरुध्द जे बंड पुकारले त्या विचारसरणीलाच व्यापारवादी (Mercantalism) विचारसरणी असे म्हणतात.

*** व्यापारवादाचा अर्थ :**

व्यापारवाद ही एक व्यापक संकल्पना मानली जाते. व्यापारवाद हा एखादी व्यक्ती वा पंथाच्या नावाशी संबंधित नाही. मध्ययुगाचा शेवट झाल्यानंतर युरोपातील अनेक राष्ट्रांमध्ये ज्या विविध आर्थिक समस्या निर्माण झाल्या, त्या समस्यांवर जे उपाय सुचविण्यात आले. त्यामध्ये युरोपीयन राष्ट्रांमधील अनेक व्यापारी, उद्योगपती, प्रशासकीय वर्ग, राजकारणी व्यक्ती अशा विविध व्यक्तींचा समावेश होतो. या विविध लोकांनी आपल्या देशाच्या आर्थिक व्यवहारांबाबत लिखाण केले होते. तसेच समस्यांबाबत उपाय सुचविलेले होते. त्या सर्वांना एकत्रितपणे व्यापारवादी विचार असे म्हणतात.

वरीलप्रमाणे लिखाण केलेल्या, सर्व लोकांच्या धोरणांचा, त्यांच्या सिद्धांतांचा आणि त्यांनी सुचविलेल्या उपायांचा त्यानंतरच्या काळातील तज्ज्ञांनी व अभ्यासकांनी अभ्यास केला. त्यामधून त्यांना आढळून आले की, वरील सर्व लोकांच्या आर्थिक विचारांमध्ये साम्य किंवा एकवाक्यता आढळते. त्यांच्याकडून लिहिलेल्या विविध कागदपत्रांची व दस्ताऐवजांची तज्ज्ञांनी व्यवस्थित छाननी करुन त्यातील समान विचार, धोरणे व सिद्धांताची एक

विचारमाला गुंफली. हीच विचारांची माला पुढे व्यापारवादी विचारसरणी म्हणून नव्याने पुढे आली.

व्यापारवादी विचार हे एका व्यक्तीने वा संप्रदायाने मांडलेले नसून विविध व्यक्तीनी मांडलेली ती एक विचारधारा असल्याने व्यापारवादाची एकच एक अशी व्याख्या करणे कठीण आहे. मात्र तरीही काही तज्ज्ञांनी आपआपल्या परीने व्यापारवादाची व्याख्या केलेली दिसून येते. त्यावेळी काही महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे:-

**१) प्रो. हॅंजे :** या आर्थिक कल्पनांना व्यापारवादी पध्दती, वाणिज्य पध्दती, व्यापारवाद अशा नावांनी संबोधले जाते. परंतु हे विचार एका व्यक्तीने मांडलेले नव्हते, किंवा एखाद्या पध्दतीसारखे नव्हते. त्यामुळे त्यांच्या विचारांना एखादी पद्धती, एखाद्या व्यक्तीने मांडलेला वाद असे म्हणण्यापेक्षा त्यास व्यापारवाद म्हणणे अधिक संयुक्तिक ठरते.

**२) प्रा. लॅकचमन :** व्यापारवाद म्हणजे मार्ग अडविणाऱ्या मध्ययुगीन विचारांविरुध्द व रुढींविरूध्द पुकारलेले युद्ध होय.

**३) श्मॉलर :** व्यापारवाद म्हणजे केवळ आर्थिक बाजूने राष्ट्रनिर्मिती होय.

**व्यापारवादाचा उदय : (Emergence of Mercantilism)**

मध्ययुगाचा शेवट झाल्यानंतर युरोप खंडात विशेषत: १५व्या आणि १६व्या शतकामध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रामध्ये आमुलाग्र बदल घडून आले. या सर्व अमुलाग्र बदलांचा परिपाक म्हणून व्यापारवाद उदयाला आला. व्यापारवादाच्या उदयास जे विविध घटक जबाबदार ठरले. त्यामध्ये पुढील प्रमुख बाबींचा उल्लेख करावा लागेल.

**१) धर्म सुधारणा :**

युरोपमधील संपूर्ण समाजव्यवस्था ही पोप नियंत्रित होती. समाजव्यवस्थेवर कॅथोलीक पंथाचा प्रचंड प्रभाव होता. या पंथाला व्यक्तीस्वातंत्र्य मान्य नव्हते. लोकांचा पैसा आणि भौतिक वस्तूंपासून दूर ठेवण्यात धन्यता मानणारा हा पंथ होता. पोपच्या अशा बुरसटलेल्या विचारांविरूद्ध एक चळवळ युरोपात जोर धरु लागली. यात मार्टीन ल्युथर किंग हा आघाडीवर होता. मार्टीन ल्युथर किंगने कॅथोलीक पंथाच्या विचारांविरूद्ध एक धर्मसुधारणा चळवळ सुरु करुन प्रोटेस्टंट या पंथाची स्थापना केली. व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार देणारा असा हा पंथ होता. त्यामुळे युरोपात उद्योग आणि व्यापारवृध्दीला सुरुवात झाली. त्यातून जी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे व्यापारवादाचा उदय झाला.

**२) विद्येचे पुनरूज्जीवन :**

मध्ययुगाच्या अस्तानंतर युरोपमध्ये फार मोठ्या प्रमाणावर वैचारिक क्रांती घडून आली. या वैचारिक क्रांतीलाच विद्येचे पुनरुज्जीवन असे म्हणतात. त्यातुन व्यापारवादाचा उदय होण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण झाली. विद्येच्या पुनरुज्जीवनामुळे परंपरागत विचारांना तडा गेला. बॅकन, गॅलिलीओ, कोपर्नीकस, केपलर इ. विचारवंतांनी जुने विचार झुगारून नवीन विचारांचा शास्त्रीय पाया घातला. त्यामुळे युरोपात व्यक्ती स्वातंत्र्याला

चालना मिळत गेली. वैचारिक क्रांतीमुळे अनेक निर्बंध नष्ट झाल्याने व्यापार व उद्योगांच्या वाढीला, विकासाला चालना मिळाली. परिणामी व्यापारवादी विचारसरणीला पोषक वातावरण निर्माण झाले.

**३) सरंजामशाहीचा शेवट :**

मध्ययुगामध्ये युरोपात अस्तित्वात असलेल्या सरंजामशाहीमुळे अर्थव्यवस्थेला स्थानिक दर्जा प्राप्त झालेला होता. सरंजामदार शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक करत. हे सरंजामदार आवश्यक तेवढ्याच अन्नधान्याचे उत्पादन करत. त्यामुळे अर्थव्यवस्था ही पूर्णपणे स्थानिक स्वरूपाची बनलेली होती. त्यामुळे या व्यवस्थेत उद्योग, व्यापार, व्यवसाय यांना फारसे स्थान प्राप्त होऊ शकले नाही. कालांतराने युरोपात सरंजामशाही संपुष्टात आली. त्यामुळे स्थानिक स्वरूपाचे उत्पादन बंद झाले व उत्पादन विस्तारीत व मोठ्या प्रमाणावर होऊ लागले. परिणामी व्यापारवृध्दीला चालना मिळत गेली. यातूनच व्यापारवाद विचारसरणीला पोषक वातावरण तयार झाले.

**४) सोन्या-चांदीच्या खाणींचा शोध व पैशाचा वापर :**

मध्ययुगाचा शेवट झाल्यानंतर युरोप खंडामध्ये ज्ञान-विज्ञान, खगोल, भूगोल, कला, साहित्य इ. क्षेत्रात अनेक शोध लागले. जलमार्गाचे जे नवे शोध लागले त्यातून कोलंबसने अमेरिका खंडाचा शोध लावला. त्यातूनच अमेरिकेमध्ये सोन्या-चांदीच्या खाणी सापडल्या. परिणामी युरोपकडे सोन्या-चांदीचा प्रवाह वाहू लागला. युरोपातील वस्तु विनीमयाची जागा सोन्या-चांदीच्या धातुंनी घेतली व पैशावर आधारित विनिमय पध्दत रूढ झाली. पैशाचा वापर अधिकाधिक केला जाऊ लागला. सरकारचे कर पैशात दिले जाऊ लागले. एकूणच पैशाच्या वाढत्या वापरामुळे व्यापार, उद्योग आणि व्यवसायांना चालना मिळत गेली. या सर्वांतून व्यापारवादाला पोषक वातावरण निर्माण होत गेले.

**५) राष्ट्रवाद बळावला :**

युरोपात सरंजामशाहीच्या जुलमी कारभारामधून राष्ट्रवादी विचारसरणी वाढीला लागली. समान भाषा, संस्कृती, परंपरा यांच्या आधारावर एकत्र येऊन एकसंघ अशा राष्ट्रांची निर्मिती झाली. राष्ट्रवादी विचारसरणीचा प्रभाव वाढत जाऊन एकसंघ समाजाची पायाभरणी झाली. त्यातुन राजसत्तेचे महत्त्व मान्य झाले. प्रजेच्या हिताचे रक्षण करणे हे राजाचे आद्य कर्तव्य आहे. ही भावना वाढीस लागली. यातूनच युरोपात इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी अशी राष्ट्रे निर्माण झाली. प्रत्येक राष्ट्र आपआपल्या हिताची जपणूक करु लागले. अशा राष्ट्रवादी विचारसरणीतूनच व्यापारवादाला चालना मिळत गेली.

**६) सरकारी खर्चात झालेली वाढ :**

राष्ट्रवादाच्या उदयातूनच अनेक नवी राष्ट्रे उदयाला आली. अशा राष्ट्रांच्या संरक्षणाची जबाबदारी राजसत्तेवर म्हणजे सरकारवर पडल्याने सरकारच्या खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होत गेली. त्यामुळे राष्ट्राचे उत्पन्न व संपत्ती वाढविण्यासाठी व्यापारात वाढ करणे आवश्यक होते. त्यासाठी प्रत्येक राष्ट्रांनी परदेशातून मोठ्या प्रमाणावर सोन्या-चांदीची आयात करण्यावर भर द्यायला सुरुवात केली. आपल्या देशाचा व्यापार नेहमी

अनुकूल राहिला पाहिजे. यासाठी व्यापारी उलाढाल वाढविणे आवश्यक बनले. यातून व्यापारवादाला पोषक वातावरण निर्माण होत गेले.

अशा प्रकारे मध्ययुगानंतर युरोपातील सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक परिस्थितीमध्ये वरीलप्रमाणे जे अमुलाग्र बदल घडून आले त्यातून व्यापारवादी विचारसरणीचा उदय होत गेला.

**व्यापारवादाची वैशिष्ट्ये : (Features of Mercantilism)**

व्यापारवादाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगितली जातात.

**१) पैसा किंवा मौल्यवान धातु म्हणजेच संपत्ती :**

व्यापारवादी विचारसरणीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पैसा किंवा मौल्यवान धातू हीच खरी संपत्ती आहे. व्यापारवाद्यांनी सोने व चांदी या धातूंना अधिक महत्त्व दिले. अधिक सोने म्हणजे अधिक संपत्ती व जेवढी अधिक संपत्ती तेवढे राष्ट्राचे सामर्थ्य अधिक असे व्यापारवाद्यांचे मत होते. इतर कोणत्याही संपत्तीपेक्षा सोने व चांदीच्या स्वरूपातील संपत्ती हे संपत्तीचे सर्वात श्रेष्ठ स्वरूप आहे. देशांकडील सोने व चांदी या मौल्यवान धातुंचा साठा हीच देशाच्या सामर्थ्याची खरी कसोटी असल्याचे व्यापारवादी मानत. देशात अधिक सोन्या-चांदीच्या धातूंचा शोध घ्यावा. अशा खाणी जर देशात नसतील तर परदेशातून अशा सोने-चांदीसारख्या मौल्यवान धातूंची आयात करावी अशी व्यापारवाद्यांची भूमिका होती. व्यापारवाद्यांनी पैशाला अधिक महत्त्व दिले होते. त्यांच्या मते, देशात पैशाचा साठा वाढला की, किंमत पातळी वाढते. त्यामुळे वस्तुंच्या उत्पादनातही वाढ होते. नफ्यात वाढ होते. अशा प्रकारे पैशाने विनिमय व्यवहार वाढतात व राष्ट्रांची संपत्ती वाढून राष्ट्राच्या सामर्थ्यात वाढ होते. त्यामुळे व्यापारवाद्यांच्या काळात अधिक सोने, अधिक संपत्ती, अधिक सामर्थ्य (More Gold, More Wealth, More Power) अशी लोकप्रिय विचारसरणी होती. यावरुनच पैसा किंवा मौल्यवान वस्तू म्हणजेच राष्ट्राची संपत्ती हे व्यापारवादी विचारसरणीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते.

**२) संपत्ती मिळविण्यासाठी परराष्ट्रीय व्यापारावर नियंत्रण आवश्यक :**

व्यापारवाद्यांच्या मते, मौल्यवान धातू म्हणजे सोने व चांदीचा संचय वाढविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे परराष्ट्रीय व्यापार हाच आहे. जर देशात मौल्यवान धातूंचा साठा अल्प असेल तर परराष्ट्रीय व्यापारातून अशा मौल्यवान धातूंची जास्तीतजास्त आयात करुन त्याचा साठा सतत वाढविणे आवश्यक आहे. देशाकडे जेवढे मौल्यवान धातू जास्त असतील तेवढा देशाचा परराष्ट्रीय व्यापार अनुकूल राहील. देशाची निर्यात ही देशाच्या आयातीपेक्षा जास्त असली पाहिजे. निर्यात वाढविण्यासाठी देशात उत्पादित होणाऱ्या वस्तू गुणवत्तापूर्ण असणे आवश्यक आहे. निर्यातीला अधिकाधिक प्रोत्साहन व आयातीवर निर्बंध अशा प्रकारचे व्यापारावर निर्बंध असणे आवश्यक आहे. आयात मालावर जकाती लावून देशातील उद्योगांना संरक्षण द्यावे असे व्यापारवाद्यांचे मत होते. देशातील साधन सामुग्रीचा कार्यक्षम व पुरेपूर वापर करुन निर्यात वस्तूंचे उत्पादन वाढविणाऱ्या उद्योगाचे देशभरात जाळे निर्माण करावे. त्यासाठी परराष्ट्रीय व्यापारावर नियंत्रण असणे व्यापारवाद्यांनी अनिवार्य मानले होते. आवश्यकतेनुसार सरकारने परराष्ट्रीय व्यापारामध्ये हस्तक्षेप करणे गरजेचे आहे असे व्यापारवाद्यांचे मत होते.

### ३) अनुकूल व्यापार हीच देशाची भरभराट :

व्यापारवाद्यांनी अनुकूल व्यापारावर प्रचंड भर दिला होता. देशाची निर्यात ही देशात होणाऱ्या आयातीपेक्षा जास्त असली पाहिजे. मौल्यवान धातू मिळविण्यासाठी देशातून विविध वस्तूंची निर्यात ही वाढविली पाहिजे. आयात शक्यतो मौल्यवान धातूंचीच केली पाहिजे. मौल्यवान धातूंव्यतिरिक्त लागणाऱ्या इतर वस्तूंची आयात न करता अशा वस्तू देशातच उत्पादित होतील याची काळजी घेतली पाहिजे. जेव्हा देशांतून निर्यात होणाऱ्या वस्तू व सेवांचे मूल्य हे आयात होणाऱ्या वस्तू व सेवांच्या मूल्यापेक्षा जास्त राहील. तेव्हाच परराष्ट्र व्यापार अनुकूल होईल. म्हणून देशातील लोकांनी तसेच सरकारने व्यापार अनुकूल होण्यासाठी जास्तीतजास्त निर्यात वाढवून कमीतकमी आयात करण्यावर भर दिला पाहिजे असे व्यापारवाद्यांचे मत होते. व्यापारवाद्यांनी व्यापाराला सर्वश्रेष्ठ स्थान दिले होते. त्यांनी उत्तम व्यापार, मध्यम कारखानदारी व कनिष्ठ शेती अशी व्यवसायाची श्रेणी ठरविलेली होती. त्यामुळेच व्यापार हा नेहमी अनुकूल असला पाहिजे. व्यापारात अनुकूलता जेवढी राखली जाईल तितका देशातील संपत्तीचा साठा वाढत जाईल आणि देशाची भरभराट होईल. असा व्यापारवादी विचारांचा मुलमंत्र होता.

### ४) निर्यात प्रोत्साहन व आयात निर्बंध :

व्यापार व उद्योगांवर नियंत्रण आणि निर्यातीला प्रोत्साहन हे व्यापारवादी विचारसरणीचे आणखी एक वैशिष्ट्य होते. अधिकाधिक निर्यात वाढविण्यासाठी दर्जेदार वस्तूंचे उत्पादन, वस्तूंच्या वाजवी किंमती, उत्पादनवाढ सातत्य, जलद वाहतूकीच्या सोयी, उद्योगांना विविध सवलती व अर्थसाहाय्य, विदेशी भांडवल गुंतवणूकीला देशात प्रोत्साहन तसेच कच्च्या मालाचे उत्पादन वाढविणे यांसारख्या बाबींवर भर दिला गेला. त्यातून देशाची निर्यात वाढण्यास मदत होत गेली. असे व्यापारवाद्यांचे मत होते.

निर्यातीला प्रोत्साहन देण्याबरोबरच आयातीवर निर्बंध घातले पाहिजेत. हे देखील व्यापारवादी विचारसरणीचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य होते. आयातीला निर्बंध घालण्यासाठी आयात मालावर कर आकारणे, चैनीच्या व अनावश्यक वस्तूंच्या आयातीवर बंदी, देशात उत्पादित न होणाऱ्या वस्तूंचीच आयात करणे, देशातून मौल्यवान धातुंची निर्यात होणार नाही. यांसारख्या बाबींवर व्यापारवाद्यांनी विशेष भर दिला. अशाप्रकारे उद्योग व व्यापार यावर कडक नियंत्रणे व निर्बंध लादून निर्यात वाढवून मौल्यवान धातूंची आयात करणे व त्याद्वारे राष्ट्राला सामर्थ्यवान बनविणे हे व्यापारवादी विचारसरणीचे प्रमुख वैशिष्ट्य होते.

### ५) राष्ट्रवादाचा पुरस्कार :

आर्थिक राष्ट्रवाद हे व्यापारवादी विचारसरणीचे, आणखी एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य मानले जाते. व्यापारवाद्यांनी आर्थिक राष्ट्रवादाचा जोरदार पुरस्कार केला. परराष्ट्र व्यापारात राष्ट्राराष्ट्रांत स्पर्धा चालते. यासाठी प्रत्येक राष्ट्राने आपल्या आर्थिक हितसंबंधांचा विचार केला पाहिजे. आपल्या देशाचा फायदा करुन घेत असताना दुसऱ्या देशाचे नुकसान झाले तरी त्याचा विचार करु नये. अशी व्यापारवाद्यांची भूमिका होती. आंतरराष्ट्रीय व्यापार हे साधन असून आर्थिक राष्ट्रवाद हे साध्य आहे. अशी व्यापारवादी विचारधारा होती. आर्थिक राष्ट्रवादामुळे राष्ट्रीय एकता निर्माण होऊन आर्थिकदृष्ट्या राष्ट्रांना सामर्थ्यशील करता येते. यावर व्यापारवाद्यांचा विश्वास होता. आर्थिकदृष्ट्या राष्ट्र एक झाल्यास देशाचा परराष्ट्रीय व्यापार वाढून मौल्यवान धातू प्राप्त करता येतात.

**६) आर्थिकदृष्ट्या सामर्थ्यवान राष्ट्राची निर्मिती :**

आर्थिकदृष्ट्या सामर्थ्यवान राष्ट्र निर्माण करणे हे सर्व व्यापारवाद्यांचे मुलभूत ध्येय होते. राष्ट्राच्या आर्थिक सामर्थ्यासाठी कोणतीही किंमत मोजण्याची व्यापारवाद्यांची तयारी होती. परराष्ट्रीय व्यापार हा एकमेव मार्ग असा आहे की, त्याद्वारे सामर्थ्यवान राष्ट्राची उभारणी करता येते. त्यासाठी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत देशाला महत्त्वाचे स्थान प्राप्त करुन देणे, त्यासाठी सुयोग्य अशा आर्थिक धोरणांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. थोडक्यात व्यापार म्हणजेच राष्ट्रनिर्मिती होय. अशी व्यापारवाद्यांची विचारसरणी होती.

**स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न :**

**अ) योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१) .................. पंथाने ऐहिक सुखात पैशाला व भौतिक वस्तूंना महत्त्व दिले.

अ) कॅथोलिक ब) प्रोटेस्टंट क) सनातन ड) नवसनातन

२) .................. विचार हे मध्ययुगीन विचारसरणीविरुध्द प्रतिक्रिया होय.

अ) निसर्गवादी ब) धार्मिक क) व्यापारवादी ड) सनातनी

३) व्यापारवाद्यांनी ........... क्षेत्राला सर्वश्रेष्ठ व्यवसायाचा दर्जा दिला.

अ) शेती ब) व्यापार क) उद्योग ड) सेवा

४) अनुकूल व्यापारशेष निर्माण करण्यासाठी निर्यातीपेक्षा आयात ..........असली पाहिजे.

अ) कमी ब) जास्त क) वाढ ड) मध्यम

५) राष्ट्राला आर्थिकदृष्ट्या बलवान बनविण्यासाठी राष्ट्राच्या संपत्तीत पर्यायाने ...... साठा वाढविला पाहिजे.

अ) अन्नधान्याचा ब) मौल्यवान धातूंचा क) मौलिक वस्तूंचा ड) सेवांचा

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) व्यापारवादी विचारांची प्रमुख दोन उद्दिष्ट्ये कोणती ?

२) विपुल लोकसंख्येचे समर्थन व्यापारवाद्यांनी का केले होते ?.

३) व्यापारवाद्यांच्या मते, राष्ट्राची खरी संपत्ती कोणती?

४) कॅथोलिक पंथाची शिकवण कशी होती?

५) व्यापारवाद्यांनी व्यवसायाचा क्रम कसा लावला?

**स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

**अ)** १) प्रोटेस्टंट २) व्यापारवादी ३) शेती ४) कमी ५) मौल्यवान धातु

**ब)** १) राष्ट्राला आर्थिकदृष्ट्या सामर्थ्यशाली करणे व संपत्ती संचयासाठी अनुकूल व्यापारतोल निर्माण करणे.

२) विपूल लोकसंख्येमुळे श्रमसंख्या वाढते व राष्ट्राचे लष्करी सामर्थ्य वाढविता येते.

३) पैसा किंवा मौल्यवान धातू (सोने, चांदी) हिच राष्ट्राची खरी संपत्ती होय.

४) व्यक्तीने भौतिक सुखापासून व पैशापासून दूर राहावे अशी शिकवण कॅथोलिक पंथाची होती.

५) सर्वोत्तम व्यापार, मध्यम उद्योग व कनिष्ठ शेती असा व्यापारवाद्यांचा व्यवसायाचा क्रम होता.

### १.३.२ निसर्गवाद : अर्थ आणि उदयाची कारणे
### (Physiocracy : Meaning & Emergence)

निसर्गवादाचा उदय १८व्या शतकामध्ये फ्रान्समध्ये झाला. फ्रान्समध्ये निसर्गवादाचा उदय होण्यापूर्वी व्यापारवादी विचारसरणीचा प्रभाव होता. फ्रान्सचा अर्थमंत्री 'कोल्बर्ट' याने व्यापारवादी धोरणांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली. त्यामुळे फ्रान्समध्ये व्यापारवादी विचार रुजलेले होते. मात्र त्या काळात फ्रान्स हा कृषीप्रधान देश असल्याने, फ्रान्समधील विचारवंत हे निसर्गावर श्रध्दा ठेवणारे होते. त्यांनी निसर्गनियमांचा पुरस्कार केला होता. नैसर्गिक नियमांचे पालन योग्य प्रकारे केल्याने समाजाचे जास्तीतजास्त हित साध्य होते, असे या विचारवंतांचे मत होते. शेती हा एक उत्पादक व्यवसाय आहे. त्यामुळे राष्ट्राची संपत्ती वाढविण्यासाठी परराष्ट्रीय व्यापार वाढविण्यापेक्षा शेतीच्या विकासावर भर दिला पाहिजे, अशी विचारसरणी फ्रान्समध्ये उदयाला आली. या विचारसरणीलाच निसर्गवादी विचार असे म्हटले जाऊ लागले.

निसर्गवादी विचारसरणी ही प्रामुख्याने व्यापारवादी विचारसरणीच्या पार्श्वभूमीवर उदयाला आली असल्याने ''निसर्गवाद म्हणजे व्यापारवादाविरुध्द पुकारलेले बंड होय.'' असे म्हटले जाते. या विचारसरणीचे जे प्रवर्तक फ्रान्समध्ये होते. त्यांना 'निसर्गवादी' (Physiocrats) या नावाने ओळखले जाते. या निसर्गवादी विचारसरणीमध्ये प्रामुख्याने डॉ. क्वेस्ने, मिरॉबु, तुर्गो, नेमॉर्स इ. विचारवंतांचा समावेश होतो. या निसर्गवाद्यांनी जे विविध विचार मांडलेले आहेत. त्यालाच निसर्गवाद या नावाने ओळखले जाते.

**निसर्गवादाच्या व्याख्या :**

विविध विचारवंतांनी निसर्गवादाच्या व्याख्या देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यापैकी काही प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे देता येतात.

**१) ड्युपॉट नेमॉर्स** : 'निसर्गवाद म्हणजे नैसर्गिक व्यवस्थेचे किंवा निसर्गनिर्मित पध्दतीचे शास्त्र होय.'

(Physiocracy as "the science of the natural order - Dupant Namours)

**२) प्रो. हॅने :** 'निसर्गवाद म्हणजे फ्रेंचांनी व्यापारवादाविरुध्द पुकारलेले बंड होय.'

वरील व्याख्या लक्षात घेतल्यानंतर असे स्पष्ट होते की, निसर्गवाद ही एक बंधनविरहीत व्यवस्था आहे. तसेच निसर्गवाद ही व्यापारवादाविरुध्दची प्रतिक्रिया आहे.

**निसर्गवादाच्या उदयाची कारणे : (Causes of Emergence of Physiocracy)**

निसर्गवादाचा उदय फ्रान्समध्येच झाला. त्याला फ्रान्समधील तत्कालीन परिस्थितीच जबाबदार होती. त्यानुसार फ्रान्समध्ये निसर्गवादाचा उदय घडून येण्यास जी कारणे जबाबदार ठरली ती पुढीलप्रमाणे सांगितली जातात.

**१) फ्रान्समधील परिस्थिती :**

कॉलबर्ट हा फ्रान्सचा पंतप्रधान असताना त्याने फ्रान्समध्ये व्यापारवादी विचारसरणीचा अवलंब केला होता. मात्र त्याच्या व्यापारवादी धोरणामुळे फ्रान्सच्या शेतीचे अतोनात नुकसान झाले. युध्द खर्च आणि देशावर झालेले कर्ज फेडण्यासाठी शेतकरी वर्गावर प्रचंड कर लादले जात होते. शिवाय शेतकऱ्यांना जमीनदारांना खंड द्यावा लागत असे त्यामुळे एकूणच फ्रान्सच्या शेतीची दुरावस्था झालेली होती. त्यातूनच कॉलबर्टच्या व्यापारवादी विचारसरणीवर प्रचंड टीका करण्यात आली. फ्रान्समधील जनता कॉलबर्टच्या व्यापारवादी धोरणाच्या विरुध्द होती. त्यातूनच निसर्गवादी विचार पुढे येण्यास पोषक वातावरण तयार झाले.

**२) जुलमी राजसत्ता :**

या काळात फ्रान्समध्ये जुलमी राजेशाही अस्तित्वात होती. फ्रान्समध्ये १४व्या, १५व्या आणि १६व्या लुईच्या कारकिर्दीत अनेक युध्दे झाली. तसेच त्यांचा राज्यकारभार अत्यंत उधळपट्टीचा होता. हे सर्व राजे 'मी म्हणजे राज्य' (I am the State) असे समजत होते. त्यामुळे चैन व विलासामध्ये ते मग्न होते. त्यांनी फ्रान्सचा खजिना रिकामा केला. शिवाय फ्रान्सला कर्जबाजारी करुन सोडले. कर्जफेडीसाठी त्यांनी जनतेवर सक्तीने कर लादले. अशा या जुलमी राजवटीविरुध्द तेथील जनतेत असंतोषाची लाट पसरली. त्याचेच पर्यवसन म्हणून निसर्गवाद या नव्या विचारसरणीचा उदय झाला.

**२) शेतीची दुरावस्था :**

व्यापारवादी विचारसरणीमुळे शेतीला अत्यंत कनिष्ठ समजले गेले. शेती व्यवसायाकडे पूर्णत: दुर्लक्ष केले. त्यामुळे तेथील शेतीचा विकास पूर्णत: थांबला. फ्रान्समधील एकूण शेतजमिनीपैकी २/३ शेतजमीन सरकार व धर्मगुरुंकडे होती. अशा जमिनीवर मात्र कसलाही कर आकारला जात नसे, मात्र शेतकऱ्यांच्या जमिनीवर भरमसाट कर आकारणी केली जात होती. जबरदस्तीने गरीब शेतकऱ्यांकडून सक्तीने करवसुली केली जात असे. व्यापारवादी धोरणांमुळे फ्रान्समधील शेती ही पूर्णत: मागास राहिली. या काळात फ्रान्सच्या शेतीची अत्यंत दुर्दशा झाली. त्यामुळे कोलबर्टने शेती व्यवसायाचा विनाश घडवून आणलेला आहे आणि त्यामुळेच फ्रान्सवर आपत्ती ओढविलेली आहे असे क्वेस्ने या विचारवंतांनी मत मांडले. क्वेस्नेच्या मते, शेतकरी श्रीमंत झाला तर देश श्रीमंत होईल. शेती हेच संपत्तीचे साधन आहे. व्यापार नाही, यातूनच निसर्गवादी विचारसरणी फ्रान्समध्ये जोर धरु लागली.

**४) व्यापारवादाविरोधी प्रतिक्रिया :**

व्यापारवादी विचारसरणीचा अनुकूल परिणाम फ्रान्समध्ये घडून आला नाही. उलट प्रतिकूल परिणामच घडून आला. व्यापारवादी धोरणामुळे शेतीकडे दुर्लक्ष झाले. त्यातूनच फ्रान्समध्ये दु:ख व दारिद्र्य मोठ्या प्रमाणावर वाढले. याच काळात इंग्लंडमध्ये शेती क्षेत्रात क्रांती घडून आली आणि शेतीचे महत्त्व लक्षात आले. फ्रान्समधील मिरॉबू व मॅदिस्वयु यांनी इंग्लंडला भेट देऊन तेथील शेती क्रांतीचा आढावा घेतला. इंग्लंडने शेती विकासाच्या जोरावर जे वैभव प्राप्त केले. ते त्यांनी फ्रान्समधील लोकांच्या लक्षात आणून दिले. राष्ट्राची प्रगती व्यापारामुळे होत नसून शेतीमुळेच होते असा विचार फ्रान्समध्ये रुळू लागला. यातूनच निसर्गवाद उदयाला आला.

**५) ज्ञानविज्ञान क्षेत्रातील नवी दिशा :**

१४ व्या लुईच्या कारकिर्दीत फ्रान्समधील जनतेला बाहेरच्या जगाची, तसेच ज्ञानाची दारे बंद होती. त्यामुळे फ्रेंच जनतेला बाहेरील जगामध्ये झालेल्या बदलांची, नव्या ज्ञानाची जाणीवच झाली नव्हती. मात्र त्यानंतरच्या दोन पिढ्यानंतर ही परिस्थिती बदलत गेली. विशेषत: इंग्लंडमधील विचारांची व ज्ञानाची सर्वंकष माहिती फ्रान्समधील जनतेला मिळू लागली. फ्रान्समधील लोक इंग्लंडमध्ये जाऊन इंग्रजी आत्मसात करु लागले. अनेक इंग्रजी ग्रंथांची फ्रेंच भाषेत भाषांतरे होऊ लागली. इंग्लंडमधील न्यूटन, लॉक या विचारवंतांचे विचार फ्रान्समध्ये लोकप्रिय होऊ लागले. त्यातूनच फ्रान्समध्ये वैचारिक क्रांती घडून येऊ लागली. समता, व्यक्ती स्वातंत्र्य, न्याय या तत्वांवर आधारित नवी समाजरचना निर्माण करण्याची प्रेरणा निर्माण होऊ लागली. अशा बदलत्या परिस्थितीमध्ये निसर्गवादासाठी विचारवंतांनी फ्रान्समध्ये सुयोग्य अशी पार्श्वभूमी निर्माण केली. त्यातूनच फ्रान्समध्ये निसर्गवादाची बीजे पेरली गेली.

**स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न :**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) निसर्गवाद ही .......................मध्ये उदयास आलेली विचारसरणी होय.

अ) इंग्लंड ब) फ्रान्स क) जर्मनी ड) जपान

२) ................ हा निसर्गवादाच्या प्रभावाचा कालखंड समजण्यात येतो.

अ) १६५६ ते १६७६ ब) १८५६ ते १८७६ क) १७५६ ते १७७६ ड) १७७६ ते १७९६

३) निसर्गवाद म्हणजे नैसर्गिक व्यवस्थेचे शास्त्र अशी व्याख्या ................. यांनी केली.

अ) प्रो. हॅने ब) ड्युपॉट दमूर क) मिरॉब्यु ड) क्वेस्ने

४) निसर्गवाद्यांच्या मते................ व्यवसायच उत्पादक होय.

अ) व्यापार ब) शेती क) उद्योग ड) सेवा

५) फ्रान्समध्ये व्यापारवादाची अंमलबजावणी ...................ने केली.

अ) क्वेस्ने ब) मिरॉब्यु क) कॉलबर्ट ड) प्रो. हॅने

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) ॲडम स्मिथने 'कृषीवादी संप्रदाय' असे नाव कोणत्या संप्रदायाला दिले?

२) निसर्गवादी विचारांचे प्रणेते कोण?

३) निसर्गवादी विचारप्रणालीपूर्वी, फ्रान्समध्ये कोणती विचारप्रणाली प्रभावी होती?

४) निसर्गवाद्यांच्या मते, कोणता व्यवसाय उत्पादक होय?

५) फ्रान्समध्ये निसर्गवादी विचारांचा पुरस्कार कोणत्या विचारवंतांनी केला?

**स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

**अ)** १) ब २) ब ३) ब ४) ब ५) क

**ब)** १) अर्थव्यवस्थेच्या दृष्टिने शेती हा महत्त्वाचा व्यवसाय आहे असे मानणाऱ्या विचाराला स्मिथने 'निसर्गवाद' असे नाव दिले.

२) डॉ. क्वेस्ने निसर्गवादी विचारांचे प्रणेते होय.

३) व्यापारवादी विचारसरणी फ्रान्समध्ये प्रभावी होती.

४) निसर्गवाद्यांच्या मते शेती व्यवसाय, मासेमारी, खाणकाम हे उत्पादक व्यवसाय होत.

५) फ्रान्समध्ये निसर्गवादी विचारसरणीचा पुरस्कार डॉ. क्वेस्ने, मिरॉब्यु, तुर्गो, नेमॉर्स या विचारवंतांनी केला.

### १.३.३ नैसर्गिक व्यवस्थेची संकल्पना आणि शेतीचे महत्त्व

### (The Concept of Natural Order and Primacy of Agriculture)

'नैसर्गिक व्यवस्था' ही निसर्गवाद्यांच्या विचारांची मुख्य तात्वीक बैठक आहे. नैसर्गिक व्यवस्थेला केंद्रस्थानी मानून निसर्गवाद्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. मुलत: निसर्गवाद्यांनी निसर्गवादाची व्याख्या करताना 'नैसर्गिक व्यवस्थेचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे निसर्गवाद' अशी केली आहे. त्यामुळे नैसर्गिक व्यवस्था ही निसर्गवाद्यांच्या विचारसरणीची मध्यवर्ती कल्पना मानली जाते.

व्यापारवादी विचारसणीमधून उद्‌भवलेल्या समस्यांना एक पर्यायी व्यवस्था म्हणून निसर्गवाद्यांनी 'नैसर्गिक व्यवस्था' या पध्दतीचा पुरस्कार केला आहे. व्यापारवादी विचारसरणीमुळे समाजव्यवस्थेवर जी अनेक बंधने आणि नियंत्रणे लादली होती. त्यामुळे मानवी स्वातंत्र्याचा संकोच झाला. त्यातून अनेक दु:खे निर्माण झाली. मात्र निसर्गवादी विचारसरणीनुसार मनुष्य हा जन्मत:च म्हणजे निसर्गत:च स्वतंत्र असतो, तो जन्माला येतो तेव्हा निसर्ग त्याच्यावर कोणतीही बंधने लादत नसतो. परंतु सरकार जेव्हा त्याच्यावर कृत्रिम बंधने लादते तेव्हा मानवी स्वातंत्र्य

हे एकप्रकारे हिरावून घेण्यासारखेच आहे. त्यामुळे समाजातील दु:खे वाढतात. निसर्गवाद्यांना अशी बंधनयुक्त व्यवस्था मान्य नव्हती. त्यामुळे लोकांची दु:खे नाहीशी व्हावी. त्यांना बंधनविरहीत जीवन जगता यावे त्यांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य प्राप्त व्हावे या उद्देशाने निसर्गवाद्यांनी नैसर्गिक व्यवस्थेचा पुरस्कार केलेला होता.

निसर्गवाद्यांच्या मते, नैसर्गिक व्यवस्था ही निसर्ग नियमानुसार चालणारी असते. ती एक आदर्श व्यवस्था असते तिचे नियम निसर्गाने किंवा ईश्वराने केलेले असतात. अशी ही निसर्गव्यवस्था असते. नैसर्गिक व्यवस्थेचे तीन अर्थ सांगता येतात.

१. कोणतीही सुधारणा झालेली नाही अशी व्यवस्था.

२. मानवी समाजाचे निसर्ग नियमानुसार नियंत्रण करणारी व्यवस्था.

३. ईश्वराने मानवजातीच्या सुखासाठी निर्माण केलेली व्यवस्था.

वरीलपैकी तिसरा अर्थ हा निसर्गवाद्यांना अभिप्रेत असलेला निसर्गव्यवस्थेचा अर्थ आहे. या अर्थाने नैसर्गिक व्यवस्थेचे वर्णन करताना निसर्गवादी असे म्हणतात की, नैसर्गिक व्यवस्था ही परमेश्वराची निर्मिती असून ती परमेश्वराने मानवजातीला दिलेली देणगी आहे. ती एक आदर्श, सर्वव्यापी, हितकारक आहे. निसर्ग व्यवस्था ही अत्यंत पवित्र आणि शाश्वत अशी व्यवस्था आहे. मनुष्य जातीच्या सुखासाठी ईश्वरानेच निर्माण केलेली ती व्यवस्था आहे. सरकारने कायदे करुन समाजात निर्माण केलेल्या व्यवस्थेपेक्षा निसर्गव्यवस्था श्रेष्ठ आहे. नैसर्गिक नियमानुसार चालणारी ही व्यवस्था असल्यामुळे त्यातून मानव जातीचे हित साधले जाते. निसर्ग नियम हे बिनचूक असतात. संपूर्ण विश्वाचे संचालन निसर्ग नियमांनी होत असल्याने निसर्ग नियमांचे पालन मानवाला करावे लागते. मानवी नियम हे मनुष्याने तयार केल्यामुळे ते सक्तीचे असतात. मात्र निसर्ग नियम हे विश्वाच्या कल्याणासाठी व मानवी सुखासाठी आहेत. त्यामुळे निसर्ग नियमांत शक्यतो हस्तक्षेप करु नये. सरकारने व समाजाने निसर्ग नियमानुसार वागले पाहिजे. त्यामुळे समाजाचे जास्तीतजास्त कल्याण साधले जाईल.

निसर्गवाद्यांनी निसर्ग व्यवस्था आणि नैसर्गिक नियम यांच्या आधारे निर्हस्तक्षेप नितीचा पुरस्कार केलेला आहे. त्यांच्या मते, देशाचा कारभार हा निसर्ग नियमानुसार चालतो. त्यामुळे सरकारने लोकांच्या खाजगी व्यवहारात ढवळाढवळ करु नये, लोकांचे जिवीत, स्वातंत्र्य आणि मालमत्ता यांचे रक्षण करणे एवढेच सरकारचे काम आहे. बाकी सर्व निसर्ग नियमानुसरच चालले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला निसर्ग नियमानुसार स्वातंत्र्य दिले तर प्रत्येक व्यक्तीचे जास्तीतजास्त कल्याण होते. निसर्गवाद्यांच्या मते नैसर्गिक व्यवस्था ही ईश्वरनिर्मित आहे. ती समजून घेणे हे प्रत्येकाचे पहिले कर्तव्य आहे आणि आपले जीवन या व्यवस्थेप्रमाणे ठेवणे हे आपले पुढचे कर्तव्य आहे.

**टीकात्मक परीक्षण :**

वरीलप्रमाणे निसर्गवाद्यांनी जी नैसर्गिक व्यवस्थेची संकल्पना मांडली. तिचे टीकात्मक परिक्षण पुढीलप्रमाणे–

**१) वैचारिक गोंधळ :**

नैसर्गिक व्यवस्था ही संकल्पना मांडत असताना निसर्गवाद्यांचा प्रचंड गोंधळ उडालेला दिसून येतो. त्यांचे विचार हे एकसारखे असलेले दिसून येत नाहीत. प्रत्येक विचारवंताने आपआपल्या कल्पनाशक्ती व प्रतिभेच्या जोरावर नैसर्गिक व्यवस्थेचे वर्णन केले असल्यामुळे त्यांच्यात मोठा वैचारिक गोंधळ उडालेला दिसून येतो.

**२) रंगतदार पण मोघम कल्पना :**

निसर्गवाद्यांनी नैसर्गिक व्यवस्थेचे वर्णन खूपच रंजक व रंगतदार पध्दतीने केलेले आहे. त्यांनी निसर्गव्यवस्थेचे वर्णन मोघम स्वरूपात केले आहे. त्यांचे आकलन सामान्य माणसाला होणे फारच कठीण आहे. निसर्गवाद्यांच्या विचारांत शास्त्रीय दृष्टिकोन व तर्कसंगतता यांचा अभाव आहे.

**३) परस्परविरोधी विचारांचे मिश्रण :**

निसर्गवाद्यांच्या नैसर्गिक व्यवस्थेबाबतच्या विचारांत भिन्नता आढळून येते. त्याचप्रमाणे त्याच्या विचारांमध्ये परस्परविरोधी विचारांचे मिश्रण आढळून येते. एका बाजूला ते निर्हस्तक्षेपाचे धोरण सांगतात. तर दुसऱ्या बाजूला ते शेतीला संरक्षण द्यावे असेही सुचवितात. तसेच ते व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार करतात. मात्र त्याच वेळी अनियमित राजेशाहीचेही समर्थन करतात. एकूणच त्यांच्या विचारांमध्ये परस्पर विरोधी नाती दिसून येतात.

**४) निसर्ग नियमांना अवास्तव महत्त्व :**

निसर्गवाद्यांची निसर्ग नियमांवर अवास्तव श्रध्दा होती. सर्व काही निसर्ग नियमानुसार सुरळीत चालते. त्यामुळे निसर्गनियमाचे पालन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. प्रत्येकालाच आपले हित कशात आहे हे कळते असे असले तरी व्यक्तीचे हित व समाजाचे हित यामध्ये परस्परविरोध असू शकतो. त्याचप्रमाणे प्रत्येकाला आपले हित कशात आहे हे कळेलच असे नाही. त्याप्रमाणे व्यक्तीला अमर्याद स्वातंत्र्य दिले तर त्याचे रूपांतर स्वैराचारात होईल याकडे निसर्गवादी पाठ फिरवतात.

**५) प्रो. हॅने यांची टीका :**

प्रो. हॅने यांच्या मते, निसर्गवाद्यांच्या काळात भौतिकशास्त्र व जीवशास्त्राचा फारसा विकास झालेला नसल्याने, ते परमेश्वर आणि निसर्ग यांसारख्या आध्यात्मिक कल्पनांमध्ये गुंतले गेले. मात्र त्या काळात भौतिकशास्त्र व जीवशास्त्राचा विकास झाला असता तर कदाचित निसर्गवादी स्वत:ला नैसर्गिक व्यवस्थेच्या कक्षेबाहेर घेऊन गेले.

**शेतीचे श्रेष्ठत्व संकल्पना :**

निसर्गवाद्यांच्या मते, उत्पादन म्हणजे वाढाव्याची निर्मिती होय. अशा प्रकारचा वाढावा हा केवळ शेतीतून मिळतो. अशी निसर्गवाद्यांची भूमीका होती. कारण त्यांच्या मते, शेतीमध्ये जेवढा उत्पादन खर्च येतो. त्यापेक्षा कितीतरी पटींनी संपत्ती निर्माण होते. निव्वळ उत्पादनाची व्याख्या करताना निसर्गवादी म्हणतात की, कोणतेही उत्पादन करताना उत्पादनासाठी नष्ट झालेली सामग्री झालेल्या उत्पादनातून वजा केल्यानंतर जे शिल्लक राहते ते

निव्वळ उत्पादन असते, असे निव्वळ उत्पादन किंवा वाढावा हा केवळ शेतीमधूनच होतो. इतर व्यवसाय वा उद्योगांमधून असा वाढावा किंवा निव्वळ उत्पादनाची निर्मिती होत नाही. म्हणूनच निसर्गवाद्यांच्या मते, केवळ शेती क्षेत्र एकमेव उत्पादक क्षेत्र असून बाकीची सर्व क्षेत्रे अनुत्पादक आहेत. याचाच अर्थ शेती शिवाय अन्य व्यवसाय हे कनिष्ठ आहेत असे निसर्गवाद्यांनी सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

शेती व्यवसाय हाच केवळ उत्पादक व्यवसाय असून इतर व्यवसाय कसे अनुत्पादक असतात. याचेही स्पष्टीकरण निसर्गवाद्यांनी आपल्या स्पष्टीकरणाद्वारे केले आहे. त्यांच्या मते अन्य व्यवसायांमध्ये वाढावा निर्माण होत नाही. मात्र शेतीमध्ये मुठभर पेरुन प्रचंड उत्पादन मिळते. व्यापार, उद्योग वा अन्य व्यवसायांमध्ये असे होत नाही. व्यापरामध्ये निव्वळ उत्पादन मिळत नाही. कारण व्यापारामध्ये उत्पादित वस्तू केवळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचविण्याचे काम केले जाते. म्हणजेच व्यापाराद्वारे वस्तूच्या मूळ उत्पादनामध्ये भर पडत नाही. म्हणून हा व्यवसाय अनुत्पादक आहे. त्याप्रमाणे कारखानदारी व कारखान्यामध्ये काम करणारे कामगार हे घटक सुध्दा उत्पादक नसतात. कारण कारखान्यात कच्च्या मालाचे रूपांतर पक्क्या मालात केले जाते असे रूपांतर म्हणजे निर्मिती नव्हे. उदा. कापड गिरणीतील कामगार कापसापासून कापडाची निर्मिती करतात. मात्र तेथे जेवढा कच्चा माल वापरला जातो त्यापेक्षा अधिक पक्का माल तयार होत नाही. म्हणजेच तेथे वाढावा निर्माण होत नाही. उदा. समजा कापडाचे उत्पादन करण्यासाठी १० किलो कापूस वापरला तर १०० किलो कपड्यांचे उत्पादन होणार नाही, मात्र शेतीत मुठभर पेरले तर पोतेभर उगवते याचाच अर्थ असा की, शेतीत जसा वाढावा निर्माण होतो तसा उद्योगांत होत नाही. यावरुन शेती हेच क्षेत्र उत्पादक आहे इतर क्षेत्रे अनुत्पादक आहेत असे निसर्गवादी म्हणतात.

निसर्गवाद्यांना एका गोष्टीची निश्चित कल्पना होती की, शेती पेक्षा व्यापार व उद्योगधंद्यामध्ये अधिक फायदा होतो. कारण व्यापार व उद्योगांमध्ये मुळ वस्तूच्या उपयोगितेत वाढ करुन तिची किंमत वाढविली जाते, मात्र निसर्गवाद्यांच्या मते, उपयोगितेमध्ये अशी वाढ करणे म्हणजे निर्मिती किंवा वाढावा नव्हे कारण बेरीज म्हणजे गुणाकार नव्हे. त्यामुळे शेती या एकमेव व्यवसायामध्येच वाढावा अगर निव्वळ उत्पादनाची निर्मिती होत असल्याने शेती हा व्यवसाय उत्पादक असून इतर सर्व व्यवसाय हे अनुत्पादक आहेत. त्यामुळे शेती हीच राष्ट्राची संपत्ती आहे. शेतीमधूनच संपत्ती निर्माण होत असल्याने निसर्गवाद्यांनी शेतीला सर्वश्रेष्ठ स्थान दिले होते. थोडक्यात निसर्गवाद्यांनी आपल्या वरील विचारसरणीमधून निव्वळ उत्पन्नाच्या आधारे शेतीला सर्वश्रेष्ठ स्थान देऊन व्यापाराला कनिष्ठ स्थान देण्याचा प्रयत्न केला आहे.

**टीकात्मक परीक्षण :**

निसर्गवाद्यांच्या 'शेतीचे श्रेष्ठत्व' या संकल्पनेवर पुढीलप्रमाणे टीका केली जाते.

१) निसर्गवाद्यांनी उत्पादन म्हणजे वाढाव्याची निर्मिती अशी उत्पादनाची व्याख्या केली आहे, परंतु त्यांची व्याख्या चुकीची आहे अशी टीका करण्यात येते. ॲडम स्मिथच्या मते, उत्पादन म्हणजे उपयोगितेची व मूल्याची निर्मिती असते. त्यामुळे निसर्गवाद्यांचे विचार कमकुवत ठरतात.

२) शेतीमध्ये वाढाव्याची निर्मिती होते. त्यामुळे शेती हाच व्यवसाय केवळ उत्पादक असून इतर व्यवसाय हे अनुत्पादक असतात. ही निसर्गवाद्यांची विचारसरणी पूर्णपणे चुकीची आहे. कारण शेतीप्रमाणेच उद्योग व व्यापार या व्यवसायांमध्येही उपयोगतेची व मूल्यांची निर्मिती होत असल्याने व्यापार व उद्योग शेतीपेक्षा अधिक उत्पादक ठरतात.

३) निसर्गवाद्यांनी शेतीला अवास्तव महत्त्व देऊन शेतीचे श्रेष्ठत्त्व सिध्द करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी व्यापारवाद्यांचा वचपा काढण्यासाठी व्यापाराला कनिष्ठ लेखून शेतीला श्रेष्ठ स्थान देण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र निसर्गवाद्यांचा हा प्रयत्न म्हणजे ॲडम स्मिथच्या मते, वाकलेली काठी सरळ करण्यासाठी ती दुसऱ्या बाजूलाही वाकवायची, असे करण्यासारखे आहे. कारण निसर्गवाद्यांनी शेतीला अवास्तव महत्त्व देऊन इतर क्षेत्रांना कमी लेखण्याची घोडचूक केली आहे.

४) निसर्गवाद्यांच्या विचारसरणीत तर्कसंगतपणा दिसून येत नाही. त्यांची संपत्तीची व्याख्या ही संदिग्ध स्वरुपाची आहे. केवळ शेतीतील वस्तूंनाच ते संपत्ती मानतात. निसर्गवादी शेतीत पिकणाऱ्या कापसाला संपत्ती मानतात. मात्र कारखान्यात त्याच कापसापासून जो कापूस तयार होतो त्याला मात्र ते संपत्ती मानत नाहीत. मूलत: शेतात पिकणारा कापूस व त्यापासून कारखान्यात तयार होणारे कापड यांचे महत्त्व समानच आहे याकडे निसर्गवादी सोईस्कर डोळेझाक करतात.

५) शेतीला महत्त्वाचे स्थान देण्याच्या भावनेतून निसर्गवाद्यांनी त्यांच्या विचारसरणीला अतिशय रंजक स्वरूप दिलेले आहे. त्यातूनच ज्या गुंतागुंती निर्माण झाल्या त्यातून त्यांना कधीही बाहेर पडता आले नाही. म्हणूनच त्यांची शेतीचे श्रेष्ठत्त्व आणि एकूणच त्यांनी मांडलेल्या सर्वच कल्पना भ्रामक आहेत अशीही टीका केली जाते.

**स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न :**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) निसर्ग नियम म्हणजे काय?

२) निसर्गवाद्यांच्या मते, मानवाचे पहिले कर्तव्य कोणते?

३) निसर्गवाद्यांनी व्यापाराबाबत कोणत्या धोरणाचे समर्थन केले?

४) निसर्गवाद्यांनी संपत्तीच्या कोणत्या रूपांत मान्यता दिली?

५) निसर्गवाद्यांच्या मते, वाढावा कोणत्या व्यवसायात निर्माण होतो?

**ब) खालील विधाने योग्य पर्याय निवडून पूर्ण करा.**

१) निसर्गवाद्यांच्या मते, आधिक्य अथवा वाढावा फक्त ........... मध्येच निर्माण होतो.

अ) शेती ब) व्यापार क) उद्योग ड) कारखाना

२) निसर्गवाद म्हणजे नैसर्गिक व्यवस्थेचे शास्त्र होय अशी व्याख्या ...........यांनी केली.

अ) प्रो. हॅने ब) ड्युपॉट दमूर क) मिरॉब्यु ड) क्वेस्ने

३) निसर्ग व्यवस्थेत निसर्ग नियम .................. निर्माण केलेले असतात.

अ) ईश्वराने ब) मानवाने क) शासनाने ड) जनतेने

४) निसर्गवाद्यांच्या मते .............. व्यवसायच उत्पादक आहे.

अ) व्यापार ब) शेती क) उद्योग ड) सेवा

५) निसर्गवाद्यांनी मांडलेली ...................ही सर्वात महत्त्वपूर्ण संकल्पना आहे.

अ) निव्वळ उत्पन्न ब) वाढावा क) अधिक्य ड) शेतीचे श्रेष्ठत्व

**स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) ईश्वराने निर्माण केलेले नियम म्हणजे निसर्ग नियम होय.

२) निसर्गवादाचे ज्ञान प्राप्त करुन घेणे हे मानवाचे पहिले कर्तव्य आहे.

३) निसर्गवाद्यांनी खुल्या व्यापाराच्या धोरणाचे समर्थन केले.

४) निसर्गवाद्यांनी संपत्तीच्या वास्तव (अन्नधान्य) स्वरुपाला मान्यता दिली.

५) निसर्गवाद्यांच्या मते, वाढावा फक्त शेती व्यवसायातूनच निर्माण होतो.

**ब) रिकाम्या जागा भरुन खालील विधाने पूर्ण करा.**

१) अ २) ब ३) अ ४) ब ५) ड

### १.३.४ आर्थिक तक्ता : (Economique Tableau)

निसर्गवादी अर्थतज्ज्ञांच्या विविध विचारांपैकी एक महत्त्वपूर्ण कल्पना म्हणजे संपत्ती संचालनाचा तक्ता होय. यालाच डॉ. क्वेस्ने यांचा आर्थिक तक्ता (Tablau Economique) असे म्हणतात. निसर्गवादी संप्रदायाचा प्रणेता मानल्या जाणाऱ्या डॉ. क्वेस्ने यांनी हा संपत्ती संचालनाचा आराखडा मांडला आहे. हा सिध्दांत डॉ. क्वेस्ने यांनी १७५८ मध्ये फ्रान्सचा त्यावेळचा राजा १५वा लुई यांच्यासाठी लिहिला होता. क्वेस्ने यांच्या या कल्पनेच्या मांडणीमुळे निसर्गवादी विचारांना खूपच प्रसिध्दी मिळाली. मिरॉब्यु या निसर्गवादी विचारवंतांनी असे म्हटले आहे की, 'जगातील तीन महत्त्वाच्या शोधापैकी पहिला लिहिण्याचा, दुसरा पैशाचा आणि तिसरा शोध म्हणजे संपत्ती संचालनाचा शोध होय.'

निसर्गवाद्यांच्या मते, निव्वळ उत्पादन हे फक्त शेतीमध्येच मिळत असल्यामुळे शेती हाच एकमेव उत्पादक व्यवसाय आहे. शेतीमधून राष्ट्राची संपत्ती निर्माण होते. अर्थात शेतीमध्ये जी संपत्ती निर्माण होते ती समाजातील

विविध वर्गात फिरते, म्हणजेच संपत्तीचे संचालन होते. शेतीत निर्माण झालेल्या संपत्तीचे संचालन विविध वर्गात होते आणि पुन्हा ही संपत्ती शेतीमध्येच येऊन मिळते. शरीराच्या रक्त संचालनाच्या कल्पनेवरुन क्वेस्नेला ही कल्पना सुचली ज्याप्रमाणे शरीरामध्ये रक्ताचे संचालन झाल्याने मानवाचे आरोग्य टिकून राहते. त्याप्रमाणे शेतीत निर्माण झालेल्या संपत्तीचे संचालन देशाच्या विविध वर्गात होत राहते व त्यामुळे देशाचे स्वास्थ्य व कार्यक्षमता टिकून राहते असे क्वेस्ने यांचे मत होते. संपत्तीचे संचालन कशाप्रमाणे विविध वर्गात होते ते स्पष्ट करण्यासाठी डॉ. क्वेस्ने यांनी एक तक्ता तयार केला. यालाच क्वेस्ने यांचा संपत्ती संचालनाचा आर्थिक तक्ता (Tableau Economique) असे म्हणतात.

क्वेस्नेच्या या कल्पनेप्रमाणे प्रत्येक वर्षी शेतीतील निर्माण होणाऱ्या संपत्तीचे संचालन समाजातील विविध वर्गात होते. यासाठी त्याने समाजाची विभागणी पुढील तीन वर्षात केली.

**१) उत्पादक वर्ग : (Productive Class)**

या वर्गामध्ये शेतीत काम करणाऱ्या शेतकरी वर्गाचा समावेश होतो. निसर्गवाद्यांच्या मते संपत्तीची निर्मिती ही शेतीतूनच होत असते. त्यामुळे शेतीत काम करणारा वर्ग हाच उत्पादक वर्ग असतो.

**२) जमीनदाराचा वर्ग : (Proprietor Class)**

या वर्गात जमीनदारांचा समावेश केलेला आहे. निसर्गवाद्यांनी या वर्गात जमीनदारांबरोबरच सरंजामदार व धर्मगुरूंचाही समावेश केलेला आहे. जमिनीची मालकी या वर्गाकडे असल्याने जमिनीपासून त्यांना खंड मिळतो.

**३) अनुत्पादक वर्ग : (Unproductive Class)**

या वर्गामध्ये कारखानदार, कारागीर, व्यापारी, कामगार म्हणजेच शेती सोडून इतर सर्व व्यवसाय, उद्योग यांचा समावेश होतो. हा सर्व वर्ग अनुत्पादक वर्ग असतो असे निसर्गवादी म्हणतात.

निसर्गवाद्यांच्या मते, संपत्तीचे संचालन वरील तीन वर्गात होत असताना शेतीत काम करणाऱ्या उत्पादक वर्गामधून संपत्ती निर्माण होते. या उत्पादक वर्गाने निर्माण केलेल्या संपत्तीचे संचालन सुरु होते. पुढे ही जमिनदार वर्गाकडे संचालित होते. जमीनदार वर्गाकडून पुढे अनुत्पादक वर्गाकडे ही संपत्ती जाते व पुन्हा ही जमीनदार व अनुत्पादक वर्गाकडील ही संचालित झालेली संपत्ती उत्पादक वर्गाकडे जाते, हे संपत्तीचे संचालन डॉ. क्वेस्ने यांनी एका आर्थिक तक्त्याद्वारे केलेले आहे.

**आर्थिक तक्ता : (Tableau Economique)**

समाजाची विभागणी वरील प्रमाणे तीन वर्गात केल्यानंतर संपत्तीचे संचालन कसे घडून येते यासाठी क्वेस्ने यांनी त्याचे उदाहरणासह स्पष्टीकरण दिले. त्यानुसार त्यांनी एका विशिष्ट वर्षात देशातील शेती क्षेत्रामधून ५ कोटी रु.ची संपत्ती निर्माण होते असे मानून या संपत्तीमध्ये समाजामध्ये संचालन कसे होते हे त्यांनी पुढील तक्त्याद्वारे दाखविले.

**संपत्ती संचालन (कोटींमध्ये)**

| **अवस्था** | **उत्पादक वर्ग** | **जमीनदार वर्ग** | **अनुत्पादक वर्ग** |
|---|---|---|---|
| पहिली | ५ | ० | ० |
| दुसरी | २ | २ | १ |
| तिसरी | ३ | ० | २ |
| चौथी | ५ | ० | ० |

वरील तक्त्याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

**१) पहिली अवस्था :** पहिल्या अवस्थेमध्ये उत्पादक वर्गाने शेतीमधून एकूण ५ कोटी रुपयांची संपत्ती निर्माण केली आहे. या संपत्तीचे समाजातील उर्वरीत दोन वर्गामध्ये संचालन होते. सुरवातीला जमीनदार वर्ग व अनुत्पादक वर्ग यांच्याकडे शून्य संपत्ती आहे. कारण सर्व संपत्ती ही शेतीतूनच तयार होत असल्याने ती उत्पादक वर्गाकडेच आहे.


**२) दुसरी अवस्था :** दुसऱ्या अवस्थेत शेतकरी (उत्पादक) वर्गाकडे असणाऱ्या ५ कोटी संपत्तीपैकी २ कोटी संपत्ती हा वर्ग स्वत:कडे ठेवतो व उरलेल्या ३ कोटी रुपयांचे संचालन होते. कारण या उत्पादक शेतकऱ्यांना शेतजमिनीची मशागत, इतर कामे, अवजारे, खते, बी-बियाणे, स्वत:ची उपजीविका यांवर खर्च करावा लागतो. म्हणून तो एकूण उत्पादित ५ कोटी संपत्तीपैकी या सर्व खर्चाकरता स्वत:कडे ठेवेल. या ३ कोटी रुपयांचा विनियोग जमीनदारांना त्यांचा खंड २ कोटी रुपये व अनुत्पादक वर्गाकडून १ कोटी रुपये किंमतीच्या वस्तू व सेवांची खरेदी करुन करेल. त्यामुळे या दुसऱ्या अवस्थेत जमीनदार वर्गाकडे २ कोटी उत्पादक वर्गाकडे २ कोटी व अनुत्पादक वर्गाकडे १ कोटी असे एकूण संपत्तीचे संचालन होईल.

**३) तिसरी अवस्था :** तिसऱ्या अवस्थेत जमीनदार वर्ग आपल्या जवळील २ कोटी रुपयांपैकी १ कोटी रुपयांचे उत्पादक वर्गाकडून अन्नधान्य खरेदी करेल व उर्वरीत १ कोटी रुपयांच्या वस्तू व सेवा अनुत्पादक वर्गाकडून खरेदी करेल. त्यामुळे आता जमीनदार वर्गाकडे ० संपत्ती राहील. मात्र त्याचवेळी उत्पादक वर्गाकडे संपत्ती ३ कोटी होईल. अशाप्रकारे या अवस्थेत संपत्तीचे संचालन होईल.

**४) चौथी अवस्था :** संपत्तीचे संचालन सतत पुढे चालू राहात असल्याने चौथ्या अवस्थेत अनुत्पादक वर्गाकडे जे २ कोटी रुपये आहेत. त्यामध्ये त्यांना जगण्यासाठी अन्नधान्याची खरेदी करावी लागत असल्याने त्यासाठी १ कोटी रु. खर्च होतील. याशिवाय या अनुत्पादक वर्गाला आपल्या उद्योग, व्यवसायामधील वस्तू व सेवांच्या उत्पादनाकरता कच्च्या मालाची गरज भासते. उदा. कापड निर्मिती करता कापूस, साखर व गुळ उत्पादनाकरिता ऊस, औषध निर्मितीकरता औषधी वनस्पती इ. मात्र हा सर्व कच्चा माल उत्पादक वर्गाकडेच असल्याने अनुत्पादक वर्ग उर्वरीत १ कोटी रुपयांचा कच्चा माल त्यांच्याकडूनच विकत घेईल. आता यातून अनुत्पादक वर्गाकडील २ कोटी रुपये सुध्दा उत्पादक वर्गाकडे संचालित होतील. त्यामुळे अनुत्पादक वर्गाकडे

० संपत्ती उरते. सरतेशेवटी उत्पादक वर्गाकडे ५ कोटींचे संचालन होते व जमीनदार व अनुत्पादक वर्गाकडील संपत्ती ० एवढी राहते. थोडक्यात संपत्ती संचालनाद्वारे एकूण मुळ संपत्ती जशी उत्पादक वर्गाकडून जमीनदार व अनुत्पादक वर्गाकडे जाते तशी ती पुन्हा सर्वच्या सर्व आर्थिक संचालनाद्वारे उत्पादक वर्गाकडे परत येते.

या वरील संपत्ती संचालनाचे नेमके स्वरुप आपणाला पुढील आकृतीद्वारे लक्षात येईल.




**टीकात्मक परीक्षण :**

निसर्गवादी विचारवंत डॉ. क्वेस्ने यांनी मांडलेल्या 'संपत्ती संचालनाचा आराखडा' किंवा आर्थिक तक्ता यावर पुढीलप्रमाणे काही टीका केल्या जातात.

**१) जमीनदार वर्गाला अवाजवी महत्त्व :** डॉ. क्वेस्ने यांनी आपल्या संपत्ती संचालनाच्या आराखड्यामध्ये 'जमीनदार' या वर्गाला गरजेपेक्षा जास्त महत्त्व दिलेले आहे. कारण क्वेस्ने यांच्या आराखड्यानुसार उत्पादक वर्गाद्वारे शेतीमधून जेव्हा ५ कोटी रूपयांची संपत्ती निर्माण होते. तेव्हा त्यातील तब्बल २ कोटी रू. खंडाच्या मोबदल्याच्या रूपात एकट्या जमीनदार वर्गालाच दिले जातात. मात्र या जमीनदार वर्गाच्या तुलनेत जे कारागीर, उद्योजक, व्यापारी, व्यावसायिक कष्टपूर्वक विविध प्रकारच्या भांडवली व उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करून त्याचा समाजाला पुरवठा करतात. अशा या वर्गाला निसर्गवादी 'अनुत्पादक' ठरवून त्यांना एकूण संपत्तीतील ५ कोटींपैकी केवळ १ कोटी रू. देतात व त्याच्या तुलनेत उत्पादन निर्मिती व वितरण यांसारख्या कोणत्याही प्रक्रियेत सहभागी नसलेल्या जमीनदार वर्गाला त्या जमिनीच्या मालकी हक्कापोटी खंड स्वरूपात तब्बल २ कोटी रूपये म्हणजे अनुत्पादक वर्गाच्या दुप्पट संपत्ती दिली जाते.

**२) समाजाची चुकीची वर्गवारी :** निसर्गवाद्यांनी समाजाची विविध वर्गामध्ये केलेली विभागणी ही मूलत:च चुकीची आहे. कारण त्यांनी कोणतेही कष्ट वा उत्पादनाची निर्मिती, वितरण यामध्ये सहभागी नसणाऱ्या जमीनदार वर्गाला उत्पादक वर्गाचा दर्जा दिला. मात्र त्याचवेळी उत्पादन व वितरणामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडणाऱ्या कष्टाळू अशा कारागीर, व्यापारी, व्यावसायिक, उद्योजक यांना मात्र त्यांनी अनुत्पादक लेखून त्यांना संपत्तीमधील अल्प वाटा दिला. परिणामी जी संकल्पना उत्पादकाला अनुत्पादक व अनुत्पादकाला उत्पादक ठरवून संपत्तीचे त्यांच्यामते संचालन करते ती सद्य काळात अप्रस्तुत ठरते.

**३) आर्थिक तक्त्याचे काल्पनिक रूप :** डॉ. क्वेस्ने यांनी मांडलेला संपत्ती संचालनाचा आराखडा हा काल्पनिक आहे, अशी त्यावर टीका केली जाते. कारण प्रत्येक निश्चित एवढ्याच संपत्तीची निर्मिती का होते. त्यातील संपत्तीचा ठराविक एवढाच वाटा विविध वर्गाला का दिला जातो. ठराविकच वर्ग उत्पादक व अनुत्पादक का असतो? यांसारख्या प्रश्नांचे योग्य स्पष्टीकरण निसर्गवादी देऊ शकले नाहीत. दरवर्षी ठराविक एवढीच संपत्ती निर्माण होते. उत्पादित वस्तूच्या किंमती स्थिर असतात. संपत्तीचे संचालन विशिष्ट नियमांनीच होते. यांसारख्या अवास्तव गृहीतांवर निसर्गवादी विचारसरणी आधारलेली असल्याने ही कल्पनाच पूर्णपणे अवास्तव व काल्पनिक असल्याची टीका केली जाते.

**४) निव्वळ उत्पन्नाच्या कल्पनेस छेद दिला :** निसर्गवाद्यांची संपत्ती संचालनाची संकल्पना ही निव्वळ उत्पन्नाच्या संकल्पनेवर आधारलेली आहे. मात्र निव्वळ उत्पादनाच्या संकल्पनेत त्यांनी जमीनदार या वर्गाला अवास्तव महत्त्व दिल्याने निव्वळ उत्पन्नाच्या कल्पनेलाच तडा गेलेला आहे. कारण त्यांच्या कल्पनेनुसार जमीनदाराला मिळणारा खंड हा निसर्गाच्या औदार्यामुळे मिळतो. जमीनदार हा ईश्वराचा प्रतिनिधी असल्याने जमिनीतून निर्माण होणाऱ्या संपत्तीचा हिस्सा त्याला द्यावाच लागेल. मात्र वास्तवात जमीनदारांनी जमिनीमध्ये जी भांडवली गुंतवणूक केलेली असते त्या भांडवलापोटी खंड स्वरूपात त्याला मोबदला मिळत असतो. तो परमेश्वराचा प्रतिनिधी आहे म्हणून हा मोबदला त्याला दिला जात नाही. त्यामुळे त्याच्या निव्वळ उत्पादन या संकल्पनेलाच छेद गेला आहे.

अशाप्रकारे निसर्गवादी विचारवंतांनी मांडलेल्या संपत्ती संचालनाच्या संकल्पनेवर वरील विविध टिका होत असल्या तरी या संकल्पनेचे महत्त्व आजही टिकून आहे. ही संकल्पना मांडून डॉ. क्वेस्ने यांनी अर्थशास्त्रीय अभ्यासाला एक ईष्ट वळण दिलेले आहे. ही बाब मान्यच करावी लागेल. डॉ. क्वेस्ने यांच्या या आर्थिक तक्त्यामुळे अर्थशास्त्रीय अभ्यासामध्ये 'विभाजनाला' महत्त्व प्राप्त झाले. शिवाय या तक्त्यामुळे अर्थशास्त्रीय विश्लेषणात गणितीय पद्धती रूजण्यास सुरूवात झाली. त्यातुनच पुढे अर्थशास्त्रीय अभ्यास व विश्लेषणाचा 'गणितीय संप्रदाय' उदयाला आला. त्याचे श्रेय डॉ. क्वेस्ने आणि त्यांच्या या आराखड्यालाच जाते. शिवाय संपत्ती संचालनाच्या या आराखड्यातूनच पुढे राष्ट्रीय संपत्तीची निर्मिती व त्याचा चक्राकार प्रवाह या महत्त्वपूर्ण संकल्पना उदयाला येऊन विकसित झाल्या. डॉ. क्वेस्नेच्या या संकल्पनेतूनच पुढे एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण समाजाच्या विविध वर्गामध्ये कसे होते. या प्रश्नाच्या अभ्यासाला सुरूवात झाली. या सर्वांमुळेच डॉ. क्वेस्ने यांच्या संपत्ती संचालन या आर्थिक आराखड्याच्या संकल्पनेला अर्थशास्त्रीय अभ्यासात आजही महत्त्वपूर्ण स्थान आहे.

**स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न :**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. डॉ. क्वेस्ने यांनी आर्थिक तक्ता फ्रान्सचा राजा ------ साठी लिहीला.

अ) १३ वा लुई ब) १४ वा लुई क) १५ वा लुई ड) १६ वा लुई

२. डॉ. क्वेस्ने यांनी संपली संचालनाचा आराखडा ------ मध्ये मांडला.

अ) १७५८ ब) १७५६ क) १७७६ ड) १७२७

३. शरीरातील ------ संचालनाच्या कल्पनेवरून डॉ. क्वेस्नेंना 'आर्थिक तक्ता' ही संकल्पना सुचली.

अ) पाणी ब) पित्त क) वायू ड) रक्त

४. डॉ. क्वेस्ने यांनी आपल्या संपत्ती संचालनाच्या आराखड्यात समाजाची विभागणी ------ वर्गात केली.

अ) दोन ब) तीन क) चार ड) पाच

५. संपत्ती संचालनाच्या आराखड्यामध्ये ------ अवस्था दिल्या आहेत.

अ) एक ब) दोन क) तीन ड) चार

**ब) पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. संपत्ती संचालनामध्ये उत्पादक वर्ग म्हणून कोणाला महत्त्वपूर्ण स्थान दिलेले आहे?

२. डॉ. क्वेस्नेंनी आर्थिक तक्त्यामध्ये अनुत्पादक वर्गामध्ये कोणाचा समावेश केलेला आहे?

३. डॉ. क्वेस्नेच्या मते, जमीनदार, वर्गाला संपत्तीचा वाटा कशाबद्दल दिला जातो?

४. संपत्ती संचालनामध्ये उत्पादक वर्गाकडून किती संपत्ती निर्माण होत, असे मानले आहे?

५. डॉ. क्वेस्ने यांनी आपल्या संपत्ती संचालनाच्या आराखड्यामध्ये झुकते माप कोणत्या वर्गाला दिलेले आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे.**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१) - क २) - अ ३) - ड ४) - ब ५) - ड

**ब) एका वाक्यात उत्तरे.**

१. संपत्ती संचालनामध्ये उत्पादक वर्ग म्हणून शेतकरी वर्गाचा समावेश होता.

२. अनुत्पादक वर्गामध्ये डॉ. क्वेस्नेनी कारागीर व्यावसायिक व कारखानदार इ. चा समावेश केलेला आहे.

३. डॉ. क्वेस्नेच्या मते, जमीनदार हे इश्वराचे प्रतिनिधी असतात. त्यामुळे जमिनीच्या औदार्यामुळे त्यांना खंड द्यावा लागतो.

४. संपत्ती संचालनाच्या आराखड्यामध्ये उत्पादक वर्गाकडून एकूण ५ कोटी रू. एवढ्या संपत्तीची निर्मिती केली जाते.

५. डॉ. क्वेस्ने यांनी आपल्या संपत्ती संचालनाच्या आराखड्यामध्ये 'जमीनदार' वर्गाला झुकते माप दिलेले आहे.

**१.४ सारांश :**

मध्ययुगीन युरोपामध्ये व्यापारवादाचा उदय होण्यापूर्वी सरंजामशाही अस्तित्त्वात होती. नगरराज्याच्या कारभारात रोमन कॅथोलिक चर्चचा प्रभाव होता. या संपूर्णपणे विस्कळीत व परावलंबी रचनेला एकसंघ, स्वावलंबी व सशक्त करण्याचा प्रयत्न व्यापारवादाच्या रूपाने झाला. या अर्थाने व्यापारवाद ही मध्ययुगीन व्यवस्थेविरूद्धची एक प्रतिक्रिया होती. सरंजामशाही अवस्थेला व्यापारी रूप देण्याचा राष्ट्र प्रबळ बनविण्याचा हा प्रयत्न होता. अर्थशास्त्रीय विचारांच्या इतिहासातील एक सोनेरी पान म्हणून व्यापारवादाचा उल्लेख कराव लागतो.

व्यापारवादी विचारवंत राष्ट्राच्या सामर्थ्याचा व त्यासाठी आर्थिक सुबत्तेचा विचार करत होता. हे सामर्थ्य प्राप्त करण्याचा महत्त्वाचा मार्ग म्हणून त्यांनी मौल्यवान धातुंच्या संचयाला महत्त्व दिले. त्यासाठी देशात सोन्याच्या खाणी असतील तर ठीक नाहीतर त्यांना मिळविण्याचा आंतरराष्ट्रीय व्यापार हा एकमेव मार्ग त्यांनी निवडला. अनुकूल व्यापरतोल ठेवून देशाला सामर्थ्यशाली बनवावे असे त्यांचे मत होते, म्हणूनच तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात तसेच काही अंशी आजच्याही संदर्भामध्ये व्यापारवादाची धोरणे ही समर्थनीय ठरतात.

यानंतर १८ व्या शतकाच्या मध्यापासून या व्यापारवादी विचारसरणीच्या विरोधात फ्रान्समध्ये जे विचार पुढे आले त्या विचारसरणीचा आपण अभ्यास केला. ज्याला 'निसर्गवाद' म्हणून ओळखले जाते. यामध्ये निसर्गवादी विचारवंतांनी ईश्वरी प्रेरणेने स्थापन झालेल्या नैसर्गिक व्यवस्थेला प्राधान्य दिले, आणि त्या व्यवस्थेचे पालन करणे हे मनुष्याच्या हिताचे आहे असे मत व्यक्त केले. यालाच त्यांनी 'निसर्गवाद' असे म्हंटले आहे. या व्यवस्थेत समाजाचे नियमन आपोआप होते. त्यासाठी राज्यसंस्थेला समाजजीवनात ढवळाढवळ करण्याची गरज नसते.

उत्पादन खर्च आणि उत्पन्न यातील फरक म्हणजेच वाढावा किंवा निव्वळ उत्पन्न होय. ही निसर्गवाद्यांची संकल्पना अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टिने महत्त्वपूर्ण ठरली. व्यापारवाद्यांनी शेतीला कनिष्ठ लेखले तर त्याच शेतीचे श्रेष्ठत्त्व सिद्ध करण्यासाठी निसर्गवाद्यांनी टोकाचे प्रयत्न केले. त्यांनी शेती हाच एकमेव उत्पादक व्यवसाय मानून व्यापार, व्यवसाय, उद्योग यांना कनिष्ठ दर्जा दिला.

निसर्गवादी विचारसरणीचे प्रणेते असलेल्या डॉ. क्वेस्ने यांनी संपत्ती संचालनाचा आर्थिक तक्ता मांडून राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण व आर्थिक प्रश्नांचा संख्याशास्त्रीय अभ्यास करून काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढले. ज्यामध्ये संचालनातील 'उत्पन्न = खर्च = उत्पन्न' असा चक्राकार प्रवाह अस्तित्त्वात असतो. तसेच आर्थिक व्यवहारांमध्ये परस्परावलंबी व परीवर्तनीय घटकांचा प्रभाव असतो. त्यापैकी जर एकात बदल झाल्यास त्याचा परिणाम उरलेल्या सर्व क्षेत्रांवर होतो. त्यामुळे अर्थव्यवस्थेत परिवर्तनीय घटकात अंतिमत: समतोल प्रस्थापित होतो व तो सर्वोत्तम असतो. तसेच तो आपोआप होतो.

**१.५ पारिभाषिक शब्द :**

न्याय किंमत - योग्य किंमत

वस्तुविनीमय पद्धती - वस्तूच्या बदल्यात वस्तूची देवाण-घेवाण, भौतिक वस्तू - जडवस्तू, आपल्या सुख समाधानाच्या वस्तू.

सरंजामदार - जमिनीचा मालक/जमीनदार

सार्वभौमत्त्व - सर्वंकष सत्ता

विसंगती - विरोध

दमन - दाबून ठेवलेली/दबलेली

करारोपण - सरकारने जनतेवर लादलेले कर

आधिक्य - वाढावा अथवा जादा निर्मिती

निसर्गसत्ता - परमेश्वराने मानवी कल्याणासाठी केलेले नियम

निर्हस्तक्षेप निती - आर्थिक बाबींमध्ये सरकारचे हस्तक्षेप न करणे.

कृषीवादी संप्रदाय - शेती क्षेत्राला, अधिक महत्त्व देणारा वर्ग अथवा पंथ

**१.६ सरावासाठी प्रश्न :**

**अ) टीपा लिहा.**

१. व्यापारवादी विचारांची वैशिष्ट्ये

२. उद्योग व्यापारावर नियंत्रण व अनुकूल व्यापारतोल

३. निसर्गवाद

४. निव्वळ उत्पादन

५. निसर्गवादाची पार्श्वभूमी

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. व्यापारवाद म्हणजे काय ते सांगून व्यापारवादाची पार्श्वभूमी सविस्तर स्पष्ट करा.

२. व्यापारवादाची वैशिष्ट्ये सांगा.

३. व्यापारवाद म्हणजे काय? व्यापारवादी विचारांचे मूल्यमाप करा.

४. निसर्गवाद्यांनी मांडलेल्या पुढील संकल्पना स्पष्ट करा.

अ) निसर्गव्यवस्था    ब) राज्यसंस्थेची कार्ये

५. निसर्गवाद्यांची ‘शेतीचे श्रेष्ठत्त्व’ ही संकल्पना सविस्तर स्पष्ट करा

६. डॉ. क्वेस्ने यांनी मांडलेल्या ‘संपत्ती संचालनाच्या’ आराखड्याचे परीक्षण करा.

**१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ सूची :**


१. आर्थिक विचारांचा विकास - प्रा. विजय कवीमंडन, श्री मंगेश प्रकाशन, नागपुर

२. आर्थिक विचारांचा इतिहास - प्रा. ए. आर. रायखेलकर, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद

३. अर्थशास्त्रीय मतप्रणालींचा इतिहास - डॉ. श्री. वी. खांदेवाले, प्रा. सौ. अमरजा नेरूरकर

४. History of Economic Thoughts, H. L. Bhatia, Vikas Publication House, New Delhi.

५. Concise History of Economic Thoughts, by No Ghosh, Rama Ghosh.


***

# घटक – २

# सनातनवादी आर्थिक विचार

# (Classical Economic Thoughts)

**अनुक्रमणिका (Index)**

२.० उद्दिष्ट्ये (Objectives)

२.१ प्रस्तावना (Introduction)

२.२ विषय विवेचन (Subject axplonation)

२.२.१ ॲडम स्मिथ, श्रमविभागणीचे तत्त्व, मूल्य सिद्धांत आणि करांची तत्त्वे.

(Adam Smith - Division Labour, Theory of Value and Canons of Taxtion)

२.२.२ डेव्हीड रिकार्डो : मूल्य सिद्धांत आणि विभाजनविषयक विचार

(Davied Ricardo - Theory of Value and Views of distribution)

२.२.३ थॉमस माल्थस : लोकसंख्या सिद्धांत (Thomos Malthus : Theory of Population)

२.२.४ आर्थिक अरिष्ट सिद्धांत (Theory of Gluts)

२.३ सारांश (Summary)

२.४ पारिभाषिक शब्द (Glossaries libitum)

२.५ सरावासाठी स्वाध्याय (Assignment for exercise)

२.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ (Extra Resources for Extra reading)

## २.० उद्दिष्टे (Objectives) :

प्रस्तुत घटकाच्या अध्ययनातून आपणास पुढील माहिती होईल.

१. सनातन कालखंड व सनातनी संप्रदायाचा अर्थ समजावून घेता येईल.

२. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांचे जीवन कार्य लक्षात येईल.

३. ॲडम स्मिथ यांनी मांडलेला मूल्य सिद्धांत, श्रमविभागणीचे तत्त्व आणि करारोपणाची तत्त्वे अभ्यासता येतील.

४. डेव्हीड रिकार्डो यांनी मांडलेला मूल्य सिद्धांत व त्याचे विभाजनाविषयीचे विचार समजावून घेता येतील.

५. थॉमस माल्थस यांनी मांडलेला लोकसंख्याविषयक सिद्धांत व त्यांची आर्थिक अरिष्ठाची संकल्पना अभ्यासता येईल.

**२.१ प्रस्तावना (Introduction) :**

१६ व्या शतकामध्ये इंग्लंड, फ्रान्स, रशिया इत्यादी देशांमध्ये व्यापारवादी विचारसरणी अस्तित्वात होती. पुढे १८ व्या शतकात व्यापारवादी विचारसरणीला विरोध होऊन निसर्गवादी विचारसरणीचा उदय झाला. मात्र यानंतर पुढील काळात म्हणजे १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात युरोप खंडामध्ये उत्पादनाच्या नव्या पद्धती, तंत्रे, नवनवे शोध इ. मुळे अनेक बदल घडून आले. उत्पादनामध्ये, त्याच्या स्वरूपात प्रचंड वाढ व बदल घडून आले. त्यामुळे या नव्या बदललेल्या परिस्थितीतील आर्थिक प्रश्न सोडविणे, त्याचे विश्लेषण करून त्यावर उपाय योजणे या संदर्भामध्ये जुने विचार तोकडे व कालबाह्य ठरू लागले. परिणामी आर्थिक विचारांची मांडणी नव्याने केली जाऊ लागली. या नव्या विचारांनाच सनातनवादी आर्थिक विचार (Classial Economic Thoughts )म्हंटले जाते व असे विचार ज्या ज्या विचारवंतांनी मांडले त्यांच्या गटाला 'सनातनवादी' (Classial School) असे म्हंटले जाते. सनातनवादी संप्रदाय (Classical School) हा शब्दप्रयोग सर्वप्रथम कार्ल मार्क्सनी वापरला.

सनातनवादी संप्रदायाची सुरवात ॲडम स्मिथपासून झाली. १७७६ ते १८४८ हा कालखंड सनातनवादी विचारांचा कालखंड म्हणून ओळखला जातो. या सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांच्या गटामध्ये ॲडम स्मिथ, डेव्हीड रिकार्डो, थॉमस माल्थस आणि जे. एस. मिल या अर्थतज्ञांचा समावेश होतो. सनातनवादाचा मुख्य प्रवर्तक ॲडम स्मिथ हा होता. डेव्हीड रिकार्डो आणि थॉमस माल्थस यांनी सनातनवादी आर्थिक विचारांना योग्य चालना दिली. तर जे. एस. मिल यांनी इंग्लंडच्या बाहेर या विचारांचा प्रचार-प्रसार केला. अर्थात जे. एस. मिल हा अखेरचा सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ ठरला. एक बाब आपण याठिकाणी आवर्जून लक्षात घ्यायला हवी. ती म्हणजे या ठिकाणी 'सनातन' (Classical) हा शब्द जूनाट वा बुरसटलेले या अर्थानी अजिबात वापरलेला नाही, तर तो 'अभिजात' 'उत्कृष्ट' या अर्थानी वापरण्यात आलेला आहे. म्हणूनच सनातनवादी संप्रदायाला 'अभिमतपंथी' म्हणूनही संबोधले जाते.

प्रस्तुत घटकामध्ये आपण ॲडम स्मिथ यांचा मूल्य सिद्धांत, श्रमविभागणीचे तत्त्व आणि त्यांची करारोपणाची तत्त्वे पाहणार आहोत. त्याबरोबरच डेव्हीड रिकार्डोचा मूल्यविषयक सिद्धांत व त्यांचे विभाजनाविषयीचे विचार देखील समजावून घेणार आहोत, व शेवटी थॉमस माल्थसनी मांडलेला लोकसंख्याविषयक सिद्धांत व त्यांची आर्थिक अरिष्टाची मांडणी पाहणार आहोत.

## २.२ विषय विवेचन (Subject Explanation) :

वर सांगितल्याप्रमाणे सनातनवादी संप्रदायातील ॲडम स्मिथ, रिकार्डो व माल्थस या अर्थतज्ञांचे विचार आपण पुढील उप-घटकांद्वारे अभ्यासणार आहोत.

### २.३.१ ॲडम स्मिथ : श्रमविभागणीचे तत्त्व, मूल्य सिद्धांत आणि करारोपणाची तत्त्वे

### (Adam Smith : Division of Labour, Theory of Value and Canons of Taxtion) :

**जीवन परिचय (life Introduction) :-**

ॲडम स्मिथ यांचा जन्म ५ जून १७२३ रोजी स्कॉटलंडमधील किक्रालडी या छोट्याशा गावात झाला. त्यांच्या लहानपणातच त्यांचे वडील वारले त्यानंतर ॲडम स्मिथचे संगोपन आणि शिक्षण त्याच्या आईने केले. लहान असताना एका भटक्या निवासी टोळीने त्याचे अपहरण केले होते. परंतु त्याची सुटका त्याच्या चुलत्याने केली. ॲडम स्मिथ दिसायला अत्यंत कुरूप होता. परंतु त्याची बुद्धी अतिशय तल्लख होती. अत्यंत बुद्धीमंत असणारा असा हा ॲडम स्मिथ वयाच्या १४ व्या वर्षी ग्लासगो विद्यापीठामध्ये शिक्षणासाठी दाखल झाला. पुढील शिक्षण त्याने ऑक्सफर्ड विद्यापीठात पूर्ण केले. पुढे त्याने ग्लासगो विद्यापीठामध्ये १७५९ ते १७६३ या कालावधीत तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान या विषयांचे प्राध्यापक म्हणून अध्यापनाचे काम केले. त्याबरोबरच तेथे त्यांनी न्यायशास्त्र, राज्यशस्त्र असे विषयही शिकविले.

ग्लासगो विद्यापीठात कार्यरत, असताना त्याचा पहिला ग्रंथ १७५९ मध्ये 'थिअरी ऑफ मॉरल सेंटीमेंट' प्रसिद्ध झाला. या ग्रंथात त्याने नैतिक कल्पनांचा विचार केल्याने तो खूपच गाजला. पुढे ॲडम स्मिथची भेट एका ब्रिटीश सरदाराबरोबर झाली. ड्युक असे त्याचे नाव होते. या ड्युक नावाच्या सरदारासोबत त्याने युरोप खंडाचा दौरा केला. या दौऱ्यामध्ये त्याची अनेक व्यक्तीशी भेट झाली. त्यामध्ये फ्रान्समधील हॉल्टेअर, तुर्गो, कवेस्ने यांचा समावेश हातो. युरोप खंडाच्या दौऱ्यावर असताना स्मिथने Wealth of Nations या ग्रंथाच्या लिखाणाला सुरूवात केली. पुढे १७७६ मध्ये त्यांचा हा ग्रंथ लंडनमध्ये प्रकाशित झाला. त्याचे पूर्ण नाव (An Inquiry into the Causes and Nature of Wealth of Nations) म्हणजेच ''राष्ट्राच्या संपत्तीच्या स्वरूपाची व तिच्या कारणांची चौकशी'' असे होते. या ग्रंथामुळे अर्थशास्त्राला एक स्वतंत्र शास्त्र म्हणून मान्यता मिळाली.

ॲडम स्मिथ हा एक सौजन्यशील आणि तत्त्वज्ञानी माणूस होता. त्याचे ग्रंथांवर अपार प्रेम होते. यांत्रिक क्षेत्रात अनेक शोध लावणारा जेम्स वॅट हा त्याचा मित्र होता. जीवनभर तो अविवाहीत व ब्रम्हचारी राहीला. आयुष्यभर तो स्नायूंच्या दुखण्यांनी त्रस्त होता. त्याचे डोके कधी कधी कंप पावत असे व बोलणे अडखळत असे असा हा जगप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व अर्थशास्त्राचा जनक १७९० मध्ये स्वर्गवासी झाला.

**ॲडम स्मिथचे आर्थिक विचार :**

ॲडम स्मिथ यांचे आर्थिक विचार अभ्यासण्यापूर्वी आपणास त्यांच्या विचारांमागील तात्विक बैठक

लक्षात घ्यावी लागेल. ॲडम स्मिथ यांचे तत्त्वज्ञान ज्या विविध कल्पनांवर आधारित आहे. त्यात पुढील बाबींचा समावेश होतो.

१. निसर्ग व्यवस्थेच्या अस्तित्त्वाची कल्पना

२. निसर्ग व्यवस्थेत मानवी हित साध्य करणाऱ्या अदृश्य शक्तीचे अस्तित्त्व

३. सरकारी हस्तक्षेप नसणारी अनिर्बंद्ध व्यक्तिस्वातंत्र्य असणारी कल्पना

४. व्यक्तीच्या स्वहित तत्परतेची कल्पना

५. सर्व व्यक्तींच्या जन्मजात स्वातंत्र्याचा व समानतेच्या कल्पनेतून उगम पावलेला विश्ववाद.

वरील तत्त्वज्ञानाच्या पायावर ॲडम स्मिथ यांची विचारसरणी आधारलेली आहे. आशावाद, निसर्गवाद, श्रमविभागणी, उदारमतवाद, निर्हस्तक्षेप नीती, मुल्यनिश्चिती, सार्वजनिक अय-व्यय इत्यादी अनेक विचार ॲडम स्मिथने वरील तत्त्वज्ञानाच्या आधारावर मांडलेले आहेत.

प्रस्तुत घटकामध्ये अभ्यासक्रमानुसार ॲडम स्मिथच्या वरील विविध विचारांपैकी मूल्य सिद्धांत व कर कसोट्या आणि श्रमविभागणीचे तत्त्व, यावरील त्यांच्या विचारांचा आढावा आपण घेणार आहोत.

**श्रमविभागणीचे तत्त्व (Principale of Division of Labour) :**

कोणत्याही राष्ट्राच्या संपत्तीत वाढ करण्यासाठी सामर्थ्य वाढविण्यासाठी संपत्ती संचयाची नितांत आवश्यकता असते. याच संपत्ती संचयासाठी व्यापारवाद्यांनी परकिय व्यापाराला तर निसर्गवाद्यांनी शेतीला सर्वोच्च प्राधान्य दिले. परंतु ॲडम स्मिथच्या मते, सर्वप्रकारचे उत्पादक श्रम हेच सर्वाधिक महत्त्वपूर्ण असे संचयाचे महत्त्वपूर्ण उगमस्थान आहे. त्याने श्रमाचे उत्पादक श्रम व अनुत्पादक श्रम असे वर्गीकरण केले.

**१) उत्पादक श्रम (Producer Labour) :**

उत्पादक श्रम म्हणजे असे श्रम की ज्याद्वारे दृश्यमान असणाऱ्या जड वस्तूंचे उत्पादन केले जाते. उदा. टि.व्ही, फ्रिज, मोबाईल, टू-व्हीलर इ.

**२) अनुत्पादक श्रम (Unproductable Labour) :**

अनुत्पादक श्रम म्हणजे असे श्रम ज्याद्वारे अदृश्य अशा भौतिक सेवांची निर्मिती केली जाते. उदा. खेळ, मनोरंजन, शिक्षण, आरोग्य सेवा इ.

ॲडम स्मिथने वस्तूच्या स्वरूपावरून त्याचे उत्पादन करणाऱ्यांचे उत्पादक श्रम व अनुत्पादक श्रम असे वर्गीकरण जरी केले असले तरी आज स्मिथने ज्या श्रमाला अनुत्पादक मानलेले होते त्यांना उत्पादक श्रम मानले जाते. कारण सद्याच्या काळात मूर्त वस्तूंच्या उत्पादनापेक्षा विमा, बॅंकिंग, सॉफ्टवेअर इ. सारख्या अमूर्त वस्तू व सेवांचेच महत्त्व व उत्पादन यात वाढ झालेली दिसून येते.

अॅडम स्मिथने आपल्या 'राष्ट्राची संपत्ती' या ग्रंथामध्ये श्रमाच्या वरील वर्गीकरणासोबतच श्रमविभागणीचे तत्त्व देखिल सविस्तरपणे मांडलेले आहे. वास्तविक श्रमविभागणीचे तत्त्व हे अगदी प्राचीन ग्रीक, संस्कृतीपासूनच अस्तित्त्वात होते. स्मिथपूर्वीही अनेक विचारवंतांनी त्यावर प्रकाश टाकलेला दिसून येतो. मात्र स्मिथने या तत्त्वाचे नव्या व बदललेल्या परिस्थितीमध्ये शास्त्रीय पद्धतीने व सविस्तर विवेचन केले. व या संकल्पनेचा विस्तार केला आहे. स्मिथने श्रमविभागणीचे तत्त्व हे मानवाच्या उपजत अशा परस्पर देवाणघेवाण करण्याच्या प्रवृत्तीतूनच विकसित होत असल्याचे सांगितले. अॅडम स्मिथच्या श्रमविभागणीचे मूळ त्याच्या निसर्गवादी विचारात आहे. म्हणजेच मनुष्याच्या स्वहित शोधण्याच्या वृत्तीतून देवघेवीचे व्यवहार पार पडतात. यातूनच श्रमविभागणीच्या तत्त्वाचा उगम झालेला आहे.

स्वत:च्या गरजा भागविण्यासाठी लागणाऱ्या सर्वच वस्तू व सेवांची उत्पादन व निर्मिती एकटी व्यक्ती करू शकत नाही. म्हणून ज्या वस्तू वा सेवांचे उत्पादन जी व्यक्ती करते त्यांचे जादाचे नग इतरांना देऊन त्या बदल्यात आपल्याला लागणाऱ्या इतर वस्तू व सेवा ती व्यक्ती इतरांकडून घेत असते. या देवाण-घेवाणीच्या व्यवहारांमध्ये व्यक्तीचा हेतू हा इतरांना मदत करणे वा परोपकार करणे हा नसतो. तर त्यामागील मूळ प्रेरणा ही स्वहित साधण्याचीच असते. अशा स्वहित साधण्याच्या प्रवत्तीतूनच श्रमविभागणीची सुरवात होते. याच श्रमविभागणीतून समाजाचे महत्तम हित साधले जाते. स्मिथच्या मते, यामागे एका अदृश्य शक्तीचा हात असतो. थोडक्यात व्यक्तीची स्वहित साधण्याची उपजत प्रवृत्ती, देवाण-घेवाणीमागील स्वार्थ, या बाबी नियंत्रित करणारी अदृश्य शक्ती त्यातून साध्य होणारे समाजहित यातून श्रमविभागणीची निर्मिती होत असल्याने ती निसर्गनिर्मित आर्थिक संस्था आहे.

**श्रमविभागणीचे फायदे :**

अॅडम स्मिथने श्रमविभागणीवर जो भर दिला. त्यामुळे इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीस उत्तेजन मिळाले. याचा परिणाम म्हणून त्यानंतर अनेक राष्ट्रांनी औद्योगिक विकासाला अनुकूल भूमिका घेतली. त्यामुळेच कार्ल मार्क्स अॅडम स्मिथचा उल्लेख औद्योगिक युगाचा पहिला अर्थतज्ज्ञ म्हणून गौरव करतो. अॅडम स्मिथच्या याच श्रमविभागणीच्या तत्त्वाचे फायदे पुढीलप्रमाणे.

१. श्रमाची व वेळेची बचत.

२. कार्यक्षमता व उत्पादन कौशल्यात झालेली वाढ.

३. जलद व मोठ्या प्रमाणावरील उत्पादन.

४. कामातील सर्वोत्तमता व संशोधनाला प्रोत्साहन.

५. सामाजिक कल्याणात वाढ.

वरील सर्व मुद्यांचे सविस्तर विश्लेषण पुढीलप्रमाणे.

**१) श्रम, वेळ व पैशांची बचत :-** एकाच वस्तू उत्पादनाची विविध कार्ये जर एकाच व्यक्तीने केली तर त्यासाठी अधिक श्रम व पैशांचा व्यय होतो. मात्र हीच सर्व उत्पादनाची कार्ये अनेक व्यक्तीमध्ये विभागली व प्रत्येकाला एकच एक काम सातत्याने करायला दिल्यास ती व्यक्ती कमीत कमी वेळेत जास्तीतजास्त उत्पादन करले की जे कमी खर्चिक असेल. कारण त्यातून पूर्वी एका प्रकारचे काम संपवून दुसऱ्या प्रकारचे काम सुरू करण्यातील वेळ वाचतो. शिवाय त्यांना कामासाठी लागणारी हत्यारे, तंत्रे, कच्चा माल यामध्ये सतत बदल करावा लागत नाही. साधनसामग्री, वेळ, श्रम आणि पैसा यांचा अपव्यय कमी होऊन त्याची बचत होते.

**२) कार्यक्षमता व उत्पादकतेतील सुधारणा :-** श्रमविभागणीमध्ये प्रत्येक कामगार हा एकच एक प्रकारचे काम सातत्याने करीत राहिल्याने त्यामध्ये तो प्राविण्य प्राप्त करतो. त्याची कार्यक्षमता वाढते आणि उत्पादकतेत देखिल वाढ घडून येते. यातून पूर्वीएवढ्याच श्रमसंख्येतून अधिकाधिक उत्पादन घेता येते. श्रमिकाचा कामाचा वेगही वाढतो. इतकेच नव्हे तर कामातील सातत्यामुळे न बघता देखील यांत्रिकपणे देखिल काम होऊ लागते. परिणामी कौशल्यपूर्ण श्रमाद्वारे गुणवत्तापूर्ण उत्पादन केले जाते. परिणामी श्रमिकांचे वेतनही वाढते व या वाढलेल्या वेतनातून त्यांची उत्पन्नपातळी वाढून त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावतो. शेवटी या सर्वातून श्रमाची कार्यक्षमता वाढते.

**३) जलद व मोठया स्वरूपातील उत्पादन :-** श्रमविभागणीमुळे कामगारांना सातत्याने एकाच प्रकारचे काम करावे लागत असल्याने त्याच्या कामाची गती वाढत जाते. शिवाय ते त्या कामामध्ये पारंगत होतात. यातून उत्पादनातही प्रचंड वाढ घडून येते. श्रमविभागणीतून हे फायदे कसे प्राप्त होतात हे सांगण्यासाठी स्मिथने एक उदाहरण दिले आहे. समजा, जर एका कारखान्यातील एका-एका कामगारांना टाचण्या तयार करण्याचे काम प्रत्येकास स्वतंत्रपणे दिले. की, जे काम १८ प्रकारात विभागलेले असते. त्यातून त्या कामगाराकडून दिवसाकाठी २० टाचण्या तयार होतात. मात्र त्याच वेळी जर १० कामगारांमध्ये हे काम १८ प्रकारात विभागले तर दर दिवशी ४८००० टाचण्या तयार होतात. म्हणजे एक कामगार दररोज सरासरी ४८०० टाचण्यांची निर्मिती करतो. थोडक्यात श्रमविभागणीतून प्रत्येक कामगारांची टाचण्याच्या उत्पादनाची क्षमता २४० पटींनी वाढली.

**४) उत्पादन कार्यात सुधारणा व संशोधनात वाढ :-** विशिष्ट प्रकारचे एकच एक काम सातत्याने करावे लागत असल्याने प्रत्येक वेळी ते आपल्या कामाच्या पद्धतीत, तंत्रात, कार्यात सुधारणा करतात. आपले काम अधिकाधिक जलद, गुणवत्तापूर्ण होण्याकरता ते नवनवी तंत्रे शोधतात. उत्पादनाच्या चांगल्या पद्धतींचा शोध घेण्याची त्यांची संशोधन वृत्ती वाढीस लागते. उत्पादन कार्यातील चुका टाळून त्या सुधारण्यावर भर दिला जातो.

**५) महत्तम कल्याण साध्य होते :-** श्रमविभागणीतून जे फायदे होतात त्यातून केवळ उद्योजकांचे उत्पादन व नफाच वाढत नाही तर कामगारांचे उत्पन्न वाढून त्यांचा राहणमानाचा दर्जा उंचावतो. साधनसामग्री, भांडवल, कच्चा माल, श्रम यांची बचत होते. एकूणच उत्पादन, उत्पन्न, नफा, गुंतवणूक या सर्वांमध्ये वाढ घडून उद्योगांचे, व्यक्तीचे व एकूणच समाजाचे महत्तम कल्याण साध्य होते.

**श्रमविभागणीचे तोटे :** ॲडम स्मिथने वरीलप्रमाणे श्रमविभागणीचे फायदे विषद केले असे नाही तर त्याने 'आपल्या राष्ट्राची संपत्ती' या ग्रंथामध्ये श्रमविभागणीतून होणाऱ्या फायद्यांसोबतच त्यातून उद्‌भवू शकणारे तोटेही सांगितलेले आहेत. हे तोटे दाखवून देत असताना स्मिथने त्यावरील उपायांचीही चर्चा केलेली आहे.

**१) काम कंटाळवाणे होते :-** कामात जेंव्हा श्रमाची विभागणी केली जाते तेंव्हा एकाच कामगाराला एकाच प्रकारचे काम सातत्याने करावे लागते. त्यामुळे त्याचे कौशल्य, बुद्धिमत्ता यांना वाव राहत नाही. तेच ते काम करून त्यातील नाविन्य हरवून जाते. त्यामुळे ते काम त्याच्यासाठी कंटाळवाणे होऊन जाते.

**२) गतिशीलतेत घट :-** कामगार बराच काळ एकाच प्रकारचे काम करीत राहिल्याने त्यांना इतर प्रकारांतील कामात स्वत:ला सामावून घेणे कठीण जाते. भिन्न उत्पादन, वेगळी पद्‌धती यांचा सहजासहजी स्वीकार करणे त्याला शक्य होत नाही. थोडक्यात श्रमविभागणीमध्ये सातत्याने व प्रदिर्घ काळ तेच ते काम करीत राहिल्याने श्रमिकांची गतिशीलता कमी होते.

श्रमविभागणीतील वरील दोषांना दूर करण्यासाठी वा त्याची तीव्रता कमी करण्याकरता कामगारांसाठी शिक्षण, प्रशिक्षण, सोयी-सुविधा, सामाजिक व सांस्कृतिक स्वास्थ्य इ. बाबी दिल्यास हे दोष कमी होतील असे ॲडम स्मिथने सुचविले.

**श्रमविभागणीच्या मर्यादा :** देशाच्या सामाजिक व औद्योगिक विकासाकरता श्रमविभागणीचे तत्त्व हितकारक असले तरी या तत्त्वाच्या काही नैसर्गिक मर्यादा असल्याचे स्मिथने मान्य केले आहे. या मर्यादा पुढीलप्रमाणे.

**१) बाजारविषयक मर्यादा :-** श्रमविभागणीचे तत्त्व जिथे लागू केले जाते तेथील बाजारपेठेचे स्वरूप कसे आहे. यावर त्याची यशस्वीता अवलंबून असते. श्रमविभागणी यशस्वी होण्याकरता बाजारपेठा या संघटीत व विकसित असायला हव्यात. त्याचा विस्तार झालेला असला पाहिजे. ज्याद्‌वारे उत्पादन घटक, साधनसामग्री, भांडवल या सर्वांचे संयोग जुळून येतील. त्यांच्या मागणी-पुरवठ्यात, वितरणात अडथळे असणार नाहीत. असे असेल तर श्रमविभागणी फायदेशीर ठरते. अन्यथा त्यावर मर्यादा येते.

**२) भांडवल पुरवठा :-** उत्पादननिर्मिती व त्यातील वाढ ही जशी श्रमावरून ठरते तशीच त्यासाठी 'भांडवलाची' भूमिका देखिल खूपच महत्त्वपूर्ण असते. श्रम विपूल असले व आपण त्याची विभागणीही केली मात्र जर या उत्पादनासाठीचे भांडवलच पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसेल ते महागडे असेल, त्याच्या उपलब्धतेमध्ये अनियमीतता असेल तर श्रमविभागणीचे तत्त्व कार्यक्षमपणे राबविता येत नाही. त्यावर मर्यादा येतात.

**३) विनिमय व्यवहारांचे स्वरूप :-** उत्पादन घटक, वस्तू व सेवा, भांडवल, साधनसामग्री इ. ची परस्पर देवाण-घेवाण, त्यांचे विनिमयातील व्यवहार हे जेवढे सुसूत्र व जलद असतील त्याचा विस्तार व व्याप्ती जेवढी जास्त असेल तेवढा श्रमविभागणीचा फायदा जास्त मात्र, विनिमयाच्या व्यवहारात जे अडथळे असतील त्यामध्ये सतत गतीरोध असतील तर मात्र श्रमविभागणीवर मर्यादा येतात.

श्रमविभागणीच्या वरील मर्यादा दूर करून त्याचे फायदे प्राप्त करून घेण्याकरता स्मिथने बाजारपेठांचा विस्तार नव्या बाजारपेठांचा शोध असे उपाय सुचविलेले आहेत.

**मूल्य सिद्धांत (Theory of Value) :**

वस्तूचे मूल्य कसे ठरते हे सर्वप्रथम सांगण्याचा प्रयत्न 'ॲडम स्मिथ' यांनी केला आहे. मात्र वस्तूच्या मूल्याबाबत ॲडम स्मिथला समाधानकारक उत्तर देता आले नाही. याची स्वत: ॲडम स्मिथने कबुली दिलेली आहे. वस्तूचे मूल्य कसे ठरते हे सांगताना ॲडम स्मिथचा प्रचंड गोंधळ उडालेला आहे. कारण त्याला शेवटपर्यंत वस्तूच्या मूल्याबाबत ठोसपणे, सांगता आलेले नाही. ॲडम स्मिथच्या वैचारिक गोंधळामुळे वस्तूच्या मूल्यासंबंधी त्याने एकाच वेळी दोन वेगवेगळे सिद्धांत मांडून गोंधळात अधिक भर घातलेली आहे.

वस्तूच्या मूल्याचा विचार करताना ॲडम स्मिथने एका ठिकाणी वस्तूचे मूल्य हे वस्तूच्या उपयोगितेवरून ठरते असे म्हंटले आहे. तर दुसऱ्या ठिकाणी त्याने वस्तूचे मूल्य हे तिच्या विनिमय मूल्यावरून ठरते असे म्हटलेले आहे. उपयोगिता मूल्य आणि विनिमय मूल्य यामध्ये त्याने जो फरक केला आहे तो पुढीलप्रमाणे.

**१) उपयोगिता मूल्य (Value in use) :–** वस्तूच्या उपयोगितेवरून जे मूल्य ठरते त्याला उपयोगिता मूल्य असे म्हणतात.

**२) विनिमय मूल्य (Value in Exchange) :–** एखाद्या वस्तूच्या बदल्यात इतर वस्तूंचे किती नग मिळतात. त्यावरून जे मूल्य ठरते त्याला त्याचे विनिमय मूल्य असे म्हंटले आहे.

ॲडम स्मिथने वरीलप्रमाणे उपयोगिता मूल्य आणि विनिमय मूल्य यामध्ये फरक केल्यानंतर त्याने असे स्पष्ट केले की, वस्तूचे मूल्य हे वस्तूच्या उपयोगितेवरून ठरत नाही. कारण ज्या वस्तूंना मोठे उपयोगिता मूल्य असते त्या वस्तूंना विनिमय मूल्य असतेच असे नाही. तसेच ज्या वस्तूंना मोठे विनिमय मूल्य असते अशा वस्तूंना उपयोगिता मूल्य असेलच असे नाही. या अनुषंगाने स्मिथने हिरा व पाण्याचे महत्त्व दिले आहे.

स्मिथच्या मते, पाणी ही अत्यंत उपयुक्त वस्तू असूनसुद्धा पाण्याला विनिमय मूल्य नसते कारण पाण्याच्या बदल्यात इतर वस्तू मिळण्याची शक्यता जवळपास नसते. मात्र हिरा ही वस्तू फारशी उपयोगाची नसून देखील त्याचे विनिमय मूल्य अधिक असते. त्यामुळे त्याच्या बदल्यात अनेक वस्तू मिळू शकतात. यावरून असे स्पष्ट होते की, ज्या वस्तूंना आर्थिक उपयोगिता मूल्य असते त्या वस्तूंना विनिमय मूल्य नसते. तर ज्या वस्तूंना अधिक विनिमय मूल्य असते त्यांना उपयोगिता मूल्य नसते. म्हणूनच ॲडम स्मिथने वस्तूच्या उपयोगिता मूल्याकडे पाठ फिरवून आपले सर्व लक्ष विनिमय मूल्यावर केंद्रित केले.

विनिमय मूल्यानंतर वस्तूच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या श्रमावरून वस्तूचे विनिमय मूल्य ठरते असे ॲडम स्मिथने स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते श्रम हे सर्व वस्तूंचे विनिमय मूल्य मोजण्याचे खरे साधन आहे. यावरच ॲडम स्मिथचा श्रम-मूल्य सिद्धांत आधारलेला आहे.

ॲडम स्मिथने मूल्याचे दोन प्रकार पाडले.

१) नैसर्गिक मूल्य (Natural Value) :-

२) बाजार मूल्य (Market Value) :-

त्यांच्या मते, नैसर्गिक मूल्य हे आदर्श व मुलभूत असते. परंतु बाजार मूल्य हे सतत बदलणारे असते. बाजारात सतत स्पर्धेची स्थिती असते. मागणी व पुरवठ्यात सतत बदल होत असतात. त्यामुळे बाजार मूल्य सतत बदलत असते. परंतू हे बाजार मूल्य नैसर्गिक मूल्याच्या खाली किंवा वर असे सतत फिरत राहात असते. यानंतर ॲडम स्मिथने वस्तूचे मूल्य कसे ठरते याबाबत विचार मांडताना एकाच वेळी दोन सिद्धांत मांडले त्यामुळे त्याचा बराच गोंधळ उडालेला दिसतो. कारण त्याने उपयोगिता मूल्याकडे दुर्लक्ष करून विनिमय मूल्यावर भर देऊन मूल्य सिद्धांत मांडला. आधुनिक काळात ज्या उपयोगिता मूल्यावरून वस्तूचे मूल्य ठरत त्या कल्पनेलाच त्याने अमान्य केले. त्यामुळे सीमांत उपयोगितेची कल्पना मागे पडली. त्याने जर उपयोगितेच्या कल्पनेस महत्त्व दिले असते तर आज जो मूल्य सिद्धांत योग्य समजला जातो त्या सिद्धांताची मांडणी कितीतरी वर्षे अगोदरच झाली असती.

अशाप्रकारे ॲडम स्मिथने मूल्य ठरविताना उपयोगिता मूल्याकडे दुर्लक्ष करून विनिमय मूल्याला जे महत्त्व दिले व मूल्य ठरविण्यात श्रमाला जे अधिकचे स्थान दिले त्यावरून स्मिथने श्रममूल्य सिद्धांत मांडला.

**श्रम-मूल्य सिद्धांत्त (Labour Theory of Value) :** ॲडम स्मिथच्या मते, वस्तूच्या उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या श्रमावरून वस्तूचे विनिमय मूल्य ठरते. श्रम हेच विनिमय मूल्य मोजण्याचे साधन आहे. याचा अर्थ एखादी वस्तू तयार करण्यासाठी जेवढे श्रम खर्च पडतील त्यावरून त्याची किंमत ठरते. समजा, सुताराला एक खुर्ची तयार करण्यासाठी ६ तास लागतात व टेबल तयार करण्यासाठी १२ तास लागतात. म्हणजे एका टेबलाची किंमत म्हणजे दोन खुर्च्या होय. कारण टेबल तयार करण्यासाठी दोन खुर्च्या तयार करण्याएवढा वेळ लागतो. श्रमाच्या मोजमापावरून टेबल व खुर्च्यांचे मूल्य ठरविले जाते. मात्र हे श्रमरूपी साधन सर्वच वस्तूच्या बाबतीत उपयुक्त ठरेलच असे नाही. कारण एखाद्या कमी कार्यक्षम कामगाराला १ टेबल तयार करण्यासाठी १८ तास लागत असतील तर अशावेळी एका टेबलाच्या मोबदल्यात ३ खुर्च्या द्याव्या लागतील. तेंव्हा वस्तू तयार करण्यासाठी लागणाऱ्या वेळेवरून मूल्य ठरते की श्रमावरून ठरते? याचे उत्तर देताना स्मिथचा गोंधळ उडालेला होता. याचा अर्थ वेळ हे श्रमाचे मोजमाप करण्याचे साधन असले तरी ते सर्वत्र उपयोगी पडत नाही.

ॲडम स्मिथने श्रमाच्या मूल्याचे चार वेगवेगळे अर्थ सांगितले ते पुढीलप्रमाणे.

१) एखादी उपयुक्त वस्तू तयार करण्यासाठी जेवढे श्रम खर्ची पडतात. त्यावरून त्या वस्तूंचे मूल्य ठरते.

२) एखाद्या वस्तूच्या उत्पादनासाठी जे श्रम लागतात त्या श्रमाच्या निर्मितीसाठी जो खर्च येतो. त्या खर्चावरून वस्तूचे मूल्य ठरते.

३) वस्तूचे मूल्य हे त्या वस्तूच्या मोबदल्यात जी वस्तू घेतली जाते. अशा वस्तूंच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या श्रमावरून ठरते.

४) मूल्याचे मापन केवळ त्या वस्तूच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या श्रमावरून केले जात नसून त्या वस्तूच्या मोबदल्यात जी वस्तू दिली जाते अशा वस्तूच्या निर्मितीसाठी खर्ची पडणाऱ्या श्रमावरून केली जाते.

अशाप्रकारे ॲडम स्मिथने श्रम या शब्दाचे वरीलप्रमाणे वेगवेगळे अर्थ सांगितल्याने त्याच्या विचारांमध्ये गोंधळ निर्माण झाला. त्यातून त्याने श्रमावर आधारित दोन सिद्धांत मांडले. वस्तूच्या उत्पादनावर खर्ची पडणारे श्रम असा अर्थ विचारात घेतला तर जो सिद्धांत तयार होतो त्याला 'श्रम-खर्च सिद्धांत' असे म्हंटले जाते. याउलट वस्तूच्या मोबदल्यात मिळणाऱ्या वस्तूला बनविण्यासाठी खर्ची पडणाऱ्या श्रमावरून वस्तूचे मूल्य ठरते असा अर्थ लक्षात घेतला तर त्यावरून जो सिद्धांत तयार होतो त्याला 'श्रम-सत्ता सिद्धांत' असे म्हणतात. परंतु एकाच गोष्टीच्या स्पष्टीकरणासाठी असे दोन वेगवेगळे सिद्धांत मांडणे म्हणजे वैचारिक गोंधळ होय. त्यानंतरही ॲडम स्मिथ मूल्याचा जसजसा अधिक विचार करत गेला तसतसा त्याचा वैचारिक गोंधळ हा वाढतच गेला. श्रमावरून जर वस्तूचे मूल्य ठरत असेल तर बाजारात वस्तूची ठरणारी किंमत श्रमिकाला मिळाली पाहिजे. पण तसे होत नाही. कारण बाजारात मिळणाऱ्या मूल्यापैकी प्रत्यक्षात फारच थोडा हिस्सा श्रमिकाला मिळतो. उरलेला मोठ्या प्रमाणावरील हिस्सा नफ्याच्या रूपात भांडवलदारांनाच मिळतो. मग हे मूल्य कसे निर्माण होते? असा प्रश्न स्मिथला पडला व त्याचे उत्तर त्याला देता येईना म्हणून त्याने यामधून आपली सुटका करून घेण्यासाठी अर्थव्यवस्थेची विभागणी पुढील दोन भागांत केली.

**१) अर्थव्यवस्थेची प्राथमिक अवस्था :-** अर्थव्यवस्थेची प्राथमिक अवस्था म्हणजे जिथे भांडवलाचा उगम झालेला नसतो अशा अवस्थेत श्रम हाच एकमेव उत्पादनाचा घटक असतो आणि तोच संपूर्ण उत्पादनाचा मालकही असतो. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या अशा प्राथमिक अवस्थेत वस्तूचे मूल्य हे तिच्या श्रमावरूनच ठरत असते असे स्मिथने म्हंटले आहे. याचाच अर्थ, अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक अवस्थेत 'श्रम मूल्य' सिद्धांत खरा ठरतो असे त्याचे मत होते.

**२) अर्थव्यवस्थेची प्रगत अवस्था :-** ॲडम स्मिथच्या मते, अर्थव्यवस्था जेंव्हा प्रगत अवस्थेत असते तेंव्हा वस्तू उत्पादनासाठी 'श्रम' या घटकाबरोबरच 'भांडवल' या घटकाचाही वापर केला जातो. त्याचबरोबर कच्चा माल, भूमी या घटकांचाही उत्पादनांमध्ये वापर केला जातो. म्हणजेच उत्पादनावर कुणा एकाचीच मालकी न राहता सामुहिक मालकी निर्माण होते. थोडक्यात उत्पादन प्रक्रियेमध्ये सर्वचजण सहभागी झाल्याने ते खंड, वेतन, नफा या स्वरूपात आपआपले मोबदले, घेतात. त्यामुळे वस्तूच्या मूल्यात खंड, वेतन, नफा यांचा समावेश होत असतो. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या प्रगत अवस्थेमध्ये, वस्तूचे मूल्य हे 'उत्पादन खर्चावरून' ठरते असे ॲडम स्मिथने म्हंटलेले आहे. थोडक्यात वस्तूच्या प्रगत अवस्थेत 'उत्पादन खर्च' सिद्धांत खरा ठरतो. असे स्मिथचे मत होते.

अशा प्रकारे ॲडम स्मिथने समाजाच्या प्राथमिक अवस्थेसाठी 'श्रम-मूल्य' सिद्धांत मांडला व प्रगत

अवस्थेसाठी मूल्याचा उत्पादन खर्च सिद्धांत मांडला. थोडक्यात ॲडम स्मिथच्या मूल्य सिद्धांतात एकवाक्यता नव्हती. वस्तूच्या मूल्याचा विचार करताना त्याने वेगवेगळे सिद्धांत मांडून गोंधळ निर्माण केला. मात्र मूल्य निश्चितीमध्ये 'श्रम' या घटकाचे महत्त्व आजच्या परिस्थितीतही मान्यच केले पाहिजे.

**स्मिथच्या मूल्य सिद्धांताचे टिकात्मक परीक्षण :**

ॲडम स्मिथच्या मूल्य सिद्धांत्तात अनेक दोष आढळून आल्याने या सिद्धांत्तावर पुढील टीका केल्या जातात.

**१) उपयोगितेच्या कल्पनेकडे दुर्लक्ष :–** ॲडम स्मिथने आपल्या मूल्य सिद्धांत्तात उपयोगिता मूल्याकडे दुर्लक्ष करून एक महत्त्वपूर्ण चूक केली आहे. अशी टिका केली जाते. त्याने फक्त विनिमय मूल्याला महत्त्व दिले. मूल्यनिश्चिततेमधील उपयोगिता या संकल्पनेचे महत्त्व त्याला सांगता आले नाही. स्मिथनंतर पुढे ऑस्ट्रियन संप्रदायाने त्याची चूक दुरूस्त करून उपयोगिता संकल्पनेवर आधारित वस्तूच्या मागणी पुरवठ्यावरून वस्तूच्या मूल्याबाबत विचार मांडला. मार्शलने सीमांत उपयोगिता तत्त्वाच्या साहाय्याने मूल्य सिद्धांताची नव्याने मांडणी केली. त्यातून मूल्य सिद्धांताला बळकटी मिळाली.

**२) एकाच वेळी दोन सिद्धांताची मांडणी:–** ॲडम स्मिथने एकाच वेळी वस्तूच्या मूल्याचा विचार करण्यासाठी 'श्रम-मूल्य सिद्धांत' आणि 'उत्पादन खर्च सिद्धांत' असे दोन वेगवेगळे सिद्धांत मांडले. अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक अवस्थेत श्रम-मूल्य सिद्धांत आणि प्रगत अवस्थेसाठी उत्पादन खर्च सिद्धांत मांडून गोंधळाची स्थिती निर्माण केली. मात्र त्याने श्रमावरच अधिक भर दिल्याने त्यानंतरच्या अर्थतज्ज्ञांनी देखील त्याच्या 'श्रम सिद्धांतालाच' अधिक महत्त्व दिले. परिणामी मूल्यनिश्चितीमधील उत्पादन खर्चाकडे दुर्लक्ष होत गेले.

**३) वैचारिक गोंधळ :–** मूल्य सिद्धांताची मांडणी करताना ॲडम स्मिथचा अनेक ठिकाणी गोंधळ उडालेला दिसतो. त्यामध्ये उपयोगिता मूल्य आणि विनिमय मूल्य यातील गोंधळ, संकल्पनेचे वेगवेगळे अर्थ लावणे, एकाच वेळी श्रम मूल्य आणि उत्पादन खर्च असे दोन वेगवेगळे सिद्धांत मांडणे इत्यादींचा समावेश होतो. त्यामुळे एकूणच त्यांच्या विचारांमध्ये गोंधळाची स्थिती निर्माण झालेली दिसते. त्याच्या याच वैचारिक गोंधळामुळे तो मूल्य सिद्धांताला योग्य दिशा देऊ शकला नाही. अशी टीका करण्यात येते.

**४) चक्रीय युक्तीवाद :–** स्मिथच्या सिद्धांतामध्ये श्रमावरून ठरणाऱ्या मूल्याचे मोजमाप वस्तूच्या मोबदल्यात किती श्रम मिळतात यावरून ठरते, असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे श्रमावरून किंमत ठरते. का किंमतीवरून श्रम ठरतात? अशा चक्रीय युक्तीवादाच्या भोवऱ्यात सिद्धांत अडकला असल्याचे दिसते.

**५) पूर्ण स्पर्धेचा आधार :–** ॲडम स्मिथने आपल्या मूल्य सिद्धांताची मांडणी ही पूर्ण स्पर्धेच्या गृहीताच्या आधारावर केलेली आहे. त्यामुळे मक्तेदारीच्या स्थितीमध्ये त्याचा सिद्धांत प्रत्ययाला येत नाही. वास्तवात देखील पूर्ण स्पर्धेचा बाजार देखील अभावानेच आढळतो. त्यामुळे हा सिद्धांत वास्तवामध्ये निरूपयोगी असल्याची टीका केली जाते.

**६) उत्पादनखर्च सिद्धांत अपुरा :–** अर्थव्यवस्थेच्या प्रगत अवस्थेमध्ये स्मिथने मांडलेला उत्पादन खर्चाचा सिद्धांत देखिल चुकीचा आहे, अशी टीका केली जाते. कारण त्याने आपल्या सिद्धांतामध्ये वस्तूच्या किंमतीमध्ये वेतन, खंड, नफा यांचा किंमतीत समावेश होतो, असे सांगितले. परंतु विभाजनाविषयक विचार मांडताना त्यांच्या खंड सिद्धांतात खंडाच्या किंमतीत समावेश होत नाही असे स्पष्टीकरण तो करतो. म्हणजेच त्याचा मूल्याचा उत्पादनखर्च सिद्धांत अपुरा ठरतो.

ॲडम स्मिथने मांडलेल्या मूल्य सिद्धांतामध्ये वरीलप्रमाणे विविध दोष आढळून आले असले तरी त्याच्या मुल्यनिश्चितीमधील विचारांचे महत्त्व हे आजही टिकून आहे. कारण त्यानंतर जे मूल्यविषयक विचार मांडले गेले त्या विचारांना स्मथच्या विचारातून चालना मिळाली. कारण कोणत्याही वस्तूच्या मूल्यनिश्चिती मधील 'श्रम' या घटकाचे महत्त्व आजही वादातीत असेच आहे. शिवाय मूल्यनिश्चितीमध्ये सर्वप्रथम वैचारिक व शास्त्रीय मांडणी करणारा पहिला अर्थतज्ज्ञ म्हणून ॲडम स्मिथचे स्थान महत्त्वाचे आहे.

**ॲडम स्मिथच्या कर कसोट्या (Conons of Taxation) :**

ॲडम स्मिथच्या आर्थिक विचारांपैकी आणखी एक महत्त्वपूर्ण आर्थिक विचार म्हणजे 'सार्वजनिक अयव्यय' (Public Finance) किंवा सरकारी अर्थकारण याबाबतच्या विचारांना महत्त्व आहे. त्याने आपल्या 'राष्ट्राची संपत्ती' (Wealth of Nations) या ग्रंथाच्या पाचव्या भागामध्ये 'राज्याचे अर्थव्यवहार' याबाबत आपले विचार सविस्तरपणे मांडलेले आहेत. त्याच्या मते, सरकारने कमीतकमी खर्च करावा. सरकारी खर्चामधील काटकसरीला त्याने आपल्या विचारात अधिक महत्त्व दिले. सरकारने आपल्या खर्चासाठी आवश्यक असणारे उत्पन्न करांच्या मार्गानी गोळा करावे असे त्याचे मत होते. थोडक्यात त्याने करांपासून मिळणाऱ्या उत्पन्नावर अधिक भर दिला होता. त्यातूनच त्याने सरकारने कर गोळा करताना कोणत्या तत्त्वांचे अनुसरण करावे याविषयी आपले विचार मांडताना चार कसोट्या सांगितल्या आहेत. ॲडम स्मिथच्या या चार कर कसोट्या पुढीलप्रमाणे.

**१) समता (Equality) :–** देशातील सर्व नागरिकांकडून त्यांच्या उत्पन्नाच्या प्रमाणात कर घेतला जावा. करामध्ये समता साधण्यासाठी प्रत्येकाच्या आर्थिक कुवतीनुसार कर घेतले पाहिजेत. श्रीमंतावर त्यांच्या वाढत्या उत्पन्नानुसार वाढत्या दराने कर आकारणी करावी. तर गरीबांवर कमी प्रमाणात कर आकारणी करावी.

**२) निश्चितता (Certainty) :–** या कसोटीनुसार कराची रक्कम निश्चित असावी. तसेच कर भरण्याची वेळ, रक्कम याची निश्चित कल्पना कर भरणाऱ्यांना असली पाहिजे. त्यामुळे कर भरताना करदात्याची गैरसोय होणार नाही व लाचलुचपतीसही आळा बसेल. शिवाय करापासून आपल्याला नेमके किती उत्पन्न मिळू शकेल याची निश्चित कल्पना सरकारला येऊ शकेल.

**३) सोईस्करता (Convenience) :–** कर भरण्याची वेळ, ठिकाण इ. बाबी करदात्यांच्या दृष्टीने सोयीच्या असल्या पाहिजेत. सरकारने केवळ आपलीच सोय पाहू नये. उदा. शेतजमिनीवर कर आकारणी करताना सरकारने पिकाची विक्री केल्यानंतर शेतकऱ्यांकडून कर वसुली करावी असा या करकसोटीचा अर्थ होता.

**४) मितव्ययता (Economy) :–** मितव्ययता याचा साधा अर्थ असा की, कर वसुलीची पद्धती खर्चिक असू नये. थोडक्यात करापासून मिळणारे उत्पन्न हे कर गोळा करण्यासाठी आलेल्या खर्चापेक्षा जास्त असले पाहीजे.

वरीलप्रमाणे ॲडम स्मिथने कर कसोट्या सांगितल्यानंतर सरकारने प्रत्यक्षात करआकारणी करताना सरकारने नफा आणि वेतन यांवर कर आकारणी न करता खंडावर कर आकारावेत असे सुचविले. कारण त्याच्या मते, सरकारने जर नफ्यावर कर आकारला तर त्याचा भार शेवटी ग्राहकांवरच पडतो. नफ्यावर करआकारणी केल्यास उत्पादक वस्तूंचे उत्पादन कमी करून त्यांच्या किंमतीमध्ये वाढ करतील. परिणामी कराचा भार सरतेशेवटी ग्राहकांवरच पडतो. त्याचप्रमाणे जर वेतनावर करआकारणी केली तर कामगार वर्ग वेतनवाढीची मागणी करतील. असे झाले तर उत्पादनखर्च वाढेल त्यातून किंमतीतही वाढ होईल व या सर्वांचा भार सरतेशेवटी सर्वसामान्य ग्राहकांवरच पडेल. म्हणूनच वेतन व नफ्यावर कर आकारण्यास स्मिथचा विरोध होता. त्याऐवजी खंडावर भार पाडणारे कर आकारावेत यावर त्याने भर दिला. त्याच्या मते, खंडावर जर करआकारणी केली तर जमीनदार वर्गाला हे कर ग्राहकांवर ढकलणे शक्य होत नाही. त्यामुळे स्मिथ खंडावरील कर आकारणीचे समर्थन करतो.

**स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न :**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. ॲडम स्मिथ यास आधुनिक अर्थशास्त्राचा ------ असे म्हणतात.

अ) विचारवंत ब) जनक क) अभ्यासक ड) विश्लेषक

२. अर्थशास्त्रातील पहिले सुप्रसिद्ध पुस्तक ------ हे होय.

अ) राष्ट्राची संपत्ती ब) दास कॅपीटल क) एशियन ड्रामा ड) अर्थशास्त्र

३. भारतीय खेड्यातील ------ पद्धती हे श्रमविभागणीचे उत्तम उदाहरण आहे.

अ) शेती ब) कलाकुसर क) बारा बलुतेदारी ड) पशुपालन

४. ॲडम स्मिथच्या मते ------ हेच संपत्तीचे उगमस्थान होय.

अ) भांडवल ब) भूमी क) संयोजक ड) उत्पादक श्रम

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. अखेरचा सनातनवादी अर्थतज्ज्ञ कोण?

२. अर्थव्यवस्थेच्या प्रगत अवस्थेत कोणता मूल्य सिद्धांत खरा ठरतो?

३. ॲडम स्मिथने किती कर कसोट्या मांडल्या?

४. ॲडम स्मिथने आपल्या मूल्य सिद्धांतात कोणत्या मूल्यावर अधिक भर दिला?

५. ॲडम स्मिथच्या मते, श्रमविभागणीचा उगम कोणत्या मानवी प्रवृत्तीतून झाला आहे?

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

अ)

१) – ब २) – अ ३) – क ४) – ड

ब)

१. जे. एस. मिल हा अखेरचा सनातनवादी अर्थतज्ज्ञ होय.

२. अर्थव्यवस्थेच्या प्रगत अवस्थेत उत्पादनखर्चाचा सिद्धांत खरा ठरतो.

३. ॲडम स्मिथने चार कर कसोट्या सांगितल्या आहेत.

४. ॲडम स्मिथने आपल्या मूल्य सिद्धांतात विनिमय मूल्यावर जास्त भर दिला.

५. ॲडम स्मिथच्या मते माणसाच्या स्व–हित साधण्याच्या उपजत प्रवृत्तीतून श्रमविभागणीचा जन्म झाला.

## २.२.२ डेव्हिड रिकार्डो : मूल्य सिद्धांत आणि विभाजनविषयक विचार

**(David Recardo : Theory of Value and Views on Distribution) :**

**जीवन परिचय (१७७२ ते १८२३) :** रिकार्डोचा जन्म १७७२ मध्ये लंडन येथे झाला. सनातन विचारवंतामध्ये ॲडम स्मिथनंतर रिकार्डोचे नाव घेतले जाते. रिकार्डो हा एका ज्यू व्यापाऱ्याचा मुलगा होता. आपल्या वडीलांप्रमाणेच व्यापार करून त्याने अवघ्या २१ व्या वर्षी अमाप संपत्ती कमवली. पुढे १७९९ मध्ये त्याच्या वाचनामध्ये ॲडम स्मिथचा 'राष्ट्राची संपत्ती' (Wealth of Nations) हा ग्रंथ आला. या ग्रंथामुळे भारावून तो अर्थशास्त्राच्या अभ्यासाकडे वळला. त्याने अर्थशास्त्रावर अनेक ग्रंथ लिहिले. १८१७ मध्ये त्याचा 'The Principles of Political Economy and Taxation' हा पहिला ग्रंथ प्रकाशित झाला. हा ग्रंथ खूपच गाजला. त्यानंतर त्याचे सोन्याच्या वाढलेल्या किंमती, धान्याच्या वाढलेल्या किंमती, शेतकरी संरक्षण अशा विविध विषयावरील लेख आणि पुस्तिका प्रकाशित झाल्या. १८१९ मध्ये इंग्लंडच्या पार्लमेंटवर तो लोकसभेचा सदस्य म्हणून निवडून आला. रिकार्डोने निगमन पद्धतीचा स्वीकार करून त्याआधारे अर्थशास्त्रीय विचारांची मांडणी केली. त्याच्या एकूणच आर्थिक विचारांवर ॲडम स्मिथचा मोठा प्रभाव असल्याचे दिसून येते. त्याने ॲडम स्मिथच्या अनेक कल्पनांचा पुरस्कार करून त्यांचा पुढे विस्तार घडवून आणला.

**रिकार्डोचे आर्थिक विचार :**

डेव्हिड रिकार्डोनी जे विविध आर्थिक विचार मांडलेले आहेत त्यामध्ये मुख्यत्त्वे मूल्यविषयक आणि विभाजनविषयक विचारांना महत्त्वाचे स्थान आहे. रिकार्डो हा मुळातच व्यापारी वृत्तीचा असल्याने त्याच्या

विचारांमध्ये शुद्ध अर्थशास्त्रीय आणि परखड व्यवहारवादी दृष्टीकोन होता. त्यादृष्टीने रिकार्डोचे प्रमुख आर्थिक विचार पुढीलप्रमाणे.

**रिकार्डोचा मूल्य सिद्धांत (Theory of Value) :**

रिकार्डोने आपला मूल्य सिद्धांत मांडत असताना ॲडम स्मिथच्या मूल्य सिद्धांताचा आधार घेतला आहे. स्मिथ प्रमाणेच रिकार्डोने देखिल वस्तूला उपयोगिता मूल्य आणि विनिमय मूल्य अशी दोन मूल्ये असतात, हे मान्य करतो. वस्तुला विनिमय मूल्य प्राप्त होण्यासाठी तिच्यामध्ये उपयोगिता असली पाहिजे. हे रिकार्डोला मान्य होते. ''मात्र विनिमय मूल्य प्राप्त होण्यासाठी उपयोगितेची आवश्यकता असली तरी उपयोगिता हे विनिमय मूल्य मोजण्याचे साधन असू शकत नाही.'' असे स्पष्ट मत रिकार्डोनी मांडले आहे.

याचाच अर्थ रिकार्डोच्या म्हणण्यानुसार वस्तूचे मूल्य उपयोगितेवर अवलंबून नसते, तर ते विनिमय मूल्यावर आधारित असते. हे सांगितल्यानंतर विनिमय मूल्य कसे ठरते याचे उत्तर देण्यासाठी रिकार्डोने वस्तूचे दोन गटांमध्ये वर्गीकरण केलेले आहे. ते पुढीलप्रमाणे.

**१) दुर्मिळ वस्तू किंवा पुनरूत्पादन करणे शक्य नसणाऱ्या वस्तू :-** अशा वस्तूंचे मूल्य हे त्यांच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या श्रमावरून ठरत नसून ते त्याच्या दुर्मिळतेवरून ठरते. उदा - दुर्मिळ चित्रे, ग्रंथ, नाणी, पुरातन पुतळे इ. चा समावेश या गटामध्ये होतो. अशा वस्तूंचा पुरवठा मानवी श्रमाद्वारे वाढविता येत नाही. त्यामुळे अशा वस्तूंची किंमत ही श्रमावरून ठरत नाही, तर त्यांच्या दुर्मिळतेवरून ठरते. अशा वस्तू श्रमाच्या साहाय्याने वाढविता येत नाहीत. त्यांची संख्या अल्प असते. त्यामुळे रिकार्डोच्या मते, अशा वस्तूंची किंमत कशी ठरते याबाबत विचार करण्याची आवश्यकता नसते.

**२) पुनरूत्पादन करता येणे शक्य असणाऱ्या वस्तू :-** ज्या वस्तूंचे उत्पादन पुन्हा पुन्हा करणे शक्य असते. अशा वस्तूंचे उत्पादन व उपलब्धता ही फार प्रमाणावर असते. मानवी श्रमाद्वारे यांची उपलब्धता मोठ्या प्रमाणावर वाढविता येते. अशा वस्तूंचा स्मिथने या वर्गात समावेश केला. त्याच्या मते, या वस्तूंचे मूल्य हे त्या वस्तूंच्या निर्मितीसाठी लागलेल्या श्रमावरून ठरते. याच आधारावर त्यांनी आपल्या श्रम सिद्धांताची मांडणी केली.

**श्रम सिद्धांत :**

रिकार्डोने बाजारात पूर्ण स्पर्धा असते असे गृहीत धरून वस्तूचे विनिमय मूल्य कसे ठरते. याबाबतचे विवेचन केले आहे. रिकार्डोने अल्पकालीन मूल्याकडे दुर्लक्ष करून दीर्घकालीन मूल्य कमी ठरते यावर भर दिला.

रिकार्डोच्या 'श्रम-खर्च' सिद्धांतानुसार वस्तुचे सापेक्ष मूल्य हे त्या वस्तूच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या एकंदर श्रमावरून ठरते. रिकार्डोने मात्र ॲडम स्मिथच्या विचारांपेक्षा वेगळा विचार मांडून असे म्हटले आहे की, समाजाच्या कोणत्याही अवस्थेत मग तो प्राथमिक असो वा प्रगत असो अशा सर्वच अवस्थांमध्ये वस्तूचे विनिमय मूल्य हे त्या वस्तूच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या श्रमावरूनच ठरते. जरी भांडवलशाही अर्थव्यवस्था अस्तित्त्वात असली तरी अशाही अवस्थेत वस्तूचे मूल्य हे श्रमावरूनच ठरते असे रिकार्डोनी म्हटले आहे. याचा खुलासा

करताना रिकार्डोनी असे सांगितले आहे की, जरी भांडवलशाहीमध्ये वस्तूच्या निर्मितीमध्ये श्रमाबरोबरच भांडवलाचाही वापर केला जात असला तरी भांडवल या घटकात ज्या यंत्रे, हत्यारे, अवजारे इ. चा समावेश होतो. ती सर्व यंत्रे, अवजारे, हत्यारे ही पूर्वी कोणत्या ना कोणत्या श्रमाद्वारेच तयार झालेली असतात. म्हणजे ही यंत्रे, अवजारे, हत्यारे म्हणजे एक प्रकारचे भूतकालीन संचित म्हणजे साठविलेले श्रमच असतात. यावरून रिकार्डोनी अस निष्कर्ष काढला की, वस्तूचे विनिमय मूल्य हे चालु काळातील श्रम आणि भूतकाळातील संचित श्रम अशा दोन्ही श्रमावरून ठरते. थोडक्यात रिकार्डोने आपल्या श्रम सिद्धांत्तादवारे वस्तूचे मूल्य हे अंतिमत: श्रमावरूनच ठरते असे सांगितले.

तरीही रिकार्डोने काही ठिकाणी वस्तूचे मूल्य उत्पादन खर्चावरूनही ठरते असे सांगितले. म्हणजेच त्याने वस्तूच्या मूल्य निश्चितीबाबत श्रम-खर्च सिद्धांत्ताचा त्याग करून उत्पादन-खर्च सिद्धांत्ताचा स्विकार केला. त्यामुळे स्मिथप्रमाणेच रिकार्डोचा देखील वस्तूच्या मूल्याबाबत वैचारिक गोंधळ उडालेला आहे. परिणामी त्याने आपल्या सिद्धांत्तात अनेक दुरूस्त्या केलेल्या आहेत.

**मूल्य सिद्धांतातील दुरूस्त्या :**

मूल्यविषयक विचारात उडालेल्या गोंधळाच्या परिस्थितीमुळे रिकार्डोने आपल्या मूल्य सिद्धांतात ज्या विविध दुरूस्त्या केलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे.

**१) श्रमाची गुणभिन्नता :** सर्वच कामगार हे गुणात्मकदृष्ट्या एकसारखे नसतात. तर विविध व्यवसायातील श्रमिकांचे कौशल्य हे विभिन्न प्रकारचे असते. त्यामुळे अशा गुणभिन्नतेचा मूल्यावर काय परिणाम होईल, हे पाहणे आवश्यक आहे. गुणात्मकदृष्ट्या भिन्न असणाऱ्या श्रमाचे मापन कसे करायचे? असा प्रश्न रिकार्डोसमोर उभा राहीला. हा प्रश्न सोडविण्यासाठी त्याने असा युक्तीवाद केला आहे की, वेगवेगळे कौशल्य व कार्यक्षमता असणाऱ्या श्रमिकांच्या श्रमाचे तुलनात्मक मुल्यमापन बाजारयंत्रणेद्वारे अचूकपणे केले जाईल. त्याकरता त्याने जवाहिऱ्याचे उदाहरण दिले आहे. जवाहिऱ्याचे काम करणाऱ्या श्रमिकाच्या एका दिवसाच्या श्रमाचे मूल्य हे सामान्य श्रमिकाच्या एका दिवसाच्या श्रमाच्या कितीतरी पट जास्त राहील. हे एकदा निश्चित झाल्यानंतर त्यात पुन्हा बदल करण्याची आवश्यकता नाही. कारण सामान्य श्रमिकांचे पाच तासांचे श्रम हे जवाहिऱ्याच्या एका तासाच्या श्रमाइतके असतात. हे एकदा बाजारयंत्रणेद्वारे आपोआप ठरले की, ते अचूक असते.

**२) भांडवलाची गुणभिन्नता :** श्रमिकांप्रमाणे भांडवलामध्येही गुणभिन्नता असते. म्हणजेच विविध प्रकारची यंत्रे व अवजारे ही देखील गुणात्मकदृष्ट्या भिन्न असू शकतात. त्यामुळे भांडवलावरील गुणभिन्नतेचा वस्तूच्या मूल्यावर परिणाम होणे स्वाभाविकच आहे. या प्रश्नावर रिकार्डोने तोडगा काढताना असे म्हटले आहे की, ज्या दोन वस्तूंच्या उत्पादनाकरिता लागणाऱ्या भांडवलाची आवश्यकता समान असते. त्या दोन वस्तूंचे मूल्य समान असते.

**३) नफ्याचा समावेश :** सुरवातीस मांडलेल्या मूल्य सिद्धांतात रिकार्डोने नफ्याचा समावेश वस्तूच्या मूल्यात होत नाही असे म्हंटले आहे. मात्र नंतरच्या दुरूस्त केलेल्या सिद्धांतात त्याने नफ्याचा समावेश वस्तूच्या मूल्यात केला पाहिजे हे मान्य केले आहे.

अशाप्रकारे रिकार्डोने आपल्या मूळ सिद्धांतात वरीलप्रमाणे बदल व दुरूस्त्या करूनही त्याचे समाधान झाले नाही अशी कबुली रिकार्डोने स्वत: दिली आहे. आपल्या मूल्यविषयक विवेचनामध्ये काही उणीवा आहेत याची त्याला पूर्वीपासूनच जाणीव होती. या जाणीवेतूनच त्याने आपला मित्र मॅक्युलक याला १८ डिसेंबर १८१९ लिहीलेल्या पत्रामध्ये असे म्हंटले आहे की, माझ्या ग्रंथात जर मला 'मूल्य' हे प्रकरण पुन्हा लिहावे लागले तर ''वस्तूच्या निर्मितीसाठी लागणारे श्रम व उत्पादन वगळता व गुंतून राहिलेल्या भांडवलावरील नफा या दोन घटकांमुळे मूल्य ठरते हे मी मान्य करेन.'' तसेच तो यापुढेही जाऊन त्या पत्रामध्ये असाही उल्लेख करतो की, ''ज्या तत्त्वानुसार मूल्य नियंत्रित केले जाते. याबद्दल मी ते स्पष्टीकरण दिले आहे, त्याने माझे समाधान झालेले नाही. माझी अशी इच्छा आहे की, माझ्यापेक्षा श्रेष्ठ लेखकाने ही जबाबदारी घ्यावी.''

**रिकार्डोच्या मूल्य सिद्धांताचे टीकात्मक परीक्षण :**

रिकार्डोने मांडलेल्या मूळ सिद्धांतावर व नंतर दुरूस्त करून मांडलेल्या सिद्धांतावर पुढील टीका केल्या जातात.

**१) उपयोगितेकडे दुर्लक्ष :–** रिकार्डोने आपल्या मूल्यविषयक सिद्धांतामध्ये उपयोगिता ही विनिमय मूल्य प्राप्त होण्यासाठी आवश्यक असली तरी उपयोगिता हे विनिमय मूल्य मोजण्याचे साधन असू शकत नाही, असे मानून त्याने उपयोगिता मूल्याकडे दुर्लक्ष केले आहे. मात्र पुढील काळात सीमांतवादी अर्थशास्त्रज्ञांनी उपयोगिता मूल्यावर आधारित सिद्धांत विकसित करून उपयोगितेचे महत्त्वाचे स्थान दाखवून दिले आहे. थोडक्यात रिकार्डोने उपयोगिता मूल्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे त्याच्या मूल्य सिद्धांतात अपुरेपणा राहिलेला आहे.

**२) वस्तूचे चुकीचे वर्गीकरण :–** रिकार्डोने पुनरूत्पादन होऊ न शकणाऱ्या वस्तू आणि पुनरूत्पादन होणाऱ्या वस्तू अशी जी वस्तूंची वर्गवारी केलेली आहे ती चुकीच्या पद्धतीने केलेली आहे व या वर्गवारीनुसार त्या त्या वस्तूंचे मुल्यही वेगवेगळे असते असे त्याचे म्हणणेही चुकीचे आहे.

**३) भांडवलास महत्त्व नाही :–** रिकार्डोने त्याच्या मूल्य सिद्धांतामध्ये भांडवल या घटकाला महत्त्वाचे व योग्य स्थान दिलेले नाही. रिकार्डो भांडवलाचे स्थान लक्षात जरी घेत असला तरी तो अगदी शेवटी वस्तूच्या मुल्यनिश्चितीमध्ये त्याला महत्त्व देत नाही. अशी त्याच्यावर टीका केली जाते.

**४) अयोग्य गृहीते :–** रिकार्डोने त्याचा मूल्य सिद्धांत अर्थव्यवस्था 'भांडवलशाही' आहे असे गृहीत धरून मांडला. परंतु त्याने पूर्ण स्पर्धा हे धरलेले गृहीत मात्र अवास्तव आहे. परिणामी रिकार्डोचा मूल्य सिद्धांत हा वास्तवदर्शी नसून तो अवास्तव आहे. अशी टीका केली जाते.

**५) सिद्धांतातील अनेक दुरूस्त्या :–** 'श्रमावरून मूल्य ठरते' असा सिद्धांत रिकार्डोने सुरवातीला मांडला. नंतर मात्र त्याचा गोंधळ उडाला. त्यासाठी त्याने सिद्धांतात अनेक दुरूस्त्या केल्या व श्रम सिद्धांताचा त्याग केला. नंतर पुन्हा त्याने मूल्याचे मापन करण्याकरिता 'श्रम' हाच घटक त्यातल्या त्यात उपयुक्त ठरतो असे सांगितले. तरीदेखील त्याचा सिद्धांत वास्तवापासून खूपच दूर गेला. रिकार्डोच्या या एकूणच गोंधळलेल्या अवस्थेमुळे त्याला स्वत:लाच हा सिद्धांत अपुरा वाटला.

अशाप्रकारे रिकाडोने मांडलेल्या मूल्य सिद्धांतावर वरीलप्रमाणे टीका होत असल्या तरीही त्याने मूल्य सिद्धांताच्या विकासामध्ये दिलेले योगदान हे महत्त्वपूर्णच ठरते. त्याने आपल्या सिद्धांतातील चुका व उणीवा स्विकारून त्यात दुरूस्त्या करून त्यामध्ये भर घालण्याचा कसोशीने प्रयत्न केला. मात्र त्यामध्ये त्याला फारसे यश आले नाही. शेवटी त्याने असे सुचविले की, कोणीतरी हुशार व्यक्तीने मूल्य सिद्धांताची संपूर्णपणे नव्याने मांडणी करावी. खरे तर या त्याच्या भूमिकेतूनच त्याचे श्रेष्ठत्त्व दिसून येते.

**रिकार्डोचे विभाजनविषयक दृष्टिकोन (Views on Distribution) :**

आर्थिक विचारांच्या इतिहासामध्ये रिकार्डोच्या विभाजनविषयक विचारांना खूप महत्त्वाचे स्थान आहे. उत्पादनाच्या विविध घटकांना त्यांचे मोबदले कसे मिळतात हे अभ्यासणे अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून महत्त्वाचे असल्याचे रिकार्डोचे मत होते. रिकार्डोने आपल्या विभाजनविषयक विचारांमध्ये प्रामुख्याने खंड, वेतन व नफा याविषयी विचार मांडलेले दिसून येतात. रिकार्डोच्या यासंबंधीच्या विचारांनाच एकत्रितपणे विभाजनविषयक विचार असे म्हणतात. रिकार्डोचा या विभाजनविषयक विचारांचा पुढीलप्रमाणे आढाव घेता येईल.

**रिकार्डोचा खंडविषयक सिद्धांत :**

रिकार्डोचा खंडविषयक सिद्धांत समजावून घेण्याआधी त्याने ज्या तत्कालीन परिस्थितीला अनुसरून हा सिद्धांत मांडला ती इंग्लंडमधील त्यावेळची परिस्थिती समजावून घेणे गरजेचे आहे. त्यावेळी इंग्लंडमधील अन्नधान्यांच्या किंमती मध्ये सातत्याने वाढत होत्या. अन्नधान्यांच्या किंमतीतील ही वाढ जमिनदारांनी खंडाच्या दरामध्ये वाढ केल्याने होत आहे असे अनेकांचे म्हणणे होते. रिकार्डोला मात्र हे मान्य नव्हते. त्याच्या मते, खंडामध्ये वाढ झाल्यामुळे किंमतीमध्ये वाढ होत नसून किंमतीत झालेल्या वाढीमुळे खंड वाढला आहे. रिकार्डोने आपले हेच म्हणने पटवून देण्यासाठी खंड सिद्धांताची मांडणी केली. या सिद्धांताद्वारे खंडाचा उद्‌भव नेमका कसा होतो आणि खंड व किंमत यातील संबंध कसा असतो हे स्पष्ट करण्याचा त्याने प्रयत्न केला आहे.

**खंडाची व्याख्या :** रिकार्डोने खंडाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ''जमिनीच्या एकूण उत्पन्नापैकी जमिनीच्या उपजत व अविनाशी शक्तींच्या वापराबद्दल जमीन मालकाला दिला जाणारा भाग म्हणजे खंड होय.'' ("Rent is that Protain of the Produce of the soil, which is paid to the landloard for the use of the original and indestructible Power of the soil"-Recardo)

**सिद्धांताचे स्पष्टीकरण :** रिकार्डोच्या मते, जमीनीमध्ये गुणभिन्नता असते. त्यानुसार काही जमीन सुपीक असते तर काही जमीन ही कमी सुपीक असते. त्यामुळे जमीनीमधील अशा गुणभेदामुळे जमीनीला खंड मिळतो. यावरूनच रिकार्डोच्या या खंडविषयक कल्पनेला 'भेदजन्य खंड' (Differential Rent) असेही म्हंटले जाते. रिकार्डोने जमीन कसण्याच्या दोन पद्धती असतात असे सांगितले.

१) विस्तीर्ण अगर व्यापक शेती पद्धती.

२) प्रकर्षित शेती पद्धती.

रिकार्डोच्या मते अशा दोन्ही प्रकारच्या शेतीमध्ये खंडाची निर्मिती होते. रिकार्डोने जमिनीच्या गुणभेदानुसार तीचे तीन प्रकार पाडले. ते पुढीलप्रमाणे. पहिली सुपीक जमीन यालाच तो उच्च प्रतीची जमीन असे म्हणतो. दुसरी म्हणजे मध्यम सुपीक जमीन यालाच तो मध्यम प्रतीची जमीन असे म्हणतो. आणि तिसरी म्हणजे कमी सुपीक जमीन यालाच तो कनिष्ठ प्रतीची जमीन असे समजतो. जमिनीच्या अशा प्रतवारीमुळेच खंडाचा उद्भव होतो. असे रिकार्डोचे मत आहे. अशाप्रकारे जमिनीतील सुपिकतेच्या या गुणधर्मामुळे खंडाचा उद्भव कसा होतो हे रिकार्डोने पुढील एका उदाहरणाद्वारे सविस्तरपणे स्पष्ट केलेले आहे.

रिकार्डोच्या मते, समजा एखाद्या विस्तीर्ण भू-प्रदेशामध्ये वसाहत करण्यासाठी लोक प्रथमच गेले तर सुरवातीला ते लोक त्या प्रदेशातील सुपीक जमिनीवर शेती करण्यास सुरवात करतील. जर अशा सुपीक जमिनीमध्ये त्यांनी तांदळाचे उत्पादन घेतल्यास ६०० क्विंटल उत्पादन होते व त्यासाठी त्यांना १२०० रू. एवढा उत्पादन खर्च येईल. त्यानुसार उत्पादनखर्च भरून निघेल एवढी तांदळाची किंमत ठरेल. त्यानुसार प्रती किलो २ रू. प्रमाणे किंमत ठरून ६०० रू. क्विंटल तांदूळ २ रू. प्रमाणे विकून १२०० रू. एवढे उत्पन्न मिळेल. याठिकाणी तांदूळ उत्पादनासाठीचा खर्च व त्यापासून मिळालेले उत्पन्न १२०० रू. समानच असल्याने इथे कोणताही खंड मिळणार नाही.

समजा, कालांतराने त्या प्रदेशातील लोकसंख्येमध्ये वाढ झाली. तर मग त्यांची अन्नधान्याची वाढलेली गरज भागविण्यासाठी पूर्वीच्या सुपीक जमिनीसोबतच आता मध्यम प्रतीची सुपीक जमीन देखील लागवडीखाली आणली जाईल. आता या मध्यम सुपीक जमिनीमध्ये पूर्वीएवढ्याच उत्पादन खर्चाद्वारे (१२,०० रू.) ४०० क्विंटल तांदळाचे उत्पादन होईल. आता या मध्यम सुपीक जमिनीतील तांदळाची किंमत उत्पादन खर्चानुसार प्रती किलो ३ रू. अशी किंमत ठरेल. व ३ रू. प्रती किलोनुसार ४०० क्विंटल तांदळाच्या विक्रीमधून १२०० रू. एवढे उत्पन्न मिळेल. बाजारात पूर्ण स्पर्धा असल्याने तांदळाची किंमत सर्वत्र ३ रू. राहील. त्यामुळे सुपीक जमिनीतील ६०० क्विंटल तांदूळ देखील ३ रू. दराने विकला गेल्याने ३x६०० = १८,०० रू. एवढे त्याला उत्पन्न मिळेल. यामध्ये त्याला त्याचा १२,०० रू. उत्पादन खर्च वजा जाता १८००-१२०० = ६०० रू. एवढा वाढावा मिळेल. मात्र मध्यम प्रतीच्या सुपीक जमिनीला असा खंड स्वरूपातील वाढावा मिळणार नाही. कारण त्यांचा उत्पादन खर्च व मिळालेली किंमत ही १२०० रू. एवढी समानच असते.

पुढे कालांतराने जेंव्हा त्या प्रदेशातील लोकसंख्येमध्ये आणखी वाढ होते. तेंव्हा देखील अन्नधान्याची टंचाई निर्माण होते. त्यामुळे त्या प्रदेशातील राहीलेली कमी सुपीक जमीन म्हणजे निकृष्ट प्रतीची जमीन देखिल लागवडीखाली आणली जाईल. मात्र ही जमीन मुळातच कमी सुपीक व निकृष्ट प्रतीची असल्याने पूर्वी एवढेच म्हणजे १२०० रू. एवढे पैसे खर्च करून देखिल उत्पादन मात्र १२०० क्विंटल एवढेच होते. त्यामुळे तांदळाची प्रती किलो किंमत उत्पादन खर्चानुसार ६ रू. एवढी होईल. बाजारामध्ये पूर्ण स्पर्धा असल्याने सर्वत्र ही एकच एक किंमत ठरेल. त्यामुळे आता पहिल्या प्रतीच्या सुपीक जमिनीला ६x६०० = ३६०० रू. उत्पन्न मिळेल व तीचा उत्पादन खर्च वजा जाता ३६००-१२०० = २४०० रू. एवढा खंड मिळेल व तीचा उत्पादन खर्च वजा जाता

२४००–१२०० = १२०० एवढा खंड मिळेल. मात्र तिसऱ्या प्रकारच्या कमी सुपीक जमिनीला खंड मिळणार नाही. कारण अशा जमिनीचा उत्पादन खर्च आणि मिळणारे उत्पन्न तेवढेच राहते.

रिकार्डोच्या मते, सीमांत जमिनीला खंड मिळत नाही. तर तो सीमांतपूर्व जमिनीलाच मिळतो. म्हणूनच सीमांत जमिनीला 'खंडविरहीत जमीन' (Rentless land) असे रिकार्डोनी म्हंटले आहे.

अशाप्रकारे रिकार्डोनी आपल्या वरील खंड सिद्धांतामधून असे स्पष्ट केले आहे की, खंड हा जमिनीच्या गुणभेदामुळे मिळणारा वाढावा आहे. तसेच रिकार्डोने या सिद्धांताद्वारे खंड व किंमत यातील संबंध स्पष्ट केला आहे. त्यानुसार त्याने खंडावरून किंमत ठरत नसून आधी किंमत ठरते व नंतर खंड ठरतो हे स्पष्ट केले आहे. म्हणूनच खंडात वाढ झाल्याने किंमती वाढलेल्या नसून मुळात अन्नधान्याच्या किंमतीमध्ये झालेल्या वाढीमुळे खंडात वाढ झाली आहे. असे आपल्या खंड सिद्धांताद्वारे सिद्ध करण्याचा त्याचा प्रयत्न आहे.

रिकार्डोच्या खंड सिद्धांतामधून पुढील निष्कर्ष निघतात.

१. खंड हा जमिनीच्या गुणभेदांमुळे मिळतो.

२. खंड हा सुपीक जमीन व मध्यम सुपीक जमिनीला मिळतो.

३. कनिष्ठ प्रतीच्या जमिनीला खंड मिळत नाही.

४. खंड जमिनीच्या प्रतवारीनुसार ठरतो.

५. खंड सीमांतपूर्व जमिनीलाच मिळतो.

६. सीमांत जमिनीला खंड मिळत नाही त्यामुळे ती जमीन खंडविरहीत (Rentless) असते.

७. अन्नधान्याच्या किंमतीतील वाढीमुळे खंडातही वाढ होते.

**गृहीते :**

रिकार्डोचा खंड सिद्धांत पुढील गृहीतांवर आधारित आहे.

१. जमिनीचा पुरवठा पूर्ण अलवचिक आहे.

२. भूमी ही निसर्गदत्त देणगी आहे.

३. खंड केवळ भूमीलाच मिळतो.

४. लोकसंख्या वाढत आहे.

५. बाजारात पूर्ण स्पर्धा अस्तित्त्वात आहे.

६. उत्पादन तंत्रामध्ये बदल होत नाही.

७. भूमीचा उपयोग फक्त अन्नधान्य उत्पादनासाठीच केला जातो.

८. सीमांत जमीन ही खंडविरहीत आहे.

**सिद्धांतावरील टीका :**

रिकार्डोच्या खंड सिद्धांतावर पुढीलप्रमाणे टीका केल्या जातात.

१. रिकार्डोनी सांगितलेला जमिनीचा क्रम योग्य नाही. प्रथम कोणत्या प्रकारची जमीन लागवडीखाली येईल याबाबतचा कोणताही ऐतिहासिक पुरावा आढळलेला नाही.

२. पूर्ण स्पर्धेच्या बाजाराचे गृहीत चुकीचे आहे. कारण पूर्ण स्पर्धेचा बाजार कुठेही अस्तित्त्वात नाही.

३. खंड केवळ जमीन याच घटकाला मिळतो. हे चूक आहे. आधुनिक अर्थशास्त्रज्ज्ञांच्या मते, खंड हा उत्पादनाच्या इतर घटकांनासुद्धा मिळतो.

४. सीमांत जमिनीला म्हणजेच कनिष्ठ प्रतीच्या जमिनीला खंड मिळत नाही. हे रिकार्डोचे म्हणणे बरोबर नाही. कारण अशा कनिष्ठ प्रतीच्या जमिनीमध्ये खते, बी-बियाणे यांचा वापर वाढवून तिच्या सुपिकतेत व उत्पादकतेत वाढ केल्यास तिलाही खंड मिळू शकतो.

५. रिकार्डोच्या मते, प्रथम किंमत ठरते व नंतर खंड ठरतो. परंतु हे चुकीचे आहे. आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या मते, खंडाचा समावेश उत्पादन खर्चामध्ये होतो. आणि उत्पादन खर्चावरून वस्तूची किंमत ठरते.

६. रिकार्डोची खंडाची व्याख्या सदोष मानली जाते. कारण त्याच्या व्याख्येनुसार जमिनीला तिच्या उपजत व अविनाशी शक्तींच्या वापराबद्दल जमीन मालकाला मिळणारा मोबदला 'खंड' असतो. परंतु टिकाकारांच्या मते, जमिनीमध्ये असे गुण मनुष्यच निर्माण करीत असतो. तसेच काही वेळा जमिनीच्या सततच्या वापरातून तिची सुपिकता नष्ट होत असते.

७. रिकार्डोने, जमिनीचा वापर केवळ पिक उत्पादनासाठीच केला जातो असे म्हंटले आहे. परंतु औद्योगिक क्रांतीनंतर जमिनीचा वापर अनेक गोष्टींकरता होऊ लागला. त्यामुळे आधुनिक काळातील या बदललेल्या परिस्थितीमध्ये रिकार्डोचा खंड सिद्धांत स्वीकार्य ठरत नाही.

वरीलप्रमाणे जरी रिकार्डोच्या खंडाविषयक सिद्धांतावर टीका होत असल्या तरी देखील त्याच्या सैद्धांतिक मांडणीचे महत्त्व कमी होत नाही. कारण त्यानेच सर्वप्रथम 'भेदजन्य खंड' ही संकल्पना रूढ केली. तसेच जमीनदार व समाजातील इतर लोकांचे हितसंबंध हे परस्परविरोधी असतात. हे त्याच्या सिद्धांताने दाखवून दिलेले आहे.

**रिकार्डोचे वेतनविषयक विचार :**

रिकार्डोने मांडलेल्या वेतनविषयक विचारांना त्याच्या खंड सिद्धांताएवढी प्रसिद्धी मिळालेली नाही. कारण रिकार्डोपूर्वीही निसर्गवाद्यांनी त्याचे वेतनविषयक विचार स्पष्ट केले आहेत. रिकार्डोनी वेतनाचा सिद्धांत मांडताना

असे म्हंटले आहे की, इतर कोणत्याही वस्तूप्रमाणेच ‘श्रम’ ही एक वस्तू आहे व तिचा पुरवठा हा कमी-जास्त होऊ शकतो. श्रमाचे मूल्य म्हणून वेतन होय. त्यामुळे इतर वस्तूप्रमाणे श्रमालाही नैसर्गिक मूल्य आणि बाजार मूल्य अशी दोन मूल्ये असतात.

रिकार्डोचे वेतनाचे दोन प्रकार सांगितले आहेत.

**१) नैसर्गिक वेतन अगर नैसर्गिक मूल्य :** उदरनिर्वाहासाठी आणि कामगारांच्या संख्येत वाढ किंवा घट होणार नाही. अशाप्रकारे वंशवृद्धी चालू ठेवावी याकरता कामगारांना तो मोबदला आवश्यक असतो. असा मोबदला म्हणजे नैसर्गिक वेतन होय.

**२) बाजार वेतन किंवा मूल्य :** श्रमाची बाजारातील किंमत म्हणजे बाजारवेतन होय. असे बाजारवेतन श्रमाला असलेली मागणी आणि श्रमाचा पुरवठा यावरून ठरते. बाजारवेतन हे नैसर्गिक वेतनाच्या जवळपास राहात असते. याचाच अर्थ बाजार वेतनाचा कल हा नैसर्गिक वेतनाकडे जाण्याचाच असतो.

**निर्वाह वेतन सिद्धांत :** रिकार्डोच्या या सिद्धांतानुसार कामगाराला मिळणारे वेतन हे त्याच्या उदरनिर्वाहापुरते असते. जेंव्हा बाजारवेतन हे नैसर्गिक वेतनापेक्षा जास्त असते. तेंव्हा कामगारांची आर्थिक स्थिती उंचावते. त्यामुळे ते कुटुंबाच्या गरजांची पुर्तता करू शकतात. तसेच पुर्वीपेक्षा मोठे कुटुंब पेलू शकतात. परिणामी त्याची प्रजोत्पादनशक्ती वाढते. ते अधिक मुलांना जन्म देतात. परिणामी लोकसंख्या वाढून कामगारांचा पुरवठा वाढतो. परिणामी वाढलेला बाजार वेतनाचा दर कमी होऊन तो नैसर्गिक वेतनाएवढा होतो व दोन वेतनदरात समतोल प्रस्थापित होतो.

जेंव्हा बाजारवेतन हे निर्वाह वेतनापेक्षा कमी असते. तेंव्हा कामगारांच्या आवश्यक गरजांची पुर्तता होत नाही. कुटुंबातील माणसांचे पालनपोषण करणे कठीण होते. अशावेळी कुटुंबातील व्यक्तींची संख्या कमी ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. कामगारांची प्रजनन क्षमता कमी होते. परिणामी लोकसंख्येत घट होऊन कामगारांचा पुरवठा कमी होतो. कामगारांच्या मागणीच्या मानाने पुरवठा कमी होतो. ह्याचा परिणाम म्हणून कामगारांचे बाजार वेतन वाढते व ते पुन्हा नैसर्गिक वेतनाएवढे होते व या दोन वेतनांमध्ये समतोल साधला जातो. अशाप्रकारे श्रमाच्या बाजार मूल्यात चढ-उतार झाले तरी शेवटी त्याचे नैसर्गिक (निर्वाह) वेतनाच्या पातळीवर येण्याची प्रवृत्ती राहते. असे रिकार्डोनी स्पष्ट केले आहे.

रिकार्डोनी आपल्या निर्वाह सिद्धांतामध्ये नंतर दुरूस्ती केली आहे व असे स्पष्ट केले आहे की, प्रगत अर्थव्यवस्थेमध्ये बाजारवेतन हे निर्वाह वेतनाच्या पातळीपेक्षा जास्त राहू शकते, कारण प्रगत देशात भांडवलाचा साठा वाढत असल्याने उद्योगधंदे सतत वाढत असतात व त्यामुळे कामगारांची मागणी सातत्याने वाढते. त्यामुळे जरी कामगारांची प्रजोत्पादन शक्ती वाढून लोकसंख्या वाढत असली तरी वाढत्या लोकसंख्येला अधिकाधिक रोजगार उपलब्ध होत असतो. त्यामुळे बाजार वेतन कमी होत नाही. तर ते निर्वाह पातळीपेक्षा वरच्या पातळीवर राहू शकते.

रिकार्डोने वरीलप्रमाणे वेतन विषयक विचार मांडलेले असले तरी त्याच्या वेतनविषयक विचारांमध्ये विविध त्रुटी असल्याचे आढळून येते. त्याने मांडलेला निर्वाह वेतनविषयक सिद्धांत हा अपूर्ण आहे. अशी त्याच्यावर टीका केली जाते. कारण त्याने आपल्या या सिद्धांतामध्ये वेतन वाढले असता कामगारांचे राहणीमान सुधारते व कामगारांची प्रजोत्पादन शक्ती वाढते असे म्हंटले आहे. मात्र आधुनिक काळात ते चुकीचे ठरते. कामगार संघटीत झाल्यावर ते आपल्या वेतनाची पातळी वाढवू शकतात. ही बाब त्याने लक्षात घेतलेली नाही. तसेच त्याने कामगारांची कार्यक्षमता विचारात घेतलेली नाही. कारण कार्यक्षमता वाढल्यास वेतनातही वाढ होऊ शकते. भांडवलात रिकार्डोचे वेतनविषयक विचार कमकुवत वाटतात.

**रिकार्डोचे नफा व व्याजाविषयीचे विचार :** रिकार्डोचे व्याज आणि नफा याबाबत अत्यंत संकुचित विचार मांडलेले आहेत. रिकार्डोने व्याजाचा समावेश नफ्यामध्ये केला आहे. त्यामुळे रिकार्डोने आपल्या आर्थिक विचारांमध्ये व्याजाबाबत फारसा विचार केलेला नाही. रिकार्डोच्या मते, नफा आणि वेतनदर यांच्यात व्यस्त स्वरूपात संबंध असतो. त्याने भांडवलाची उत्पादनक्षमता गृहीत धरल्याने भांडवलावर नफ्याच्या स्वरूपात मोबदला मिळतो. असे त्याने सुचविले आहे. रिकार्डोच्या मते, उत्पादक त्याच्या स्वत:कडील भांडवल उत्पादक कार्यासाठी गुंतवीत असल्याने त्यांना व्याज देण्याचा फारसा प्रश्न येत नाही. म्हणून त्याने व्याजाचा स्वतंत्रपणे विचारच केलेला नाही.

रिकार्डोनी नफ्यासंबंधी एक महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढला आहे की, समाजाची जसजशी प्रगती होत जाते तसतसे नफ्याचे प्रमाणदेखील घटत जाते. प्रगत व गतिमान अर्थव्यवस्थेमध्ये लोकसंख्या वाढत जात असल्याने अन्नधान्यांची मागणी वाढते. त्यासाठी कमी सुपीक जमीन लागवडीसाठी आणली जाते. त्यामुळे जादा कामगार कामावर घेतले जातात. त्यामुळे कामगारांच्या वेतनात वाढ होते. वेतनात जसजशी वाढ होत जाते तसा नफा घटत जातो. शेवटी अशी एक स्थिती येते की, नफा घटत जावून अखेर तो शून्य होतो. त्यामुळे भांडवल संचयाला पायबंद बसतो व त्यामुळे गुंतवणूक थांबते. त्यामुळे अर्थव्यवस्था स्थितीशील अवस्थेत जाते असे रिकार्डोने म्हंटले आहे. थोडक्यात रिकार्डोच्या नफ्याविषयक विचारांमधील ठळक बाबी पुढीलप्रमाणे.

१) नफ्याचा व्याजात समावेश होतो.

२) नफा व वेतन यांचे प्रमाण व्यस्त असते.

३) नफ्याची प्रवृत्ती घटत जाण्याची असते.

४) स्थितीशील अर्थव्यवस्था निर्माण होते.

**टीकात्मक परीक्षण :** रिकार्डोने मांडलेल्या नफ्याविषयक विचारांमध्ये मोठ्या प्रमाणात उणिवा आणि त्रुटी आढळून येतात. त्याने वेतनदर आणि नफा यांच्यात व्यस्त संबंध सांगितला. हे पूर्णत: चुकीचे आहे. कारण वेतनदर वाढत असताना नफा देखिल वाढत असल्याचे दिसून आले आहे. शिवाय वेतनदाराशिवाय इतर अनेक घटक वेतनदर ठरविण्यात कारणीभूत असतात. त्याकडे रिकार्डोने दुर्लक्ष केले आहे. थोडक्यात रिकार्डोचे नफ्याबाबतचे विचार हे अत्यंत संकुचित मानले जातात.

विभाजनविषयक विचार मांडून रिकार्डोने आर्थिक विचारांच्या इतिहासात मोलाची भर घातली आहे. विभाजन हा अर्थशास्त्राच्या अभ्यासविषयातील एक मध्यवर्ती विषय आहे. असे त्याचे स्पष्ट मत होते. मात्र त्याचा खंडाविषयक सिद्धांत वगळता वेतन, व्याज, नफा असे इतर विभाजनविषयक विचार हे फारच कमकुवत असल्याचे आढळून येते. असे असुनही आर्थिक विचारांच्या प्रारंभीच्या काळात विभाजनासारखा महत्त्वपूर्ण प्रश्नांच्या सैद्धांतिक मांडणीला त्याने सुरूवात करून दिली.

**स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न :**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. रिकार्डोच्या मते, ------ हे विनिमय मूल्य मोजण्याचे साधन असू शकत नाही.

अ) उपयोगिता ब) उपयोग क) मागणी ड) पुरवठा

२. रिकार्डोच्या मते, वस्तूचे मूल्य ------ वरून ठरते.

अ) उपयोगिता ब) विनिमय क) श्रम ड) भांडवल

३. जमिनीच्या ------ मुळे तिला खंड मिळतो.

अ) दुर्मिळताब) गुणभेद क) सुपिकता ड) मागणी

४. ------ जमिनीलाच खंड मिळतो.

अ) सुपीक ब) दुर्मीळ क) सीमांतपूर्व ड) सीमांत

५. कामगारांना त्यांच्या ------ एवढेच वेतन दिले जाते.

अ) निर्वाह पातळी ब) श्रम क) पुरवठा ड) मागणी

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. रिकार्डोने वेतनाचे कोणते प्रकार सांगितले?

२. रिकार्डोची खंडाची व्याख्या सांगा.

३. रिकार्डोने जमीन कसण्याच्या कोणत्या दोन पद्धती सांगितल्या?

४. रिकार्डोने वस्तूचे कोणत्या दोन प्रकारात वर्गीकरण केले?

५. रिकार्डोचा आर्थिक विचारांवर कोणाचा प्रभाव होता?

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे.**

**अ)**

१)-अ  २)-क  ३)-ब  ४)-ड  ५)-अ

**ब)**

१) रिकार्डोनी नैसर्गिक, वेतन आणि बाजार वेतन असे वेतनाचे दोन प्रकार सांगितले.

२) ''जमिनीच्या एकूण उत्पन्नापैकी जमिनीच्या उपजत व अविनाशी शक्तींच्या वापराबद्दल जमीन मालकाला दिला जाणारा भाग म्हणजे खंड होय.''

३) रिकार्डोने जमीन कसण्याच्या i) सखोल शेती पद्धती आणि ii) विस्तीर्ण शेती पद्धती असे दोन प्रकार सांगितले.

४) रिकार्डोने वस्तुंचे पुनरूत्पादन करता न येणाऱ्या वस्तू आणि पुनरूत्पादन करता येणाऱ्या वस्तू असे दोन प्रकार सांगितले.

५) रिकार्डोच्या आर्थिक विचारांवर ॲडम स्मिथच्या विचारांचा प्रभाव होता.

## २.२.३ थॉमस माल्थस : लोकसंख्या सिद्धांत (Thomos Malthus : Theory of Population) :

### जीवन परिचय (१७६६ ते १८३४) :

थॉमस माल्थसचा जन्म १४ फेब्रुवारी १७७६ रोजी इंग्लंडमध्ये झाला. वयाच्या १९ व्या वर्षी माल्थस केंब्रिज विद्यापीठात दाखल झाला. अत्यंत बुद्धिमान म्हणून त्याची ओळख होती. त्याने गणित या विषयातील सर्वोच्च मानली जाणारी 'रँग्लर' ही पदवी संपादन केली होती. ईस्ट इंडिया कंपनीने स्थापन केलेल्या हेलवरी येथील कॉलेजमध्ये माल्थसने इतिहास व अर्थशास्त्र या विषयांचा प्राध्यापक म्हणून काम केले. सन १७९८ मध्ये 'An Essay on Principles of Population हा ग्रंथ त्याने इंग्लंडमधील तत्कालीन प्रश्नांचा अभ्यास करुन प्रसिध्द केला. त्याच्या या ग्रंथाला खूपच प्रसिध्दी मिळाली. त्याने आपल्या कार्यकाळात अनेक ग्रंथाचे लेखन केले. त्यामध्ये प्रामुख्याने अर्थशास्त्राची मूलतत्त्वे, धान्यसंबंधी कायद्याचा अभ्यास, खंडाचे स्वरूप, गरीबांबाबतचा कायदा इ. ग्रंथांचा समावेश होतो. याशिवाय त्याने अनेक वैचारिक निबंध लिहीलेले आहेत.

### माल्थसचे आर्थिक विचार :

माल्थसने जे विविध आर्थिक विचार मांडलेले आहेत त्यामध्ये लोकसंख्याविषयक सिद्धांत आणि अति उत्पादन व आर्थिक अरिष्टे यावरील त्याचे विचार अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जातात. प्रस्तुत प्रकरणामध्ये माल्थसच्या वरील विचारांचा सखोल आढावा पुढीलप्रमाणे घेतला आहे.

**माल्थसचा लोकसंख्या सिद्धांत (Population Theory of Malthus) :**

माल्थसने त्याचा लोकसंख्याविषयक सिद्धांत हा एका विशिष्ट परिस्थितीतून मांडलेला आहे. माल्थसपूर्वीही अनेक विचारवंतांनी लोकसंख्येच्या प्रश्नावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. व्यापारवादी व निसर्गवादी विचारवंतांनी वाढत्या लोकसंख्येचे समर्थन केलेले होते. माल्थसच्या काळात इंग्लंडमधील व्यापार व साम्राज्य वाढत होते. त्याच काळात आदर्श समाजव्यवस्थेवर विश्वास ठेवणारा एक वर्ग इंग्लंडमध्ये वाढत होता. त्यांचे नेतृत्त्व गॉडवीन या आदर्शवाद्याकडे होते. गॉडवीनने आदर्श समाजव्यवस्थेचे चित्र रंगवून समाजात सर्व लोक सुखा-समाधानात राहतात आणि त्यांना उदरनिर्वाहाची काळजी नसते. असे रंजक विचार, वाढत्या लोकसंख्येला पोषक असे विचार मांडलेले होते. त्यामुळे गॉडवीनच्या या आदर्शवादी समाजव्यवस्थेला प्रत्युत्तर देण्याच्या हेतूने माल्थसने सन १७९८ मध्ये लोकसंख्येवर एक निबंध लिहीला. त्यामध्ये त्याने गॉडवीनच्या काल्पनीक व आदर्श समाजव्यवस्थेवर प्रखर टीका केली आणि लोकसंख्या वाढली असता दु:ख, दारिद्र्य वाढते असे सांगितले. माल्थसच्या या ग्रंथाने सर्वत्र खळबळ निर्माण केली. अर्थात माल्थसच्या या लोकसंख्या ग्रंथावर प्रचंड टीका झाल्याने नंतर त्यात माल्थसने बदल करून १८०३ मध्ये दूसरी अवृत्ती प्रकाशित केली. आणि त्यामध्ये वाढत्या लोकसंख्येतून निर्माण होणाऱ्या समस्या व त्या सोडविण्यासाठीचे प्रतिबंधात्मक उपाय यावर प्रकाश टाकला. अर्थात ज्या कारणांमुळे समाजाला सुखी-समाधानी अवस्थेकडे वाटचाल करता आली नाही. त्या कारणांचा शोध घेणे व ती कारणे दूर करण्याची शक्यता तपासणे हे दोन प्रमुख उद्देश माल्थसच्या लोकसंख्या सिद्धांतामागे होते.

**सिद्धांत्ताचे स्वरूप :**

माल्थसचा लोकसंख्याविषयक सिद्धांत पुढील तीन मुख्य गृहीतांवर आधारीत आहे.

१. मानवाला जगण्यासाठी अन्नाची नितांत आवश्यकता असते.

२. स्त्री- पुरूषांमधील आकर्षण हे मानवी जीवनातील एक नैसर्गिक अंग आहे.

३. अन्नधान्यातील उत्पादनवाढ ही लोकसंख्येतील वाढीपेक्षा कमी असते.

वरील गृहीतांच्या आधारावर माल्थसने असे स्पष्ट केले आहे की, मानवाला जगण्यासाठी अन्नधान्यांची गरज असते, परंतु त्याचबरोबर स्त्री-पुरूषांमधील आकर्षण हे नैसर्गिक असल्याने ते प्रभावी व कायमपणे टिकणारे असते. त्यामुळे लोकसंख्या सतत वाढत जाते. लोकसंख्या भूमिती श्रेणीने वाढत जाते. म्हणजे २, ४, ८, १६, ३९ याप्रमाणे ही वाढ होते. अर्थातच यामुळे लोकसंख्या ही दर २५ वर्षांनी दुप्पट होते. मात्र याच काळात मानवाला जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अन्नधान्याच्या उत्पादनात मात्र फारशी वाढ होत नाही. अन्नधान्यांमधील होणारी ही वाढ १, २, ३, ४, ५, ६, ७ अशी गणिती श्रेणीनुसार होते.

वरीलप्रमाणे माल्थसच्या मते, लोकसंख्या भूमिती श्रेणीने व अन्नधान्यांचे उत्पादन, गणिती श्रेणीने वाढत असल्याने दर २५ वर्षानंतर लोकसंख्या जास्त आणि अन्नधान्य उत्पादन कमी अशी परिस्थिती निर्माण होऊन देशात उपासमार, दारिद्र्य, दु:ख यांसारख्या समस्या निर्माण होतात. आणि म्हणूनच लोकसंख्येला निर्वाहाच्या

पातळीवरच रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायांची अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे माल्थसने स्पष्ट केले आहे.

**लोकसंख्या वाढीवरील उपाय :**

लोकसंख्या वाढीची प्रवृत्ती आणि अन्नधान्य उत्पादन घटण्याचा दर यातील तफावत वाढत गेल्यास उपासमार, दारिद्र्य यांसारख्या समस्या सोडविण्यासाठी जर प्रतिबंधक उपाय योजना केली गेली नाही तर निसर्ग स्वत: दुष्काळ, रोगराई, युद्धसंहारक असे उपाय योजून लोकसंख्या कमी करेल, असे माल्थसने म्हंटलेले होते, परंतु त्याने ग्रंथाच्या दुसऱ्या अवृत्तीमध्ये पुढील दोन प्रकारचे उपाय सुचविलेले आहेत.

**१) प्रतिबंधक उपाय :–** लोकसंख्या नियंत्रित करण्याच्या दृष्टिने लोकांकडून जाविणपूर्वक जे मार्ग स्विकारले जातात त्याला माल्थसने प्रतिबंधात्मक उपाय असे म्हंटले आहे. यामध्ये मुख्यत्त्वे ब्रम्हचर्य इत्यादी उपाय सुचविण्यात आलेले आहेत. माल्थसला संतती नियमनाची साधने वापरणे मान्य नव्हते.

**२) नैसर्गिक किंवा प्राकृतिक उपाय :–** माल्थसच्या मते, लोकसंख्या नियंत्रित करणे हे शेवटी माणसाच्या हाती आहे. परंतु मानवाने जर लोकसंख्या वाढीला प्रतिबंध घातला नाही तर ते कार्य निसर्ग करतो. त्यामध्ये दुष्काळ, महापूर, रोगराई, युद्धे इत्यादी मार्गाचा समावेश होतो. त्यातून अनेक लोक मृत्युमुखी पडतील. आणि अन्नधान्य व लोकसंख्या मेळ घातला जाईल, म्हणून यासाठी लोकांनी उपाय योजावेत असे मत माल्थसने व्यक्त केले आहे.

अशाप्रकारे माल्थसने वरील उपाय सांगून पूढे असेही स्पष्ट केले आहे की, प्रतिबंधक उपायांचा लोक फारसा उपयोग करणार नाहीत. त्यामुळे लोकसंख्या झपाट्याने वाढत जाईल. त्यातूनच दु:ख, दारिद्र्य, उपासमार इ. मध्ये वाढ होते. शेवटी निसर्ग आपले अतिसंहारक असे उपाय वापरून लोकसंख्या नियंत्रित करेल. अशाप्रकारचा निराशावादी विचार माल्थसने आपल्या सिद्धांतामध्ये व्यक्त केला होता.

**लोकसंख्या सिद्धातांचे परीक्षण :**

माल्थसच्या लोकसंख्या सिद्धांतावर अनेक टीका करण्यात आल्या आहेत. विशेषत: समाजवादी विचारवंतांनी या सिद्धांतावर जोरदार टीका केली आहे. त्यापैकी प्रमुख टीका पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) अन्नधान्य उत्पादनात प्रचंड वाढ :–** माल्थसने आपल्या सिद्धांतात अन्नधान्य उत्पादनवाढ ही गणिती श्रेणीने होते असे म्हंटले आहे. मात्र याबाबत कोणताही शास्त्रीय आधार नाही. कारण आज अनेक देशांमध्ये अन्नधान्य उत्पादनामध्ये प्रचंड वाढ झालेली दिसून येते. अनेक देश उदा– अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया इ. देश मोठ्या प्रमाणावर अन्नधान्यांचे उत्पादन करीत आहेत व निर्यातही करीत आहेत. आज आधुनिक तंत्रज्ञान, नवनविन संशोधन इत्यादींच्या आधारावर कृषी उत्पादनात प्रचंड वाढ घडून येत आहे. त्यामुळे माल्थसचे वरील विचार पूर्णत: चुकीचे ठरले आहे.

**२) लोकसंख्या भूमिती श्रेणीने वाढत नाही :–** लोकसंख्यावाढ भूमितीय श्रेणीने वाढते असे या सिद्धांन्तामध्ये म्हंटलेले आहे. पण ऐतिहासिकदृष्ट्या हे सिद्ध होत नाही, कारण आज अनेक पाश्चिमात्य देशांमध्ये लोकसंख्या घटली आहे. त्यामुळे लोकसंख्या भूमितीय श्रेणीने वाढून दर २५ वर्षांनी ती दुप्पट होते असे म्हणने अवास्तव आहे. अशी टीका केली जाते.

**३) निराशावादी विचारसरणी :–** माल्थसने आपल्या सिद्धांतामध्ये निराशावादी विचार मांडलेले आहेत. लोकसंख्या अमर्याद वाढून प्रचंड समस्या व संकटांना मानवजातीला सामना करावा लागेल. अशी माल्थसची निराशावादी विचारसरणी होती. त्यामुळे त्याच्या सिद्धांतावर जोरदार टीका केली गेली.

**४) स्त्री–पुरूष आकर्षण राहुनही लोकसंख्या घटते :–** स्त्री–पुरूष यांच्यातील नैसर्गिक आकर्षण कायमस्वरूपी टिकून राहते व त्यामुळे लोकसंख्या सतत वाढत राहते असा विचार माल्थसने आपल्या सिद्धांतामध्ये व्यक्त केला आहे. मात्र कालौघात असे घडताना दिसत नाही. जगातील अनेक देशांमध्ये फ्रान्स, प. जर्मनी, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशांमध्ये स्त्री–पुरूषांमधील आकर्षण कायम राहुनही लोकांनी आपल्या राहणीमानाचा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी निश्चयपूर्वक लोकसंख्या नियंत्रित ठेवलेली आहे. याचाच अर्थ स्त्री–पुरूषांमधील आकर्षण आजही कायम राहून देखील लोकसंख्या घटत आहे.

**५) मानवी श्रमाकडे दुर्लक्ष :–** माल्थसच्या सिद्धांतामध्ये मानवी श्रमाला विचारात घेतलेले दिसत नाही. लोकसंख्या वाढते म्हणजे फक्त खाणारी तोंडेच वाढतात असे नसून त्याबरोबर काम करणारे दोन समर्थ हात देखील वाढत असतात. याकडे त्याने दुर्लक्ष केले आहे. माणसाचे दोन हात त्याला लागणाऱ्या वस्तूंपेक्षा जास्त वस्तू तयार करतात. त्यामुळेच लोकसंख्या वाढीपेक्षाही अन्नधान्य उत्पादन प्रचंड प्रमाणात वाढल्याने माल्थसचा लोकसंख्याविषयक सिद्धांत चुकीचा ठरला आहे.

**६) प्रतिबंधक उपाय निरूपयोगी :–** आपल्या लोकसंख्या सिद्धांतामध्ये माल्थसने जे लोकसंख्या नियंत्रणाचे उपाय सुचविलेले आहेत ते निरूपयोगी ठरतात. अशीही टिका केली जाते. त्याने सुचविलेल्या उपायांपैकी उशिरा लग्न, नैतिक संयम, ब्रम्हचर्य या गोष्टी सर्वसामान्य लोकांना शक्य नसल्याने त्या पाळल्या जाणार नाहीत. तसेच त्यांनी संतती नियमनाच्या साधनांना केलेला विरोध अयोग्य आहे. अशीही टीका करण्यात येते. त्याने सुचविलेले नैसर्गिक उपाय देखील बुद्धीला न पटणारे आहेत. त्यामुळेच हा सिद्धांत चुकीचा ठरतो.

**७) प्राणी शास्त्रज्ञांच्या मते, चुकीचा सिद्धांत :–** प्राणी शास्त्रज्ञांनी माल्थसचा हा सिद्धांत चुकीचा ठरविलेला आहे. कारण मनुष्याची जसजशी प्रगती होत जाईल तसतशी त्याची प्रजोत्पादन क्षमता कमी होत जाईल. तसेच मनुष्य अन्नधान्याशिवाय जगूच शकणार नाही. यावर उत्तर देताना प्राणी शास्त्रज्ञांनी असे सांगितले आहे की, अन्नधान्याव्यतिरिक्त फळे, भाजीपाला, दूध, अंडी, मांस, मासे इत्यादी अनेक गोष्टींचा खाण्यामध्ये वापर केला जातो. याचाच अर्थ अन्नाशिवाय देखील माणूस जगतो याची जाणीव माल्थसला नसल्याने त्याचा सिद्धांत चुकीचा ठरतो.

माल्थसच्या लोकसंख्या सिद्धांतावर वरील अनेक टीका होत असल्या तरीही त्याच्या सिद्धांताचे महत्त्व कमी होत नाही. माल्थसने वास्तव परिस्थितीचे भान ठेवून त्याद्वारे केलेले लोकसंख्यंचे विवेचन जरी निराशाजनक वाटत असले तरी आजच्या परिस्थितीतही लोकसंख्येचा स्फोट झालेल्या देशांना लोकसंख्येच्या प्रश्नांने किती ग्रासले आहे. याची कल्पना येण्यास हा सिद्धांत उपयुक्त ठरतो. विकसित देशांच्या बाबतीत हा सिद्धांत मर्यादित प्रमाणात लागू होत असला तरी अनेक अविकसित व मागास देशांमध्ये या सिद्धांताचे महत्त्वाचे स्थान नाकारता येत नाही. लोकसंख्येच्या प्रश्नाकडे जगाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न माल्थसच्या या सिद्धांतामधून झाला आहे.

**स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न :**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. ------ यांनी लोकसंख्याविषयक सिद्धांताची मांडणी केली.

अ) थॉमस माल्थस  ब) डेव्हीड रिकार्डो  क)कार्ल मार्क्स  ड) जे. एन. केन्स

२. माल्थसच्या मते, लोकसंख्या ------ श्रेणीने वाढते.

अ) भूमिती  ब) गणिती  क) सरासरी  ड) गुणीत

३. लोकसंख्येच्या तुलनेत अन्नधान्याच्या उत्पादनातील वाढ ------ श्रेणीने होते.

अ) भूमिती  ब) गणिती  क) सरासरी  ड) गुणीत

४. ------ ने इंग्लंडमध्ये आदर्श समाजव्यवस्थेचे चित्र रंगवले.

अ) फ्रेजर  ब) कार्ल यंग  क) गॉडवीन  ड) मॉरीस

५. माल्थसने ------ साली लोकसंख्येवर निबंध लिहीला.

अ) १७७६  ब) १७९८  क)१७८०  ड) १७९१

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. माल्थसच्या लोकसंख्येवरील ग्रंथाचे नाव काय?

२. माल्थसच्या मते, लोकसंख्या किती वर्षांनी दुप्पट होते?

३. माल्थसने सांगितलेले लोकसंख्या प्रतीबंधाचे दोन उपाय सांगा?

४. माल्थसने लोकसंख्या नियंत्रणाचे कोणते नैसर्गिक उपाय सांगितले?

५. माल्थसने गणितातील सर्वोच्च असणारी कोणती पदवी संपादन केली होती?

**स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे :**

**अ)**

१) - अ  २) - अ  ३) - ब  ४) - क  ५) - ब

**ब)**

१. सन १७९८ मध्ये हा "An Essay on Principles of Population" हा ग्रंथ लिहीला.

२. माल्थसच्या मते, लोकसंख्या दर २५ वर्षांनी दुप्पट होते.

३. माल्थसने लेकसंख्या प्रतिबंधाकरता नैतिक संयम, विवाहबाह्य संबंध, विवाहाचे वय वाढविणे, ब्रम्हचर्य असे उपाय सुचविले.

४. माल्थसने दुष्काळ, महायुद्धे, रोगराई, महापूर असे लोकसंख्या नियंत्रणाचे नैसर्गिक किंवा प्राकृतिक उपाय सांगितले.

५. माल्थसने गणितामधील सर्वोच्च मानली जाणारी 'रँग्लर' ही पदवी संपादन केली होती.

### २.२.४ आर्थिक अरिष्टे/अतिरेकाचा/अतिभांडवलसंचय सिद्धांत (Theory of Gluts) :

माल्थसने भांडवल संचयाबाबत जे विचार मांडलेले आहेत. त्यामध्ये त्याने आर्थिक अरिष्टे आणि अतिभांडवलसंचय याबाबतचे जे विचार मांडलेले आहेत. त्यालाच अतिभांडवलसंचय सिद्धांत किंवा अतिरेकाचा सिद्धांत तसेच काही वेळा आर्थिक अरिष्टे सिद्धांत (Theory of Gluts) असे म्हणतात. माल्थसने हा अतिभांडवलसंचयाचा सिद्धांत एका विशिष्ट कारणास्तव मांडलेला आहे. कारण जे. बी. से. या सनातनवादी अर्थतज्ज्ञांने मांडलेला 'बाजारपेठांचा नियम' हे होय.

जे. बी. से. याने त्याच्या बाजारपेठाच्या सिद्धांतामध्ये असे म्हंटले होते की, ''प्रत्येक पुरवठा आपली मागणी निर्माण करतो.'' त्यामुळे बाजारात नेहमी मागणी बरोबर पुरवठा असा समतोल साधला जातो. त्यामुळे बाजारात कधीही मागणीपेक्षा उत्पादन जास्त किंवा मागणीपेक्षा उत्पादन कमी अशी स्थिती निर्माणच होत नाही. याचाच अर्थ बाजारपेठेमध्ये अतिरिक्त उत्पादन किंवा न्यून उत्पादन अशी अवस्था कधीच निर्माण होत नाही. जे.बी.से. यांच्या या सिद्धांताला डेव्हिड रिकार्डोनी दुजोरा दिला आहे व असे स्पष्ट केले आहे की, अर्थव्यवस्थेत एकूण मागणी व एकूण पुरवठा यांचा समतोल वा मेळ आपोआप घातला जातो. त्यामुळे अतिरिक्त उत्पादनाची स्थिती निर्माण होते.

माल्थसला जे. बी. से आणि रिकार्डो यांचे हे वरील विचार मान्य नव्हते. त्याने रिकार्डोला कठोर विरोध केला आणि असे प्रतिपादन केले जाते की, भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये भांडवलदारांची भांडवलसंचय करण्याची प्रवृत्ती असते. भांडवलदारांचा असा भांडवलसंचय करण्याच्या प्रवृत्तीतूनच जरुरीपेक्षा अधिक भांडवलसंचय होतो. आणि त्यातून अनुउत्पादन आणि अतिरिक्त उत्पादन (Over Production) ची स्थिती निर्माण होते व

त्यातुन आर्थिक अरिष्टे निर्माण होतात. म्हणून अर्थव्यवस्थेत अतिरेकी भांडवलसंचय होतो आणि त्यातुन अत्युत्पादन व आर्थिक अरिष्ट्ये कशी निर्माण होतात. या समस्यांचे स्पष्टीकरण करण्यासाठी माल्थसने 'अति-भांडवलसंचय' या सिध्दांताची मांडणी केली आहे.

माल्थसला भांडवलशाही अर्थव्यवस्था आणि उद्योगांची वेगाने झालेली प्रगती मान्य नव्हती. त्याला कृषीप्रधान अर्थव्यवस्था हवी होती. माल्थसच्या मते, भांडवलशाही अर्थव्यवस्थेवर संपूर्ण नियंत्रण हे भांडवलदारांचे असते. हे भांडवलदार जास्तीतजास्त नफा मिळविण्यासाठी नेहमीच धडपडत असतात. त्यासाठी ते अधिकाधिक गुंतवणूक करतात व अशी गुंतवणूक करण्यासाठी हे भांडवलदार जास्तीतजात बचत करतात. म्हणजेच आपला उपभोगावरील खर्च कमी करुन अधिकाधिक भांडवलसंचय करतात. असा भांडवलाचा संचय सातत्याने वाढत गेल्याने अधिक भांडवलसंचय हे अतिरेकी होणे. त्यातुन विविध वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढते. मात्र अशा वाढलेल्या उत्पादनाला मागणी येत नाही. कारण वस्तूंच्या खरेदीसाठी आवश्यक असणारी खरेदी शक्ती लोकांजवळ असत नाही. बाजारात एका बाजूला प्रचंड प्रमाणात उत्पादन झालेले असते. मात्र दुसऱ्या बाजूला खरेदी शक्तीच्या आभावी मागणीत कमतरता असते. परिणामी बाजारात वस्तूंचे साठे मोठ्या प्रमाणात तसेच पडून राहतात. त्यातुनच अत्युत्पादनाची वा अतिरिक्त उत्पादनाची स्थिती निर्माण होते.

माल्थसच्या मते अत्युत्पादनाची स्थिती निर्माण होण्यासाठी पुढील दोन कारणे जबाबदार असतात.

१) भांडवलदारांची अतिभांडवलसंचयी प्रवृत्ती

२) न्युन उपभोग व प्रभावी मागणीतील कमतरता

माल्थसच्या मते, भांडवलदार हे भांडवलसंचयाकरता त्यांना मिळालेला नफा सातत्याने गुंतवितात. त्यामुळे भांडवलदार उपभोगावर खर्च करीत नाहीत. तसेच अधिक नफा कमविण्यासाठी ते कामगारांना कमी वेतन देतात. त्यामुळे कामगारांची खरेदी शक्ती देखिल कमी राहते. त्यामुळे तेही खरेदी करु शकत नाहीत. त्यामुळे अर्थव्यवस्थेत न्युन उपभोगाची (Under Consumption) परिस्थिती निर्माण होते. या न्युन उपभोगाबरोबरच प्रभावी मागणीची कमतरता असते. प्रभावी मागणीची व्याख्या करताना माल्थस असे म्हणतो की, 'प्रभावी मागणी म्हणजे अशी मागणी जी वस्तूंची मागणी व पुरवठा सतत चालू ठेवते'. अर्थात न्युन उपभोगामुळे मागणीत कमतरता निर्माण होते. एका बाजूला अत्युत्पादन तर दुसरीकडे न्यून उपभोग आणि प्रभावी मागणीतील कमतरता अशा दुहेरी परिस्थितीतून अतिरिक्त उत्पानाची स्थिती निर्माण होत असते.

**आर्थिक अरिष्ट व आर्थिक मंदी :**

माल्थसने अति भांडवलसंचयामधून अतिरिक्त उत्पादन स्थिती सांगून त्यामधून आर्थिक अरिष्ट व आर्थिक मंदी कशी निर्माण होते. याबाबतही विचार मांडला. त्याच्या मते, भांडवलशाही अर्थव्यवस्थेत एकदा अतिरिक्त भांडवलशाहीची स्थिती निर्माण झाली की, त्यातूनच आर्थिक अरिष्टे व मंदीची स्थिती निर्माण होते आणि यास मुख्यत: भांडवलदारांची प्रवृत्ती जबाबदार ठरते. भांडवलदार हे नफ्याच्या अपेक्षेपोटी कामगारांना कमी वेतन देतात

आणि स्वत: उपभोगावर फारसा खर्च करीत नाहीत. कामगारांना वेतन कमी दिल्यामुळे त्याचा उपभोग कमी होतो. परिणामी मागणी घटून आर्थिक मंदी निर्माण होते. तसेच अतिरिक्त उत्पादनामुळे वस्तूंच्या किंमतीही हळूहळू कमी होत जातात. वस्तूंच्या किंमती कमी कमी होत जाऊन जेव्हा त्या उत्पादन खर्चापेक्षाही कमी होतात. तेव्हा भांडवलदारांचा उत्पादन खर्च भरुन निघत नसल्यामुळे ते उत्पादन कमी करतात.

त्यामुळे उद्योगधंदे बंद पडतात. त्यातूनच कामगारांना बेकार व्हावे लागते. कामगारांच्या बेकारीमुळे त्याची खरेदी शक्ती कमी होऊन पुन्हा वस्तूंची मागणी कमी होते. याचा परिणाम होऊन अर्थव्यवस्था मंदीच्या संकटात सापडते. त्यामुळे आर्थिक अरिष्टे निर्माण होतील असे माल्थसने स्पष्ट केले आहे. अर्थात, माल्थसच्या मते, मंदीची ही परिस्थिती कायमस्वरुपी टिकणारी नसते. कारण मंदीच्या काळात भांडवलदार उत्पादन करणार नाहीत. त्यामुळे अर्थव्यवस्थेमध्ये पूर्वीचे जे उत्पादन केलेले असते. ते कधीतरी संपेल व भांडवलदारांमध्ये पुन्हा उत्पादन करण्याची प्रेरणा निर्माण होईल.

**उपाययोजना :**

आर्थिक अरिष्ट टाळण्यासाठी माल्थसने काही उपाय सुचविलेले आहेत.

**१) अनुत्पादक उपभोग वाढविणे :**

माल्थसच्या मते, अनुत्पादक उपभोक्ते म्हणजे असा वर्ग की जो जड वस्तुंची निर्मिती न करणारा पण स्वत:चे उत्पन्न उपभोगावर खर्च करणारा असतो. या वर्गामध्ये त्याने जमीनदार, धनिक लोक, धर्मगुरु, शिक्षक, सैनिक, न्यायाधिश, वकील, डॉक्टर, साहित्यिक, कलावंत इत्यादींचा समावेश केला. माल्थसच्या मते, आर्थिक अरिष्ट टाळण्यासाठी वरील अनुत्पादक उपभोक्त्यांची आवश्यकता असते. अशा अनुत्पादक उपभोक्ता वर्गावर सार्वजनिक खचाद्वारे खर्च केल्यास त्यांच्या हातात पैसा जाईल. त्यांचे उत्पन्न वाढेल. आणि त्यातुन वस्तूंची मागणी वाढून आर्थिक अरिष्ट व मंदी कमी होण्यास मदत होईल.

**२) भांडवलदारांचा उपभोग वाढविणे :**

भांडवलदार भांडवलसंचयासाठी नफ्याच्या अधिकाधिक भाग वापरतात. त्यामुळे त्यांची बचत जास्त आणि उपभोग कमी अशी स्थिती असते. म्हणून माल्थसने असे सुचविले की, भांडवलशाहीतील अतिरिक्त उत्पादनाची स्थिती टाळण्यासाठी भांडवलदारांनी स्वत:च उत्पादन केलेल्या वस्तूंचा उपभोग घ्यावा. तसेच भांडवलदारांनी मोठ्या प्रमाणावर किंमती न वाढविता आपल्या अवास्तव नफा प्राप्तीवर मर्यादा घालावी.

**३)** आर्थिक अरिष्ट टाळण्यासाठी देशातील लोकांची बचत प्रवृत्ती गरजेपेक्षा जास्त प्रमाणात वाढता कामा नये. हा देखिल आर्थिक अरिष्ट टाळण्यासाठीचा एक उपाय असू शकतो असे माल्थसने सुचविले.

माल्थसने वरीलप्रमाणे अर्थशास्त्रीय विचार मांडून अर्थशास्त्रीय विचारांच्या इतिहासात मोलाची कामगिरी केली आहे. माल्थसच्या विचारांचा आधार घेऊन अनेक अर्थतज्ज्ञांनी पुढे विविध संकल्पना मांडल्या. केन्स या

अर्थतज्ज्ञांनी माल्थसविषयी पुढील उद्‌गार काढले आहेत. 'एकोणिसाव्या शतकातील आर्थिक विचारांची उभारणी ही जर रिकार्डोऐवजी माल्थसच्या विचारांवर जर झाली असती तर आजचे आर्थिक जीवन हे अधिक सुंदर व अधिक समजूतदार झाले असते'. यावरुनच आपणांस त्यांच्या कामगिरीची कल्पना येऊ शकते.

**स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न :**

**अ) योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१) माल्थसने मांडलेल्या अतिभांडवलसंचय सिध्दांताला ............... सिध्दांत असेही म्हणतात.

अ) नफ्याचा ब) मूल्याचा क) प्राप्तीचा ड) अतिरेकाचा

२) जे. बी. से. च्या मते, प्रत्येक पुरवठा आपली................... निर्माण करतो.

अ) मागणी ब) पुरवठा क) विक्री ड) खरेदी

३) जे. बी. से. च्या सिध्दांताला .................. नी दुजोरा दिला.

अ) माल्थस ब) ॲडम स्मिथ क) रिकार्डो ड) केन्स

४) माल्थसच्या मते ................ अर्थव्यवस्थेत आर्थिक अरिष्टे निर्माण होतात.

अ) समाजवादी ब) भांडवलशाही क) मिश्र ड) साम्यवादी

५) माल्थस ..............प्रधान अर्थव्यवस्थेचा समर्थक होता.

अ) शेती ब) उद्योग क) व्यापार ड) सेवा

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) माल्थसने सांगितलेली अतिउत्पादनाची दोन प्रमुख कारणे कोणती ?

२) माल्थसने प्रभावी मागणीची केलेली व्याख्या सांगा.

३) माल्थसच्या मते, भांडवलशाहीमध्ये मंदी कशामुळे निर्माण होते?

४) आर्थिक अरिष्ट टाळण्यासाठी माल्थसने सुचविलेले दोन उपाय सांगा.

५) जे. बी. से. यांनी कोणता सिध्दांत मांडला?

**स्वयंअध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे :**

अ) १ - ड २ - अ ३ - क ४ - ब ५ - अ

ब) १) भांडवलदारांची अतिभांडवल संचयाची प्रवृत्ती आणि न्युन उपभोग व प्रभावी मागणीतील कमतरता हे दोन अतिउत्पादनाची प्रमुख कारणे असल्याचे माल्थसने सांगितलेली आहेत.

२) प्रभावी मागणी म्हणजे जी वस्तुंचे उत्पादन व पुरवठा सतत चालू ठेवते अशी मागणी होय.

३) माल्थसच्या मते, भांडवलशाीतील अतिउत्पादनामुळे आर्थिक मंदी निर्माण होते.

४) अनुत्पादक उपभोक्त्यांमध्ये उपभोग वाढविणे आणि भांडवलदारांचा उपभोग वाढविणे हे दोन उपाय आर्थिक अरिष्टे टाळण्यासाठी माल्थसने सुचविलेले उपाय आहेत.

५) जे. बी. से. यांनी 'बाजारपेठांचा सिध्दात' मांडला.

**२.३ सारांश (Summary) :**

आधुनिक काळातील व्यापारवाद व निसर्गवादाचा कालखंड (१७७६ ते १८४८) म्हणजेच सनातन कालखंड होय. ॲडम स्मिथच्या आर्थिक विचारांपासून सनातन कालखंडाची सुरवात होती. ॲडम स्मिथला आधुनिक आर्थिक विचार मांडणारा अर्थशास्त्रज्ज्ञांचा समुदाय म्हणजे सनातनवादी संप्रदाय होय. यामध्ये ॲडम स्मिथ डेव्हीड रिकार्डो, थॉमस माल्थस, प्रा. पिगू, जे. बी. से., जे. एस. मिल यांचा समावेश होतो.

१७७६ मध्ये ॲडम स्मिथने 'राष्ट्राची संपत्ती' हा जो प्रसिद्ध ग्रंथ लिहीला व या पुस्तकामुळेच अर्थशास्त्राला एक स्वतंत्र शास्त्र म्हणून मान्यता मिळाली. समाजात उत्पादन करताना सामाजिक सहकार्याची जी एक पद्धत असते त्यास श्रमविभागणी असे म्हणतात. कार्यक्षमतेत वाढ, श्रम व वेळेची बचत, जलद व मोठ्या प्रमाणावर उत्पादन, संशोधनास चालना हे श्रमविभागणीचे फायदे असून कामात कंटाळा व गतीशीलतेत घट हे श्रमविभागणीचे तोटे आहेत. स्मिथने वस्तूच्या मूल्य निश्चितीमध्ये श्रमाला महत्त्व दिलेले आहे. उत्पादक श्रम हेच संपत्तीचे उगमस्थान आहे. असे प्रतिपादन करून वस्तूच्या मुल्यनिश्चितीमध्ये मूल्य सिद्धांत मांडला आहे. स्मिथच्या मते, सरकारने काटकसरीचा वापर करून सार्वजनिक खर्च कमीत कमी करावा. कर आकारणी हेच सरकारच्या उत्पन्नाचे एक प्रमुख साधन असून कर आकारणी करताना समता, निश्चितता, सोईस्करता, मितव्ययता या प्रमुख चार कसोट्या सांगितल्या आहेत.

डेव्हिड रिकार्डो हा प्रसिद्ध सनातनवादी अर्थतज्ज्ञ असून त्याचा खंडविषयक सिद्धांत अर्थशास्त्रीय विचारांत प्रसिद्ध आहे. जमिनीच्या एकूण उत्पादनापैकी जमिनीच्या उपजत व अविनाशी गुणांबद्दल जमीन मालकाला दिला जातो. त्याला खंड असे म्हणतात. रिकार्डोच्या मते, अन्नधान्यांच्या किंमती खंडावरून ठरत नाहीत. तर किंमतीवरून खंड ठरतो. म्हणजेच खंडाचा समावेश किंमतीत होत नाही. रिकार्डोनी मूल्याबाबत देखिल विनिमय मूल्यावरून श्रमाचे मूल्य ठरते असे सांगितले. त्याच्या विभाजनविषयक विचारांमध्ये वेतन नफा याविषयी विचार मांडलेले विचार हे फारच कमकुवत होते.

थॉमस माल्थस हा सनातनवादी आर्थिक विचारांमधील एक प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आहे की जो त्याच्या लोकसंख्याविषयीच्या सिद्धांताकरता प्रसिद्ध आहे. त्याच्या मते, लोकसंख्येतील वाढ ही भूमिती श्रेणीनुसार होते. त्यामुळे लोकसंख्या दर २५ वर्षांनी दुप्पट होते. दुसरीकडे अन्नधान्य उत्पादनातील वाढ ही गणिती पद्धतीने होते. त्यामुळे दारिद्र्य, उपासमार, बेकारी यांसारख्या लोकसंख्या विषयक समस्या निर्माण होतात. त्यामुळे वाढती

लोकसंख्या रोखण्यासाठी प्रतिबंधक व नैसर्गिक उपाय योजले पाहिजे. माल्थसच्या मते, भांडवलसंचय, अतिउत्पादन व न्यून उपभोग ही उपभोग ही भांडवलशाहीची खास वैशिष्ट्ये असून अर्थव्यवस्थेत अतिरिक्त उत्पादनाचे साठे पडून राहिल्याने मंदी सारखी आर्थिक अरिष्टे निर्माण होतात.

**२.४ पारिभाषिक शब्द (Glossary) :**

१) सनातन - अभिजात किंवा उत्कृष्ट

२) सनातनवादी संप्रदाय - सनातनवादी विचार मांडणारा अर्थतज्ज्ञांचा समूह किंवा गट.

३) व्यापारतोल - विशिष्ट कालखंडातील एखाद्या देशातील आयात-निर्यात दर्शविणारा तक्ता.

४) खुला व्यापार - कोणत्याही निर्बंधाशिवाय मुक्त व्यापार.

५) तौलनिक - तुलनात्मक

६) मितव्ययता - काटकसर

७) विस्तृत शेती - विस्तीर्ण किंवा व्यापक शेती.

८) सखोल शेती - जमिनीचे क्षेत्रफळ कायम ठेवून श्रम व भांडवलाचे प्रमाण वाढवून शेती करणे.

९) भूमिती श्रेणी - वाढीचे प्रमाण दुप्पट (२, ४ , ८, १६...)

१०) गणिती श्रेणी - सरळ स्वरूपातील वाढ (१, २, ३, ४...)

**२.५ सरावासाठी स्वाध्याय (Assignment for exercise) :**

**अ) दिर्घोत्तरी प्रश्न :**

१. ॲडम स्मिथच्या मूल्यविषयक सिद्धांताचे स्पष्टीकरण द्या.

२. ॲडम स्मिथचे श्रमविभागणीची संकल्पना स्पष्ट करून तिचे फायदे व तोटे सांगा.

३. रिकार्डोच्या खंडाविषयक सिद्धांताचे मूल्यमापन करा.

४. रिकार्डोचा मूल्य सिद्धांत सविस्तर स्पष्ट करा.

५. माल्थसच्या लोकसंख्याविषयक सिद्धांताचे स्पष्टीकरण करा.

६. माल्थसचे अतिरिक्त उत्पादन व आर्थिक अरिष्टे याविषयीचे विचार सविस्तर मांडा.

**ब) टीपा लिहा :**

१. स्मिथच्या कर कसोट्या.

२. स्मिथचे श्रमविभागणीचे तत्त्व.

३. रिकार्डोचा मूल्य सिद्धांत.

४. रिकार्डोचा खंड सिद्धांत.

५. माल्थसचा लोकसंख्याविषयक सिद्धांत.

६. माल्थसचे अतिरिक्त उत्पादनाबाबत विचार.

## २.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. प्रा. गाडगीळ बाळ, 'अर्थशास्त्राचे शिल्पकार' (अनुवाद) (१९६९) मॅजिस्टेक बुक स्टॉल.

२. प्रा. काटे के. बी. अर्थशास्त्रीय विचारांचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

३. प्रा. ठक्कर के. एच. 'आर्थिक कल्पनांचा विकास' (१९९४-९५) फडके प्रकाशन, कोल्हापूर.

४. प्रा. देसाई स. श्री. मु., प्रा. येवलेकर चि. त्र., 'आर्थिक विचारांचा इतिहास' (१९७१) ढोकळ प्रकाशन, लक्ष्मी रस्ता, पुणे ३०.

५. प्रा. गोखले आर. एम. 'अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास' (१९७९) कोंन्टिनेंटल प्रकाशन, पुणे ३०.

६. प्रा. डॉ. जे. एफ. पाटील. (संपादक) 'आर्थिक विचारांचा इतिहास' (२००५) फडके प्रकाशन, कोल्हापूर.

७. प्रा. रायखेलकर ए. आर. 'आर्थिक विचारांचा इतिहास' (२००५) विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपूरा, औरंगाबाद.

८. डॉ. अनिलकुमार वावरे, प्रा. संजय धोंडे, डॉ. अनिल सप्रे 'आर्थिक विचारांचा इतिहास' एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद.

९. कुलकर्णी श्री. प्र. 'आर्थिक विचारगाथा' श्री. साईनाथ प्रकाशन, कोल्हापूर.

१०. L. H. Haney - History of Economic Thought.

११. Gide and Rist - History of Economic Doctirines.

१२. Bhatnagar K. P. and Bahadur Satish, 'A History of Economic Thought' (1965) Kishore Publication House, Kanpur.

१३. Taylor overton H. A. History of Economic Thought.

१४. Marshall Alfaret - Principles of Economics, The English Langauge Book Society and Macmillan Press Ltd.


***

# घटक : ३
# फ्रेडरिक लिस्ट यांचे आर्थिक विचार
# Economic Thoughts of Fredrick List

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन :

३.२.१ सनातनवादी विचारांवरील टीका

३.२.२ आर्थिक वृध्दीचे टप्पे

३.२.३ राष्ट्रवादी विचारसरणी

३.२.४ संरक्षणाचा सिध्दांत

३.३ सारांश

३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे

३.६ पारिभाषिक शब्द

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

**३.० उद्दिष्ट्ये :** सदर प्रकरणाच्या अभ्यासानंतर आपणाला पुढील बाबींची अधिक कल्पना येण्यास मदत होते.

१. फ्रेडरिक लिस्ट यांनी सनातनवादी विचारांवर केलेल्या टीका स्पष्ट होण्यास मदत होते.

२. लिस्ट यांचे आर्थिक विकासाचे टप्पे समजण्यास मदत होईल. लिस्ट यांचे आर्थिक विकासाचे टप्पे, शिकारी किंवा रानटी अवस्था, गुराखी अवस्था, शेती व्यवसायावरील अवलंबित्व, शेती-उद्योग विकासाची अवस्था, शेती-कारखानदारी-व्यापार विकासाची सर्वोच्च अवस्था, लिस्ट यांच्या विकास टप्प्यांचे टीकात्मक परिक्षण या संकल्पना अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

३. लिस्ट यांच्या राष्ट्रवादी विचारसरणीची कल्पना येईल. लिस्ट यांची राष्ट्रवादी विचारसरणी, राष्ट्रवादी विचारांचे समर्थन याबाबत अधिक माहिती प्राप्त होण्यास मदत होते.

४. लिस्ट यांचा संरक्षण सिध्दांत लक्षात येईल. सनातनवादी तज्ञांचे व्यापार धोरण विषयक विचार, फ्रेडरिक लिस्ट यांचे व्यापार विषयक संरक्षणाचे धोरण, संरक्षण विषयक धोरणाचे समर्थन, विकास अवस्था व व्यापाराचे धोरण, लिस्टच्या संरक्षण धोरणाचे वैशिष्ट्ये याची अधिक माहिती मिळते.

**३.१ प्रास्ताविक :**

जॉर्ज फ्रेडरिक लिस्ट यांचा जन्म ६ ऑगस्ट १७८९ रोजी वुर्टेमबर्ग (जर्मनी) येथे झाला. तर त्यांचा मृत्यू ३० नोव्हेबर १८४६ रोजी ऑस्ट्रेलिया येथे झाला. त्यांच्यावर आलेक्झांडर हॅमिल्टन व डॅनियल रेमंड यांच्या विचारांचा प्रभाव होता. फ्रेडरिक लिस्ट यांनी लिखानामधून सरकारी कार्यप्रणालीवर प्रखर टीका केल्याने त्याला नोकरीचा राजीनामा द्यावा लागला. सरकारच्या अंतर्गत व्यापारावरील करारोपनाच्या धोरणाचा विरोध करणारे लिखान केल्याने जर्मन सरकारने १० महिने शिक्षा केली. सन १८२० मध्ये त्यांची जर्मनीच्या कायदे मंडळावर निवड, सातत्य पूर्ण सार्वजनिक धोरणावर टीका करणारे लिखाण करत राहील्याने त्याला जर्मनी सोडावी लागली व तो अमेरिकेमध्ये जाऊन राहीला.

सन १८२७ मध्ये त्यांनी Outlines of American Political Economy हा ग्रंथ लिहीला व त्यामध्ये संरक्षणाच्या धोरणाचे प्रचार करणारे विचार मांडले. सन १८३२ मध्ये अमेरिकन सरकारने अमेरिकेचा प्रतिनिधी म्हणून त्याला जर्मनीस पाठविले. जर्मनीच्या पायाभुत सुविधांच्या दृष्टीने अंत्यत महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या रेल्वेच्या विकासाबाबत योजना त्याने तयार केली. सन १८४१ मध्ये National System of Political Economy हा ग्रंथ लिहीला. अशा या German Historical School of Economics चा संस्थापक असणाऱ्या, १९ व्या शतकामधील प्रभावी जर्मन-अमेरिकन शास्त्रज्ञाने, अमेरिकेतील संपत्तीचे आर्थिक संकटामध्ये मोठे नुकसान झाल्याने व खालावत चाललेल्या आरोग्यामुळे सन १८४६ मध्ये आत्महत्या केली.

**३.२ विषय विवेचन -**

प्रस्तुत घटकामध्ये खालील बाबींचा परामर्श घेतला आहे.

३.२.१ फ्रेडरिक लिस्ट यांनी सनातनवादी विचारांवर केलेल्या टीका

३.२.२. लिस्ट यांचे आर्थिक विकासाचे टप्पे - शिकारी किंवा रानटी अवस्था - गुराखी अवस्था - शेती व्यवसायावरील अवलंबित्व - शेती - उद्योग विकासाची अवस्था - शेती - कारखानदारी - व्यापार विकासाची सर्वोच्च अवस्था - लिस्ट यांच्या विकास टप्प्यांचे टीकात्मक परिक्षण

३.२.३ लिस्ट यांची राष्ट्रवादी विचारसरणी - राष्ट्रवादी विचारांचे समर्थन

३.२.४ सनातनवादी तज्ञांचे व्यापार धोरण विषयक विचार - फ्रेडरिक लिस्ट यांचे व्यापार विषयक संरक्षणाचे धोरण - संरक्षण विषयक धोरणाचे समर्थन - विकास अवस्था व व्यापाराचे धोरण - लिस्टच्या संरक्षण धोरणाचे वैशिष्ट्ये

### ३.२.१ सनातनवादी विचारांवरील टीका (Critisim on Classical School) :

सनातनवादी विचारामध्ये असणारे दोषच राष्ट्रवादी विचारसरणीच्या उदयाला कारणीभूत ठरलेले आहेत. सनातनवादी विचारवंतानी जगातील सर्वच देशांनी विकासाचा एक विशिष्ट टप्पा गाठलेला आहे. सर्व देश विकासाच्या समान अवस्थेला पोहचलेले आहेत. त्यामूळे त्यांनी खुल्या अर्थव्यवस्थेचा स्विकार केल्यास त्यामधून सर्वच देशांना फायदा प्राप्त होईल. हेच विचार सनातनवादी विचारावरील टीकेस कारणीभूत ठरले व त्यामधून जागतिक स्तरावर राष्ट्रवादी विचारांचा विकास घडून आला.

प्रचलित सनातवादी विचारांमधील प्रमुख दोष दाखवित, त्या विचारांना विरोध दर्शविणारे राष्ट्रवादी विचारसरणीचे समर्थन करणारे लिखाण सर्वप्रथम फ्रेडरिक लिस्ट यांनी केले म्हणूनच त्यांनी राष्ट्रवादी विचारांचे प्रणेते असे म्हटले जाते. लिस्ट यांनी सनातनवादी विचारांवर पुढील टीका केलेल्या आहेत.

सर्व देश समान विकासावस्थेत नसतात. सनातनवादी अर्थतज्ञांनी जगातील सर्वच देश विकासाच्या एका समान अवस्थेला पोहचलेले आहेत म्हणूनच सर्वानी खुल्या व्यापाराचे धोरण स्विकारावे असे मत व्यक्त केले होते. परंतु लिस्ट यांनी जगातील अनेक अर्थव्यवस्थांचा अभ्यास करुन जगातील सर्वच देश विकासाच्या समान अवस्थेत नाहीत हे सिध्द केले.

**१. राष्ट्रवादी संकल्पनेकडे दुर्लक्ष :** सनातनवादी विचारवंतानी व्यक्ती आणि विश्व या दोन घटकांवरती भर देऊन दोन्हीच्या दरम्यान असणाऱ्या राष्ट्र संकल्पनेकडे दुर्लक्ष केलेले आहे. प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या राष्ट्रांचा नागरीक असतो. राष्ट्राच्या सामाजिक आर्थिक विकासाचा परिणाम नागरीकाच्या विकासावरती होत असतो म्हणूनच राष्ट्र ही संकल्पना अत्यंत महत्तवाची असते.

**२. एकच सिध्दांत सर्व देशांना समान लागू पडत नाही :** सनातनवादी अर्थतज्ञांनी जगातील सर्वच देश विकासाच्या एका समान अवस्थेला पोहचलेले असल्याने एकच सिध्दांत सर्व देशांना समान लागू पडतो असे मत व्यक्त केले होते. परंतु लिस्ट यांनी अनेक अर्थव्यवस्थांचा अभ्यास करुन जगातील सर्वच देश विकासाच्या समान अवस्थेत नाहीत हे सिध्द केले व म्हणूनच एकच सिध्दांत सर्व देशांना समान लागू पडत नाही अशी टीका केली.

**३. एकच धोरण सर्व देशांना योग्य नाही :** फ्रेडरिक लिस्ट यांनी अनेक अर्थव्यवस्थांच्या अभ्यासावरुन जगातील सर्वच देश विकासाच्या समान अवस्थेत नाहीत हे सिध्द केले त्यामुळे एकच धोरण जगातील सर्व देशांना लागू पडत नसते या सनातनवादी विचारावर टीका केली.

**४. संपत्तीच्या निर्मितीकडे दुर्लक्ष :** लिस्ट याच्या मते ॲडम स्मिथ, रिकार्डो या सनातनवादी शास्त्रज्ञांनी संपत्तीच्या साठ्यावर अधिक भर देऊन संपत्तीच्या निर्मितीकडे पुर्णतः दुर्लक्ष केलेले आहे अशी टीका केली.

**५. व्यक्तिहित व व्यक्ती स्वातंत्र्याला अवास्तव महत्त्व :** सनातनवादी विचारवंतानी सरकारने व्यक्ती हिताच्या दृष्टीकोनातून व्यक्ती स्वातंत्र्याचे धोरण स्वीकारल्यास प्रत्येक व्यक्तीच्या विकासातून संपूर्ण विश्वाचा विकास घडून येण्यास मदत होते असे मत व्यक्त केले. परंतु सनातनवाद्यानी व्यक्ती हीत व व्यक्ती स्वातंत्र्याला अवास्तव महत्त्व दिले आहे अशी टीका लिस्ट यांनी केली आहे.

**६. खुल्या व्यापाराला अधिक महत्त्व :** सनातनवादी अर्थतज्ञांनी जगातील सर्वच देश विकासाच्या समान अवस्थेमध्ये पोहचलेले आहेत म्हणूनच खुल्या व्यापाराचे धोरण स्वीकारावे असे मत व्यक्त केले. परंतु लिस्ट यांनी आर्थिक विकासाचे विविध टप्पे स्पष्ट करुन संरक्षणाच्या धोरणाचे समर्थन केले व सनातनवाद्यांनी खुल्या व्यापाराला अधिक महत्त्व दिले अशी टीका केली.

**७. निर्हस्तक्षेपाचे धोरण अयोग्य :** सनातनवाद्यांनी खुल्या व्यापाराच्या धोरणाचे समर्थन करत असताना निर्हस्तक्षेपाचे धोरण सरकारने स्वीकारावे असे मत व्यक्त केले परंतु विकासाच्या सर्वोच्च अवस्थेमध्ये पोहचण्यासाठी सरकारने हस्तक्षेपाचे धोरण स्विकारणे योग्य असते असे स्पष्ट केले तर निर्हस्तक्षेपाचे धोरण अयोग्य आहे अशी टीका केली.

**८. जगात सर्वत्र शांतता नसते :** सनातनवादी विचारवंतानी जगातील सर्वच देश विकासाच्या समान अवस्थेत पोहचलेले आहेत तसेच जगात सर्वत्र शांतता आहे असे मत व्यक्त केले, परंतु जगातील अनेक देशांमध्ये संघर्षच आहेत असे दिसून येते म्हणूनच जगात सर्वत्र शांतता आहे हे सनातनी विधान चूकीचे ठरते.

**९. विविध देशातील हितसंबंध समान असत नाहीत :** ज्या प्रमाणे सर्व राष्ट्रांची विकास अवस्था समान नाही, सर्वत्र शांतता नाही त्याप्रमाणेच विविध देशांमधील हितसबंध समान असतात या सनातनी विचारांवर लिस्टने टीका केलेली आहे.

**१०. सनातनी विचारांमध्ये गतिशीलतेकडे दुर्लक्ष :** सनातनवादी विचारवंतानी जागतिक स्तरावरती सर्वच देश सर्वोच्च विकासाच्या अवस्थेमध्ये पोहचलेले आहेत व ते स्थितीशील अवस्थेला पोहचलेले आहेत असे विचार मांडून गतिशीलतेकडे दुर्लक्ष केलेले आहे अशी टीका लिस्ट यांनी केली.

वरील स्वरुपाच्या विविध टीका करुन लिस्ट यांनी सनातनवादी विचारांमधील दोष किंवा कमकुवतपणा स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या टीका करुन लिस्ट यांनी राष्ट्रवाद, विकासाचे टप्पे व संरक्षणाचे धोरण याबाबतचे स्वत:चे तत्वज्ञान मांडण्याचा प्रयत्न केला व ते आज जगप्रसिध्द झालेले आहे.

### ३.२.२ लिस्ट यांचे आर्थिक वृध्दीचे टप्पे (Stages of Economic Growth) :

लिस्ट यांनी आपल्या लिखाणामध्ये सनातनवादी विचारवंताच्या आर्थिक विकासाबाबतच्या विचारांमधील दोष स्पष्ट करत असताना जे विचार स्पष्ट केलेले आहेत त्यांचा समावेश लिस्ट यांच्या आर्थिक विकासाबाबतच्या विचारांमध्ये होतो. त्या विचारांमध्ये त्यांनी आर्थिक विकास व वृध्दीबाबतचे टप्पे स्पष्ट केलेले आहेत.

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञानी विश्वाच्या विकासाच्या संदर्भात ज्या काही विचारांची मांडणी केली आहे त्यामध्ये पुढील विचारांचा समावेश होतो.

१) सर्व देश विकासाच्या समान अवस्थेत असतात.

२) सर्व सिध्दांत सर्व देशांना समान लागू पडतात.

३) सर्व देशांनी एकाच धोरणाचा स्विकार करावा.

४) मुक्त व्यापाराचा स्विकार सर्व राष्ट्रांनी करावा.

५) सरकारचे धोरण हस्तक्षेप विरहीत असावे.

यांसारख्या विचारांवर आधारीत सनातनवाद्यांचे आर्थिक विकासाबाबतचे विचार आधारलेले होते. सर्व विचार अयोग्य असून जगातील सर्वच देश विकासाच्या समान अवस्थेला नाहीत. त्यापैकी काही देश प्रगत तर काही देश मागासलेले आहेत. काही विकासाच्या प्राथमिक टप्प्यामध्ये आहेत तर काही देश विकासाच्या अंतिम टप्प्यामध्ये आहेत. म्हणूनच सर्वच देशांनी एकाच धोरणाचा स्वीकार करु नये. सर्व देशांना समान सिध्दांत लागू होत नाहीत असे मत व्यक्त करुन सर्वांनी मुक्त व्यापार, तसेच निर्हस्तक्षेपाचे धोरण स्वीकारणे योग्य नाही असे जे विचार मांडले त्यांना फ्रेडरिक लिस्ट यांचे आर्थिक विकासाचे विचार असे म्हणतात.

**लिस्ट यांचे आर्थिक विकासाचे टप्पे :**

लिस्ट यांनी जगातील अनेक देशाच्या विकासाच्या विविध टप्प्यांचा अभ्यास करुन असे मत व्यक्त केले की, प्रत्येक देश विकासाच्या विविध टप्प्यांमधून विकसित अर्थव्यवस्थेच्या अवस्थेमध्ये प्रवेश करत असतो. विकासाच्या त्या अवस्था त्यांनी पुढील प्रमाणे स्पष्ट केलेल्या आहेत.

**१) शिकारी किंवा रानटी अवस्था (Hunting or Savage Stage) :**

विकासाच्या प्राथमिक टप्प्यामध्ये अर्थव्यवस्था या अतिमागास असतात. या रानटी अवस्थेमध्ये शिकार करुनच उदरनिर्वाह करण्याचे कार्य व्यक्ती करतात. विकास साध्य करण्याच्या क्षमता नसल्याने अशा देशांना अन्य अर्थव्यवस्थांवर विसंबून राहावे लागते.

**अवस्थेची वैशिष्ट्ये :**

१) लोक टोळ्यांच्या स्वरुपात राहतात.

२) शिकार करणे हे उदरनिर्वाहाचे महत्त्वाचे साधन.

३) समूहामध्ये सहकार्याचा अभाव.

४) अर्थव्यवस्थेचे अतिमागास स्वरुप.

५) अर्थव्यवस्था शिकारी टोळ्यांचे प्रदेश असे स्वरुप.

६) समुहामध्ये संशोधन वृत्तीचा अभाव.

७) विकासाच्या प्रेरणा निर्माण झालेल्या नसतात.

८) शिक्षण तसेच संशोधन याची ओळख नसते.

९) राष्ट्र विकास, व्यक्तीस्वातंत्र्य यासारख्या संकल्पना परिचित नसतात.

**आवश्यक धोरण :**

विकासाच्या शिकारी तसेच रानटी अवस्थेमध्ये कार्यरत असणाऱ्या देशांनी मुक्त किंवा खुल्या अर्थव्यवस्थेचा

स्वीकार करावा असे मत फ्रेडरिक लिस्ट यांनी व्यक्त केले. या अवस्थेमध्ये खुल्या धोरणाचा स्वीकार केल्यास त्यांच्या प्राथमिक गरजांची पूर्तता होण्यास मदत होईल. तसेच अन्य देशांशी व्यवहार वाढत गेल्यास तो देश विकासाच्या दुसऱ्या टप्प्यात पोहचण्यास मदत होईल असे मत लिस्ट यांनी व्यक्त केले आहे.

**२) गुराखी अवस्था (Pastoral Stage) :**

शिकारी अवस्थेमधून अर्थव्यवस्था गुराखी अवस्थेमध्ये प्रवेश करते असे मत लिस्ट यांनी व्यक्त केले. गुराखी अवस्थेलाच पशूपालन अवस्था असेही म्हंटले जाते. या अवस्थेमध्ये समाज व्यवस्थेच्या उदरनिर्वाहाचे साधन हे पशुपालन व्यवसाय असतो.

**अवस्थेची वैशिष्ट्ये :**

१) रानटी अवस्थेच्या पुढचा टप्पा

२) पशुपालन उदरनिर्वाहाचे मुख्य साधन

३) गुराखी समाजाच्या प्रदेशाचे स्वरुप

४) शेती व्यवसायाच्या दिशेने वाटचालीस सुरवात

**आवश्यक धोरण :**

फ्रेडरिक लिस्ट यांच्या मते या अवस्थेमध्ये असणाऱ्या देशांनी आपल्या आर्थिक विकासाचा पुढचा टप्पा गाठण्यासाठी मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार करावा. मुक्त अर्थव्यवस्थेच्या आधारावर समाजाच्या मुलभूत गरजा पूर्ण करता येतात. तसेच आर्थिक विनिमयाचे व्यवहार वाढत जातात. व त्यामधून त्या देशाला विकासाची तिसरी अवस्था साध्य करणे अगदी सहज शक्य होते असे मत लिस्टने व्यक्त केले.

**३) शेती व्यवसायावरील अवलंबित्व (Agricultural Stage) :**

गुराखी अवस्थेत मुक्त व्यापाराचा स्विकार केल्यास अर्थव्यवस्था विकासाच्या शेती व्यवसाय या तिसऱ्या अवस्थेमध्ये प्रवेश करते. दुसऱ्या टप्प्यात पशुपालनावर अवलंबून असणाऱ्या अर्थव्यवस्थेचे उदरनिर्वाहाचे साधन शेती व्यवसाय हे बनते.

**अवस्थेची वैशिष्ट्ये :**

१) शेती क्षेत्राचा विकास.

२) नागरिक समुहाने राहण्यास सुरवात करतात.

३) शेती उत्पादनामध्ये वाढ होते.

४) कच्च्या मालाचे उत्पादन शेतीमध्ये घेतले जाते.

५) शेती मालाच्या उत्पादनाच्या मोबदल्यात अन्य वस्तूंची देवाण-घेवाण केली जाते.

६) शेती क्षेत्राच्या विकासातून औद्योगीक विकासाला प्रारंभ.

**आवश्यक धोरण :**

या अवस्थेच्या विकासासाठी सरकारने मुक्त अर्थव्यवस्थेचा किंवा खुल्या व्यापाराच्या धोरणाचा स्वीकार करावा असे मत लिस्ट यांनी व्यक्त केले. त्यांच्या मते मुक्त व्यापाराच्या साहाय्याने या अवस्थेतील राष्ट्रे शेती उत्पादनाची निर्यात करुन औंद्योगीक उत्पादनाची आयात करु शकतात व त्यामधून अर्थव्यवस्था औद्योगीक विकासाच्या पुढच्या टप्प्यामध्ये प्रवेश करतात. परंतु या अवस्थेमध्ये मुक्त व्यापाराचा स्विकार करत असताना राष्ट्राचे परावलंबन वाढणार नाही याची दक्षता त्या राष्ट्राने घेणे आवश्यक आहे असे मत लिस्ट यांनी व्यक्त केले.

**४) शेती-उद्योग विकासाची अवस्था (Agricultural Manufacturing Stage) :**

शेती विकासाच्या अवस्थेमधून अर्थव्यवस्था विकासाच्या पुढच्या म्हणजेच शेती-उद्योग विकासाच्या अवस्थेमध्ये प्रवेश, करते लिस्ट यांनी विकासाची ही चौथी अवस्था मानली आहे.

**अवस्थेची वैशिष्ट्ये :** लिस्ट यांना या अवस्थेची पुढील वैशिष्ट्ये दिसून येतात.

१) शेती व्यवसाय विकसित झालेला असतो.

२) शेती आधारित व्यवसायाच्या विकासामधून औद्योगीक विकासाची सुरुवात.

३) उद्योग बाल्यावस्थेमध्ये असतात.

४) शेती उद्योगाच्या विकासाला प्रेरक ठरते.

५) औद्योगीक विकासातून शेती विकास गतिमान होतो.

६) संघटीत स्वरुपाच्या राज्य संस्थेची स्थापना.

**आवश्यक धोरण :**

या अवस्थेमध्ये खुल्या धोरणा ऐवजी संरक्षणाचे धोरण स्विकारावे असे मत फ्रेडरिक लिस्ट यांनी व्यक्त केले अशा स्वरुपाच्या धोरणाचा स्विकार केल्यास देशामध्ये नव्याने स्थापना झालेल्या बाल्यावस्थेतील उद्योगांना संरक्षण प्राप्त होईल व त्यामधून अशा उद्योगांचा विकास गतिमान होण्यास मदत होते. देशातील उद्योगांना संरक्षण देण्यासाठी सरकारने आयातीवर जकात लादणे कोटा ठरविणे या सारख्या मार्गाने उद्योग विकसित होण्यास मदत होते व ती अर्थव्यवस्था विकासाच्या शेवटच्या म्हणजे पाचव्या टप्प्यामध्ये प्रवेश करते असे मत लिस्ट यांनी स्पष्ट केले.

**५) शेती-कारखानदारी-व्यापार विकासाची सर्वोच्च अवस्था (Agricultural Manufacturing Commercial Stage) :**

विकासाच्या शेती-उद्योग विकास या अवस्थेत देशी उद्योगांना संरक्षण दिल्यास ती अर्थव्यवस्था विकासाच्या सर्वोच्च अवस्थेमध्ये प्रवेश करते. की ज्यामध्ये शेती - उद्योग यांच्याबरोबरच व्यापाराचा देखील विकास साध्य झालेला असतो. शेती-उद्योग व व्यापार यांच्या विकासामध्ये योग्य तो समन्वय साध्य झालेला असतो.

**अवस्थेची वैशिष्ट्ये :**

१) शेती क्षेत्राचा विकास.

२) औद्योगीक क्षेत्राचा विकास.

३) व्यापाराचा विकास.

४) शेती - उद्योग व व्यापार विकासामध्ये योग्य समन्वय.

५) सर्वोच्च अवस्था साध्य करणे प्रत्येक राष्ट्राचे उद्दीष्ट

६) या अवस्थेत सर्व देश समान अवस्थेला पोहचतात.

७) राजकीय सत्ता प्रबळ बनते.

८) पुर्णत: व्यक्ती स्वातंत्र्य.

९) सांस्कृतिक विकास झालेला असतो.

१०) विकासाची ही सामान्य अवस्था असते.

११) अनेक वसाहतींची स्थापना.

१२) विकसित आंतराष्ट्रीय व्यापार.

**आवश्यक धोरण :**

सर्वोच्च विकासाच्या अवस्थेमध्ये सर्वच देश समान आर्थिक अवस्थेमध्ये पोहचलेले असतात. अशा देशांमध्ये खुल्या व्यापाराच्या धोरणाचा निर्हस्तक्षेपाच्या धोरणाचा पुरस्कार करावा, सर्वासाठीचे सिद्धांत समान असावेत असे मत लिस्ट यांनी स्पष्ट केले.

**विविध देश अथवा देश समुहाबाबत लिस्ट यांचे मत :**

अर्थव्यवस्थेतील विविध देशांच्या तसेच देश समुहाच्या विकासाबाबत, ते कितपत विकास साध्य करु शकतील याबाबत लिस्ट यांनी या अवस्था स्पष्ट करत असताना पुढील विचार मांडले आहेत.

| देश/ देशांचा समुह | अपेक्षित विकास टप्पा | वैशिष्ट्ये |
|---|---|---|
| १. समशीतोष्ण हवामानातील देश | सर्वोच्च विकासाची अवस्था स्पष्ट करावी | मोठा भूप्रदेश, मोठी नैसर्गिक साधन संपत्ती,अधिक लोकसंख्या |
| २. उष्णकटीबंधातील देश | शेती विकास अवस्थेपर्यत प्रगती करावी- शेती निर्यातीच्या आधारे औद्योगीक वस्तूंची आयात करावी. | हवामान, प्रतिकूल नैसर्गिक साधन संपत्तीची कमतरता, श्रमशक्तीचा अभाव |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | स्पेन व पोर्तुगाल | शेती व उद्योग विकास अवस्थेमध्ये | -------- |
| ४. | अमेरिका व जर्मनी | संरक्षण धोरणाच्या साहाय्याने सर्वोच्च विकासाची अवस्था साध्य करण्याचा प्रयत्न करावा. | हॉलंड व पोलंड हे देश जर्मनीत सामील झाल्यास भूप्रदेशामध्ये वाढ होवून सर्वोच्च विकासाची अवस्था ते साध्य करतील. |
| ५. | फ्रान्स | शेती व उद्योग विकासाच्या अवस्थेमधून सर्वोच्च विकासाच्या अवस्थे जवळ पोहचला आहे. | |
| ६. | इंग्लंड | विकासाच्या सर्वोच्च अवस्थेमध्ये पोहचलेले एकमेव राष्ट्र | |

आर्थिक विकासाच्या स्पष्ट केलेल्या या अवस्थांमधूनच अर्थव्यवस्था प्रवास करत असतात असे मत फ्रेडरिक लिस्ट यांनी व्यक्त केलेले आहे. त्यांच्या मते प्रत्येक राष्ट्राने आपल्या क्षमतेनुसार विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करावा व सर्वोच्च विकासाची अवस्था गाठल्यानंतरच राष्ट्रांनी सर्वांसाठी समान सिद्धांत, विचार व धोरणांचा स्विकार केल्यास तो सर्वच राष्ट्रांच्या विकासाला प्रेरक ठरणार असतो असे मत व्यक्त केले आहे. त्यांच्या या सिध्दांतानुसार जर्मनी हा विकासाच्या चौथ्या अवस्थेमध्ये आहे व अनेक नव्याने स्थापन झालेले बाल्यावस्थेतील उद्योग इंग्लंडमधील उत्पादनाशी स्पर्धा करण्याइतपत सक्षम बनलेले नाहीत. अशा अवस्थेत उद्योगांना संरक्षण दिले आणि जर हॉलंड व पोलंड हे देश जर्मनीमध्ये समाविष्ट होत असतील तर, जर्मनीचे क्षेत्रफळ विस्तारल्याने जर्मनी सर्वोच्च विकासाच्या पाचव्या अवस्थेला पोहचेल. त्यावेळी जर्मनीने संरक्षणाच्या धोरणाचा त्याग करुन खुल्या व्यापाराचे धोरण स्विकारावे असे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांच्या या विचारांनाच लिस्ट यांचे आर्थिक विकासाबाबतचे विचार असे म्हटले जाते.

**लिस्ट यांच्या विकास टप्प्यांचे टीकात्मक परिक्षण :**

सनातनवादी विचारवंतांच्या आर्थिक विकासाबाबतच्या विचारांवर टीका करुन लिस्ट यांनी आर्थिक विकासाच्या ज्या पाच अवस्थांचे वर्णन केलेले आहे, त्यामधील दोष किंवा टीका पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतात.

**१) सर्वोच्च विकासाची अवस्था सामान्य असूच शकत नाही :** लिस्ट यांनी विकासाच्या शेवटच्या अवस्थेची जी वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत. त्या अवस्थेस सर्वोच्च विकासाची अवस्था असे म्हणतात. त्यालाच तो सामान्य अवस्था मानतो परंतु ती अवस्था एकमेव इंग्लंड या देशाने साध्य केली असल्याने ती सामान्य असूच शकत नाही ती असामान्य अवस्था आहे अशी टीका केली जाते.

**२) विकास अवस्था व त्यांची वैशिष्ट्ये :** लिस्टने विकासाच्या पाच अवस्था व त्यांची वैशिष्ट्ये

यांच्यामध्ये गोंधळ झाल्याचे दिसून येते. कारण पहिली अवस्था व दुसरी अवस्था यामधील वैशिष्ट्ये जवळपास सारखीच असल्याचे दिसून येते.

**३) अवस्था स्थलांतराची कारणे अस्पष्ट** : एका अवस्थेनंतर दुसरी, दुसरी नंतर तिसरी अवस्था अर्थव्यवस्था साध्य करतात असे मत लिस्ट यांनी स्पष्ट केले आहे परंतु असे स्थलांतरण होण्यास कारणीभूत ठरणाऱ्या विविध घटकांचे फारसे स्पष्टीकरण या सिद्धांतामध्ये केलेले नाही अशी टीका केली जाते.

**४) अवस्था स्थलांतर बिंदू अस्पष्ट :** विविध टप्प्यांचे स्पष्टीकरण देत असताना कोणत्या बिंदूला एक अवस्था संपुष्टात येते व नवीन अवस्था सुरु होते त्या स्थलांतर बिंदूबाबतचे लिखाण अगदीच अस्पष्ट आहे. अशा स्वरुपाची टीका यावर केली आहे.

**५) उष्ण कटिबंधातील देशांबाबत अयोग्य विधान :** उष्ण कटिबंधातील देशातील हवामान प्रतिकूल असते, तसेच नैसर्गिक साधन संपत्ती व श्रमशक्तीचा अभाव असल्याने ते देश सर्वोच्च विकासाची अवस्था साध्य करु शकत नाहीत हे विचार आज या कटिबंधातील अनेक देशांनी चुकीचे असल्याचे सिद्ध केलेले आहे.

**६) सर्व अवस्थामधून जावे लागते असे नाही :** प्रत्येक देशाला विकासाच्या प्रत्येक अवस्थेमधुन पुढे जावे लागते असे मत व्यक्त केले आहे परंतु जपान, रशिया यासारख्या देशांनी शेती विकासाच्या अवस्थेतूनच सर्वोच्च विकासाचा शेवटचा टप्पा गाठला असल्याने या विचारांवर मर्यादा येते.

**७) स्मिथ यांच्या अवस्थांचा आधार :** लिस्ट यांनी मांडलेल्या शेवटच्या तीन अवस्था या ॲडम स्थिम यांनी या पूर्वीच मांडलेल्या होत्या म्हणूनच स्थिम यांच्या अवस्थांचा आधार अशा प्रकारची टीका केली जाते.

वरील स्वरुपाचे दोष किंवा टीका लिस्ट यांच्या आर्थिक विकासाबाबतच्या विचारांवर करण्यात येत असल्या तरी जगातील सर्वच देश विकासाच्या समान अवस्थेमध्ये नसतात. औद्योगिक विकासाच्या प्रारंभावस्थेमध्ये असणाऱ्या देशांनी देशी उद्योगांना संरक्षण देऊन विकास साध्य करणे अवश्यक आहे अन्यथा त्या देशातील बाल्याउद्योगांचा ऱ्हास घडून येईल असे जे विचार मांडले त्यामधून जर्मन सरकारने जर्मनीसाठी संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार केला व आर्थिक विकास साध्य करु शकला. यावरुनच फ्रेडरिक लिस्ट यांचे आर्थिक विकासाबाबतचे विचार व आर्थिक विकासाचे टप्पे किती श्रेष्ठ आहेत याची कल्पना येते.

### ३.२.३ लिस्ट यांची राष्ट्रवादी विचारसरणी (Concept of Nationalism) :

फ्रेडरिक लिस्ट यांनी सनातनवादी विचारामधील दोष दाखवित त्यावर एका बाजूला टीका केल्या त्याबरोबरच दुसऱ्या बाजूला राष्ट्रवादी व संरक्षणाचे धोरण या दोन विचारांची अंत्यत महत्त्वाची देणगी अर्थशास्त्राला दिलेली आहे.

ॲडम स्थिम, जे. बी. से. यांसारख्या सनातवादी विचारवंतानी जगातील सर्वच देश विकासाच्या समान अवस्थेला पोहचलेले आहेत, व्यक्ती विकास व त्यामधून विश्‍व विकास अशा स्वरूपाचे तत्वज्ञान मांडले. त्यांच्यामते प्रत्येक व्यक्ती स्वत:चा विकास साध्य करण्याचा प्रयत्न करतो व त्यामधून संपूर्ण विश्‍वाचा आपोआपच विकास घडून येतो. म्हणून प्रत्येक राष्ट्राने मुक्त व्यापाराचे धोरण स्वीकारावे, फारसा हस्तक्षेप

अर्थव्यवस्थेमध्ये करण्याची आवश्यकता नाही. अशा स्वरुपाचे जे वैश्विकरणाबाबतचे जे विचार मांडले होते ते पूर्णतः राष्ट्र या संकल्पनेकडे दुर्लक्ष करणारे म्हणजेच ते विचार राष्ट्रवाद या संकल्पनेकडे दुर्लक्ष करणारे होते अशी टीका करत असताना विश्व विकासामध्ये राष्ट्र हे किती महत्त्वाचे आहे, याबाबत स्पष्टीकरण देण्याचा जो प्रयत्न केलेला आहे त्यालाच लिस्ट यांचा राष्ट्रवाद असे म्हणतात. सर्व प्रथम राष्ट्रवादाचे विचार मांडण्याचे कार्य फ्रेडरिक लिस्ट यांनी केल्याने त्यांना राष्ट्रवादाचे प्रणेते असेही म्हणतात.

**लिस्टचा राष्ट्रवाद :**

फ्रेडरिक लिस्ट यांनी सनातनवादी विचारवंतांच्या आत्यंतिक विश्ववाद या विचारामधील दोष स्पष्ट करत असताना व्यक्ती विकास, विश्व विकास या दरम्यान राष्ट्रविकास अत्यंत महत्त्वाचा आहे असे मत व्यक्त केले. त्यांच्या मते आज विश्वात अनेक राष्ट्रे आहेत. प्रत्येक राष्ट्र विकासाच्या वेगवेगळ्या अवस्थेमध्ये आहे. प्रत्येक राष्ट्र आपल्या विकासाचा वेग वाढविण्याचा, जनतेच्या कल्याणात वाढ घडवून आणण्याचा प्रयत्न करत असते. त्यामुळे संपूर्ण जग एक आहे असे मानून धोरण निश्चिती न करता प्रत्येक राष्ट्राच्या विकासाच्या अवस्था विचारामध्ये घेऊन विकासाबाबतची धोरणे त्या-त्या राष्ट्राने निश्चित करावीत अशा स्वरुपाचे जे विचार मांडलेले आहेत त्यांनाच लिस्ट यांचा राष्ट्रवाद किंवा लिस्ट यांचे राष्ट्रवादी विचार असे म्हटले जाते.

म्हणजेच विकासाबाबत सनातनवादी विचारवंतांनी व्यक्ती विकासानंतर जगाच्या विकासाला अधिक महत्त्व दिले परंतु यांच्या दरम्यान अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणून कार्य करणाऱ्या राष्ट्र या संकल्पनेकडे पूर्णतः दुर्लक्ष केल्यानेच लिस्ट यांचे राष्ट्रवादाबाबतचे विचार विकसित झालेले आहेत.

**राष्ट्रवादी विचारांचे समर्थन :**

जर्मन शास्त्रज्ञ फ्रेडरिक लिस्ट यांनी सनातनवाद्यांच्या विचारांवर टीका करत असताना जे राष्ट्रवादाबाबतचे धोरण स्वीकारलेले आहे, त्याबाबत त्यांनी पुढील मुद्यांच्या आधारे राष्ट्रवादी विचारांचे समर्थन केलेले आहे.

१) जगातील सर्वच देश विकासाच्या समान अवस्थेला पोहचलेले आहेत.

२) सर्व सिध्दांत सर्व देशांना समान लागू पडत नाहीत.

३) एकच धोरण सर्व देशांना योग्य आहे.

४) जगामध्ये सर्वत्र शांतता नसते.

५) प्रत्येक देशातील हितसंबंध समान नसतात.

६) प्रत्येक राष्ट्र जागतिक स्थान उंचावण्याचा प्रयत्न करते

७) प्रत्येक राष्ट्र आपले अस्तित्व टिकविण्याचा प्रयत्न करते

८) व्यक्ती सर्वप्रथम राष्ट्राची नागरिक असते.

९) राष्ट्राच्या प्रगतीवर व्यक्तीची प्रगती अवलंबून.

१०) राष्ट्राचे स्वत:चे वेगळे अस्तित्व असते.

११) राष्ट्रांराष्ट्रांमध्ये स्पर्धा आहे, युध्द निर्माण होवू शकते.

१२) उद्दीष्टांच्या पूर्ततेसाठी सरकारचा हस्तक्षेप आवश्यक.

वरील विचारांवरुन लिस्ट यांच्या राष्ट्रवादी विचारांचे स्वरुप स्पष्ट होते. त्यांचे राष्ट्रवादाबाबतचे स्पष्ट केलेले धोरण सातत्याने स्वीकारले पाहीजे असा आग्रह लिस्ट यांचा नव्हता त्यांच्या मते, जेव्हा सर्व देश विकासाच्या समान अवस्थेला पोहचतील तेव्हा सनातनवाद्यांनी सुचविलेले वैश्विकरणाचे धोरण सर्वानी स्वीकारायला काही हरकत नाही. म्हणजेच कोणत्या टप्प्यापर्यंत राष्ट्रवाद आवश्यक आहे याचेही स्पष्टीकरण लिस्ट यांनी दिलेले आहे.

### ३.२.४ लिस्ट यांचा संरक्षणाचा सिध्दांत (Protection Theory of List) :

लिस्ट यांनी सनातनवाद्यांच्या व्यापार विषयक विचारांमधील दोष स्पष्ट करीत असताना जर्मनीसारख्या शेती उद्योग विकास अवस्थेमध्ये असणाऱ्या राष्ट्रांनी संरक्षाचे धोरण स्वीकारावे व त्यामधून सर्वोच्च विकासाची शेवटची अवस्था साध्य करण्याचा प्रयत्न करावा असे विचार व्यक्त केले. म्हणजेच लिस्ट यांचे व्यापार धोरणाबाबतचे विचार हे सनातनवादी विचारवंताच्या व्यापार विषयक विचारामध्ये असणाऱ्या दोषांमधूनच उदयास आलेले आहेत.

**सनातनवादी तज्ञांचे व्यापार धोरण विषयक विचार :**

सनातनवादी अर्थतज्ञांनी जगातील सर्वच देश विकासाच्या एका समान अवस्थेत पोहचलेले आहे त्यामुळे सर्वांनी खुल्या व्यापारी धोरणाचा पुरस्कार करावा असे मत व्यक्त केले होते. त्यांच्या मते जगातील सर्व देशांची संस्कृती, परंपरा विकासाची अवस्था समान असल्याने एक सिद्धांत सर्वांना लागू पडत असतो. व्यापार विषयक धोरणामध्ये भिन्नता नसावी तसेच सरकारने अनावश्यक हस्तक्षेपाचे धोरण बाजूला ठेवून खुल्या व्यापाराचे धोरण स्वीकारल्यास सर्वच राष्ट्रांचा आर्थिक विकास घडून येण्यास मदत होईल असे मत व्यक्त केले.

**फ्रेडरिक लिस्ट यांचे व्यापार विषयक संरक्षणाचे धोरण :**

लिस्ट यांच्या मते सनातनवादी विचारवंतांच्या लिखाणामधील सर्वात मोठा दोष म्हणजे त्यांनी जगातील सर्व देश विकासाच्या समान अवस्थेला पोहचलेले आहेत म्हणून त्यांनी खुल्या व्यापाराचे धोरण स्वीकारावे हा होय. लिस्ट यांनी जगातील अनेक देशांचा अभ्यास करुन असे सिद्ध केले की सर्वच देश विकासाच्या समान अवस्थेमध्ये नाहीत आणि म्हणूनच सर्वांसाठी समान धोरण अयोग्य असेल ज्या देशातील उद्योगांचा परिपूर्ण विकास साध्य झालेला नाही त्यांनी बाल्यावस्थेतील उद्योगांच्या विकासासाठी संरक्षणाचे धोरण स्वीकारावे असे मत व्यक्त केलेले आहे.

**संरक्षणाचे धोरण :** आर्थिक विकासाच्या चौथ्या अवस्थेतील देशांनी आपल्या अर्थव्यवस्थेतील नव्याने सुरु झालेल्या बाल्यावस्थेतील उद्योगांच्या विकासावर विकसित राष्ट्रांमधून होणाऱ्या आयातीमुळे विपरीत परिणाम होणार नाही या दृष्टीने आयात व्यापारावर जकात तसेच कोटा यासारख्या व्यापारविषयक बंधनांचा वापर करुन अशा उद्योगांचे रक्षण करण्याबाबतचे जे धोरण सुचविलेले आहे त्यास संरक्षणाचे धोरण असे म्हणतात.

**संरक्षण विषयक धोरणाचे समर्थन :**

लिस्ट यांनी सनातनवादी व्यापार विषयक विचारांवर टीका करुन जे संरक्षणाचे धोरण (Protection Policy) सुचविलेले आहे त्याचे समर्थन पुढील प्रमाणे केले आहे.

१) जगातील सर्वच देशांनी समान विकास साध्य केलेला नाही.

२) प्रत्येक देशातील रुढी, परंपरांमध्ये भिन्नता आहे.

३) प्रत्येक देशाची विकासाच्या क्षमतेमध्ये भिन्नता आहे.

४) बाल्यावस्थेतील उद्योग विकसित देशातील उद्योगांशी स्पर्धा करु शकत नाहीत.

५) बाल्यावस्थेतील उद्योगांचा परिपूर्ण विकास होण्यासाठी संरक्षणाचे धोरण योग्य असते.

६) विकासाच्या चौथ्या अवस्थेमध्ये सरकारने हस्तक्षेपाचे धोरण स्वीकारावे.

वरील मुद्याचा आधार घेत लिस्ट यांनी विकासाच्या सर्वोच्च अवस्थेमध्ये पोहचण्यासाठी संरक्षणाचे धोरण स्वीकारणे हिताचे असते, त्यामधून बाल्यावस्थेतील उद्योगांची इंग्लंड सारख्या विकसित देशामधून येणाऱ्या उच्च दर्जाच्या व कमी किंमतीच्या उत्पादनाशी स्पर्धा करण्याची क्षमता वाढत जाईल व तो देश सर्वोच्च विकासाच्या अवस्थेमध्ये प्रवेश करेल असे मत त्यांनी व्यक्त केले.

**विकास अवस्था व व्यापाराचे धोरण :**

फ्रेडरिक लिस्ट यांनी प्रत्येक देशाची अवस्था भिन्न स्वरुपाची आहे, परिणामी कोणत्या देशाने संरक्षणाचे धोरण स्वीकारावे व कोणत्या देशाने मुक्त व्यापाराचे धोरण स्वीकारावे हे त्या-त्या देशाच्या विकास अवस्थेवर अवलंबून आहे. इंग्लंड हा विकासाच्या सर्वोच्च स्तरावर असल्याने मी जर इंग्लंडचा नागरिक असतो तर मी देखील मुक्त व्यापाराचा पुरस्कार केला असता परंतु आज जर्मनी विकासाच्या सर्वोच्च अवस्थेमध्ये पोहचण्यासाठी मी जर्मनीसाठी संरक्षणाच्या धोरणाचा पुरस्कार करेन असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले.

| | **विकास अवस्था** | **आवश्यक धोरण** |
|---|---|---|
| १ | शिकारी /रानटी अवस्था | खुल्या व्यापाराचे धोरण |
| २ | पशुपालन /गुराखी अवस्था | खुल्या व्यापाराचे धोरण |
| ३ | शेती विकास अवस्था | खुल्या व्यापाराचे धोरण |
| ४ | शेती-उद्योग विकासाची अवस्था | संरक्षणाचे धोरण |
| ५ | शेती-उद्योग व्यापार विकासाची अवस्था | खुल्या व्यापाराचे धोरण |

वरील विविध विकासाच्या अवस्थेमध्ये आज जगातील देशांची विभागणी झालेली आहे. जे देश विकास साध्य करण्यास सक्षम आहेत व शेती उद्योग विकासाच्या अवस्थेत आहेत फक्त त्यांनाच संरक्षण धोरणाची आवश्यकता आहे. विकासाची क्षमता नसणाऱ्या व सर्वोच्च विकास साध्य केलेल्या देशांना संरक्षणाच्या धोरणाची

आवश्यकता नाही असे मत लिस्ट यांनी व्यक्त केले. म्हणजे लिस्ट यांचे नाव संरक्षणाच्या धोरणाशी जरी जोडले गेले असले तरी ते फक्त संरक्षणाच्या धोरणाचे समर्थक व खुल्या व्यापाराचे विरोधक आहेत असे कधीच नव्हते त्यांनी खुल्या व्यापाराचे धोरण कोणत्या अवस्थेमध्ये उपयुक्त ठरते याचेही स्पष्टीकरण दिलेले आहे. त्यामुळे त्यांचे विचार सर्वांगीण व श्रेष्ठ स्वरुपाचे मानले जातात.

**लिस्टच्या संरक्षण धोरणाची वैशिष्ट्ये :** लिस्ट यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबतचे संरक्षणाचे धोरण स्पष्ट केलेले आहे त्याची महत्त्वाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) बाल्यावस्थेतील उद्योगांच्या विकासासाठी संरक्षण :** ज्या अर्थव्यवस्था शेती-उद्योग विकासाच्या अवस्थेमध्ये आहेत त्यांनीच देशी उद्योगाच्या संरक्षणाच्या दृष्टीने संरक्षणाचे धोरण स्वीकारावे. म्हणजेच जर्मनीसारख्या देशांनी सर्वोच्च विकासाचा टप्पा साध्य करण्यासाठी नव्याने स्थापन झालेल्या उद्योगांचा विकास साध्य करता यावा यासाठी संरक्षणाचे धोरण स्वीकारावे हे वैशिष्ट्य मानले जाते.

**२) रानटी अवस्थेतील अर्थव्यवस्थांना संरक्षणाची गरज नाही :** या अवस्थेमधील देश अतिमागास अवस्थेमध्ये असतात त्यांना संरक्षणाची गरज नसते त्यांनी खुल्या व्यापार धोरणाचा स्वीकार केल्यास त्यांचा विकास गतिमान होण्यास मदत होते.

**३) गुराखी अवस्थेमध्ये देखील खुला व्यापार :** लिस्ट यांनी गुराखी अवस्थेमध्ये असणाऱ्या देशांना देखील खुल्या व्यापाराचे धोरण योग्य असते. त्यांना संरक्षणाची आवश्यकता नसते ते खुल्या व्यापार धोरणाच्या साहाय्याने विकासाची पुढची अवस्था साध्य करु शकतात.

**४) शेती विकास अवस्थेमध्ये संरक्षणाची आवश्यकता नाही :** लिस्ट यांच्या मते शेती विकास अवस्थेमधील देशांनी मुक्त व्यापाराचा स्वीकार करावा शेती उत्पादन, कच्चा माल याची निर्यात करुन औद्योगीक उत्पादनाची, आयात करुन विकासाचा पुढील टप्पा साध्य करण्याचे प्रयत्न करावेत. म्हणजेच त्यांना संरक्षणाची आवश्यकता नाही.

**५) समशीतोष्ण कटिबंधातील देशांना संरक्षण :** ज्या देशाची सर्वोच्च विकास साध्य करण्याची क्षमता आहे. अशा देशांनीच संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार करावा असे तत्वज्ञान लिस्ट यांनी मांडले अशी क्षमता समशीतोष्ण कटिबंधातील देशांची असते त्यांनी संरक्षणाचे धोरण स्वीकारावे

**६) उष्ण कटिबंधातील देशांसाठी खुल्या व्यापाराचे धोरण :** उष्णकटिबंधातील देशांची सर्वोच्च विकास साध्य करण्याची क्षमता नसते म्हणूनच त्यांनी संरक्षणाच्या धोरणाऐवजी मुक्त किंवा खुल्या व्यापाराचे धोरण स्वीकारावे व आपल्या विकासाचा पुढील टप्पा साध्य करण्याचा प्रयत्न करावा,

**७) क्षमता असणाऱ्या देशानांच संरक्षण :** ज्या राष्ट्राची आर्थिक विकासाची क्षमता आहे अशाच देशांनी संरक्षणाचे धोरण स्वीकारावे व ज्या देशांचा विकास साध्य करण्याची क्षमता नाही त्यानी विकासासाठी व्यापाराच्या धोरणाला प्राधान्य द्यावे.

**विकासाची क्षमता ठरणारे निकष :**

१) मोठा भूप्रदेश.

२) श्रमशक्तीचा पुरेसा पुरवठा.

३) नैसर्गिक साधन संपत्तीची उपलब्धता.

४) शेती क्षेत्राचा विकास.

५) सांस्कृतिक विकास.

६) राजकीय विकास.

७) सक्षम नाविक दल.

८) सक्षम संरक्षण व्यवस्था.

वरील सर्व निकषांची पुर्तता करण्याची क्षमता ज्या देशांकडे आहे, असेच देश सर्वोच्च विकासाची अवस्था साध्य करु शकत असल्याने फक्त त्यांनीच संरक्षणाचे धोरण स्वीकारावे असे मत या सिध्दांतामध्ये मांडले गेले.

**८) औद्योगिक शिक्षण हे संरक्षण धोरणाचे उद्दिष्ट :** अर्थव्यवस्थेला सर्वोच्च विकासाच्या अवस्थेमध्ये रुपांतरीत करण्यामध्ये औद्योगिक शिक्षणाचे कार्य अत्यंत महत्त्वाचे असे असते. म्हणूनच अर्थव्यवस्थेमध्ये औद्योगिक शिक्षणाचा विस्तार करणे हे संरक्षणाच्या धोरणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट असते.

**९) भांडवलाची कमतरता असणाऱ्या राष्ट्रांसाठी मुक्त व्यापार :** ज्या राष्ट्रांमध्ये भांडवलाची कमतरता असते अशी राष्ट्रे विकासाच्या मागासलेल्या अवस्थेमध्ये असतात त्यांनी आपला विकास साध्य करण्यासाठी खुल्या व्यापार धोरणाचा स्वीकार करावा.

**१०) मुक्त व्यापाराचे संरक्षण करणारा संरक्षण वाद :** लिस्ट यांनी संरक्षणवादाचे समर्थन करताना कधीही मुक्त व्यापाराचा किंवा खुल्या व्यापाराचा विरोध केला नाही. उलट त्यांनी विकासाच्या कोणत्या अवस्थेमध्ये मुक्त व्यापाराचे धोरण योग्य असते याचे स्पष्टीकरण दिले आहे. म्हणजेच लिस्ट यांचा संरक्षणवाद हा मुक्त व्यापाराचा समर्थक होता.

**११) सर्व उद्योगांना संरक्षणाची आवश्यकता नाही :** अर्थव्यवस्थेतील सर्वच उद्योगांना संरक्षण देण्याची आवश्यकता नसून जे उद्योग नव्याने स्थापन झालेले आहेत अशा बाल्यावस्थेमधील उद्योगांना संरक्षणाची आवश्यकता आहे.

**१२) कच्च्या मालाच्या बाबत मुक्त व्यापार :** जी राष्ट्रे कच्च्या मालाबाबत इतर राष्ट्रांवर अवलंबून असतात त्यांनी संरक्षणाचे धोरण स्वीकारल्यास कच्चा मालाची आयात महाग होवून वस्तू उत्पादन खर्च वाढतो निर्यात घटते म्हणून त्यांनी मुक्त व्यापार स्वीकारावा.

**१३) यंत्रसामग्रीच्या बाबत मुक्त व्यापार :** जे देश यंत्र सामग्रीच्या बाबतीत अन्य देशांवर अवलंबून आहेत त्यांनी संरक्षणाचे धोरण स्वीकारल्यास त्याचा देशाच्या औद्योगिक विकासावर विपरीत परिणाम होतो, विकासाचा वेग मंदावतो तो देश सर्वोच्च विकास अवस्था साध्य करु शकत नाही. म्हणून अशा देशांनी मुक्त व्यापाराचे धोरण स्वीकारावे असे मत व्यक्त केले.

वरील स्वरुपाचे अनेक विचार फ्रेडरिक लिस्ट यांनी व्यक्त केले आहेत. लिस्टने जरी राष्ट्रवादाचे समर्थन केले असले तरी तो विश्ववादाचा विरोधक कधीच नव्हता राष्ट्र विकसित अवस्थेत पोहचल्यानंतर त्याने विश्ववाद स्वीकारावा असे सांगितले. लिस्टने व्यापारबाबतचे संरक्षणवादाचे धोरण मांडले, त्याचे समर्थन केले असले तरी त्याने मुक्त किंवा खुल्या व्यापाराचा विरोध कधीच केला नव्हता. कोणत्या अवस्थेत खुला व्यापार योग्य ठरतो याचे स्पष्टीकरण दिलेले आहे. म्हणजेच लिस्ट यांचे विचार एकांगी स्वरुपाचे नव्हते. त्यांनी सर्व बाजूंचा अभ्यास करुन विचार स्पष्ट केलेले होते म्हणूनच ते अधिक उपयुक्त ठरले.

### ३.३ सारांश :

लिस्ट यांनी सनातनवादी विचारांमधील दोष किंवा कमकुवतपणा स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. या टीका करुन लिस्ट यांनी राष्ट्रवाद, विकासाचे टप्पे व संरक्षणाचे धोरण याबाबतचे स्वत:चे तत्त्वज्ञान मांडण्याचा प्रयत्न केला व ते आज जगप्रसिध्द झालेले आहे. आर्थिक विकासाच्या स्पष्ट केलेल्या या अवस्थांमधूनच अर्थव्यवस्था प्रवास करत असतात असे मत फ्रेडरिक लिस्ट यांनी व्यक्त केलेले आहे. त्यांच्या मते प्रत्येक राष्ट्राने आपल्या क्षमतेनुसार विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करावा व सर्वोच्च विकासाची अवस्था गाठल्यानंतरच राष्ट्रांनी सर्वांसाठी समान सिद्धांत, विचार व धोरणांचा स्वीकार केल्यास तो सर्वच राष्ट्रांच्या विकासाला प्रेरक ठरणार असतो असे मत व्यक्त केले आहे. त्याच्या या सिध्दांतानुसार जर्मनी हा विकासाच्या चौथ्या अवस्थेमध्ये आहे व अनेक नव्याने स्थापन झालेले बाल्यावस्थेतील उद्योग इंग्लंडमधील उत्पादनाशी स्पर्धा करण्याइतपत सक्षम बनलेले नाहीत. अशा अवस्थेत उद्योगांना संरक्षण दिले आणि जर हॉलंड व पोलंड हे देश जर्मनीमध्ये समाविष्ट होत असतील तर, जर्मनीचे क्षेत्रफळ विस्तारल्याने जर्मनी सर्वोच्च विकासाच्या पाचव्या अवस्थेला पोहचेल. त्यावेळी जर्मनीने संरक्षणाच्या धोरणाचा त्याग करुन खुल्या व्यापाराचे धोरण स्वीकारावे असे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांच्या या विचारांनाच लिस्ट यांचे आर्थिक विकासाबाबतचे विचार असे म्हटले जाते. लिस्ट यांच्या आर्थिक विकासाबाबतच्या विचारांवर टीका करण्यात येत असल्या तरी जगातील सर्वच देश विकासाच्या समान अवस्थेमध्ये नसतात. औद्योगिक विकासाच्या प्रारंभावस्थेमध्ये असणाऱ्या देशांनी देशी उद्योगांना संरक्षण देऊन विकास साध्य करणे आवश्यक आहे, अन्यथा त्या देशातील बाल्याउद्योगांचा ऱ्हास घडून येईल असे जे विचार मांडले. त्यामधून जर्मन सरकारने जर्मनीसाठी संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार केला व आर्थिक विकास साध्य करु शकला. यावरुनच फ्रेडरिक लिस्ट यांचे आर्थिक विकासाबाबतचे विचार व आर्थिक विकासाचे टप्पे किती श्रेष्ठ आहेत याची कल्पना येते.

जेव्हा सर्व देश विकासाच्या समान अवस्थेला पोहचतील तेंव्हा सनातनवाद्यांनी सुचविलेले वैश्विकरणाचे धोरण सर्वांनी स्वीकारायला काही हरकत नाही. म्हणजेच कोणत्या टप्प्यापर्यंत राष्ट्रवाद आवश्यक आहे याचेही

स्पष्टीकरण लिस्ट यांनी दिलेले आहे. लिस्टने जरी राष्ट्रवादाचे समर्थन केले असले तरी तो विश्ववादाचा विरोधक कधीच नव्हता. राष्ट्र विकसित अवस्थेत पोहचल्यानंतर त्याने विश्ववाद स्वीकारावा असे सांगितले. लिस्टने व्यापारबाबतचे संरक्षणवादाचे धोरण मांडले, त्याचे समर्थन केले असले तरी त्याने मुक्त किंवा खुल्या व्यापाराचा विरोध कधीच केला नव्हता. कोणत्या अवस्थेत खुला व्यापार योग्य ठरतो याचे स्पष्टीकरण दिलेले आहे. म्हणजेच लिस्ट यांचे विचार एकांगी स्वरुपाचे नव्हते. त्यांनी सर्व बाजूंचा अभ्यास करुन विचार स्पष्ट केलेले होते म्हणूनच ते अधिक उपयुक्त ठरले.

**३.४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :**

**अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) जॉर्ज फ्रेडरिक लिस्ट यांचा जन्म ६ ऑगस्ट १७८९ रोजी वुर्टेमबर्ग ................ येथे झाला.

अ. अमेरिका ब. जर्मनी क. जपान ड. चीन

२) सन..................मध्ये फ्रेडरिक लिस्ट यांनी Outlines of American Political Economy हा ग्रंथ लिहीला.

अ. १८०७ ब. १८१७ क. १८२७ ड. १८३७

३) .......... यांच्या मते जगातील सर्वच देशांनी विकासाचा एक विशिष्ट टप्पा गाठलेला आहे.

अ. सनातनवादी ब. फ्रेडरिक लिस्ट क. आधुनिक अर्थतज्ञ ड. यापैकी नाही

४) ............यांनी व्यक्ती आणि विश्व या दोन घटकांवरती भर देऊन दोन्हीच्या दरम्यान असणाऱ्या राष्ट्र संकल्पनेकडे दुर्लक्ष केलेले आहे असे मत फ्रेडरिक लिस्ट यांनी व्यक्त केले.

अ. सनातनवादी ब. फ्रेडरिक लिस्ट क. खुल्या व्यापाराच्या ड. यापैकी नाही

५) लिस्ट यांनी आर्थिक विकासाचे विविध टप्पे स्पष्ट करुन ........... धोरणाचे समर्थन केले

अ. संरक्षणाच्या ब. मुक्त व्यापाराच्या क. खुल्या व्यापाराच्या ड. यापैकी नाही

६) रानटी अवस्थेमध्ये ........... करुनच उदरनिर्वाह करण्याचे कार्य व्यक्ती करतात.

अ. पशुपालन ब. व्यापार क. शेती ड. शिकार

७) रानटी अवस्थेमध्ये ......... धोरणाचा स्वीकार केल्यास त्यांच्या प्राथमिक गरजांची पूर्तता होण्यास मदत होईल.

अ. संरक्षणाच्या ब. बंदिस्त क. खुल्या ड. यापैकी नाही

८) .............अवस्थेमध्ये खुल्या धोरणा ऐवजी संरक्षणाचे धोरण स्वीकारावे असे मत फ्रेडरिक लिस्ट यांनी व्यक्त केले

अ. रानटी ब. गुराखी क. शेती विकास ड. शेती-उद्योग विकास

**३.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे**

१) ब. जर्मनी

२) क. १८२७

३) अ. सनातनवादी

४) अ. सनातनवादी

५) अ. संरक्षणाच्या

६) ड. शिकार

७) क. खुल्या

८) ड. शेती-उद्योग विकास

**३.६ पारिभाषिक शब्द**

**१. रानटी अवस्था :** रानटी अवस्थेमध्ये शिकार करुनच उदरनिर्वाह करण्याचे कार्य व्यक्ती करतात. विकास साध्य करण्याच्या क्षमता नसल्याने अशा देशांना अन्य अर्थव्यवस्थांवर विसंबून राहावे लागते.

**२. गुराखी अवस्था :** गुराखी अवस्थेलाच पशूपालन अवस्था असेही म्हंटले जाते. या अवस्थेमध्ये समाज व्यवस्थेच्या उदरनिर्वाहाचे साधन हे पशुपालन व्यवसाय असतो.

**३. राष्ट्रवाद :** संपूर्ण जग एक आहे असे मानून धोरण निश्चिती न करता प्रत्येक राष्ट्राच्या विकासाच्या अवस्था विचारामध्ये घेऊन विकासाबाबतची धोरणे त्या-त्या राष्ट्राने निश्चित करावीत अशा स्वरुपाचे जे विचार मांडलेले आहेत त्यांनाच लिस्ट यांचा राष्ट्रवाद किंवा लिस्ट यांचे राष्ट्रवादी विचार असे म्हटले जाते.

**३.७ सरावासाठी स्वाध्याय :**

**अ) टीपा लिहा :**

१) शिकारी किंवा रानटी अवस्था

२) गुराखी अवस्था

३) शेती व्यवसायावरील अवलंबित्व

४) शेती-उद्योग विकासाची अवस्था

५) शेती-कारखानदारी-व्यापार विकासाची सर्वोच्च अवस्था

**ब) दिर्घोत्तरी प्रश्न :**

१) लिस्ट यांच्या सनातनवादी विचारांवरील टीकांची चर्चा करा.

२) लिस्ट यांच्या विकास टप्प्यांचे टीकात्मक परिक्षण करा.

३) लिस्ट यांची राष्ट्रवादी विचारसरणी स्पष्ट करा.

४) लिस्ट यांचा संरक्षणाचा सिध्दांत चर्चा करा.

५) लिस्ट यांचे आर्थिक वृध्दीचे टप्पे स्पष्ट करा.

**३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ सूची :**


१. आर्थिक विचारांचा विकास - प्रा. विजय कवीमंडन, श्री मंगेश प्रकाशन, नागपुर

२. आर्थिक विचारांचा इतिहास - प्रा. ए. आर. रायखेलकर, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद

३. अर्थशास्त्रीय मतप्रणालींचा इतिहास - डॉ. श्री. वी. खांदेवाले, प्रा. सौ. अमरजा नेरूरकर

४. History of Economic Thoughts, H. L. Bhatia, Vikas Publication House, New Delhi.

५. Concise History of Economic Thoughts, by No Ghosh, Rama Ghosh.


***

# घटक : ४
# कार्ल मार्क्स यांचे आर्थिक विचार
# Economic Thoughts of Karl Marx

**अनुक्रमणिका**

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ मार्क्स यांचा शास्त्रीय समाजवाद आणि भौतिकवादी दृष्टीकोण

४.२.२ कार्ल मार्क्स यांचा मूल्य सिद्धांत

४.२.३ अतिरिक्त मूल्य सिद्धांत

४.२.४ नफ्याच्या दरामधील घट

४.३ सारांश

४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे

४.६ पारिभाषिक शब्द

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

**४.०. उद्दिष्ट्ये :** सदर प्रकरणाच्या अभ्यासानंतर आपणाला पुढील बाबींची अधिक कल्पना येण्यास मदत होते.

१. मार्क्स यांचा शास्त्रीय समाजवाद आणि भौतिकवादी दृष्टीकोन समजण्यास मदत होईल.

मार्क्स यांचा शास्त्रीय समाजवाद आणि भौतिकवादी दृष्टीकोण, भांडवलशाही अर्थव्यवस्थेमधील दोष, समाजवादी अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये, समाजवादी विचारसरणीचे प्रकार, स्वप्नाळू समाजवाद, स्वप्नाळू समाजवादी विचारसरणीची वैशिष्ट्ये, शास्त्रीय समाजवादी विचारांची वैशिष्ट्ये, भौतिकवादी दृष्टीकोणाची संकल्पना, हेगेलचे विरोध विकासाबाबतचे विचार, मार्क्सचे भौतिक विरोध विकासाबाबतचे विचार, विकासाधिष्ठित भौतिकवाद, ऐतिहासीक भौतिकवाद, अर्थव्यवस्थेच्या विकासाचे टप्पे, मार्क्सचा आर्थिक भौतिकवाद, इतिहासाच्या भौतिकवादी विश्लेषनाचे टीकात्मक मूल्यमापन अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

२. कार्ल मार्क्स यांच्या मूल्य सिध्दांताची कल्पना येईल.

कार्ल मार्क्स यांचा मूल्य सिद्धांत, मूल्याचे प्रकार, उपयोगिता मूल्य, विनिमय मूल्य, श्रमाचे प्रकार, वर्तमानातील श्रमखर्च, भूतकाळातील श्रमखर्च, श्रमखर्च मापनातील समस्या, मार्क्स यांच्या मूल्य सिद्धांतावरील टीका अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

३. अतिरिक्त मूल्याबाबतचे कार्ल मार्क्स यांचेविचार माहिती होतील.

अतिरिक्त मूल्य सिद्धांत, विनिमयाचे प्रकार, श्रमाचे प्रकार, निर्वाह श्रम, अतिरिक्त श्रम, भांडवलाचे प्रकार, स्थिर भांडवल, बदलते भांडवल, शोषणाचा दर, कार्ल मार्क्स यांच्या अतिरिक्त सिद्धांतावरील टीका याबाबत अधिक माहिती प्राप्त होण्यास मदत होते.

४. नफ्याच्या दरातील घटीची कारणमिमांसा करता येईल.

नफ्याच्या दरामधील घट, नफ्याचा दर, नफ्याचा दर घटण्याची कारणे, नफ्याच्या दरातील घटीच्या परीणामाची अधिक माहिती मिळते.

**४.१ प्रास्ताविक :**

कार्ल मार्क्सचा जन्म जर्मनीतील ट्रेव्हेस येथील ज्यू कुटुंबात ५ मे, १८१८ रोजी झाला. सन १८४३ मध्ये Introduction to a critique at Hegal's Philosophy of Right हा ग्रंथ लिहिला. सन १८४७ मध्ये The Poverty of Philosophy हा ग्रंथ लिहिला. सन १८४८ मध्ये Communist Manifesto हा साम्यवादी विचारांचा ग्रंथ एंजल्सच्या मदतीने लिहिला. सन १८४९ मध्ये लंडनमध्ये स्थायीक झाला. सन १८६७ मध्ये त्यांनी Das Capital या जगप्रसिद्ध २५०० पानांच्या ग्रंथाचा पहिला भाग प्रसिद्ध केला. १७ मार्च, १८८३ रोजी हा थोर अर्थशास्त्रज्ञ मरण पावला.

मार्क्सच्या मृत्यूनंतर एंजल्सने सन १८८५ मध्ये Das Capital या ग्रंथाचा दुसरा भाग तर एंजल्सने Das Capital या ग्रंथाचा तिसरा भाग प्रसिद्ध केला. कार्ल मार्क्सवर हेगेलच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव होता. इतिहास व तत्त्वज्ञानाकडे त्याच्या अभ्यासाचा कल होता. त्याने The Rhenish Times या पत्रकाचा संपादक म्हणून कार्य तसेच ब्रिटीश म्युझियम लायब्ररीत अभ्यास व संशोधन केले.

**४.२ विषय विवेचन :**

प्रस्तुत घटकामध्ये खालील बाबींचा सविस्तर परामर्श घेतला आहे.

**४.२.१** मार्क्स यांचा शास्त्रीय समाजवाद आणि भौतिकवादी दृष्टीकोण – भांडवलशाही अर्थव्यवस्थेमधील दोष – समाजवादी अर्थव्यवस्था – समाजवादी अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये – समाजवादी विचारसरणीचे प्रकार – स्वप्नाळू समाजवाद – स्वप्नाळू समाजवादी विचारसरणीची वैशिष्ट्ये – शास्त्रीय समाजवाद – शास्त्रीय समाजवादी विचारांची वैशिष्ट्ये – भौतिकवादी दृष्टीकोणाची संकल्पना – हेगेलचे विरोध विकासाबाबतचे विचार – मार्क्सचे भौतिक विरोध विकासाबाबतचे विचार – विकासाधिष्ठित भौतिकवाद – ऐतिहासीक भौतिक वाद –अर्थव्यवस्थेच्या विकासाचे टप्पे – मार्क्सचा आर्थिक भौतिकवाद – इतिहाच्या भौतिकवादी विश्लेषनाचे

टीकात्मक मूल्यमापन

४.२.२ कार्ल मार्क्स यांचा मूल्य सिध्दांत – सिध्दांतातील महत्वाच्या बाबी – मूल्याचे प्रकार – श्रमाचे प्रकार – श्रमखर्च मापनातील समस्या – मूल्य सिध्दांतावरील टीका.

४.२.३ अतिरिक्त मूल्य सिद्धांत – विनिमयाचे प्रकार – श्रमाचे प्रकार – निर्वाह श्रम – अतिरिक्त श्रम – भांडवलाचे प्रकार – स्थिर भांडवल – बदलते भांडवल – शोषणाचा दर – कार्ल मार्क्स यांच्या अतिरिक्त सिद्धांतावरील टीका

४.२.४ नफ्याच्या दरामधील घट – नफ्याचा दर – नफ्याचा दर घटण्याची कारणे – नफ्याच्या दरातील घटीचे परिणाम

**४.२.१ मार्क्स यांचा शास्त्रीय समाजवाद आणि भौतिकवादी दृष्टीकोण :**

**अ. मार्क्स यांचा शास्त्रीय समाजवाद (Scientific Socialism of Karl Marx) :**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये व्यक्ती स्वातंत्र, वैयक्तिक मालकी, अल्प सार्वजनिक हस्तक्षेप, खुल्या व्यापाराचे फायदे यासारखे फायदे प्राप्त होत असतात. म्हणूनच अनेक सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी खुल्या व्यापाराबरोबरच भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा स्वीकार राष्ट्रांनी करावा असे मत व्यक्त केले. परंतु या अर्थव्यवस्थेमध्ये अनेक दोष देखील होते.

**भांडवलशाही अर्थव्यवस्थेमधील दोष :**

१) प्रचंड आर्थिक विषमता.

२) कामगार-मालक वर्ग.

३) औद्योगिक अशांतता.

४) श्रमिकांचे शोषण.

५) दारिद्र्य

६) उद्योगांचे केंद्रीकरण

७) प्रादेशिक विषमता

८) आर्थिक अस्थैर्य

९) बेकारी

१०) बेकारीने राहणीमानाचा घसरलेला दर्जा

यासारखे दोष निर्माण झाल्याने या अर्थव्यवस्थेवर टीका होवू लागल्या व या समस्या सोडविणारी व्यवस्था कशा स्वरुपाची असावी याबाबतचे लिखाण अनेक तज्ञानी सुरु केले, त्यामधूनच समाजवादी अर्थव्यवस्थेची

संकल्पना पुढे आली.

**समाजवादी अर्थव्यवस्था (Socialistic Economy) :**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील दोष नाहीसे करण्यासाठी समाजवादी अर्थव्यवस्थेचा उगम झाला. समाजवादी अर्थव्यवस्था म्हणजे ज्या अर्थव्यवस्थेत देशातील उत्पादन साधने सार्वजनिक (सरकारच्या) मालकीची असतात व उत्पादन खाजगी नफ्यासाठी न करता समाजाच्या फायद्यासाठी केले जाते.

**समाजवादी अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये :**

१) साधन सामग्रीची सार्वजनिक मालकी.

२) केंद्रीय नियोजन मंडळाचे अस्तित्व.

३) हस्तक्षेप धोरण.

४) आर्थिक समता.

५) वर्गविरहीत समाज रचना.

६) सामाजिक लाभ.

७) पिळवणूक नाही.

८) सामाजिक सुरक्षितता.

**समाजवादी विचारसरणीचे प्रकार :**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेमधील दोष स्पष्ट करुन त्यांनी समाजवादी अर्थव्यवस्था कशी अस्तित्वात यावी तिचे स्वरुप काय असावे याबाबत जे विचार मांडले ती समाजवादी विचारसरणी पुढील दोन भागामध्ये विभागली आहे.

**समाजवादी विचारसरणी**

**स्वप्नाळू समाजवाद**

१) सेंट सायमन

२) रॉबर्ट ओवेन

३) लुई ब्लॅक

४) फोरिअर

**शास्त्रीय समाजवाद**

१) कार्ल मार्क्स

२) रॉबर्टसन

३) लॅसाली

**स्वप्नाळू समाजवाद (Utopian Socialisam) :**

मार्क्स यांच्यापूर्वी ज्या अर्थशास्त्रज्ञांनी समाजवादावर लिखाण केलेले आहे त्यांचा समावेश स्वप्नाळू समाजवादी विचारवंतांमध्ये केला जातो. यामध्ये सेट सायमन, रॉबर्ट ओवेन, लुई ब्लॅक, फोरिअर यासमाजवादी तज्ञांचा समावेश होता. या अर्थतज्ञांनी समाजवादाबाबतचे लिखाण केलेले आहे. परंतु समाजवादाच्या कार्यकारण भावाचे स्पष्टीकरण देणारे शास्त्रीय विचार मांडलेले नव्हते, काय असू शकेल? यासारखे स्वप्नवत विचार, कल्पनात्मक विचार मांडले गेले म्हणूनच त्यांचा समावेश स्वप्नाळू समाजवादामध्ये केला गेला.

**स्वप्नाळू समाजवादी विचारसरणीची वैशिष्ट्ये :** स्वप्नाळू समाजवाद समूहातील शास्त्रज्ञांनी समाजवादाची निर्मिती, त्याचे गुण दोष याबाबत जे विचार मांडले त्याची पुढील वैशिष्ट्ये दिसून येतात.

१. समाजवादी जहाल विचार स्वीकारले जावू नयेत.

२. समाजवाद क्रांतीकारक मार्गाने अस्तित्वात येवू शकत नाही.

३. समाजवादाचे महत्त्व लोकांना पटवून द्यावे.

४. समाजवादाचे फायदे त्यांची उपयुक्तता लोकांना पटवून देणे.

५. लोकांना भावनात्मक मत पटवून देवून समाजवादास प्रेरीत करणे.

६. समाजवादाच्या निर्मितीसाठी समाज मनपरिवर्तनाचा मार्ग स्वीकारावा.

७. समाजवादी समाजव्यवस्था सामोपचाराने स्वीकारली जावी.

८. समाजवादासाठी सक्तीचा मार्ग अयोग्य आहे.

९. विकास होताना टप्प्या-टप्प्याने समाजवाद अस्तित्वात येवू शकतो यावर त्यांचा विश्वास नव्हता.

१०. समाजवादाच्या निर्मितीबाबतचे सर्व विचार कल्पनारम्य स्वरुपाचे होते.

या स्वरुपाची वैशिष्ट्ये स्वप्नाळू समाजवादी अर्थतज्ञांची होती. परंतु त्यांनी समाजवादाची मांडणी शास्त्रीय आधारावर केलेली नव्हती म्हणून पुढील टप्प्यामध्ये शास्त्रीय समाजवाद उदयास आला.

**शास्त्रीय समाजवाद (Scientific Socialism) :**

समाजवादाच्या निर्मितीबाबत शास्त्रीय आधारावर ज्यांनी विचार मांडलेले आहेत त्यांचा समावेश शास्त्रीय समाजवादामध्ये केला जातो. कार्ल मार्क्सचे नांव शास्त्रीय समाजवादाशी जोडले जाते. तसेच रॉबर्टसन, लॅसाली यांनीही शास्त्रीय समाजवादाचा पुरस्कार केला होता.

**शास्त्रीय समाजवादी विचारांची वैशिष्ट्ये :**

१. समाजवादाची निर्मिती ही अटळ व अपरिहार्य आहे.

२. समाजवादाची निर्मिती विशिष्ट नियमानुसार होणार आहे.

३. आर्थिक विकासाच्या विविध टप्प्यामधून अर्थव्यवस्था स्थलांतरीत होत असताना ती समाजवादाच्या दिशेने वाटचाल करते.

४. भांडवलशाहीमधील दोषच समाजवादाच्या निर्मितीस कारणीभूत ठरणारे असतात.

५. भांडवलशाहीमधील मालक-कामगार संघर्ष समाजवादाच्या उदयास कारणीभूत ठरणारा असेल.

६. भांडवलशाहीमधील कामगारांचे शोषण समाजवादाच्या निर्मितीस जबाबदार असेल.

अशा स्वरुपाचे जे विचार समाजवादाच्या निर्मितीबाबत कार्ल मार्क्स व त्यांच्या अनुयायांनी मांडले त्यालाच शास्त्रीय समाजवाद असे मानले जाते. रशियन क्रांतीनंतर जेव्हा रशियामध्ये साम्यवाद अस्तित्वात आला तेव्हा खऱ्या अर्थाने मार्क्सच्या शास्त्रीय साम्यवादाच्या विचारांवर संशोधन सुरु झाले. त्यांच्या साम्यवादाच्या विचारांनी जगाचे लक्ष वेधून घेतले. मार्क्सवाद प्रत्यक्षात अस्तित्वात येतोय की काय असे विचार मांडले गेले. परंतु साम्यवादी रशियाचे विघटन झाल्यानंतर मार्क्स यांच्या विचारांचा प्रभाव काहीसा कमी झाल्याचे दिसून येत आहे. असे असले तरी त्यांनी भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे जे दोष स्पष्ट केलेले आहेत ते आजही प्रत्ययास येत आहेत.

**भौतिकवादी दृष्टीकोनाची संकल्पना (The Concept of Materialist Approach) :**

कार्ल मार्क्स यांनी आर्थिक विकासाची संकल्पना स्पष्ट करताना विरोध विकासाधिष्ठित भौतिकवादाच्या संकल्पनेचा आधार घेतला आहे. त्याने विकासाधिष्ठित भौतिकवादामधील भौतिकवादाची संकल्पना फ्रेंच शास्त्रज्ञांकडून घेतली तर विरोध विकासाची संकल्पना हेगल यांच्या लिखाणातून घेतली आहे. म्हणजेच मार्क्स यांच्या लिखाणावर हेगेल यांच्या विरोध विकासाच्या संकल्पनेचा प्रभाव दिसून येतो. असे असले तरी हेगेलच्या विचारांमधील दोष कमी करण्याचा प्रयत्न मार्क्स यांनी केला. हेगेल यांचे विरोध विकासाबाबतचे विचार डोक्यावर उभे अशा उलट अवस्थेत होते. त्यामध्ये सुधारणा करुन त्यांना पायावर उभे करण्याचे कार्य मार्क्सने केले असे मत प्रा. ग्रे. यांनी व्यक्त केले.

**हेगेलचे विरोध विकासाबाबतचे विचार :**

हेगेल यांच्यामते परस्पर विरोधी विचारांच्या संघर्षांमधून सुसंवादी स्वरुपाची विचारसरणी उदयास येत असते. त्यांच्या मते कल्पनेचे प्रतिबिंब म्हणजे भौतिक जग होय. सर्व प्रथम कल्पना विश्वामध्ये बदल घडून येतात व त्याचा परीणाम म्हणून भौतिक विश्वामध्ये बदल घडवून आणले जातात.

**कल्पना विश्वातील बदल :**

हेगेलने कल्पना विश्वात होणारे बदल स्पष्ट करण्यासाठी विरोध-विकास या संकल्पनेचा आधार घेतला आहे. विचारांमधील संघर्षांमधूनच कल्पना विश्वात बदल घडून येतात. जेव्हा एखाद्या विचाराची मांडणी केली जाते तेव्हा त्या विचाराला विरोधी विचार मांडले जातात. त्या विचारांना प्रतिउत्तर म्हणून आणखी विचार

मांडले जातात व अशा विचारांच्या संघर्षमधूनच समन्वयवादी, परिपूर्ण विचार उदयास येतात व वैचारीक प्रगती घडून येते. कल्पनाविश्वाचा विकास घडून येतो व त्यामधून भौतिक विश्वामध्ये बदल घडवून आणावे लागतात. म्हणजेच कल्पना विश्वातील बदल हे कारण आहे तर भौतिक विश्वातील बदल हे परीणाम आहे असे हेगेल मानतो.

**मार्क्सचे भौतिक विरोध विकासाबाबतचे विचार :**

हेगेल यांच्या विचारामधील विकास संकल्पनेच्या आधारे भौतिक विश्वामध्ये कशा स्वरुपाचे बदल घडून येतात याचे स्पष्टीकरण मार्क्सने दिल्याने त्याच्या या विचारांना विकासाधिष्ठित भौतिकवाद असे म्हटले जाते. मार्क्सच्यामते हेगेल म्हणतो त्याप्रमाणे प्रथम कल्पना विश्वामध्ये बदल होत नाही तर भौतिक विश्वामध्ये सर्व प्रथम बदल घडून येतो व त्या बदलांचा परीणाम म्हणून नंतर कल्पना विश्वामध्ये बदल घडवून आणले जातात. म्हणजेच मार्क्सने कल्पना विश्वातील बदलांपेक्षा वास्तव भौतिकवादी विश्वातील बदल प्रथम होतात व त्यांचा परीणाम कल्पना विश्वातील बदलांवर होतो असे मत व्यक्त केले.

म्हणूनच हेगेल यांच्या विचारांना पायावर उभे करण्याचे काम कार्ल मार्क्सने केले असे मानले जाते. अर्थव्यवस्थेच्या विकासाबाबत जी यंत्रणा तयार केलेली असते त्याला विरोधी धोरणे स्वीकारली जातात. त्या दोन्हींच्या गुण-दोषांचा विचार करुन पर्याप्त अशा स्वरुपाचे एखादे धोरण तयार केले जाते व ते राबविले जाते व त्यामधून अर्थव्यवस्थेच्या विकासाची गती वाढण्यास मदत होते. असे मत मार्क्सने व्यक्त केले यालाच मार्क्सचे विरोध विकासाधिष्ठित भौतिकवाद असे म्हटले जाते. विरोध हाच विकासाला कारणीभूत ठरत असतो.

**ऐतिहासिक भौतिकवाद :**

कार्ल मार्क्स यांनी अर्थव्यवस्थेचा विकास होत असताना समाज विविध अवस्थांमधून कसा विकास साध्य करत राहतो याबाबतचे विचार संशोधनाच्या आधारावर मांडले त्यालाच मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद असे म्हणतात.

मार्क्स पूर्व तज्ञांनी विकासाबाबत संकल्पनाची मांडणी करत असताना विविध मते व्यक्त केली त्यामध्ये,

१) राज्य पध्दतीमधील बदलांनी विकास घडून येतो.

२) धार्मिक बदलांमुळे विकास होतो.

३) नैसर्गिक बदलांमुळे विकास साध्य होतो.

४) वाढत्या व्यापारामधून विकास साध्य होतो.

या विचारांचा समावेश होतो. मार्क्सने ऐतिहासिक भौतिकवादाचे स्पष्टीकरण देत असताना इतिहासामध्ये अर्थव्यवस्थांचे स्वरुप एका अवस्थेमधून दुसऱ्या अवस्थेमध्ये दुसऱ्यामधून तिसऱ्या अवस्थेमध्ये कसे बदलले आहे याचे पुरावे दिलेले आहेत. त्यांनी अर्थव्यवस्थेचे पुढील टप्पे सांगीतलेले आहेत.

## अर्थव्यवस्थेच्या विकासाचे टप्पे

समाजसत्ताक अर्थव्यवस्था

गुलामगिरिची अर्थव्यवस्था

सरंजामशाही अर्थव्यवस्था

भांडवलशाही अर्थव्यवस्था

समाजवादी अर्थव्यवस्था

अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या ऐतिहासीक अभ्यासावरुन अर्थव्यवस्था कोणकोणत्या टप्प्यामधून विकसीत होत गेली याचे स्पष्टीकरण मार्क्सने दिलेले आहे.

**१) समाजसत्ताक अर्थव्यवस्था :** सर्वप्रथम अर्थव्यवस्था समाजसत्ताक स्वरुपाची होती, उत्पादनाच्या सर्व साधनांवर संपूर्ण समाजाची मालकी होती. वर्ग विरहीत, संघर्ष विरहीत असे अर्थव्यवस्थेचे स्वरुप होते.

**२) गुलामगिरी आधारीत अर्थव्यवस्था :** समाजसत्ताक अर्थव्यवस्थेमध्ये मुलभूत बदल घडून आल्याने गुलामगिरीची अर्थव्यवस्था प्रस्तापीत झाली. यामध्ये मालक व गुलाम असे दोन वर्ग निर्माण झाले त्यांच्यामध्ये संघर्ष वाढला.

**३) सरंजामशाही अर्थव्यवस्था :** मालक वर्गांनी गुलामांचे शोषण केल्याने वर्ग संघर्षाचे स्वरुप तीव्र बनले, क्रांती घडून आली त्यामुळे सरंजामशाही अर्थव्यवस्थेने घेतली. यामध्ये सुद्धा अ) सरंजामदार ब) भूदास किंवा कुळे असे दोन वर्ग निर्माण झाले. जमिनीची मालकी असणाऱ्या सरंजामदारांनी कुळांचे शोषण केल्याने सरंजामशाहीचा अस्त झाला.

**४) भांडवलशाही अर्थव्यवस्था :** सरंजामशाही अर्थव्यवस्थेच्या अस्तामधूनच भांडवलशाहीचा उदय झाला असे विधान मार्क्सने इतिहाच्या अभ्यासावरुन केले. त्यांच्या मते भांडवलशाही अर्थव्यवस्था ही अर्थव्यवस्थेच्या उत्क्रांतीमधील एक अवस्था असून यामध्ये कामगार-मालक, गरिब-श्रीमंत यामध्ये भांडवलदारांच्या शोषणाला कामगार वर्ग विरोध करेल त्यामधून वर्ग संघर्ष निर्माण होईल. त्याचे परीणाम कामगार कपात, संप, टाळेबंदी, वेतन कपात मंदी यासारख्या समस्या निर्माण होतील. त्याचे परिवर्तन क्रांतीकारक बदलांमध्ये होवून आज जगामध्ये अस्तित्वात असणारी भांडवलशाही अर्थव्यवस्था लोप पावेल.

**५) समाजवादी अर्थव्यवस्था :** भांडवलशाहीमधील दोषच तिच्या विनाशास कारणीभूत ठरतील व त्यामधून जगात साम्यवाद अस्तित्वात येईल. ज्यामध्ये संपूर्ण मालकी सरकारची असेल, कामगार-मालक वर्ग संघर्ष निर्माण होऊ शकत नाही. तेजी मंदी चक्रे निर्माण होवू शकत नाही.

अशा स्वरुपाचे ऐतिहासिक बदलांबाबत जे विचार मांडलेले आहेत त्यांचा समावेश ऐतिहासिक भौतिकवादामध्ये केला जातो. मार्क्स यांनी हेगेल यांच्या विकासवादाचा आधार घेत आर्थिक भौतिकवाद स्पष्ट केला.

**मार्क्सचा आर्थिक भौतिकवाद (Concept of Economic Materialisam) :**

अर्थव्यवस्थेमध्ये कार्यरत असणारे आर्थिक प्रवाह हेच आर्थिक विकास घडवून आणण्यास कारणीभूत ठरत असतात असा जो विचार मांडला त्यालाच मार्क्सचा आर्थिक भौतिकवाद असे म्हटले जाते.

मार्क्स यांच्यामते विश्वामध्ये ज्या काही क्रांत्या घडून आल्या त्यांचे महत्त्वाचे कारण उत्पादन साधनांची मालकी हेच आहे. अर्थव्यवस्थेमधील सर्व बदल हे उत्पादन साधनांमध्ये घडून आलेल्या मालकी हक्कामधील परिवर्तनाने घडून आलेल्या आहेत. त्यांच्या या विचारांना मार्क्सचा आर्थिक भौतिकवाद असे म्हटले जाते.

**इतिहासाच्या भौतिकवादी विश्लेषणाचे टीकात्मक मूल्यमापन :**

**१) आर्थिक प्रवाहांना अवास्तव महत्त्व :** समाज जीवनामध्ये बदल घडून आणण्याचे कार्य आर्थिक प्रवाहांमुळेच होते असे विचार मार्क्स यांनी व्यक्त केले. परंतु वास्तवामध्ये आर्थिक प्रवाहांबरोबर अनेक सामाजिक, राजकीय, धार्मिक घटक सामाजिक बदलांवर प्रभाव टाकत असतात अशी टीका केली आहे.

**२) सामाजिक घटकांना उत्क्रांती कारणीभूत :** अर्थव्यवस्थेमधील समस्यांमुळे वर्गसंघर्ष निर्माण होतो. त्यामधून क्रांती घडून आल्याने अर्थव्यवस्था पुढील टप्प्यामध्ये प्रवेश करते. असा विचार मांडला परंतु वास्तवामध्ये अर्थव्यवस्थेमध्ये यांत्रिकीकरण, तंत्रज्ञानाचा विकास यासारख्या उत्क्रांतीकारक घटकांनी बदल घडून येतो.

**३) अर्थव्यवस्थेच्या वर्गांचे अस्तित्व नाकारता येत नाही :** कोणत्याही स्वरुपाच्या अर्थव्यवस्थेमध्ये विविध स्वरुपाचे वर्ग हे कार्यरत असतातच. म्हणजेच मार्क्स यांनी मान्य केलेल्या वर्ग विरहीत अर्थव्यवस्था अस्तित्वात असू शकत नाही.

**४) अनुभवजन्य पुराव्याचा अभाव :** अर्थव्यवस्थेमध्ये क्रांतीकारक बदल घडून आल्याने ती विविध टप्प्यांमधून संक्रमित होते या विचारांचा ठोस अनुभवजन्य पुरावा नाही.

**५) रशियाच्या विघटनाने विचार मागे पडले :** भांडवलशाहीच्या विनाशानंतर समाजवाद प्रस्थापित होईल हा मार्क्सचा विचार रशियाच्या विघटनानंतर मागे पडला आहे.

**६) एकांगी विचारसरणी :** विकास प्रक्रियेमध्ये आर्थिक बदलांच्या बरोबरच भौगोलिक स्थिती, व्यापाराची प्रगती, सेवाक्षेत्राचा विकास, देशातील उपलब्ध घटकांची उपलब्धता यासारख्या अनेक घटकांचा प्रभाव पडतो. परंतु या घटकांकडे दुर्लक्ष केले असल्याने त्यांचे विचार एकांगी स्वरुपाचे वाटतात.

अशा स्वरुपाच्या टीका मार्क्स यांच्या भौतिकवादी विश्लेषणावर केल्या जात असल्या तरी त्यांनी स्पष्ट केलेली अनेक वैशिष्ट्ये तसेच दोष आजच्या भांडवलशाही राष्ट्रांमध्ये दिसून येतात.

**४.२.२ कार्ल मार्क्स यांचा मूल्य सिद्धांत (Value Theory of Karl Marx) :**

कार्ल मार्क्स यांनी आपल्या लिखाणामध्ये वस्तूंचे मूल्य कसे निश्चित होते याबाबत जे विचार मांडलेले आहेत त्यांनाच मार्क्सचा मूल्य सिद्धांत असे म्हटले जाते. त्यांचे मूल्यविषयक विचार हे ॲडम स्थिम व डेव्हीड

रिकार्डो यांनी स्पष्ट केलेल्या श्रममूल्याच्या विचारांवर आधारलेले आहेत. मानवी गरजांची पूर्तता करणाऱ्या वस्तूंचे मूल्य कसे ठरते याबाबतचा सिद्धांत मांडताना मार्क्सने श्रममूल्याला महत्त्वाचे स्थान दिले आहे. त्याच्या मते वस्तूंला जे मूल्य प्राप्त झालेले असते ते त्या वस्तूमध्ये समाविष्ट असणाऱ्या श्रममूल्यावरुन प्राप्त झालेले असते. म्हणूनच या मूल्य सिद्धांताला श्रममूल्य सिद्धांत असे ही म्हटले आहे.

**मार्क्सच्या सिद्धांतामधील महत्त्वाच्या बाबी :**

कार्ल मार्क्स यांनी वस्तूंच्या मूल्याबाबतचा जो मूल्य सिद्धांत स्पष्ट केलेला आहे त्यामधील महत्त्वपूर्ण बाबी पुढील प्रमाणे सांगता येतात.

१) श्रममूल्यावर आधारलेला सिद्धांत.

२) मालक कामगारांचे शोषण कसे करतात याचे स्पष्टीकरण.

३) अतिरिक्त मूल्य निर्मिती कशी होते याचे स्पष्टीकरण.

४) नफ्याची निर्मिती कशी होते याचे स्पष्टीकरण.

५) नफ्याच्या निर्मितीमध्ये कोणत्या घटकाचे योगदान.

६) नफ्याचा दर घटत का जातो.

७) भांडवलशाही अर्थव्यवस्थेमधील मूलभूत दोष कोणते.

८) भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या अस्तास कारणीभूत घटक कोणते.

९) श्रममूल्य मापनामधील अडचणी कोणत्या.

यांसारख्या अनेक बाबींवर मार्क्स यांचा श्रममूल्य सिद्धांत आधारलेला आहे.

**सिध्दांताचे विधान :**

प्रत्येक वस्तूचे मूल्य हे त्या वस्तूमध्ये समाविष्ट असणाऱ्या श्रमावर ठरते. ज्या वस्तूंच्या निर्मितीसाठी कमी श्रम खर्ची पडते त्याचे मूल्य कमी, अधिक श्रमखर्च असेल तर मूल्य देखील अधिक व समान खर्च झालेल्या वस्तूंचे मूल्य समान असते.

मार्क्स यांच्या मते कोणत्याही वस्तूला जे मूल्य प्राप्त होते ते त्या वस्तूमध्ये समाविष्ठ असणाऱ्या श्रमामूळेच. जेव्हा वस्तूविनिमय पध्दतीमध्ये एका वस्तूच्या मोबदल्यात दूसरी वस्तू दिली किंवा घेतली जाते तेव्हा त्या दोन्ही वस्तूंच्या उत्पादनासाठी खर्ची पडलेले श्रम समान असते. दोन वस्तूंच्या देवाण - घेवाणीमध्ये श्रम हा घटक महत्त्वाची भूमिका पार पाडत असतो.

वस्तूचे मूल्य = वस्तू निर्मितीचा श्रमखर्च

समजा टेबलचे मूल्य खुर्चीच्या मूल्यापेक्षा दुप्पट आहे. याचा अर्थ टेबलच्या उत्पादनासाठी खर्ची पडलेले

श्रम हे खुर्चीच्या उत्पादनासाठी खर्ची पडलेल्या श्रमापेक्षा दुप्पट आहे असा होतो. म्हणूनच तो विनिमय दर किंवा टेबल व खुर्चीमधील देवाण-घेवाण दर होय.

१ टेबल = २ खुर्ची असा ठरतो.

**मूल्याचे प्रकार (Types of Value) :**

सदर सिद्धांताची मांडणी करताना मार्क्स यांनी वस्तूच्या दोन प्रकारच्या मूल्याचा विचार केला आहे.

**१) उपयोगिता मूल्य (Utility Value):**

वस्तूच्या उपभोगापासून जी उपयोगिता प्राप्त होते तिला मार्क्स उपयोगिता मूल्य असे म्हणतो. वस्तूमध्ये समाविष्ट झालेल्या नैसर्गिक गुणधर्मावरुन उपयोगिता मूल्य ठरते, असे मार्क्स म्हणतो. वस्तूमधील समाविष्ट नैसर्गिक गुणधर्माचा उपभोग घेतला असता उपयोगिता मूल्य प्राप्त होते. उपयोगिता मूल्य हे वस्तूच्या मूल्याची गुणात्मक बाजू आहे. परंतु मूल्य निश्चितीमध्ये या मूल्याचा विचार सनातनी शास्त्रज्ञांनी केलेला नाही असे मार्क्स यांना वाटते.

**२) विनिमय मूल्य (Exchange Value) :**

वस्तूच्या देवाण-घेवाणीतून जे मूल्य प्राप्त होते त्यास विनिमय मूल्य असे म्हणतात. वस्तूच्या मूल्याची ही संस्थात्मक बाजू असल्याचे मानले जाते. वस्तूच्या उत्पादनासाठी जेवढे मानवी श्रम खर्ची पडलेले असते तेवढे त्या वस्तूचे विनिमय मूल्य असते.

वरील दोन प्रकारच्या मूल्यांपैकी वस्तूच्या विनिमय मूल्यावर अधिक लक्ष देऊन आपला मूल्य सिद्धांत स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**श्रमाचे प्रकार (Types of Labour) :**

कोणतीही वस्तू उत्पादीत करताना उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर मानवी श्रमाच्या साहाय्याने करणे आवश्यक असते, त्याबरोबरच भांडवलाचा, यंत्रसामग्री वापर देखील आवश्यक असतो, परंतु जर भांडवल या घटकाचा विचार करुन मूल्य सिद्धांताचे स्पष्टीकरण दिले गेले तर मूल्य सिद्धांताचे-श्रममूल्य सिद्धांत हे स्वरुपच नष्ट होईल अशी भिती असल्याने श्रमाचे पुढील दोन प्रकार केले.

**अ) वर्तमानातील श्रमखर्च :** वस्तूच्या उत्पादनासाठी ज्या मानवी श्रमाचा वापर केला जातो त्याचा समावेश वर्तमानातील श्रमखर्चामध्ये केला जातो.

समजा टेबल बनविण्यासाठी जर २ श्रमिकांनी कार्य केले असेल तर २ श्रमिक हे वर्तमान कालखंडातील श्रमखर्च ठरतात.

**ब) भूतकाळातील श्रमखर्च (संचित श्रम):**

वस्तूंच्या उत्पादनासाठी ज्या काही भांडवली वस्तू किंवा यंत्रसामग्रीचा वापर केला जातो त्याचा समावेश भूतकालीन श्रमखर्चामध्ये करावा असे मार्क्सनी स्पष्ट केले आहे.

मार्क्स यांच्यामते वस्तूनिर्मितीसाठी सध्या ज्या भांडवलाचा तसेच यंत्रांचा वापर केला जातो त्यांच्या निर्मितीसाठी पूर्वी (भूतकाळामध्ये) श्रमीकांचाच वापर केलेला असतो. म्हणून आज त्यांचा वापर करत असताना ते भांडवल या स्वरुपामध्ये विचारात न घेता संचित श्रम (Stored Labour) या स्वरुपात विचारात घ्यावे. म्हणजेच

श्रमखर्च = वर्तमानातील खर्च + संचित खर्च

श्रमखर्च = वर्तमानातील खर्च + (यंत्रांच्या निर्मितीसाठी भूतकाळात केलेला श्रमखर्च )

संचित श्रमाच्या स्वरुपात भांडवलाचा विचार करुन वस्तूचे मूल्य हे श्रमखर्चावर ठरते याविचाराचे समर्थन करण्याचा प्रयत्न मार्क्स यांनी केल्याचे दिसून येतो.

**श्रमखर्च मापनातील समस्या :**

कार्ल मार्क्स यांनी आपले श्रममूल्य विषयक विचार स्पष्ट करताना श्रमखर्च मापनामध्ये कोणकोणत्या समस्या निर्माण होवू शकतात, तसेच त्यावर कोणत्या उपायांची अंमलबजावणी करावी याचे ही विवेचन केलेले आहे. त्या समस्यांमध्ये पुढील समस्यांचा समावेश होतो.

**१) सामाजिक श्रमखर्चाचे मापन कसे करावे ?:**

अशा स्वरुपाचा प्रश्न निर्माण झाल्यास समाजातील प्रत्येक व्यक्तीने केलेल्या श्रमखर्चाचा विचार एकूण सामाजिक खर्चाचा एक भाग या स्वरुपात करावा. तसेच अर्थव्यवस्थेमधील तंत्रज्ञान, उत्पादन साधने, नैसर्गिक सामग्री यांचा विचार करताना जेवढ्या श्रमाची आवश्यकता वस्तू उत्पादनासाठी आहे त्यास सामाजिक दृष्ट्या आवश्यक श्रम या दृष्टीने विचारात घ्यावे असे या समस्येचे निराकरण मार्क्स यांनी केले.

**२) जुनाट यंत्रांचा वापर व अधिकचा श्रमखर्च यांच्या आधारे मूल्य निश्चितीची अडचण :**

अशा श्रम स्थितीत अधिक श्रम खर्च करावा लागतो. तो वेळ वाया किंवा फुकट गेला असे मानावे कारण अशा अधिकच्या खर्चास समाज मान्यता देऊन कदापी अधिकचा मोबदला देण्यास तयार होणार नाही.

**३) कुशल व अकुशल श्रमाच्या साह्याने उत्पादन :**

जर एकाच प्रकारच्या वस्तू उत्पादनामध्ये कुशल तसेच अकुशल श्रमिक कार्यरत असतील तर कुशल कामगारांचे कौशल्य अकुशल कामगारांच्यापेक्षा किती पट अधिक आहे याच्या आधारे त्या-त्या वस्तूंचे मूल्य निश्चित करावे असे मार्क्स यांनी स्पष्ट केले आहे.

या स्वरुपामध्ये कार्ल मार्क्स यांनी वस्तूच्या मूल्य निश्चितीच्याबाबत जे विचार व्यक्त केलेले आहेत. त्यांनाच कार्ल मार्क्स यांचा श्रममूल्य सिद्धांत असे म्हटले जाते. या सिद्धांतामध्ये त्यांनी ॲडम स्थिम, रिकार्डो यांच्या मूल्य विषयक विचारांमध्ये सुधारणा करुन श्रममूल्य सिद्धांताचे विकसित रुप पुढे ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी भांडवलाचा विचार संचित श्रमाच्या स्वरुपामध्ये केलेला आहे. तसेच मूल्यमापनामध्ये

कोणत्या समस्या निर्माण होवू शकतात व त्यांचे निराकरण कसे करावे याबाबतचे विवेचन दिले असल्याने तो श्रेष्ठ ठरतो.

**मार्क्स यांच्या मूल्य सिद्धांतावरील टीका :**

**१) निसर्गनिर्मित वस्तूंच्या मूल्याचा विचार नाही :** मार्क्स यांनी ज्या वस्तूंच्या निर्मितीसाठी श्रमखर्ची पडलेले आहेत त्यांना त्या श्रमखर्चाएवढे मूल्य प्राप्त होते असे मत व्यक्त केले, परंतु अनेक वस्तू निसर्गनिर्मित असतात. त्यांच्या निर्मितीसाठी कोणताच श्रमखर्च येत नाही, मग त्यांना का मूल्य प्राप्त होते याचे विवेचन केलेले नाही अशी टीका केली जाते.

**२) उपयोगितेच्याबाबत गोंधळ :** मूल्य सिद्धांतामध्ये मार्क्सने उपयोगितेचे मूल्य विचारात घेतलेले नाही कारण श्रममूल्य सिद्धांतामध्ये बाधा निर्माण होत होती. परंतु नंतर त्यांनी उपयोगितेच्याबाबत बरेच स्पष्टीकरण दिलेले आहे म्हणजे त्यांनी उपयोगितेबाबत गोंधळ निर्माण केला आहे अशी टिका केली जाते.

**३) एकांगी सिद्धांत :** वस्तूच्या उत्पादनासाठी फक्त श्रमाचीच आवश्यकता असते व त्या श्रमखर्चावरुनच वस्तूंची किंमत ठरते असे जे विवेचन केले आहे ते एकांगी स्वरुपाचे होते कारण श्रमाबरोबर अनेक घटकांची उत्पादनाची आवश्यकता असते.

**४) संचित श्रमाची संकल्पना अयोग्य :** मार्क्सने सिद्धांतामध्ये गोंधळ निर्माण होवू नये यासाठी भांडवलाचा विचार संचित श्रम या स्वरुपाने केलेला आहे, परंतु भांडवलाचा स्वतंत्र विचार करणे आवश्यक आहे अशी टिका केली जाते.

**५) वस्तूच्या मागणीच्या कार्याकडे दुर्लक्ष :** मार्क्स यांनी वस्तूमधील समाविष्ट श्रम खर्चावरुन तिला मूल्य प्राप्त होते असा विचार स्पष्ट केला म्हणजेच त्यांनी पुरवठ्याच्या बाजूने सिद्धांत मांडला. परंतु मूल्य निश्चितीमध्ये मागणीची भूमिका देखील महत्त्वपूर्ण असते या विचाराकडे दुर्लक्ष केले आहे.

**६) वस्तू दुर्मिळतेकडे दुर्लक्ष :** वस्तूच्या श्रमखर्चाबरोबरच तिच्या दुर्मिळतेमूळे श्रममूल्यापेक्षा बरेच अधिक मूल्य प्राप्त होत असते, त्याचे स्पष्टीकरण हा सिद्धांत देत नाही. उदा. हिऱ्याला असणाऱ्या श्रममूल्यापेक्षा त्याचे वास्तव मूल्य बरेच अधिक असण्याचे कारण त्याची दुर्मिळता हे आहे याकडे दुर्लक्ष केले आहे.

**७) कुशल व अकुशल श्रमिकांच्या मूल्यमापनातील अडचण :** मार्क्स यांनी कुशल कामगारांचे कौशल्य अकुशल कामगारांच्यापेक्षा किती पट अधिक आहे याच्या आधारे मूल्य निश्चित करावे असे सांगितले, परंतु वास्तवात त्याप्रमाणे मापन अशक्य आहे.

**८) शोषणाचे विवेचन करणारा सिद्धांत :** मार्क्स याने हा सिद्धांत मालक वर्ग कामगारांचे शोषण करतो या विचारावर आहे व तो शोषणाचे विवेचन करतो अशी टीका केली जाते.

**९) भांडवलशाहीतील फायद्यांकडे दुर्लक्ष :** मार्क्स यांनी भांडवलशाहीतील दोष स्पष्ट करण्याच्या दृष्टीने या सिद्धांताची मांडणी केलेली असून भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये असणारे अनेक फायदे या सिद्धांताने

विचारात घेतलेले नाहीत अशीही टीका केली जाते.

**१०) वस्तूचे मूल्य व किंमत असा गोंधळ :** सिद्धांताची मांडणी झाल्यानंतर मार्क्सने वस्तूचे मूल्य वस्तूची किंमत यामधील भेद स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे त्यामूळे हा नक्की मूल्य सिद्धांत की किंमत सिद्धांत असा प्रश्न निर्माण केला जातो.

**११) गोंधळ सिद्धांत :** या सिद्धांतामध्ये मार्क्सने उपयोगिता व विनिमय मूल्य, कुशल व अकुशल कामगार तसेच भूतकालीन व वर्तमान श्रमखर्च या संकल्पनांमध्ये गोंधळ केल्याने तो श्रममूल्य सिद्धांत नाही तर गोंधळ सिद्धांत आहे अशी टीका केली जाते.

अशा स्वरुपाच्या टीका कार्ल मार्क्स यांच्या श्रममूल्य सिद्धांतावर केल्या जातात.

### ४.२.३ अतिरिक्त मूल्य सिद्धांत (Theory of Surplus Value) :

कार्ल मार्क्स यांनी वस्तूच्या मूल्यनिश्चितीच्या सिद्धांतानंतर अतिरिक्त मूल्याबाबतचे विचार स्पष्ट केलेले आहेत. त्यांच्या मते भांडवलशाही राष्ट्रांमध्ये ज्याकाही अनेक समस्या आहेत त्यामध्ये अतिरिक्त मूल्याची निर्मिती व त्यामाध्यमातून श्रमिकांचे होणारे शोषण ही अतिशय गंभीर समस्या आहे. भांडवलदारांकडून केली जाणारी अतिरिक्त मूल्यनिर्मिती अनेक समस्यांच्या निर्मितीला कारणीभूत ठरत असते, आणि त्यामधूनच भांडवलशाहीचे अस्तित्व धोक्यात येवू शकते, असे मत कार्ल मार्क्स यांनी व्यक्त केले. भांडवलशाहीतील कामगारांचे आर्थिक शोषण, पिळवणूक यामधून कामगार-मालक, गरीब-श्रीमंत असा वर्ग संघर्ष निर्माण झाल्याने भांडवलशाहीचे अस्तित्व नष्ट होऊन जगामध्ये साम्यवाद अस्तित्वात येईल असे जे भाकीत केले ते अतिरिक्त मूल्याच्या विचारांमधून पुढे आलेले आहे.

**सिद्धांताचे विधान :**

कामगारांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंना बाजारपेठेमध्ये प्राप्त झालेले मूल्य व कामगाराला प्रत्यक्षात प्राप्त झालेले वेतन या दोहोतील तफावत म्हणजे अतिरिक्त मूल्य होय.

मार्क्स यांच्या मते कोणत्याही वस्तूला जे मूल्य प्राप्त होते ते त्यामध्ये समाविष्ट असणाऱ्या श्रमामुळेच, म्हणजेच फक्त श्रमिकच वस्तूंची निर्मिती करीत असतात त्यामुळेच वस्तूला बाजारपेठेमध्ये जे मूल्य प्राप्त झालेले असते. त्यावर श्रमिकाचाच अधिकार असतो परंतु भांडवलदार, मालक वर्ग श्रमिकांना बाजारातील प्राप्त मूल्यापेक्षा कमी मूल्य देतात व त्यांचे शोषण करतात. ही दोन मूल्यांमधील तफावत आहे तिलाच अतिरिक्त मूल्य असे म्हटले जाते.

**अतिरिक्त मूल्याचे सूत्र :**

अतिरिक्त मूल्य = कामगारांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंना बाजारात प्राप्त होणारे मूल्य - कामगारांना श्रमाचा मोबदला म्हणून प्राप्त वेतन.

समजा एखाद्या श्रमिकाने तयार केलेल्या टेबलची विक्री ३०० रुपयांना केली. परंतु त्यापैकी श्रमिकाला टेबल निर्मितीचा मोबदला म्हणून १६० रुपये दिले जात असतील तर

अतिरिक्त मूल्य = ३०० – १६० = १४०

म्हणजेच वरील व्यवहारामध्ये भांडवलदारांनी १४० रुपये अतिरिक्त मूल्याची निर्मिती केली असल्याचे स्पष्ट होते. वास्तवामध्ये टेबलला जे ३०० रुपये मूल्य प्राप्त झालेले आहे ते फक्त श्रमिकांमुळेच, म्हणूनच ते सर्व मूल्य श्रमिकाला प्राप्त होणे आवश्यक होते. परंतु भांडवलदारांनी १४० रुपयांची अतिरिक्त मूल्य निर्मिती करुन तेवढ्या स्वरुपात कामगारांचे शोषण केल्याचे स्पष्ट होते

**कोणत्या परिस्थितीमध्ये श्रमाचे शोषण होते ? :**

मार्क्स यांनी भांडवलदार कोणत्या परिस्थितीमध्ये अतिरिक्त मूल्याची निर्मिती करुन श्रमिकांचे शोषण करतो याबाबत विनिमयाचे प्रकार, श्रमाचे प्रकार व भांडवलाचे प्रकार यांचा आधार घेतलेला आहे.

**१) विनिमयाचे प्रकार :** मार्क्स यांनी अर्थव्यवस्थेतील विनिमय व्यवहारांचे पुढील प्रकार केलेले आहेत.

**अ) वस्तू–पैसा–वस्तू (Commodity-Money-Commodity) :** यालाच C-M-C असेही म्हणतात. या प्रकारामध्ये वस्तूच्या मोबदल्यात पैसा प्राप्त होत असतो व त्या पैशाच्या मोबदल्यात अन्य वस्तू प्राप्त केल्या जातात. यामध्ये पैशाची भूमिका फक्त विनिमय व्यवहार पूर्ण करणे ही असल्याने अतिरिक्त मूल्याची निर्मिती होत नाही. म्हणजेच ज्या व्यवहारामध्ये पैसा विनिमयाचे माध्यम या स्वरुपात कार्य करतो तेथे श्रमिकांचे शोषण होत नाही.

**ब) पैसा–वस्तू–पैसा (Money-Commodity-Money):** या व्यवहारालाच M-C-M असेही म्हणतात. भांडवलशाही देशांमध्ये पैशाच्या मोबदल्यामध्ये वस्तू प्राप्त केल्या जातात व त्यांची विक्री करुन पैसा प्राप्त केला जातो. खरेदीसाठी खर्च केलेल्या पैशापेक्षा वस्तूंच्या विक्रीमधून प्राप्त होणारा पैसा अधिक असावा अशी अपेक्षा असते. या व्यवहाराचे दोन भाग केले जातात.

**क) पैसा–वस्तू (Commodity-Money) :** या अवस्थेत भांडवलदार पैशाच्या सहाय्याने वस्तू उत्पादनाचे कार्य करीत असतो. त्यामध्ये श्रमिकांचा वापर होत असल्याने अतिरिक्त मूल्याची निर्मिती होते असे मार्क्स म्हणतो.

**ड) वस्तू–पैसा (Commodity-Money):** या अवस्थेत उत्पादीत वस्तूंची विक्री करुन पैसा मिळविणे एवढेच कार्य केले जात असल्याने अतिरिक्त मूल्याची निर्मिती होत नाही तसेच श्रमाचे शोषणही होत नाही.

**२) श्रमाचे प्रकार (Types of Labour) :** मार्क्स यांनी श्रमाचे दोन प्रकार केले आहेत.

**अ) आवश्यक श्रम :** मार्क्स यांच्या मते श्रम हाच एकमेव वस्तूच्या उत्पादनाचा घटक असल्याने त्याला दिल्या जाणाऱ्या वेतनाच्या निर्मितीसाठी जेवढे श्रम करणे गरजेचे आहे त्याला आवश्यक श्रम असे म्हणतात.

यालाच निर्वाह श्रम असेही म्हणतात.

समजा एखाद्या श्रमिकाला महिना ५०० रुपये वेतन प्राप्त होते व त्याच्या निर्मितीसाठी त्याला प्रतिदिन ३ तास श्रम करणे आवश्यक असेल तर ३ तास श्रम हे त्याचे आवश्यक श्रम ठरते.

**ब) अतिरिक्त श्रम :** श्रमिकाला प्राप्त होणाऱ्या वेतनापेक्षा तो जे अधिकचे श्रमखर्च करतो त्याला अतिरिक्त श्रम असे म्हणतात.

समजा कामगारांचे आवश्यक श्रम ३ तास असताना भांडवलदार मालक वर्ग त्याचे कडून ८ तास काम करुन घेत असेल तर –

अतिरिक्त श्रम = एकूण श्रम – आवश्क श्रम

अतिरिक्त श्रम = ८ तास – ३ तास = ५ तास

५ तास हे त्याचे अतिरिक्त श्रम ठरते.

**३) भांडवलाचे प्रकार (Types of Capital) :**

**अ) स्थिर भांडवल (Fixed Capital) :** यामध्ये त्यांनी कच्चा माल, यंत्रसामग्री, भांडवली वस्तू यांचा समावेश केला. उत्पादन क्रियेमध्ये स्थिर भांडवलाचे मूल्य बदलत नाही म्हणून ते अतिरिक्त मूल्याची निर्मिती करु शकत नाही असे मार्क्स म्हणतो.

**ब) बदलते भांडवल (Variable Capital) :** मार्क्स यांनी कामगारांच्या वेतनावर खर्च होणाऱ्या भांडवलाचा समावेश बदलत्या भांडवलामध्ये केला व उत्पादनाच्या क्रियेमध्ये बदलत्या भांडवलाचे मूल्य बदलत असल्याने ते अतिरिक्त मूल्याची निर्मिती करते.

**शोषणाचा दर (Rate of Exploitation):**

मार्क्स यांनी जे भांडवलदार श्रमिकांचे शोषण करतात त्याची तीव्रता काय आहे याची कल्पना यावी यासाठी शोषणाचा दर ही संकल्पना मांडली. यालाच अतिरिक्त मूल्याचा दर असेही म्हणतात. याचे दोन प्रकार केले जातात.

**१) बदलत्या भांडवलाच्या आधारे :**

बदलते भांडवल आणि अतिरिक्त मूल्य यामध्ये असणारे प्रमाण म्हणजे अतिरिक्त मूल्याचा दर होय.

**सूत्र :**

$$\text{अतिरिक्त मूल्याचा दर} = \frac{\text{अतिरिक्त मूल्य}}{\text{बदलते भांडवल}} \times १००$$

जर अतिरिक्त मूल्य : २५

बदलते भांडवल : ५० असेल तर

$$\text{अतिरिक्त मूल्याचा दर} = \frac{२५}{५०} \times १००$$

शोषणाचा दर ५०% राहतो.

२) आवश्यक श्रमाच्या आधारे :

**आवश्यक श्रम व अतिरिक्त या दोहोमध्ये असणारे प्रमाण म्हणजे अतिरिक्त मूल्याचा किंवा शोषणाचा दर होय.**

**सूत्र :**

$$\text{अतिरिक्त मूल्याचा दर} = \frac{\text{अतिरिक्त श्रम}}{\text{आवश्यक श्रम}} \times १००$$

जर आवश्यक श्रम : ३ तास एकूण श्रम : ८ तास असेल तर

अतिरिक श्रम: ५ तास ठरते म्हणूनच.

$$\text{अतिरिक्त मूल्याचा दर} = \frac{५}{३} \times १०० = १६६ \%$$

म्हणजेच अतिरिक्त मूल्याचा दर १६६% राहतो.

अशा स्वरुपात कार्ल मार्क्स यांनी अतिरिक्त मूल्याच्या निर्मितीबाबतचे विचार स्पष्ट केलेले आहेत व त्याआधारे भांडवलशाही अर्थव्यवस्थेमधील मालकवर्ग कामगारांचे शोषण कशा प्रकारे करतो ते स्पष्ट केले आहे.

**कार्ल मार्क्स यांच्या अतिरिक्त सिद्धांतावरील टीका :**

**१) व्याजाबाबतच्या विचारांमध्ये गोंधळ :** मार्क्स यांनी सुरवातीला अतिरिक्त मूल्याबाबतचे विचार मांडताना व्याजाचा विचार केलेला नाही व नंतर व्याज हे अतिरिक्त मूल्याचाच भाग असते असे विचार मांडले त्यामधून गोंधळ निर्माण केला आहे.

**२) उत्पादनाच्या अन्य घटकांकडे दुर्लक्ष :** या सिद्धांतामध्ये वस्तू उत्पादनासाठी फक्त श्रमाचाच वापर केला जातो असे विचार व्यक्त करुन उत्पादनाच्या अन्य घटकांकडे दुर्लक्ष केले आहे अशी टीका केली जाते.

**३) मागणीकडे दुर्लक्ष :** वस्तूच्या मागणीमधील बदल हा घटक देखील वस्तूच्या किंमत निश्चितीमध्ये महत्त्वाचे योगदान देत असतो, परंतु हा सिद्धांत त्याकडे दुर्लक्ष करतो अशी टीका केली जाते.

**४) गरजेच्या तीव्रतेकडे दुर्लक्ष :** अनेक वेळा काही वस्तूंच्या गरजेची तीव्रता अधिक असल्याने त्या वस्तूंची किंमत अधिक राहू शकते व श्रममूल्य व वस्तूमूल्य यामध्ये तफावत निर्माण होवू शकते याचा विचार मार्क्सने केलेला नाही.

**५) बदलत्या भांडवलामध्ये अन्य घटकांचाही समावेश होतो :** मार्क्स यांनी बदलत्या भांडवलामध्ये वेतनावरील खर्चाचा समावेश होतो असे मत व्यक्त केले. परंतु प्रत्यक्षात बदलत्या भांडवलामध्ये श्रमाबरोबरच कच्चा माल यांचाही समावेश होता याकडे दुर्लक्ष केलेले आहे.

**६) शारिरीक श्रम व बौध्दीक श्रम असे वर्गीकरण आवश्यक :** मार्क्सने श्रमाचे शारिरीक व बौध्दीक श्रम असे प्रकार करुन सिद्धांताचे स्पष्टीकरण करणे आवश्यक होते. परंतु त्याचा विचार केलेला नाही अशी टीका केली जाते.

**७) संयोजकाच्या कार्याकडे दुर्लक्ष :** कोणत्याही उत्पादनाच्या क्रियेमध्ये संयोजकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. तोच उत्पादन घटकांना एकत्र करुन उत्पादन घेण्याचे कार्य करतो आणि त्याच्या कार्याचा मोबदला म्हणून त्याला नफा प्राप्त होतो या विचारांकडे हा सिद्धांत दुर्लक्ष करतो.

**८) आधुनिक तंत्रज्ञानामधील नफ्याच्या निर्मितीचे स्पष्टीकरण नाही :** अनेक उद्योगांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात असताना कामगार संख्या कमी करुन देखील नफ्याचे प्रमाण का वाढते याचे स्पष्टीकरण हा सिद्धांत देत नाही

**९) उद्योग तोट्यात का जातो याचे स्पष्टीकरण नाही :** मंदीच्या कालखंडामध्ये अनेक उद्योग खर्चापेक्षा कमी किंमत झाल्याने बंद करावे लागतात. त्यावेळेस भांडवलदाराला प्रचंड नुकसान सहन करावे लागते याचा विचार या सिद्धांतामध्ये केलेला नाही.

अशा स्वरुपाचे दोष या सिद्धांतामध्ये दिसून येतात असे असले तरी देखील भांडवलशाही राष्ट्रांमधील मूलभूत दोष कोणकोणते आहेत, त्यांची निर्मिती का होते, त्याला कोणते घटक कारणीभूत ठरतात, त्याचे परिणाम काय होवू शकतात याबाबतचे विचार सर्वप्रथम मांडण्याचे व ते जगासमोर आणण्याचे कार्ल मार्क्स यांनी केलेले आहे. साम्यवादाचे समर्थन करताना या व्यवस्थेत मालक-कामगार, गरीब- श्रीमंत असा वर्ग संघर्ष नसतो, मालक वर्ग कामगारांचे शोषण करीत नाही असे मत व्यक्त केले. आजच्या भांडवलशाही राष्ट्राचा विचार करता वरील दोष त्या राष्ट्रांमध्ये असल्याचे दिसून येते म्हणूनच त्याचे विचार हे सर्वश्रेष्ठ ठरतात.

### ४.२.४ नफ्याच्या दरामधील घट (Falling Rate of Profit) :

भांडवलशाही अर्थव्यवस्थांचा विकास हा नफ्याच्या दरावर आधारलेला असतो. जेव्हा नफ्याचा दर अधिक असतो तेव्हा भांडवलदार मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करतात, त्यामधून उत्पादन-उत्पादकता-रोजगार-विकासाचा वेग यामध्ये गुणक पध्दतीने वाढ घडून येते. याउलट नफ्याचा दर घटत असताना यासर्व घटकांमध्ये घट होत जाऊन अर्थव्यवस्थेमध्ये नैराश्येचे वातावरण निर्माण होते. मार्क्स यांनी आपले आर्थिक विचार स्पष्ट करताना नफ्याचा दर आणि अतिरिक्त मूल्याचा दर यामध्ये फरक करुन नफ्याच्या दरावर परिणाम करणारे घटक कोणते आहेत, तो कमी

का होत जातो याबाबतचे विश्लेषण दिलेले आहे.

**नफ्याचा दर (Rate of Profit) :**

एकूण भांडवल आणि अतिरिक्त मूल्य यामध्ये असणारे प्रमाण म्हणजे नफ्याचा दर होय.

$$\text{सूत्र : नफ्याचा दर} = \frac{\text{अतिरिक्त मूल्य}}{\text{एकूण भांडवल}} \times १००$$

एकूण भांडवलामध्ये स्थिर भांडवल तसेच बदलते भांडवल यांचा समावेश होत असतो तेच सूत्र रुपाने--

एकूण भांडवल = स्थिर भांडवल + बदलते भांडवल.

म्हणून

$$\text{नफ्याचा दर} = \frac{\text{अतिरिक्त मूल्य}}{\text{स्थिर भांडवल + बदलते भांडवल}} \times १००$$

जर अतिरिक्त मूल्य २५ रुपये.

स्थिर भांडवल ६० रुपये.

बदलते भांडवल ५० रुपये असेल तर.

$$\text{नफ्याचा दर} = \frac{२५}{६० + ५०} \times १०० = \frac{२५}{११०} \times १०० = २२.७२ \%$$

नफ्याचा दर हा एकूण भांडवलाच्या २२.७२% आहे.

**नफ्याच्या दरामध्ये घट :**

कार्ल मार्क्स यांनी आपल्या आर्थिक विचारांमध्ये स्पष्ट केले की, भांडवलशाही अर्थव्यवस्थांचा विकास होत असताना एकूण भांडवलामधील स्थिर भांडवलाचे प्रमाण वाढत जाते व त्याच्या तुलनेत बदलते भांडवल कमी राहील्याने प्राप्त होणाऱ्या दरामध्ये घट होते. समजा वरील उदाहरणामध्ये नफ्याचा दर २२.७२% आहे. अशा अवस्थेत अर्थव्यवस्थेचा विकास झाला व एकूण भांडवलातील स्थिर भांडवल ९० रुपयांपर्यंत वाढले, बदलते भांडवल ५० रुपये आणि अतिरिक्त मूल्य २५ रुपये असेल तर नफ्याच्या दरामध्ये काय बदल होईल ते पुढील सूत्रावरुन स्पष्ट होते.

$$\text{नफ्याचा दर} = \frac{२५}{९० + ५०} \times १०० \quad \frac{२५}{१४०} \times १०० = १७.८५ \%$$

म्हणजेच मार्क्स यांच्या स्पष्टीकरणाप्रमाणे भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील आर्थिक विकासाबरोबर स्थिर भांडवलाचे प्रमाण वाढत गेले, परंतु बदलते भांडवल न वाढल्याने अतिरिक्त मूल्य आहे तेच राहीले व नफ्याचा जो दर २२.७२ % होता, तो १७.८५%पर्यंत कमी झाला. याप्रमाणे नफ्याचा दर घटत जातो असे स्पष्टीकरण मार्क्स यांनी दिलेले आहे.

**नफ्याचा दर घटण्याची कारणे :**

मार्क्स यांच्या विचारांप्रमाणे भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये नफ्याचा दर घटण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

**१) आर्थिक विकास :** कार्ल मार्क्स यांनी स्पष्ट केले की आर्थिक विकासाबरोबर स्थिर भांडवल व बदलते भांडवल यामधील प्रमाण बदलते. बदलत्या भांडवलाच्या तुलनेत स्थिर भांडवलाचा अधिक वापर केला जातो व त्यामधून नफ्याचा दर घटतो.

**२) भांडवलाची उपलब्धता :** आर्थिक विकासाबरोबर अर्थव्यवस्थेमध्ये भांडवलाची उपलब्धता वाढत जाते व वाढत्या भांडवलाचा वापर उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणात होतो. श्रमिकांशी भांडवलाचे असणारे प्रमाण वाढल्याने नफ्याचा दर कमी राहतो.

**३) तांत्रिक प्रगती :** आर्थिक प्रगतीबरोबर अशा देशांमध्ये तांत्रिक प्रगती घडून येते. त्यामधून नवीन यंत्रांचा शोध लागतो. त्यांचा वापर अर्थव्यवस्थेमध्ये सुरु होतो. यंत्राचा समावेश स्थिर भांडवलामध्ये होत असल्याने एकूण भांडवलातील स्थिर भांडवलाचे प्रमाण वाढल्याने नफ्याचा दर घटत जातो.

**४) जलद गतीने उत्पादन :** भांडवलाशाही देशांमधील उत्पादक वाढत्या मागणीची पूर्तता करता यावी यासाठी आधुनिक यंत्रसामग्री, तंत्रज्ञानाचा वापर करतात. त्यामधून स्थिर भांडवलाचे प्रमाण वाढते. बदलते भांडवल म्हणजेच श्रम आहे तेवढेच असल्याने अतिरिक्त मूल्यामध्ये वाढ होत नाही, कारण त्याची निर्मिती फक्त श्रमामधूनच होत असते. परिणामी नफ्याचा दर कमी होत जातो.

**नफ्याच्या दरातील घटीचे परीणाम :** वरील कारणांनी जर भांडवलशाही देशांमधील नफ्याचा दर कमी झाला तर त्याचे अर्थव्यवस्थेवर पुढील परिणाम होतात.

**१) कामगारांचे शोषण :** मालक वर्गाच्या नफ्याच्या दरात घट सुरु झाल्यास, त्याचा सर्वात पहिला परिणाम भोगावा लागतो तो कामगार वर्गाला त्यांचे विविध मार्गांनी शोषण सुरु होते.

**२) वेतन दरात कपात :** भांडवलदारांचा नफा कमी होत असताना ते कामगारांचे वेतनदर कमी करुन आपला नफा स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करतात.

**३) कामगारांच्या सोई –सवलती कमी करणे :** नफ्याचा दर घटत असल्यास भांडवलदार कामगारांच्या सोई–सवलतींवर जी रक्कम खर्च करत असतात त्यामध्ये घट करण्यास सुरुवात करतात.

**४) कामगार मागण्याकडे दुर्लक्ष :** कामगारांच्या सोई सवलतीमध्ये घट करण्याबरोबर भांडवलदारवर्ग

कामगारांच्या योग्य असणाऱ्या मागण्यांकडेही दुर्लक्ष करण्यास सुरुवात करतो.

**५) कामगार कपातीचे धोरण :** यंत्रांच्या वापरामधून भांडवलदारांच्या नफ्याचे प्रमाण कमी झाल्याने ते नवीन कामगारांची भरती न करता, आहे त्या कामगारांच्या कपातीचे धोरण राबवितात. त्यामधून बेकारांची संख्या वाढत जाते व बेकारांची जी सेना निर्माण होते त्यास मार्क्स राखीव कामगार दल असे म्हणतो. (Industrial Reserve Army) असे म्हणतो.

नफ्याच्या दराच्या घटीबरोबरच, यांत्रिकीकरणाचे वाढते प्रमाण, लघु-कुटीरोद्योगांचा ऱ्हास या कारणांनी बेकारांचे प्रमाण वाढते, वेतनाचे दर कमी होतात, उदरनिर्वाहा इतपत देखील वेतन मिळू शकत नाही.

**६) कामगार-मालक संघर्ष :** कामगारांच्या मागण्यांकडे केलेले दुर्लक्ष, कामगार व वेतन कपातीचे धोरण यामधून कामगार व मालक यांच्यामध्ये संघर्ष निर्माण होतो त्यामधून औद्योगिक अशांतता निर्माण होते.

**७) आर्थिक मंदी :** नफ्याच्या घटत्या दरामधून कामगार कपात, वेतनदर कपात, बेकारांच्या संख्येमध्ये वाढ यासारखे जे बदल घडून येतात त्यामधून ते अर्थव्यवस्थेला आर्थिक मंदीच्या दिशेने घेवून जातात.

**८) भांडवलशाहीच्या अस्तित्वाला धोका :** अर्थव्यवस्थेमध्ये कामगार-मालक संघर्ष, औद्योगिक अशांतता यासारख्या कारणांनी क्रांतीकारक बदल घडून येतात व भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे अस्तित्वच धोक्यात येते. म्हणूनच कार्ल मार्क्स म्हणतो भांडवलशाही राष्ट्रांच्या प्रगतीमध्येच तिच्या विनाशाची बीजे रोवली गेली आहेत.

## ४.३ सारांश :

रशियन क्रांतीनंतर जेव्हा रशियामध्ये साम्यवाद अस्तित्वात आला तेव्हा खऱ्या अर्थाने मार्क्सच्या शास्त्रीय साम्यवादाच्या विचारांवर संशोधन सुरु झाले. समाजवादाच्या निर्मितीबाबत कार्ल मार्क्स व त्यांच्या अनुयायांनी जे विचार मांडले त्यालाच शास्त्रीय समाजवाद असे मानले जाते. त्यांच्या साम्यवादाच्या विचारांनी जगाचे लक्ष वेधून घेतले. मार्क्सवाद प्रत्यक्षात अस्तित्वात येतोय की काय असे विचार मांडले गेले. परंतु साम्यवादी रशियाचे विघटन झाल्यानंतर मार्क्स यांच्या विचारांचा प्रभाव काहीसा कमी झाल्याचे दिसून येत आहे. असे असले तरी त्यांनी भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे जे दोष स्पष्ट केलेले आहेत ते आजही प्रत्ययास येत आहेत. कार्ल मार्क्स यांनी आर्थिक विकासाची संकल्पना स्पष्ट करताना विरोध विकासाधिष्ठित भौतिकवादाच्या संकल्पनेचा आधार घेतला आहे. त्याने विकासाधिष्ठित भौतिकवादामधील भौतिकवादाची संकल्पना फ्रेंच शास्त्रज्ञांकडून घेतली तर विरोध विकासाची संकल्पना हेगेल यांच्या लिखाणातून घेतली आहे. म्हणजेच मार्क्स यांच्या लिखाणावर हेगेल यांच्या विरोध विकासाच्या संकल्पनेचा प्रभाव दिसून येतो. असे असले तरी हेगलच्या विचारांमधील दोष कमी करण्याचा प्रयत्न मार्क्स यांनी केला. हेगेल यांचे विरोध विकासाबाबतचे विचार डोक्यावर उभे अशा उलट अवस्थेत होते.

मार्क्स यांच्या मते विश्वामध्ये ज्या काही क्रांत्या घडून आल्या त्यांचे महत्त्वाचे कारण उत्पादन साधनांची मालकी हेच आहे. अर्थव्यवस्थेमधील सर्व बदल हे उत्पादन साधनांमध्ये घडून आलेले मालकी हक्कामधील परिवर्तनाने घडून आलेल्या आहेत. त्यांच्या या विचारांना मार्क्सचा आर्थिक भौतिकवाद असे म्हटले जाते. प्रत्येक वस्तूचे मूल्य हे त्या वस्तूमध्ये समाविष्ट असणाऱ्या श्रमावर ठरते. ज्या वस्तूंच्या निर्मितीसाठी कमी श्रम खर्ची पडते

त्याचे मूल्य कमी, अधिक श्रम खर्च असेल तर मूल्य देखील अधिक व समान खर्च झालेल्या वस्तूंचे मूल्य समान असते. मार्क्स यांच्या मते कोणत्याही वस्तूला जे मूल्य प्राप्त होते ते त्या वस्तूमध्ये समाविष्ट असणाऱ्या श्रमामूळेच. जेव्हा वस्तूविनिमय पध्दतीमध्ये एका वस्तूच्या मोबदल्यात दुसरी वस्तू दिली किंवा घेतली जाते तेव्हा त्या दोन्ही वस्तूंच्या उत्पादनासाठी खर्ची पडलेले श्रम समान असते.

कार्ल मार्क्स यांनी वस्तूच्या मूल्यनिश्चितीच्या सिद्धांतानंतर अतिरिक्त मूल्याबाबतचे विचार स्पष्ट केलेले आहेत. त्यांच्या मते भांडवलशाही राष्ट्रांमध्ये ज्याकाही अनेक समस्या आहेत त्यामध्ये अतिरिक्त मूल्याची निर्मिती व त्यामाध्यमातून श्रमिकांचे होणारे शोषण ही अतिशय गंभीर समस्या आहे. भांडवलदारांकडून केली जाणारी अतिरिक्त मूल्यनिर्मिती अनेक समस्यांच्या निर्मितीला कारणीभूत ठरत असते, आणि त्यामधूनच भांडवलशाहीचे अस्तित्व धोक्यात येवू शकते, असे मत कार्ल मार्क्स यांनी व्यक्त केले. भांडवलशाहीतील कामगारांचे आर्थिक शोषण, पिळवणूक यामधून कामगार-मालक, गरीब-श्रीमंत असा वर्ग संघर्ष निर्माण झाल्याने भांडवलशाहीचे अस्तित्व नष्ट होऊन जगामध्ये साम्यवाद अस्तित्वात येईल असे जे भाकीत केले ते अतिरिक्त मूल्याच्या विचारांमधून पुढे आलेले आहे. भांडवलशाही राष्ट्रांमधील मूलभूत दोष कोणकोणते आहेत, त्यांची निर्मिती का होते, त्याला कोणते घटक कारणीभूत ठरतात, त्याचे परिणाम काय होवू शकतात याबाबतचे विचार सर्वप्रथम मांडण्याचे व ते जगासमोर आणण्याचे कार्य मार्क्स यांनी केलेले आहे. साम्यवादाचे समर्थन करताना या व्यवस्थेत मालक-कामगार, गरीब-श्रीमंत असा वर्ग संघर्ष नसतो, मालक वर्ग कामगारांचे शोषण करीत नाही असे मत व्यक्त केले. आजच्या भांडवलशाही राष्ट्राचा विचार करता वरील दोष त्या राष्ट्रांमध्ये असल्याचे दिसून येते म्हणूनच त्याचे विचार हे सर्वश्रेष्ठ ठरतात.

**४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

**खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) कार्ल मार्क्स यांचा जन्म .................... रोजी झाला.

अ. १६ ऑगस्ट १७९० ब. ६ ऑगस्ट १७८९ क. ६ ऑगस्ट १७८९ ड. १६ ऑगस्ट १७८९

२) सन .............. मध्ये कार्ल मार्क्स यांनी The Poverty of Philosophy हा ग्रंथ लिहला.

अ. १८५७ ब. १८४७ क. १८५० ड. १८५५

३) कार्ल मार्क्स यांनी Communist Manifesto हा साम्यवादी विचारांचा ग्रंथ ...... च्या मदतीने लिहिला.

अ. एंजल्स ब. फ्रेडरिक लिस्ट क. ॲडम स्मिथ ड. रिकार्डो

४) भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील दोष नाहीसे करण्यासाठी ...... अर्थव्यवस्थेचा उगम झाला..

अ. खुल्या ब. समाजवादी क. मुक्त ड. यापैकी नाही

५) ...... ही समाजवादी अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये आहेत.

अ. हस्तक्षेप धोरण ब. आर्थिक समता क. वर्गविरहीत समाज रचना ड. वरील सर्व

६) कार्ल मार्क्सचे नांव शास्त्रीय समाजवादाशी जोडले जाते. तसेच ...... यांनीही शास्त्रीय समाजवादाचा पुरस्कार केला होता.

अ. रॉबर्टसन ब. लॅसाली क. अ आणि ब दोन्ही ड. यापैकी नाही

७) कार्ल मार्क्स याच्या मते वस्तूंला जे मूल्य प्राप्त झालेले असते ते त्या वस्तूमध्ये समाविष्ट असणाऱ्या ...... वरुन प्राप्त झालेले असते.

अ. श्रममूल्य ब. भांडवल क. कच्चा माल ड. यापैकी नाही

८) वस्तूच्या उपभोगापासून जी उपयोगिता प्राप्त होते तिला मार्क्स ..... मूल्य असे म्हणतो.

अ. विनिमय ब. उपयोगिता क. अतिरिक्त ड. यापैकी नाही

९) वस्तूच्या देवाण-घेवाणीतून जे मूल्य प्राप्त होते त्यास ..... मूल्य असे म्हणतात.

अ. विनिमय ब. उपयोगिता क. अतिरिक्त ड. यापैकी नाही

१०) कामगारांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंना बाजारपेठेमध्ये प्राप्त झालेले मूल्य व कामगाराला प्रत्यक्षात प्राप्त झालेले वेतन या दोहोतील तफावत म्हणजे ...... मूल्य होय.

अ. विनिमय ब. उपयोगिता क. अतिरिक्त ड. यापैकी नाही

११) आवश्यक श्रम व अतिरिक्त श्रम या दोहोमध्ये असणारे प्रमाण म्हणजे .......... दर होय..

अ. अतिरिक्त मूल्याचा ब. शोषणाचा क. अ आणि ब दोन्ही ड. यापैकी नाही

**४.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्नाची उत्तरे :**

१) क. ६ ऑगस्ट १७८९

२) ब. १८४७

३) अ. एंजल्स

४) ब. समाजवादी

५) ड. वरील सर्व

६) क. अ आणि ब दोन्ही

७) अ. श्रममूल्य

८) ब. उपयोगिता

९)    अ. विनिमय

१०)  क. अतिरिक्त

११)  क. अ आणि ब दोन्ही

**४.६ पारिभाषिक शब्द :**

**१. विकासाधिष्ठित भौतिकवाद :** हेगेल यांच्या विचारामधील विकास संकल्पनेच्या आधारे भौतिक विश्वामध्ये कशा स्वरुपाचे बदल घडून येतात याचे स्पष्टीकरण मार्क्सने दिल्याने त्याच्या या विचारांना विकासाधिष्ठित भौतिकवाद असे म्हटले जाते.

**२. ऐतिहासिक भौतिकवाद :** कार्ल मार्क्स यांनी अर्थव्यवस्थेचा विकास होत असताना समाज विविध अवस्थामधून कसा विकास साध्य करत राहतो याबाबतचे विचार संशोधनाच्या आधारावर मांडले त्यालाच मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद असे म्हणतात.

**३. आर्थिक भौतिकवाद :** अर्थव्यवस्थेमध्ये कार्यरत असणारे आर्थिक प्रवाह हेच आर्थिक विकास घडवून आणण्यास कारणीभूत ठरत असतात असा जो विचार मांडला त्यालाच मार्क्सचा आर्थिक भौतिकवाद असे म्हटले जाते.

**४. उपयोगिता मूल्य :** वस्तूच्या उपभोगापासून जी उपयोगिता प्राप्त होते तिला मार्क्स उपयोगिता मूल्य असे म्हणतो.

**५. विनिमय मूल्य :** वस्तूच्या देवाण-घेवाणीतून जे मूल्य प्राप्त होते त्यास विनिमय मूल्य असे म्हणतात.

**६. वर्तमानातील श्रमखर्च :** वस्तूच्या उत्पादनासाठी ज्या मानवी श्रमाचा वापर केला जातो त्याचा समावेश वर्तमानातील श्रमखर्चामध्ये केला जातो.

७. वस्तूंच्या उत्पादनासाठी ज्या काही भांडवली वस्तू किंवा यंत्रसामग्रीचा वापर केला जातो त्याचा समावेश भूतकालीन श्रमखर्चामध्ये करावा असे मार्क्सनी स्पष्ट केले आहे.

**८. अतिरिक्त मूल्य :** कामगारांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंना बाजारपेठेमध्ये प्राप्त झालेले मूल्य व कामगाराला प्रत्यक्षात प्राप्त झालेले वेतन या दोहोतील तफावत म्हणजे अतिरिक्त मूल्य होय.

**९. निर्वाह श्रम :** एकमेव वस्तूच्या उत्पादनाचा घटक असल्याने त्याला दिल्या जाणाऱ्या वेतनाच्या निर्मितीसाठी जवढे श्रम करणे गरजेचे आहे त्याला आवश्यक श्रम असे म्हणतात. यालाच निर्वाह श्रम असेही म्हणतात.

**१०. अतिरिक्त श्रम :** श्रमिकाला प्राप्त होणाऱ्या वेतनापेक्षा तो जे अधिकचे  श्रमखर्च  करतो त्याला अतिरिक्त श्रम असे म्हणतात.

**११. स्थिर भांडवल :** यामध्ये त्यांनी कच्चामाल, यंत्रसामग्री, भांडवली वस्तू यांचा समावेश केला. उत्पादन क्रियेमध्ये स्थिर भांडवलाचे मूल्य बदलत नाही म्हणून ते अतिरिक्त मूल्याची निर्मिती करु शकत नाही असे मार्क्स म्हणतो.

**१२. बदलते भांडवल :** मार्क्स यांनी कामगारांच्या वेतनावर खर्च होणाऱ्या भांडवलाचा समावेश बदलत्या भांडवलामध्ये केला.

**१२. शोषणाचा दर :** मार्क्स यांनी जे भांडवलदार श्रमिकांचे शोषण करतात त्याची तीव्रता काय आहे याची कल्पना यावी यासाठी शोषणाचा दर ही संकल्पना मांडली.

**१३. नफ्याचा दर :** एकूण भांडवल आणि अतिरिक्त मूल्य यामध्ये असणारे प्रमाण म्हणजे नफ्याचा दर होय.

**४.७ सरावासाठी स्वाध्याय**

**प्रश्न १. टीपा लिहा**

१) समाजवादी विचारसरणीचे प्रकार

२) स्वप्नाळू समाजवाद

३) शास्त्रीय समाजवाद

४) नफ्याच्या दरामधील घट

५) राखीव कामगार दल

**प्रश्न २. पुढील प्रश्नाची सविस्तर चर्चा करा.**

१) मार्क्स यांच्या शास्त्रीय समाजवादाची चर्चा करा.

२) मार्क्स यांचा भौतिकवादी दृष्टीकोण स्पष्ट करा.

३) कार्ल मार्क्स यांचा मूल्य सिद्धांत स्पष्ट करा.

४) अतिरिक्त मूल्य सिद्धांताची सविस्तर चर्चा करा.

५) मार्क्सचा आर्थिक भौतिकवाद स्पष्ट करा.

**४.८ अधिक वाचनासाठी संदर्भ सूची :**

१. आर्थिक विचारांचा विकास - प्रा. विजय कवीमंडन, श्री मंगेश प्रकाशन, नागपुर

२. आर्थिक विचारांचा इतिहास - प्रा. ए. आर. रायखेलकर, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद

३. अर्थशास्त्रीय मतप्रणालींचा इतिहास - डॉ. श्री. वी. खांदेवाले, प्रा. सौ. अमरजा नेरूरकर

४. History of Economic Thoughts, H. L. Bhatia, Vikas Publication House, New Delhi.

५. Concise History of Economic Thoughts, by No Ghosh, Rama Ghosh.

***

# घटक : १
# नवसनातवादी आर्थिक विचार : आल्फ्रेड मार्शल
# Neo-Classical Economic Thought - Alfred Marshall


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ अभ्यास विषय

  १.२.१ मार्शलचे मूल्यविषयक विचार

  १.२.२ मार्शलची प्रातिनिधीक उद्योगसंस्थेची संकल्पना

  १.२.३ उपभोक्त्याचे संतोषाधिक्य

  १.२.४ मार्शलचे मागणीविषयक विचार

१.३ सारांश

१.४ संज्ञा / पारिभाषीक शब्द

१.५ स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

१.६ पुढील अभ्यासासाठी संदर्भ


**१.० उद्दिष्ट्ये :**

सदर घटकांच्या अभ्यासांती आपणास...

१) डॉ. मार्शल यांचे मूल्य विषयक विचार लक्षात येतील.

२) डॉ. मार्शल यांची प्रातिनिधिक उद्योग संस्थेची संकल्पना समजेल.

३) उत्पादन घटकांचा सांगोपांग अभ्यास करता येईल.

४) डॉ. मार्शल यांचे आभास खंड या संकल्पनेचे आकलन होईल.

५) डॉ. मार्शल यांचे आर्थिक विचारांच्या विकासातील योगदान पाहता येईल.

**१.१ प्रस्तावना :**

अर्थशास्त्रीय सिद्धांतात आर्थिक विचारांचे योगदान देणारे असंख्य अर्थशास्त्रज्ञ होऊन गेले प्रत्येकाने तत्कालीन कालखंडात अर्थशास्त्रीय विचारांचे खूप मोठे योगदान दिलं होते. त्या काळातील सर्वात प्रभावी

अर्थशास्त्रज्ञ म्हणून डॉ. अल्फ्रेड मार्शल यांच्या नावाचा उल्लेख केला जातो. मार्शल हे प्रसिद्ध ब्रिटिश अर्थतज्ञ व अर्थशास्त्रामध्ये नव सनातनवाद यांचे महत्त्वाचे पुरस्कर्ते होते. आर्थिक विचारांच्या इतिहासात मार्शलच्या आर्थिक योगदानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

मार्शल यांचा जन्म लंडनमधील एका उपनगरात २६ जुलै १८४२ मध्ये झाला. वडील बँक ऑफ इंग्लंडमध्ये रोखपाल म्हणून काम करत होते. डॉ. मार्शल यांचे गणितीय विषयात प्राविण्य असल्यामुळे ते पदवीधर होऊन अल्पावधीतच त्यांनी 'रँगलर' ही गणितातील सर्वोच्च पदवी केंब्रिज विद्यापीठातून संपादन केली. सुरुवातीस केंब्रिजमध्ये गणित विषयाच्या अध्यापनाच्या कार्याला सुरुवात करून त्यांची प्रख्यात तत्त्ववेत्ता हेन्री सिजविक यांच्याशी वैचारिक संबंध आला आणि त्यांच्या आग्रहामुळे ते कांट व हेगल या तत्त्ववेत्त्यांच्या तत्वज्ञानाचा अभ्यास करू लागले. स्पेन्सर, मिल व कुर्नो यांनी लिहिलेल्या ग्रंथसंपदाच्या वाचनातून त्यांच्या विचारांचा प्रभाव मार्शल यांच्या व्यक्तिमत्वावर झाला. डॉ.मार्शल यांनी गणिती विषयाबरोबर तत्वज्ञान व नीतिशास्त्र विषयाची आवड व वेगळी हातोटी प्राप्ती केली होती त्यामुळे त्यांचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोनावर या विषयांचा प्रभाव दिसून येतो.

मार्शल यांचा उदय होण्यापुर्वी सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ अर्थशास्त्राला पॉलिटिकल इकॉनॉमी म्हणत असत जे मार्शल यांनी ओळखून आपल्या द प्रिन्सिपल्स ऑफ इकॉनॉमिक्स या ग्रंथात अर्थशास्त्राचे वाढते महत्त्व ओळखून त्या शास्त्राला स्वतंत्र स्थान देण्याचा प्रयत्न केला आणि इकॉनॉमिक्स हा शब्द प्रथम योजिला.

अल्फ्रेड मार्शल यांनी असंख्य ग्रंथाची निर्मिती करून त्यापैकी इकॉनॉमिक्स ऑफ इंडस्ट्री,प्रिन्सिपल्स ऑफ इकॉनॉमिक्स व मनी क्रेडिट अँड कॉमर्स या लोकप्रिय ग्रंथांचा समावेश होता. तसेच सन १८९१ ते १८९४ या काळात 'कमिशन ऑन लेबर' या संस्थेचे सदस्यत्व स्वीकारून त्यांनी दिलेले योगदान वाखाणण्याजोगं होते. नंतरच्या काळात मार्शल यांनी केंब्रिज संप्रदायाची स्थापना केली.

### १.२ अभ्यास विषय :

अल्फ्रेड मार्शल हे नवसनातनवादी अर्थशास्त्रज्ञांच्या गटातील एक प्रमुख अर्थशास्त्रज्ञ म्हणून ओळखले जातात. अर्थशास्त्राला एक वैचारिक व आर्थिक प्रगल्भता प्रस्थापित करण्याचे श्रेय यांना दिले जाते. मार्शलच्या काळात कालांतराने जॉन स्ट्यूअर्ट मिल, डेव्हिड रिकार्डो व ॲडम स्मिथ या सारख्या नावाजलेल्या सनातनी अर्थशास्त्रज्ञांनी मांडलेल्या विचारांचे महत्व कमी होत होते. असंख्य अर्थशास्त्रज्ञानी सनातनवादी विचारसरणीतील दोष दाखवण्याचे काम केले मात्र डॉ. मार्शल यांनी सनातनवादी विचारांचा सखोल अभ्यास करून जुन्या व नवीन विचारांचा समन्वय साधण्याचे उत्तम कार्य केले. सदर घटकात मार्शल यांनी मांडलेल्या आर्थिक विचारांबाबत सविस्तर विवेचन केले आहे.

### १.२.१ मार्शलचे मूल्य विषयक समन्वयवादी विचार/मूल्य सिद्धांत (Theory of Value)

मार्शल यांनी मूल्यनिर्धारण क्षेत्रात केलेले काम कौतुकास्पद असून अर्थव्यवस्थेतील अनेक भागांच्या परस्पर संबंधाचा शोध घेताना मागणी, पुरवठा व मूल्यनिर्धारण याचे त्यांनी उत्कृष्ट पद्धतीने विवेचन केल्याचे आढळून

येते. मागणी या घटकाचा विचार करताना त्यांनी उपयोगिता, सीमांत उपयोगिता व घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत या संकल्पनांचा वापर केलेला दिसून येतो. तसेच पुरवठ्याचे पृथक्करण करताना उत्पादन फलांचे नियम, श्रमविभाजन व उत्पादन क्षेत्रातील संघटन कौशल्य यांचा उपयोग केला आहे. प्रस्तापित संकल्पनांचा आधार घेऊन मागणी व पुरवठा यामधील संतुलन सिद्धांत मांडला. मार्शलने पूर्वीच्या अर्थशास्त्रज्ञानी वस्तूचे मूल्य निश्चित करताना मागणी व पुरवठा या दोहोंचे महत्त्व ओळखले होते. असे असले तरी ऑस्ट्रियन संप्रदायाचा विल्यम स्टॅनले, जेव्हांस, कार्ल मेंगर आणि जॉन क्लार्क या अर्थशास्त्रज्ञांनी कोणत्याही वस्तूचे मूल्य तिच्या सीमांत उपयोगिता त्यामुळेच निश्चित होते असे मत मांडून मूल्य निर्धारनात मागणीला अधिक महत्त्व प्रदान केले. याउलट जॉन स्टुअर्ट मिल, डम स्मिथ व डेव्हिड रिकार्डो या सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी वस्तूच्या पुरवठ्यावर अधिक भर देऊन वस्तूचे मूल्य उत्पादन परीव्ययावर इतके असते असे व्यक्त केले. डॉ. मार्शल यांच्या मते दोन्ही सिद्धांत स्वतंत्रपणे व परिपूर्ण असले तरी ते एकांगी होते. त्यामुळे या दोहोत समन्वय साधून व्यक्तिनिष्ठ व वस्तुनिष्ठ या दोन्ही दृष्टीकोनातून मूल्य सिद्धांत मांडण्याचा प्रयत्न केला. मार्शलने आपले मूल्यविषयक विचार मांडताना पूर्ण स्पर्धा व उपयोगिता विवेचन या गोष्टी गृहीत मूल्य सिद्धांत त्यांनी मागणी व पुरवठा या दोन्ही बाजूंना समसमान महत्त्व दिले.

**मागणी–पुरवठा समन्वय :**

मार्शल यांनी वस्तूचे मूल्य निश्चित करताना वस्तूची सीमांत उपयोगिता व उत्पादन परिव्यय यांची सांगड घातली तसेच मागणी व पुरवठा या दोन्ही बाजूंना सारखेच महत्त्व दिले. त्यांनी ही बाब स्पष्ट करण्यासाठी काही उदाहरणाचा वापर केल्याचे स्पष्टपणे दिसून येते जसे की, मागणी व पुरवठा हे कात्रीच्या दोन्ही पात्याप्रमाणे असतात या दोन्ही पात्यांचा उपयोग एकाचवेळी करून कागद व कापड कापता येतो. तसेच दुसरे उदाहरण लक्षात घेतलं तर तोंडाच्या दोन जबड्यांची कार्ये एकदम सुरु केल्याशिवाय एखादा पदार्थ चावता येऊ शकत नाही. त्याचप्रमाणे किंमत निश्चितीसाठी मागणी व पुरवठा या दोन्ही घटकांमध्ये समन्वय असणे गरजेचं असते त्याशिवाय किंमत निश्चिती किंवा समतोल होऊ शकत नाही.

मार्शलने आपल्या मूल्य सिद्धांताचे विश्लेषण शास्त्रशुद्ध व सखोल करण्यासाठी वस्तूची मागणी व पुरवठा यासाठी कालावधीचे योगदान महत्त्वाचे मानले आहे. त्यासाठी मार्शलने कालखंडाचे किंवा कालावधीचे चार भागात वर्गीकरण करून अतिअल्पकाळ, अल्पकाळ, दीर्घकाळ व अतिदीर्घकाळ अशी विभागणी केली आहे त्याचे सखोल विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

**१) अत्यल्प काळ (Very Short Period) :**

मार्शलने आपल्या मूल्य सिद्धांतात असे मत प्रतिपादन केले आहे की, अत्यल्प काळ हा अतिशय अल्प कालावधीसाठी म्हणजेच काही तासांचा असू शकतो. यामध्ये उत्पादक व विक्रेत्याला वस्तूच्या पुरवठ्यात बदल घडवून आणणे किंवा वस्तूंचा पुरवठा वाढवणे अत्यंत कठीण असते. या अल्प काळात वस्तूचा पुरवठा हा जवळजवळ स्थिर /तटस्थ असतो. अशा परिस्थितीत वस्तूची किंमत ठरविताना पुरवठ्याची बाजू प्रभावी ठरत नाही त्यामुळे वस्तूची किंमत ही तिच्या मागणीवर निश्चित होत असते. जर वस्तूची मागणी वाढली तर किंमत वाढते याउलट वस्तूची मागणी कमी झाली तर वस्तूची किंमत कमी होते असे दिसून येते. थोडक्यात असे म्हणता

येईल की, अत्यल्प काळात वस्तूच्या मूल्य निर्धारना मध्ये मागणी या घटकाला अधिक महत्त्व असते.

**२) अल्पकाळ (Short Run)**

मार्शलच्या मते, अल्पकाळात उत्पादकाला पुरवठयात थोडाफार प्रमाणात बदल करता येणे शक्य असते या कालावधीत उत्पादनाच्या साहाय्याने जास्तीत जास्त पुरवठा करण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. म्हणजेच अल्पकाळात वस्तूच्या मागणी व पुरवठा यात समतोल प्रस्थापित होऊन जी किंमत निश्चित होते त्याला अल्पकालीन सर्वसाधारण किंमत म्हणतात.

**३) दीर्घकाळ (Very Long-run )**

दीर्घकाळात उत्पादक विक्रेता उत्पादन साधनात व यंत्रसामग्रीत बदल करून पुरवठ्यात वाढ घडवून आणू शकतो. मागणीप्रमाणे पुरवठा ही वाढ घडवून आणता येते म्हणजेच दीर्घ काळात वस्तूची मागणी व पुरवठा यांच्या समन्वयातून मूल्य निश्चित होते. अशा प्रकारे प्रस्थापित झालेल्या किंमतीला दीर्घकालीन सर्वसाधारण किंमत असे संबोधतात.

**४) अति दीर्घकाळ/प्रदीर्घकाळ (Very Long-run)**

मार्शलच्या मते अतिदीर्घकाळ हा खूप मोठा कालखंड असून तो साधारणतः ३० ते ४० वर्षाचा असू शकतो. त्या काळात फार मोठे बदल होण्याची शक्यता असते. यामध्ये लोकांच्या आवडी निवडी, लोकसंख्या, उत्पादन तंत्र, उत्पादन पद्धती, वस्तूची मागणी व पुरवठा यासारख्या अनेक घटकात बदल होऊ शकतात. या काळात वस्तूच्या पुरवठ्यात मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणणे शक्य असते या कालखंडात पुरवठ्यावर उत्पादन खर्चाचा प्रभाव असतो म्हणजेच वस्तूची अतिशय दीर्घकालीन किंमत ही त्याच्या दीर्घकालीन सरासरी खर्चा इतकी असते.

अशा रीतीने कालावधी जेवढा कमी तेवढे मागणीही प्रभावी ठरते आणि कालावधी जेवढा जास्त तेवढा पुरवठा प्रभावी ठरतो या पद्धतीने मार्शलने आपल्या मूल्य सिद्धांतात मागणी व पुरवठा बरोबरच कालावधीला ही अधिक महत्त्व देऊन हा सिद्धांत परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**मार्शलचे मुख्य खर्च व पूरक खर्चाविषयक विचार :**

अर्थशास्त्रात उत्पादन हा घटक विचारात घेतल्यास उत्पादन खर्चाचा विचार करावा लागतो. उत्पादन कार्यात सहाय्य करणाऱ्या विविध उत्पादन साधनावर जो खर्च करावा लागतो त्याला उत्पादन खर्च असे संबोधतात. थोडक्यात उत्पादन खर्च म्हणजे वस्तूची निर्मिती करण्यापासून ते उपभोक्त्यांच्या हातात ती वस्तू पोहोचण्याच्या प्रक्रियेपर्यंत जो खर्च येतो त्याला उत्पादन खर्च म्हणतात.

मार्शलने आपल्या आर्थिक विचारात उत्पादनविषयक विचारही मांडलेले आहेत. या उत्पादन विषयक विचारांनाही तितकेच महत्त्व प्राप्त झाले आहे. जितके महत्व मूल्य विषयक विचाराना आहे यासाठी त्याचे स्पष्टीकरण केले की, वस्तूच्या मूल्यामध्ये पुरवठ्याबरोबरच उत्पादन खर्चही महत्त्वाचा असतो. मार्शलने उत्पादन

खर्चाचे दोन प्रकारात विभागणी केली असून एक मुख्य खर्च व दुसरा खर्च हा पूरक असून त्याचे स्पष्टीकरण आपणास पुढील प्रमाणे देता येईल.

## १) मुख्य /बदलता खर्च :

जो खर्च उत्पादनात होणाऱ्या बदलानुसार बदलतो त्याला मुख्य खर्च किंवा बदलता खर्च म्हणतात. याचा अर्थ जर उत्पादकाने वस्तूच्या उत्पादनात वाढ घडवून आणण्याचे ठरविले असेल तर मुख्य खर्चामध्ये वाढ होते याउलट परिस्थितीत उत्पादकाने उत्पादन घटवण्याचे किंवा कमी करण्याचे ठरविले तर मुख्य खर्च कमी होतो. थोडक्यात वस्तूच्या उत्पादनामध्ये बदलत्या घटकावर होणारा खर्च हा मुख्य खर्च होय. यामध्ये श्रमिकांचे वेतन, कच्च्या मालावरील खर्च, इंधनावरील खर्च, विक्रीकर, उत्पादन कर व भांडवलावरील खर्च अशा सर्व घटकांचा समावेश होतो.

उत्पादनात होणाऱ्या वाढीबरोबर मुख्य खर्चही वाढतो; अल्पकाळात उत्पादक आपले उत्पादनविषयीचे निर्णय हे मुख्य खर्चाचा विचार करूनच घेत असतो असे मत मार्शलने प्रतिपादन केले आहे. उत्पादक नेहमीच किमान मुख्य खर्च भरून निघेल इतकी किंमत मिळत असेल तरच उत्पादन प्रक्रिया चालू ठेवतो; अन्यथा त्याला तोटा सहन करावा लागेल त्याऐवजी तो आपले उत्पादन बंद करणे पसंत करतो. याचा अर्थ अल्पकाळ विचारात घेतल्यास उत्पादक उत्पादनासंबंधी तसेच मूल्य विषयक धोरणामध्ये निर्णय घेताना मुख्य किंवा बदलता खर्च विचारात घेऊन अंतिम निर्णय घेत असतो यावरूनच मुख्य खर्चाचे उत्पादन प्रक्रियेत असलेले महत्त्व लक्षात येते.

## २) स्थिर अथवा पूरक खर्च :

अल्प काळामध्ये उत्पादनाची काही साधने ही स्थिर असतात तर काही साधने बदलत्या स्वरूपाची असतात त्यापैकी स्थिर साधनावर केला जाणारा खर्च म्हणजे स्थिर खर्च होय. स्थिर खर्चामध्ये भांडवलावरील व्याज, इमारतीचे भाडे, यंत्रसामग्री, देखभालीचा खर्च, व्यवसाय कर, कार्यालयीन खर्च, विम्याचे हप्ते, कर्जावरील व्याज अशा अनेक घटकांचा समावेश यामध्ये असतो. उद्योग संस्थेची उत्पादन चालू अथवा बंद असले तरी स्थिर खर्च करणे हे अपरिहार्य असते हे पूरक खर्चाचे एक वैशिष्ट्य आहे. स्थिर किंवा पूरक खर्चावरच उत्पादनाचे आकारमान अवलंबून असते. थोडक्यात, अल्पकाळ व दीर्घकाळ दोन्हीमध्ये पूरक खर्चाच्या संकल्पनेला अधिक महत्त्व प्राप्त झालेले आहे.

अशा प्रकारे मार्शल यांनी उत्पादन खर्चाचे मुख्य व पूरक खर्च अशी विभागणी करून मुख्य व पूरक खर्चाच्या संकल्पना स्पष्ट केल्या. या संकल्पनांचा वापर उत्पादक हा उत्पादन प्रक्रियेत करताना दिसतात. आजही या संकल्पना मार्गदर्शक ठरत आहेत. मार्शलच्या या संकल्पना अर्थशास्त्रात विविध विचारांच्या विकासाला चालना देण्याचं कार्य करताना दिसत आहेत त्यामुळे डॉ. मार्शल यांच्या या संकल्पना आर्थिक विचारांच्या इतिहासात उल्लेखनीय आहेत.

### १.२.२ डॉ.मार्शलची प्रातिनिधिक उद्योगसंस्थेची संकल्पना : ( The Concept of Representative Firm)

डॉ. अल्फ्रेड मार्शल यांनी आपल्या नव-अभिजात प्रतिमानात उद्योगसंस्था, उद्योग व बाजार यांची पद्धतशीर व सैद्धांतिक मांडणी केली आहे.त्यांच्या मते, उद्योग संस्था या गतिशिल असून त्या कायमस्वरूपी असमतोल अनुभवणाऱ्या असतात.यासाठी मार्शल यांनी उत्पादनाविषयी चर्चा करताना सर्व उद्योगसंस्थांचे प्रतिनिधित्व करणारी प्रतिनिधी उद्योग संस्था ही संकल्पना मांडली. खरे म्हणजे अर्थशास्त्रात प्रथमच पर्याप्त उद्योगसंस्थेची संकल्पना मांडण्याचे श्रेय मार्शल यांना जाते. मार्शल यांनी या सिद्धांतामध्ये उत्पादन खर्च या घटकाला आत्यंतिक महत्त्व दिल्याचे दिसते. त्यांच्या मते, दीर्घकाळात वस्तूची किंमत ही तिच्या सरासरी उत्पादन खर्चावर अवलंबून असते. उद्योगधंदे वाढत असताना काही उद्योग संस्था नवीन प्रस्थापित होतात;काहींची वाढ होताना दिसते; तर काही उद्योगसंस्था बंद पडण्याच्या मार्गावर असतात या निरनिराळ्या उद्योग संस्थांचा उत्पादन खर्च निरनिराळा असतो. दीर्घ काळाचा विचार केला असता कोणती उद्योग संस्था ही अधिक कार्यक्षम आहे या प्रश्नाचे उत्तर मार्शल यांनी पर्याप्त उद्योग संस्था ही संकल्पना मांडून पूर्णत्वास आणली.

एखाद्या विशिष्ट उद्योग संस्थेच्या खर्चा इतकी बाजारातील दीर्घकालीन समतोल किंमत असेल हे ठरविणे खूप कठीण असते. अत्यंत कार्यक्षम व उत्कृष्ट अशा उद्योग संस्थांच्या उत्पादन खर्चा बरोबर ती किंमत असेल असे म्हटले तर त्या उद्योगसंस्थेपेक्षा कमी कार्यक्षम उद्योगसंस्था बंद पडतील. जर कमी कार्यक्षम उद्योग संस्थांच्या उत्पादन खर्चाबरोबर ती किंमत निश्चित होत असेल असे मानले तर सर्वच उद्योग संस्था या योग्य ठरतील. तसेच नवीन स्थापन झालेल्या उद्योगसंस्थाबाबत किमंतीविषयी सांगणे चुकीचे ठरेल. कारण काही उद्योग संस्था या बाजारात येऊ शकतात तर काही बंद पडू शकतात हे सर्व प्रश्न विचारात घेऊन मार्शल यांनी प्रातिनिधिक उद्योगसंस्था ही संकल्पना मांडली.

मार्शल यांनी प्रातिनिधीक उद्योग संस्थेच्या संकल्पनेमध्ये असे मत मांडले की, प्रचलित असणारे उत्पादनतंत्र व व्यवस्थापकीय कौशल्य विचारात घेऊन पूर्ण स्पर्धेच्या परिस्थितीमध्ये या उद्योग संस्थेचा सरासरी खर्च हा किमान असतो. त्यामुळेच अशी उद्योग संस्था दीर्घकाळापर्यंत स्थिर व यशस्वीपणे टिकून राहू शकते.

प्रातिनिधिक उद्योग संस्थेचा दीर्घकालीन सरासरी खर्च हा किमान पातळीवर असल्याने त्याला अंतर्गत व बाह्य फायदे किंवा लाभ प्राप्त होतात अंतर्गत लाभामध्ये १) तांत्रिक लाभ किंवा बचती २) भांडवल विषयक लाभ ३) मागणी विषयक लाभ ४) व्यवस्थापकीय लाभ ५) खरेदी-विक्री विषयक लाभ इ.फायदे प्राप्त होतात. तसेच स्थानिकीकीरण, विशेषीकरण , उपफल निर्मितीचे लाभ व संशोधनातून प्राप्त झालेले लाभ असे बाह्य लाभही प्राप्त होतात.

**टीका :**

मार्शल यांच्या प्रातिनिधिक उद्योग संस्थेच्या संकल्पनेवर अनेक अर्थशास्त्रज्ञानी टीका केलेली आढळते त्यामध्ये प्रा. पिगू व प्रा. रोबिन्सन यांचा समावेश होतो.

१) प्रा.पिगू : उत्पादन फलन व पूर्ण स्पर्धा असताना असा समतोल प्रस्थापित होत नाही.

२) प्रा. रोबिन्सन : प्रातिनिधिक उद्योग संस्थेची कल्पना स्पष्ट अव्यवहार्य असून तर्कशास्त्रदृष्ट्या चुकीचे आहे असे सांगितले.

आजच्या घडीला अपूर्ण स्पर्धा व घटते उत्पादन फल आढळून येत असल्याने या संकल्पने ऐवजी पर्याप्त उद्योग संस्थेची संकल्पना वापरली जाताना दिसते.

अशा असंख्य टीका होत असल्या तरी मार्शलच्या प्रतिनिधिक संकल्पनेचे महत्त्व व त्याची तीव्रता कमी होत नाही. मार्शलने मांडलेल्या उत्पादन विषयक विचारांमध्ये या संकल्पनेला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.

**मार्शलचे उत्पादन व संघटन विषयक विचार :**

मार्शल यांनी अर्थशास्त्रात दिलेल्या योगदानाला अनन्यसाधारण महत्व असून त्याने मांडलेल्या विविध विचारांमुळे अर्थशास्त्राला एक नवसंजीवनी व दिशा प्राप्त झाली आहे. आजच्या काळातील अर्थशास्त्रीय विचारवंतांना त्यांचे विचार हे मार्गदर्शक म्हणून उपयोगाचे होताना दिसत आहे.

उत्पादनाच्या घटकांचा विचार केला असता त्यामध्ये प्रमुख चार घटकांचा अंतर्भाव होतो. त्यामध्ये भूमी, श्रम, भांडवल व संयोजक हे घटक असतात. उत्पादन प्रक्रियेमध्ये या चार ही घटकांचे महत्त्व असून अल्फ्रेड मार्शल यांनी मांडलेल्या उत्पादन व संघटनविषयक विचारांमध्ये उत्पादनाचे प्रमुख तीन घटक असतात असे म्हटले आहे. त्या उत्पादन घटकांमध्ये भूमी, श्रम व भांडवल या घटकांचा समावेश केला. त्यांच्यामध्ये संयोजक किंवा संघटक हा उत्पादनाचा एक महत्त्वाचा घटक असला तरी त्याचा उत्पादनांमध्ये प्रत्यक्ष सहभाग दिसून येत नाही. त्यामुळे उत्पादनाच्या प्रक्रियेत भूमी, श्रम व भांडवल या घटकांचा समावेश होतो. तसेच या घटकांच्या कार्यक्षमतेवर व उत्पादकतेवर उत्पादनाचे कार्य अवलंबून असते. मार्शलच्या या विचारांमध्ये भूमी, श्रम व भांडवलाला दिल्या जाणाऱ्या मोबदल्याचा विचार केलेला आहे. त्याची सविस्तर मांडणी डॉ. मार्शल यांनी केली आहे.

**१) श्रम (Labour)**

उत्पादन प्रक्रियेत ज्या उत्पादन घटकांचा समावेश करण्यात येतो त्या उत्पादन घटकांना त्याचा त्याच्या उपयोगाबद्दल योग्य मोबदला दिला जातो. श्रम हा घटक उत्पादन प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक आहे त्यामुळे मार्शलच्या मते श्रम या घटकाला वेतनाच्या रूपात मोबदला दिला जातो. वेतन दर हे श्रमाला असलेली मागणी व पुरवठा यांच्यात संतुलन होऊन निश्चित होतो. श्रमाचा मोबदला देताना किमान वाजवी राहणीमान खर्च व सीमांत उत्पादकता या दोन घटकांचा विचार करून मोबदला द्यायला हवा असे मार्शल यांनी सांगितले. अशा प्रकारे श्रम या उत्पादन घटकाला दिला जाणारा मोबदला हा विविध स्वरूपातून देता येतो याचे विवेचन मार्शल यांनी या विचारातून व्यक्त केलेले आहे.

**भूमी : (Land)**

भूमी या उत्पादन घटकासाठी दिला जाणारा मोबदला याविषयी रिकार्डोने खंड सिद्धांत मांडला. त्यानुसार

भूमी या उत्पादन घटकाला खंड स्वरूपात मोबदला दिला जातो हे स्पष्ट केले. मात्र मार्शल यांनी रिकार्डोचा खंड सिद्धांत मान्य केला पण त्यांनी आभास खंडाची नवीन संकल्पना मांडली. त्यांच्यामते, भूमी व्यतिरिक्त इतर उत्पादन घटकांना अल्पकाळात सर्वसाधारण परिस्थितीत त्यांना मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा अधिकचे उत्पन्न म्हणजे आभास खंड होय. अलवचिक पुरवठ्यामुळे सर्व उत्पादन घटकांना आभास खंडाच्या स्वरूपात उत्पन्न मिळते.मार्शलच्या आभास खंड संकल्पनेतूनच खंडाचा आधुनिक सिद्धांत उदयास आल्याचे दिसून येते.

**भांडवल :**

उत्पादन घटकातील भांडवल हा घटक महत्त्वाचा मानला जातो. मार्शलने भांडवल या उत्पादन घटकांचे उत्पादन व्यवस्थेतील असलेले महत्त्व अधोरेखित केले. भांडवलाच्या वापराबद्दल जो मोबदला भांडवल मालकाला दिला जातो त्याला व्याज असे म्हणतात. भांडवलाला मिळणारा मोबदला हा देखील अनेक घटकावर अवलंबून असतो व भांडवलाची निर्मिती ही बचतीतून होत असते त्याबद्दल त्या भांडवल मालकास योग्य तो मोबदला व्याज रुपात मिळणे आवश्यक आहे. अल्पकाळाचा विचार केला असता व्याजदर हा भांडवलाची मागणी व पुरवठा यांच्या समतोलातून निश्चित होत असतो. तसेच दीर्घकाळात पैशाचा पुरवठा व गुंतवणुकीतून मिळणाऱ्या लाभाचा व्याजदरावर परिणाम होतो. त्यामुळे भांडवलाला व्याजाच्या स्वरूपात मोबदला प्राप्त होत असतो.

उत्पादनाच्या चार घटकांपैकी मार्शलने तीन घटकांना महत्त्व दिले असले तरी त्यांनी मांडलेल्या उत्पादनविषयक विचारात संघटक या घटकाची भूमिका महत्त्वाची असल्याचे दिसते अशाप्रकारे त्यांनी भूमी, श्रम व भांडवल या तीन उत्पादन घटकांच्या मोबदल्याविषयी सविस्तर स्पष्टीकरण करून त्यांचे महत्त्व विशद केले आहे. आधुनिक काळात या उत्पादन घटकांना अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त होते.

**मार्शलचे नफा विषयक विचार :**

मार्शलने आपल्या उत्पादन व संघटन विषयक विचारात भूमी,श्रम व भांडवल या उत्पादन घटकांचा समावेश केला परंतु, संयोजक या उत्पादन घटकाचा समावेश केला नसला तरी त्याला महत्त्वाचे स्थान दिल्याचे दिसून येते. ज्याप्रमाणे श्रमाला वेतन स्वरूपात भूमीला खंड व भांडवलाला व्याज स्वरूपात मोबदला द्यावा लागतो त्याचप्रमाणे संयोजकाला नफ्याच्या स्वरूपात मोबदला द्यावा लागतो. मार्शलने मांडलेल्या उत्पादन विषयक विचारात नफ्याचा समावेश केला आहे. मार्शल यांनी ही संकल्पना तीन प्रकारे स्पष्ट केलेली आहे संयोजकांच्या व्यवस्थापनाबद्दल दिला जाणारा मोबदला, त्याच्या संघटन कौशल्य बद्दल दिला जाणारा मोबदला व त्यांनी गुंतवलेल्या भांडवलासाठी दिला जाणारा मोबदला अशा तीन प्रकारच्या कार्याचा समावेश नफ्यामध्ये केला जातो.

मार्शलच्या मते, घटकाच्या कार्यकुशलतेवर नफा अवलंबून असतो. श्रम, भूमी व भांडवल या उत्पादन घटकांना एकत्रित आणून उत्पादनाचे उत्तम कार्य करीत असतो. यामध्ये या उत्पादन घटकांवर नियंत्रण ठेवणे, अंतिम निर्णय घेणे इत्यादी महत्त्वाची कार्ये संयोजक कौशल्याने पार पाडत असतो म्हणून त्याच्या श्रमाला कुशल श्रम मानले जाते. तसेच संयोजक हा उत्पादन व्यवस्थेत अनुकूल बदल घडवून आणण्याचे कार्य करत असतो आणि म्हणूनच मार्शलने असे म्हटले आहे की नफ्याचा आकार हा संघटकाच्या अंगी असलेल्या संघटन

कौशल्य या घटकाच्या मागणी-पुरवठा वरून ठरत असतो. अल्प काळामध्ये असे संघटन कौशल्य मागणीच्या मानाने कमी असते, त्यामुळे नफ्याचा आकार वाढून संघटकाला खंड स्वरूपात उत्पन्न मिळते. मार्शलने नफ्याविषयी विचारांमध्ये उत्पादन घटकांचे असलेले महत्वाची गुणवैशिष्ट्ये या विषयी सविस्तर उल्लेख केलेला आहे. ज्याचा उपयोग आधुनिक काळात होताना दिसतो अशा रीतीने मार्शलने आपले नफ्याविषयक विचार सविस्तरपणे प्रस्तुत केले आहे.

### १.२.३ उपभोक्त्याचे संतोषाधिक्य : (Consumer's Surplus)

नव-सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ डॉ. अल्फ्रेड मार्शल यांनी अर्थशास्त्रीय विचारांचे योगदान देत असताना असंख्य अर्थशास्त्रीय संकल्पनाची नव्याने भर घातली. त्यामध्ये प्रामुख्याने मूल्य सिद्धांत, लवचिकता, आभास खंड व उपभोक्त्याचे संतोषाधिक्य यासारख्या संकल्पनांनी अर्थशास्त्रीय सैद्धांतिक विकासाला चालना दिली.उपभोक्त्याचे संतोषाधिक्य ही संकल्पना अर्थशास्त्राच्या आर्थिक विश्लेषणात अत्यंत महत्त्वाची व पायाभूत मानली जाते. सर्वप्रथम १८४४ मध्ये फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ ड्यूपीट यांनी उपभोक्त्याचे संतोषाधिक्य ही संकल्पना मांडली. मात्र तत्कालीन काळात डॉ.अल्फ्रेड मार्शल यांनी ही संकल्पना शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडून उपभोक्त्याचे संतोषाधिक्य या संकल्पनेला आर्थिक विचार प्रवाहात अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त करून दिले. 'एखादा उपभोक्ता एखादी वस्तू खरेदी करण्यासाठी जास्तीत जास्त द्यावयास तयार असणारी किंमत व प्रत्यक्षात ज्या किमतीस ती वस्तू उपभोगत्यास मिळते ती किंमत या दोन्ही किंमतीतील फरकास उपभोक्त्याचे संतोषाधिक्य असे म्हणतात.'

### उपभोक्त्याच्या संतोषाधिक्याचा अर्थ :

उपभोक्त्याचे संतोषाधिक्य या संकल्पनेस आर्थिक विश्लेषणात खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. अल्फ्रेड मार्शल यांच्या मते, ''एखाद्या वस्तूच्या उपभोगाशिवाय राहण्यापेक्षा व्यक्ती त्या वस्तूसाठी अतिरिक्त किंमत देण्यास तयार होतो तेव्हा ती वस्तू त्या व्यक्तीस किती किंमतीला मिळाल्यामुळे व्यक्तीचा लाभ होतो त्याला उपभोक्त्याचे संतोषाधिक्य म्हणतात. उपभोक्ता एखादी वस्तू खरेदी करताना त्या वस्तूपासून मिळणाऱ्या उपयोगितेचा विचार करतो. ज्या वस्तूपासून अधिकाधिक उपयोगिता मिळते त्या वस्तूला अधिक किंमत देण्यास तयार होतो या वेळी उपभोकत्याने प्रत्यक्षात दिलेली किंमत व देण्यास तयार असलेली किंमत यामध्ये जो फरक असतो त्या फरकास उपभोक्त्याचे संतोषाधिक्य म्हणतात. पुढील उदाहरणावरून ही संकल्पना अधिक सुस्पष्ट होईल.

उदा. एखादा उपभोक्ता एका पाण्याची बाटली खरेदीसाठी रू. ३०/ देण्यास तयार आहे परंतु प्रत्यक्षात उपभोक्त्याला ती पाण्याची बाटली रू. १५/- या किंमतीस मिळाली. या ठिकाणी उपभोक्ता पाण्याच्या बाटलीसाठी द्यावयास तयार असलेली किंमत (रू. ३०/-) व प्रत्यक्षात द्यावे लागलेली किंमत (रू. १५/) यामध्ये रू. १५/- चा ( रू. ३०/ - रू. १५/-) फरक आहे. या ठिकाणी रू. १५/- हे त्या उपभोक्त्याचे संतोषाधिक्य आहे.

उपभोक्त्याचे संतोषाधिक्य ही संकल्पना घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांतावर अवलंबून असते. परंतु वस्तू खरेदी करताना उपभोक्ता वस्तूची किंमत उपयोगिता व पैशाची सीमांत उपयोगिता याची तुलना करीत असतो.

मार्शल यांनी ही संकल्पना मांडताना काही गृहिते गृहीत धरली आहेत ती पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतात.

**गृहीते :**

१) उपयोगिता ही पैशांमध्ये मोजता येते म्हणजेच त्याचे संख्यात्मक मापन करता येते.

२) विचारात घेतलेल्या कोणत्याही वस्तूसाठी पर्याय उपलब्ध नाही.

३) उपभोक्त्याच्या आवडी-निवडी उत्पन्न व सवयी बदलत नाहीत.


४) पैशाची सीमांत उपयोगिता ही स्थिर मानली आहे.

**उपभोक्त्याचे संतोषाधिक्य या संकल्पनेचे सविस्तर स्पष्टीकरण :**

उपभोक्त्याचे संतोषाधिक्य ही संकल्पना अत्यंत उत्तम पद्धतीने समजून घेण्यासाठी एका उदाहरणांचा वापर केला आहे. हे उदाहरण कोष्टक व आकृतीवरून योग्यरीत्या सुस्पष्ट करता येईल.

| अ.क्र. | उपभोगलेल्या सफरचंदाचे नग | सीमांत उपयोगिता = देऊ केलेली किमंत रू. | प्रत्यक्ष दिलेली किमंत रू. | उपभोक्त्याचे संतोषाधिक्य |
|---|---|---|---|---|
| १ | १ | ५० | १० | ४० |
| २ | २ | ४० | १० | ३० |
| ३ | ३ | ३० | १० | २० |
| ४ | ४ | २० | १० | १० |
| ५ | ५ | १० | १० | ०० |
| **एकूण =** | **१५** | **१५० =** | **५०** | **१००** |

वरील कोष्टकानुसार, समजा बाजारात एका सफरचंदाची किंमत रू. १०/- आहे आणि उपभोक्ता सफरचंदा साठी रू. ५०/ देण्यास तयार असतो. पण दुसऱ्सर नगासाठी मात्र रू. ४०/- देण्यास तयार असतो, तिसऱ्या नगासाठी रू. ३०/, चौथ्या नगासाठी रू.२०/-, तर पाचव्या नगासाठी रू. १०/- देण्यास तयार असतो. कारण ही संकल्पना घटत्या सीमांत उपयोगितेवर अवलंबून आहे. ५ व्या नगा पासून उपभोक्त्याला संतोषाधिक्य मिळत नाही कारण प्रत्यक्षात दिलेली किंमत व देण्यास तयार असणारी किंमत ही समान आहे. त्यामुळे त्याला पहिल्या १ ते ४ सफरचंदाच्या नगापासूनच संतोषाधिक्य प्राप्त होते. हीच बाब आकृतीच्या सहाय्याने पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते.




उपरोक्त आकृतीमध्ये अक्ष अक्षावर वस्तूची मागणी,अय अक्षावर वस्तूची किंमत व  सीमांत उपयोगिता दर्शवलेली आहे. वरील आकृतीमध्ये वस्तूची किंमत स्थिर मानली असून एखाद्या वस्तूसाठी उपभोक्ता जास्तीत जास्त 'अ ब क इ' इतकी किंमत देण्यास तयार आहे पण प्रत्यक्षात मात्र ती वस्तू त्याला 'अ ब क ड'या किमतीस मिळते याचा अर्थ 'ड क इ' हा त्रिकोण त्याचे संतोषाधिक्य दर्शवितो.

**उपभोक्त्याचे संतोषाधिक्याचे मापन करण्यासाठी पुढील सूत्राचा वापर करता येईल.**

**सूत्र :**

उपभोक्त्याचे संतोषाधिक्य = एकूण उपयोगिता - (वस्तूची किंमत - वस्तूचे नग)

उपभोक्त्याचे संतोषाधिक्य या संकल्पनेला आर्थिक विश्लेषणात आत्यंतिक महत्त्व आहे.परंतु या संकल्पनेवर अनेक टीकाकारांनी कठोर टीका केल्या आहेत त्या पुढील प्रमाणे आहेत.

**टीका :**

१) उपयोगिता ही पैशांमध्ये मोजता येणे अशक्य आहे.

२) एखाद्या वस्तूचे बाजारात अनेक पर्याय उपलब्ध असतात.

३) भविष्यात व्यक्तीचे उत्पन्न, त्याच्या आवडीनिवडी व सवयी बदलण्याच्या शक्यता नाकारता येत नाहीत.

४) पैशाचे मूल्य हे लवचिक असते त्यामुळे उपयोगीतीचे मापन पैशाच्या सहाय्याने करणे अवघड आहे.

५) कमी प्रतीच्या वस्तूंच्या म्हणजेच गिफेन वस्तूच्या बाबतीत या संकल्पनेचा विचार केलेला दिसून येत नाही.

६) वस्तूंची मागणी ही किंमती बरोबर अनेक घटकांवर अवलंबून असते मात्र या घटकाकडे या संकल्पनेत दुर्लक्ष झाल्याचे दिसते.

**महत्त्व :**

उपभोक्त्याचे संतोषाधिक्य या संकल्पनेवर अनेक टीका होत असल्या तरी आर्थिक विश्लेषणामध्ये या संकल्पनेला असलेले महत्त्व यामुळे कमी होत नाही.

१) एकाच देशातील दोन व्यक्तींच्या राहणीमानातील तुलना करण्यासाठी उपयोग होतो.

२) आंतरराष्ट्रीय व्यापारात आयातीमुळे उपभोक्त्याच्या संतोषाधिक्यावर होणाऱ्या परिणामांचे मूल्यमापन करण्यासाठी याचा विचार केला जातो.

३) सरकारला कर आकारणी व वस्तूची किंमत ठरविण्यासाठी उपयोग होतो.

४) कल्याणकारी अर्थशास्त्र नागरिकांचे महत्तम कल्याण साधण्यासाठी या संकल्पनेची मदत होते.

वरील सर्व गोष्टींचा विचार करता, उपभोक्त्याचे संतोषाधिक्य या संकल्पनेला अर्थशास्त्रात अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे त्यामुळे याचे सर्व श्रेय डॉ. अल्फ्रेड मार्शल यांना जाते हे सत्य मान्य करावे लागेल.

**१.२.४ मार्शलचे मागणीची विषयक विचार : (Marshal's Thought on Elasticity of Demand )**

मार्शल यांनी अर्थशास्त्र विषयात दिलेले योगदान अर्थशास्त्रीय विचारांच्या दृष्टीने अत्यंत कौतुकास्पद व उल्लेखनीय आहे. त्यांनी आपल्या कारकिर्दीत असंख्य अर्थशास्त्रीय संकल्पना मांडल्या आहेत. त्यापैकी मागणीची लवचिकता ही संकल्पना खूप महत्त्वाची असून अर्थशास्त्रीय विचारात त्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले आहे. मार्शलने मागणीच्या किंमत लवचिकतेची संकल्पना मांडली.

मागणीच्या नियमाप्रमाणे वस्तूची किंमत व मागणी यात व्यस्त संबंध असतो. मागणीचा नियम हा मागणीत होणारा गुणात्मक बदल दर्शवतो;किमतीत वाढ झाली तर मागणी अंकुचन पावते आणि किंमत कमी झाली तर मागणी वाढते पण एखाद्या वस्तूच्या किंमतीत किती प्रमाणात बदल झाला असता मागणी किती प्रमाणात बदल होतो हे मागणीच्या नियमातून स्पष्ट होत नाही. त्यामुळे मागणीचा नियम हा वस्तूची किंमत व मागणी यातील संख्यात्मक संबंध स्पष्ट करण्यासाठी अपुरा ठरतो म्हणूनच त्यांनी मागणीची लवचिकता ही संकल्पना मांडून त्यास मूर्त रूप दिले.

एखाद्या वस्तूची मागणी ही वस्तूची किंमत उपभोक्त्याचे उत्पन्न व इतर संबंधित वस्तूच्या किमती यावर अवलंबून असतात मार्शलने मागणीची लवचिकता या संकल्पने मधील 'मागणीची किंमत लवचिकता' ही संकल्पना विशेष महत्त्वाची मानली जाते पण त्या अगोदर मागणीची लवचिकता हा घटक अभ्यासने महत्त्वाचे ठरते.

**१.२.४.१ मागणीची लवचिकता :**

मार्शलच्या मते ज्या प्रमाणात किंमतीत किंचित घट होते त्यानुसार मागणी जास्त अथवा कमी प्रमाणात

वाढते तसेच ज्या प्रमाणात किमतीत वाढ होते त्यानुसार मागणी जास्त अथवा कमी प्रमाणात दिसते यालाच मागणीची लवचिकता असे म्हणतात. किमतीतील बदलामुळे मागणीत घडून येणाऱ्या बदलाचे प्रमाण म्हणजे मागणीची लवचिकता होय.

**मागणीच्या लवचिकतेचे प्रकार :**

ज्या घटकाचा प्रभाव पडून मागणीत बदल घडून येतो त्यावरून मागणीच्या लवचिकतेचे प्रमुख तीन प्रकार पडतात ते पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

१) मागणीची किंमत लवचिकता २) मागणीची उत्पन्न लवचिकता ३) मागणीची छेदक लवचिकता

१) मागणीची किंमत लवचिकता

**व्याख्या :**

१) मार्शलच्या मते, किंमतीत होणाऱ्या शेकडा बदलामुळे त्या वस्तूच्या मागणीत होणारा शेकडा बदल म्हणजे मागणीची किंमत लवचिकता होय.

२) किंमतीतील बदलाचा परिणाम म्हणून मागणीत घडून येणाऱ्या बदलांच्या संबंधाला मागणीची किंमत लवचिकता असे म्हणतात.

थोडक्यात, वस्तूंच्या किमतीत होणाऱ्या बदलामुळे त्या वस्तूच्या मागणीत जो बदल होतो त्या बदलाच्या प्रमाणास मागणीची किंमत लवचिकता असे म्हणतात. मागणीची किंमत लवचिकता सूत्ररुपाने पुढीलप्रमाणे मोजता येते.

**सूत्र :**

१) मागणीची किंमत लवचिकता = मागणीतील शेकडा बदल/ किमतीतील शेकडा बदल

२) मागणीची किंमत लवचिकता = मागणीतील प्रमाणशीर बदल/ किमतीतील प्रमाणशीर बदल

**उदाहरण :**

समजा एखाद्या वस्तूच्या किमतीत शेकडा १० ने घट झाल्यास त्या वस्तूची मागणी शेकडा २० ने वाढली.तर वरील सूत्राचा वापर करून मागणीची किंमत लवचिकता खालील प्रमाणे सांगता येईल.

**मागणीची किंमत लवचिकता =** मागणीतील शेकडा बदल/ किमतीतील शेकडा बदल

= २०/१०

= २

याठिकाणी मागणीची किंमत लवचिकता २ अशी आहे.

**किंमत लवचिकतेचे प्रकार :**

मार्शलने वस्तूची किंमत व मागणी यांच्यातील बदलाच्या तीव्रतेच्या आधारे मागणीच्या किंमत लवचिकतेचे प्रमुख ५ प्रकारात वर्गीकरण केले आहे. ते पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

**अ) पूर्ण लवचिक मागणी :**

किंमतीत अल्पसा किंवा मुळीच बदल न होता मागणी जेव्हा अनंत पटीने बदलत असेल तर त्यास पूर्ण लवचिक मागणी म्हणतात.

जेव्हा मागणीची लवचिकता अनंत असते तेव्हा मागणीचा वक्र अक्ष अक्षाला समांतर असतो.

उदा. सोने किंवा चांदी यासारख्या मौल्यवान वस्तूंच्या किंमतीत बदल न होता मागणी सतत वाढत असते.

**ब) पूर्ण अलवचिक मागणी :**

किंमतीत कितीही बदल झाला तरी मागणीत कोणताच बदल होत नाही तेव्हा त्यास संपूर्ण अलवचिक मागणी असे म्हणतात. या प्रकारच्या मागणीच्या लवचिकतेचे पूर्णपणे ताठर मागणी किंवा शून्य लवचिकता असेही म्हणतात.

उदा. वस्तूंच्या किंमतीत २० टक्यींच  नी घट झाली तर मागणीत कोणताच बदल होत नाही. जेव्हा मागणीची लवचिकता ताठर असते तेव्हा मागणी वक्र अय अक्षाला समांतर असतो.

**क) एकक लवचिक मागणी :**

जेव्हा वस्तूची किंमत आणि त्या वस्तूची मागणी यांच्यात एकसारखे बदल होतात तेव्हा मागणीची किंमत लवचिकता एक एवढी असते.

उदा. किंमतीत २०% नी घट झाली तर मागणीत ही २० % ने वाढ होते.

थोडक्यात, किंमतीतील वाढ व मागणीतील वाढ समान पातळीची असल्यामुळे मागणीची किंमत लवचिकता एक एवढीच असते.

**ड) जास्त लवचिक मागणी :**

किंमतीतील बदलाच्या प्रमाणापेक्षा मागणीतील बदलाचे प्रमाण जास्त असते तेव्हा त्यास जास्त लवचिक मागणी असे म्हणतात.

उदा. किंमतीत १० टक्यांनी घट केली असता मागणीत २० टक्क्यांनी वाढ होते.

**इ) कमी लवचिक मागणी :**

किंमतीतील बदलाच्या प्रमाणापेक्षा जेव्हा मागणीतील बदलाचे प्रमाण कमी असते तेव्हा त्यास कमी लवचिक मागणी असे म्हणतात.

उदा.  किंमतीत २०टक्के नी घट केली असता मागणी १० टक्क्यांनी वाढ होते.

अशा प्रकारे मागणीची किंमत लवचिकतेचे प्रकार दिसून येतात.

**२)   मागणीची उत्पन्न लवचिकता :**

उत्पन्नातील बदलाचा परिणाम म्हणून मागणी घडून येणाऱ्या बदलास मागणीची उत्पन्न लवचिकता असे म्हणतात.

मागणीच्या उत्पन्न लवचिकतेचे धन उत्पन्न लवचिकता, ऋण उत्पन्न लवचिकता व शुन्य उत्पन्न लवचिकता असे तीन प्रकार पडतात.

**सूत्र :**

मागणीची उत्पन्न लवचिकता = मागणीतील शेकडा बदल/ उत्पन्नातील शेकडा बदल

**३)   मागणीची छेदक/ अन्योन्य लवचिकता :**

एका वस्तूंच्या किंमतीतील बदलाचा परिणाम म्हणून अन्य वस्तूंच्या मागणीत घडून येणाऱ्या बदलास मागणीची छेदक/ अन्योन्य लवचिकता असे म्हणतात. यामध्ये दुसऱ्या वस्तूची किंमत ही स्थिर असते.

उदा. पर्यायी व पूरक वस्तू मागणीची छेदक लवचिकता व मागणीची तिरकस लवचिकता असे म्हटले जाते.

मागणीच्या छेदक लवचिकतेचे धन छेदक लवचिकता,ऋण छेदक लवचिकता व शून्य छेदक लवचिकता असे तीन प्रकार पडतात.

**सूत्र :**

कॉफीची छेदक लवचिकता = कॉफीच्या मागणीतील शेकडा बदल/ चहाच्या किंमतीतील शेकडा बदल

**पर्यायता लवचिकता :**

पर्यायता लवचिकता ही संकल्पना आधुनिक अर्थशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जाते अर्थशास्त्रीय विश्लेषणामध्ये या संकल्पनेचा वापर सर्रास केला जातो. एखाद्या वस्तूच्या किंमतीतील चढ-उतार याचा परिणाम त्याच्या पर्यायी वस्तूच्या मागणीत घडून येतो.

थोडक्यात, एखाद्या वस्तूच्या किंमतीत होणाऱ्या बदलाचे परिणाम हे त्या वस्तूच्या पर्यायी वस्तूच्या मागणीत जो बदल घडून येतो त्या बदलाच्या प्रमाणास पर्यायता लवचिकता म्हणतात.

**सूत्र :**

पर्यायता लवचिकता = दोन वस्तूंच्या खरेदी गुणोत्तरातील शेकडा बद्दल/ दोन वस्तूंच्या किंमत गुणोत्तरातील शेकडा बदल

उपभोग आणि मागणी यांचा विचार करताना मार्शल यांनी मांडलेली लवचिकतेची संकल्पना अर्थशास्त्रामध्ये


अतिशय महत्त्वाची मानली जाते. व्यावहारिक व तात्विकदृष्ट्या विचार करता त्याचे महत्त्व समजून येईल. लवचिकता या संकल्पनेचा शोध लावून मार्शल यांनी अर्थशास्त्राची मोठीच सेवा केली आहे असे केन्सने म्हटले आहे. उत्पादकांना नफा मिळवणे,शासनास करनीती ठरविणे, विदेशी व्यापार, सार्वजनिक सुविधा पुरविणे व उत्पादन घटकाचे मोबदला निश्चित करणे अशा अनेक क्षेत्रांमध्ये मागणीच्या लवचिकतेचा उपयोग केला जातो यावरून मागणीच्या लवचिकतेचे महत्त्व व व्याप्ती स्पष्ट होते.

### १.२.४.२ आभास खंड (Quasi Rent)

अर्थशास्त्रातील नव-सनातनवादी संप्रदायाचे प्रमुख, अत्यंत प्रभावी अर्थशास्त्रज्ञ व केंब्रिज संप्रदायाचे संस्थापक म्हणून ओळखले जाणारे अर्थशास्त्रज्ञ अल्फ्रेड मार्शल यांनी 'आभास खंड' ही संकल्पना मांडली. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी खंडाची संकल्पना फक्त भूमि या घटका पुरतीच मर्यादित ठेवली होती. मात्र नवसनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी खंड हे सर्व उत्पादन घटकांना लागू करता येते हे स्पष्ट केले. भूमी व्यतिरिक्त इतर उत्पादन घटकांना अल्पकाळामध्ये; सर्वसाधारण परिस्थितीमध्ये त्यांना मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा अधिक उत्पन्न मिळते यालाच मार्शल यांनी आभास खंड असे संबोधले आहे. मुळात आभास खंडाची संकल्पना ही दुर्मिळतेवर आधारलेली आहे.

अल्प काळामध्ये काही कारणामुळे एखाद्या घटकांच्या मागणीत अनपेक्षित वाढ झाल्यास त्याचा पुरवठा अलवचिक म्हणजेच त्यामध्ये तात्काळ वाढ करता येत नसल्यामुळे त्या घटकांना नेहमीपेक्षा अतिरिक्त उत्पन्न मिळते. अल्पकाळामध्ये मिळणाऱ्या या अतिरिक्त नफ्यालाच मार्शलने आभास खंड असे म्हटले आहे. रिकार्डोने प्रतिपादित खंड सिद्धांतानुसार खंड हा भूमी या घटकाला मिळणारा मोबदला होय. परंतु मार्शल व आधुनिक अर्थशास्त्रज्ञानी खंड हा अलवचिक व अपुऱ्या पुरवठ्यामुळे निर्माण होतो असे मत मांडले. खंड हा गुणवतेतील भेदामुळे निर्माण होतो हे रिकार्डोचे मत अमान्य केले. मार्शलच्या मते, ज्या उत्पादन घटकांचा मागणीपेक्षा पुरवठा अपुरा पडतो अशा सर्व उत्पादन घटकांना अधिकचे उत्पन्न प्राप्त होते त्यालाच आभास खंड म्हणतात.

जमिनीप्रमाणे इतर उत्पादन घटक विशिष्ट परिस्थितीत दुर्मिळ झाल्याने त्यांना खंड स्वरूपात उत्पन्न मिळते. भूमी आणि इतर उत्पादक घटक यामधील एक फरक म्हणजे भूमी हा घटक स्थिर असल्यामुळे त्याचा पुरवठा ही कायमस्वरूपी स्थिर असतो. तसेच अन्य उत्पादक घटक (श्रम, भांडवल व संयोजक) हे केवळ अल्प काळामध्ये स्थिर राहू शकतात. मात्र दीर्घकाळात पुरवठा वाढविणे शक्य असल्यामुळे भूमि या घटकाव्यतिरिक्त इतर उत्पादन घटकांचा पुरवठा हा मागणीनुसार वाढविता येतो. त्यामुळे दीर्घकाळात भूमी व्यतिरिक्त अन्य उत्पादन घटकांचा मागणीनुसार पुरवठा वाढल्यास अल्पकाळात मिळणारे आभास खंड हे अधिक उत्पन्न मिळवून देत नाही. भूमि या उत्पादन घटकाला मिळणारा खंड हा मोबदला कायमस्वरूपी असतो कारण या घटकांचा पुरवठा अल्पकाळात व दीर्घकाळात स्थिर किंवा अलवचिक असतो. पण इतर उत्पादन घटकांचा पुरवठा अलवचिक नसल्यामुळे त्यांना अल्पकाळातच आभास खंड मिळतो आणि तो तात्पुरत्या स्वरूपाचा असतो.




21

अल्फ्रेड मार्शल यांनी आभास खंड या संकल्पनेची मांडणी केली पण त्यांच्या या संकल्पनेत अस्पष्टता दिसून येते. त्यामुळे ही संकल्पना वेगवेगळ्या दृष्टिकोनातून मांडण्याचा प्रयत्न केला जातो. डॉ. मार्शल यांनी मांडलेली आभास खंडाची संकल्पना खालील आकृतीच्या सहाय्याने अधिक सुस्पष्ट करता येईल.

वरील आकृतीमध्ये अक्ष अक्षावर उत्पादन, अय अक्षावर किंमत दर्शविलेली आहे. वरील आकृतीमध्ये एका विशिष्ट उद्योग संस्थेचा विचार केलेला आहे असे आपण मानू, त्या उद्योग संस्थेचा सुरुवातीचा मागणी वक्र मप आहे. याठिकाणी सरासरी बदलता खर्च  क्ष स आहे.तर सरासरी स्थिर खर्च हा सन आहे. या स्थितीत किंमत किंवा सरासरी प्राप्ती ही क्ष र असल्यामुळे सरासरी बदलता खर्च क्ष स हा भरून निघतो. कारण सरासरी खर्चापेक्षा सरासरी प्राप्ती अधिक आहे तसेच अल्प काळामध्ये किमान बदलता खर्च भरून निघणे महत्त्वाचे असते त्यामुळे बदलत्या खर्चापेक्षा अधिकचे उत्पन्न म्हणजेच त्या उद्योगसंस्थेचा 'आभास खंड' होय.

वरील आकृतीमध्ये किंमत क्ष र (अम) असताना सरासरी बदलता खर्च(क्ष स) भरून निघतो व सरासरी सर इतके अधिकचे उत्पन्न उत्पादन संस्थेस प्राप्त होते हे अधिकचे उत्पन्न म्हणजेच आभास खंड होय. याठिकाणी हा स र सरासरी आभास खंड असून म र स क हा एकूण आभास खंड आहे. नंतरच्या काळात मागणी वाढली तर नवीन मागणी वक्र म२प२ असा होईल तर सरासरी बदलता खर्च क्ष २व असा असेल किंमत क्ष २अ ही सरासरी बदलत्या खर्चापेक्षा (क्ष २व) अ व एवढे जास्त असेल म्हणजेच मागणी वाढल्यानंतर अ व हा सरासरी आभास खंड असून म२अ व त इतका एकूण आभास खंड होईल.

अल्पकाळात मागणीप्रमाणे पुरवठा वाढविणे अशक्य असते त्यामुळे स्थिर उत्पादक घटकांना मिळणारे अधिकचे उत्पन्न म्हणजेच आभास खंड होय. हा आभास खंड दीर्घकाळात अस्तित्वात राहत नाही कारण दीर्घकाळात पुरवठा हा मागणीप्रमाणे वाढवता येतो म्हणजेच पुरवठा लवचिक होतो. तसेच दीर्घकाळात सर्व उत्पादन घटक हे बदलते असल्यामुळे उद्योग संस्थांना सरासरी उत्पादन खर्च एवढेच उत्पन्न प्राप्त होते.याचा अर्थ उत्पादन खर्चापेक्षा जास्त उत्पन्न न मिळाल्यामुळे दीर्घकाळामध्ये आभास खंड आढळून येत नाही.

आभास खंडाची संकल्पना अधिक समजून घेण्यासाठी एका उदाहरणाच्या सहाय्याने ती सुस्पष्ट करता येईल. समजा एका उद्योग संस्थेत कामगारांची मागणी वाढली असता अल्पकाळात मागणीप्रमाणे पुरवठा वाढवणे अशक्य असते अशावेळी कामगारांना पूर्वीच्या ३०० रुपये ऐवजी ५०० रुपये एवढा मोबदला देऊन त्यांच्याकडून काम करून घेतले जाते हा जो अतिरिक्त २०० रुपये एवढा मोबदला म्हणजेच हे जादाचे उत्पन्न होय यालाच आभास खंड म्हणता येईल. दीर्घकाळात मात्र कामगारांच्या पुरवठ्यात वाढ होऊ शकते त्यामुळे त्यांना पूर्वीच्या मोबदल्यात काम करावे लागेल त्यामुळे २०० रुपये अतिरिक्त मोबदला नाहीसा होतो.

**अर्थशास्त्रीय विचारांच्या विकासात मार्शलचे योगदान :**

अल्फ्रेड मार्शल यांनी अर्थशास्त्र विषयासाठी दिलेले योगदान कौतुकास्पद असून त्यांनी मांडलेल्या आर्थिक विचारावरून ते अधिक ठळकपणे स्पष्ट होते. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी मांडलेले विचार व व्यक्तिनिष्ठ अर्थशास्त्रीय विचार यांचा योग्य समन्वय साधून नवीन विचार प्रणाली त्यांनी विकसित केली. जगातील नावाजलेल्या प्रमुख अर्थशास्त्रज्ञामध्ये त्यांचा समावेश केला जातो. मार्शलने मूल्य सिद्धांत, प्रातिनिधिक उद्योगसंस्था, मागणीची लवचिकता, उपभोक्त्याचे संतोषाधिक्य, उत्पादन खर्चाच्या संकल्पना व आभास खंड याबाबत सखोल विवेचन करून आपले अर्थशास्त्रीय योगदान व महत्त्व स्पष्ट केले. आजच्या काळात व भविष्यातही त्यांच्या या सर्व संकल्पना व सिद्धांत अर्थशास्त्रीय विषयांना दिशादर्शक ठरतील याबाबत दुमत नाही.

डॉ. आल्फ्रेड मार्शल यांनी मांडलेल्या अनेक संकल्पना व सिद्धांताविषयी अनेक थोर अर्थतज्ज्ञांनी टीका केली असली तरीही त्यांचे अर्थशास्त्रीय विषयासाठी दिलेले योगदान व महत्त्व कमी होत नाही. सरतेशेवटी मार्शल यांनी नव-सनातनवादी विचारधारा मजबूत करण्याचे काम व आधुनिक अर्थशास्त्राला योग्य दिशा देण्याचे कार्य त्यांच्या या अर्थशास्त्रीय योगदानामुळे शक्य झाले आहे हे सत्य स्वीकारणे गरजेचे आहे. आज ही अल्फ्रेड मार्शल यांचे स्थान अर्थशास्त्र विचारांच्या इतिहासामध्ये अबाधित व अटल आहे.

**सारांश :**

मार्शल यांनी अल्पकाळ व दीर्घकाळाचा विचार करून आभास खंडाची संकल्पना मांडली. अलवचिक पुरवठ्यामुळे सर्व उत्पादन घटकांना अल्पकाळात पुरवठा वाढविणे अशक्य असल्यामुळे मिळणारे अधिकचे उत्पन्न म्हणजे आभास खंड होय. मात्र दीर्घकाळात पुरवठा वाढविणे शक्य असल्यामुळे अल्पकाळात मिळणारे जादाचे उत्पन्न नाहीशी होते. म्हणजेच दीर्घकाळात पुरवठ्यात वाढ झाल्यामुळे आभास खंडाचे उत्पन्न संपुष्टात येते.तसेच सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनाच्या मते, खंड हा फक्त भूमि या घटकाला मिळतो. पण मार्शलच्या मते, अल्पकाळात

भूमी प्रमाणे इतर उत्पादन घटकांनाही आभास खंड प्राप्त होतो हे त्यांनी सिद्ध करून दाखविले आहे.

लवचिकता संकल्पना मांडून त्यांनी अर्थशास्त्रीय विचाराना बळकटी आणण्याचा प्रयत्न केला.तसेच त्यांनी लवचिकतेचे प्रकार मांडून लवचिकतेचे स्थान अबाधित केले आहे. उपभोक्त्याचे संतोषाधिक्य या संकल्पनेस आर्थिक विश्लेषणात खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. अल्फ्रेड मार्शल यांच्या मते, एखाद्या वस्तूच्या उपभोगाशिवाय राहण्यापेक्षा व्यक्ती त्या वस्तूसाठी अतिरिक्त किंमत देण्यास तयार होतो तेव्हा ती वस्तू त्या व्यक्तीस किती किमतीला मिळाल्यामुळे व्यक्तीचा लाभ होतो त्याला उपभोक्त्याचे संतोषाधिक्य म्हणतात. उपभोक्त्याचे संतोषाधिक्य या संकल्पनेने अर्थशास्त्राला एक वेगळे महत्त्व प्राप्त करून दिले आहे.एकंदरीत मार्शल यांचे योगदान कौतुकास्पद आहे.

**पारिभाषिक शब्द :**

लवचिकता : सबंधित घटकामध्ये सोयीनुसार बदल करणे

आभास खंड : कोणत्याही घटकास तात्पुरता मिळणारा अतिरिक्त नफा म्हणजे तात्पुरता खंड

प्रातिनिधिक संस्था : संस्था समूहामधील इतर सर्व संस्थेचे उत्पादन, विशेशीकरण, किंमत व अन्य बाबाचे प्रतिनिधित्व करणारी संस्था होय.

उपभोक्त्याचे संतोषाधिक्य : वस्तू खरेदी करण्यासाठी जास्तीत जास्त द्यावयास तयार असणारी किंमत व प्रत्यक्षात ज्या किमतीस ती वस्तू उपभोगत्यास मिळते ती किंमत या दोन्ही किमतीतील फरक होय.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्ने :**

१. डॉ. मार्शल हे ............................ अर्थशास्त्रज्ञ म्हणून ओळखले जातात.

अ) सनातनवादी ब) नव- सनातनवादी क) व्यापारवादी ड) निसर्गवादी

२. प्रातिनिधिक उद्योगसंस्थेचा दीर्घकालीन .............. खर्च हा किमान पातळीवर असल्याने लाभ प्राप्त होतो.

अ) सरासरी खर्च ब) सीमांत खर्च क) बदलत्या ड) यापैकी नाही

३. वस्तूच्या किमतीत होणाऱ्या बदलामुळे त्या वस्तूच्या मागणीत जो बदल होतो, त्या बदलाच्या प्रमाणास ........... लवचिकता म्हणतात.

अ) उत्पन्न ब) किंमत क) छेदक ड) यापैकी नाही

४. उपभोक्त्याच्या उत्पन्नातील बदलाचा परिणाम म्हणून वस्तूच्या मागणीत होणाऱ्या बदलाचे प्रमाण म्हणजे ............... लवचिकता होय.

अ) उत्पन्न ब) किंमत क) छेदक ड) यापैकी नाही

५. एखादया वस्तूच्या किमतीत होणाऱ्या बदलामुळे तिच्या पर्यायी वस्तूच्या मागणीत बदल होतो, त्या बदलाच्या प्रमाणास ............... लवचिकता म्हणतात.

अ) उत्पन्न ब) किंमत क) पर्यायता ड) यापैकी नाही

६) आभास खंडाची संकल्पना ................. यांनी मांडली आहे.

अ) रिकार्डो ब) मार्शल क) फिशर ड) यापैकी नाही

७) उपभोक्त्याचे संतोषाधिक्य ही संकल्पना ................... यांनी मांडली.

अ) रिकार्डो ब) मार्शल क) फिशर ड) यापैकी नाही

**स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

१. ब) नव- सनातनवादी २. अ) सरासरी खर्च ३. ब) किमत ४. अ) उत्पन्न

५. क) पर्यायता ६. ब) मार्शल ७. ब) मार्शल

**सरावासाठी स्वाध्याय :**

**टीपा लिहा :**

१) मार्शलचे मूल्यविषयक विचार

२) आभास खंड

३) पर्यायता लवचिकता

४) मार्शलची मुख्य व पूरक खर्चाची संकल्पना

५) उत्पन्न लवचिकता

६) तिरकस लवचिकता

७) नफ्याविषयक विचार

८) उत्पादन घटकाविषयक विचार

९) उपभोक्त्याचे संतोषाधिक्य

**दीर्घोत्तरी प्रश्न :**

१) मार्शलचे मुल्यविषयक समन्वयवादी विचार स्पष्ट करा.

२) मार्शलच्या मागणीच्या लवचिकतेच्या संकल्पनेची सविस्तरपणे चर्चा करा.

३) आभास खंडाची आकृतीसह सविस्तरपणे चर्चा करा.

४) डॉ. मार्शलची प्रातिनिधिक उद्योगसंस्थेची चर्चा करा.

५) उपभोक्त्याचे संतोषाधिक्य ही संकल्पना सविस्तरपणे स्पष्ट करा.

***

# घटक : २
# भारतीय आर्थिक विचार
# INDIAN ECONOMIC THOUGHTS

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ अभ्यास विषय

- २.२.१ महात्मा फुले यांचे शैक्षणिक व शेतीविषयक विचार
- २.२.२ छ. राजर्षी शाहू महाराजांचे शेती व सहकारविषयक विचार
- २.२.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चलन व शेतीविषयक विचार
- २.२.४ दादाभाई नौरोजी-निस्सारण सिद्धांत

२.३ सारांश

२.४ संज्ञा/पारिभाषिक शब्द

२.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

२.६ पुढील अभ्यासासाठी संदर्भ

## २.० उद्दिष्ट्ये :

सदर घटकांच्या अभ्यासांती आपणास...

१) महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छ.शाहू महाराज व दादाभाई नौरोजी या सारख्या राष्ट्रीय विचारवंतांच्या समग्र व्यक्तिमत्वाचा परिचय होईल.

२) महात्मा फुले व छ.शाहू महाराजांचे तत्कालीन शैक्षणिक विचारांचे अध्ययन करता येईल.

३) महात्मा फुले, छ.शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक आर्थिक विचारांचे आकलन होईल

४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर व छ.शाहू महाराज यांचे जल व्यवस्थापन नियोजनाचा अभ्यास करता येईल.

५) दादाभाई नौरोजी यांच्या आर्थिक निस्सारण सिद्धांताच्या माध्यमातून आर्थिक पिळवणूकीचे सखोल ज्ञान प्राप्त होईल.

६) आजच्या विद्यमान परिस्थितीत या सर्व भारतीय विचारवंतानी दिलेल्या आर्थिक विचारांचे महत्त्व व व्यावहारिक उपयोजन समजते त्याचबरोबर शासनाला योग्य धोरण आखण्यास दिशा मिळेल

## २.१ प्रस्तावना :

प्रस्तुत घटकात भारतीय आर्थिक विचारवंतांच्या सखोल विचारांचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यामध्ये महात्मा फुले यांचे शैक्षणिक आणि शेतीविषयक आर्थिक विचार, छ.शाहू महाराजांचे कृषीविषयक व सहकारविषयक धोरण व दृष्टीकोण, तसेच त्यांचे तत्कालीन काळातील शेती व शेतकरी कल्याणासाठी केलेले जल व्यवस्थापन याचा सांगोपांग अभ्यास केलेला आहे.

तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय अर्थशास्त्रज्ञ म्हणून दिलेले योगदान त्यापैकी कृषीविषयक प्रश्न, महारवतन, सहकार शेती, खोती पद्धत विरुद्ध केलेले आंदोलन व विधिमंडळातून शेतकरी धोरण, चलन विषयक प्रश्न व मौद्रिक धोरणाच्या माध्यमातून केलेले कार्य, तत्कालीन काळातील ब्रिटीश शासनाचा सार्वजनिक आयव्यय विषयक अभ्यास, इतर आर्थिक विचार, जल धोरण व इतर विकासात्मक धोरणाचा अभ्यास करण्यात आला आहे.

भारताचे पितामह दादाभाई नौरोजी यांनी १९ व्या शतकात आर्थिक विचार मांडलेले असून त्यापैकी आर्थिक निस्सारणाचा सिद्धांत, शोषणाचे विविध मार्ग व आर्थिक निस्सारणाच्या परिणामाचा अभ्यास सदर घटकात करण्यात आला आहे.एकंदरीत या घटकाच्या माध्यमातून या प्रस्तुत भारतीय विचारवंताच्या आर्थिक विचारांचा अभ्यास केलेला आहे.

## २.१ महात्मा फुले यांचे शैक्षणिक आणि शेतीविषयक आर्थिक विचार
## (Mahatma Phule : Views on Agriculture and Education )

### जीवन परिचय :

जगातील काही मोजक्या समाजसुधारकापैकी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या नावाचा उल्लेख केला जातो. महात्मा फुले म्हणजे समाजसुधारकांच्या रांगेतील परिपक्व समाजधुरीण होय. शैक्षणिक बदल व प्रवाह सुधारण्याच्या प्रवासातील असंख्य शिक्षणतज्ञांचा महामेरू, बळीराजाचे नेतृत्व करणारा व मातीशी नाळ जोडलेल्या, शेती प्रगतीसाठी अव्याहतपणे विचाराधीन असलेले व कृतिशील कार्यातून शेती सुधारक, प्रगतिशील शेतकरी व कृषी पंडित म्हणून सुप्रसिद्ध होते. तत्कालीन हिंदुस्थानामध्ये जात, धर्म, पंथ, लिंग व क्षेत्र यांना कोणताही थारा न देता थोर मानवतावादी दृष्टीतून पाहणारा मानवतावादी सुधारक तसेच समाजातील वंचित घटकांसाठी व समाजव्यवस्थेने शूद्र व अशुद्र अशा प्रकारची निर्माण केलेली व्यवस्था मोडून काढणारा बंडखोर समाज क्रांतिकारक होय. शूद्रातिशूद्रांचा तारणहार, शैक्षणिक चळवळीच्या प्रवासातुन महिलांना व शूद्रांना शैक्षणिक प्रवाहात आणणारा चळवळीचे खरेखुरे शिक्षक व शिलेदार आहेत. आपल्या लेखन कौशल्याच्या माध्यमातून विविध ग्रंथाची निर्मिती करून समाजामध्ये जाणीव जागृती करून प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध बंड करणारा, इंग्रजी व्यवस्थेला प्रगतशील व पुरोगामी व्यवस्था निर्माण करण्यास भाग पाडणारा जातिवंत शूर शिलेदार म्हणून त्यांची ओळख सर्वश्रुत आहे.

ज्योतिराव गोविंदराव फुले या महात्म्याचा जन्म सन ११ एप्रिल १९२८ मध्ये आई चिमणाबाई व वडील गोविंदराव यांच्या पोटी झाला. गोविंदराव फुले यांनी वयाच्या ७ व्या वर्षी ज्योतिराव फुले यांना शाळेत पाठवले परंतु अल्पकाळात तत्कालीन व्यवस्थेमुळे त्यांना शाळेतून काढून टाकण्यात आले. मात्र त्यानंतर गफार बेग मुंशी आणि मेजर लिजिट साहेब यांनी गोविंदरावांना शिक्षणाचे महत्व पटवून देऊन ज्योतिरावांना सन १८४१ मध्ये मिशनरीच्या इंग्लिश शाळेत दाखल करण्यात आले. या मिशनरीच्या शाळेतून म.फुलेंच्या राजकीय सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक मनाची परिपक्व घडणजडण झाली. त्यामुळे जोतीरावांच्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत मिळालेली ही सकस शिदोरी सातत्याने समाजकारणी उपयोगी पडू लागली. तसेच थॉमस पेन व छ.शिवाजी महाराजांच्या विचाराने ते प्रभावित होते.

कालांतराने सर्व क्षेत्रात आलेला अनुभव व शिक्षणामुळे निर्माण झालेली परिपूर्ण परिपक्वता यामुळे समाजातील पददलित,वंचित घटक व बहुजन समाजाचे अज्ञान व असमानता दूर केल्याशिवाय त्या समाजाला माणुसकीचे जीवन प्राप्त होणार नाही हे ओळखले होते. तसेच समाजात स्त्री शिकल्याशिवाय त्या कुटुंबाला व समाजाला अर्थ प्राप्त होणार नाही हे त्यांनी ओळखून त्यांनी जाणीवपूर्वक १८४८ मध्ये पुण्यात बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाड्यात मुलींच्या शाळेची स्थापना केली. लगेच सन १८५१ ला दुसरी मुलींची शाळा सुरू करून स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. अस्पृश्य समाजासाठी शिक्षणाची व्यवस्था करण्यासाठी सन १८५१ मध्ये नाना पेठेत शाळा सुरू केली तसेच १८५५ मध्ये रात्र शाळा सुरू करून त्यांनी शिक्षणाविषयीचा आपला हेतू व भूमिका स्पष्ट केली. या त्यांच्या समग्र शिक्षण प्रवासात सन १८८२ रोजी बहुजन समाजास शिक्षण प्राप्त व्हावे व त्यास चालना मिळावी यासाठी हंटर आयोगासमोर त्यांनी साक्ष दिली.

तसेच त्यांनी सामाजिक चळवळीत कार्य करीत असताना सन १८६३ ला बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करून व पुनर्विवाहास चालना देण्यासाठी सन १८६४ मध्ये शेणवी जातीत पहिला पुनर्विवाह घडवून आणला. तसेच त्यांनी महिला हितार्थ व कल्याणासाठी विविध मार्गाने पत्नी सावित्रीबाई व स्वतः जोतीराव फुले यांनी संघर्षमय प्रवास केला. तसेच अस्पृश्य समाजाच्या सोयीसाठी व बहुजनांचा आधारु या भावनेने त्यांनी सन १८६८ ला आपल्या वाड्यातील पाण्याचा हौद खुला केला. त्यांचे व्यक्तिमत्त्व परिपूर्ण असल्यामुळे त्यांनी राजकारणात प्रवेश करून पुणे नगरपालिकेचे सदस्य पदापासून ते महापौर पदापर्यंतचा प्रवास बहुजन हिताय व कौतुकास्पद होता.

म. ज्योतिबा फुले यांनी शूद्रातिशूद्र लोकांचे हाल, शेतकऱ्यांची भयावह स्थिती, महिलांचे समाजातील दुय्यम स्थान, सामाजिक परिस्थिती बदलणे यासाठी एखादी अखंड चालणारी चळवळ उभी राहिली पाहिजे हे त्यांच्या लक्षात आले त्यानंतर सन १८७३ ला 'सत्यशोधक समाज' स्थापन केला. या समाजाचा वैचारिक मूलाधार खालील प्रमाणे होता.

१. ईश्वर एकच असून तो सर्वव्यापी निर्गुण, निर्विकार व सत्यरूप आहे.

२. ईश्वराची भक्ती करण्यास प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार असून यासाठी भट- दलालांची आवश्यकता नाही.

३. कोणीही व्यक्ती जातीने श्रेष्ठ नसून फक्त गुणाने श्रेष्ठ ठरतो.

आपल्या विचारांचा प्रचार व प्रसार व्हावा या हेतूने म. फुलेनी अनेक ग्रंथांची निर्मिती केली. ही सर्व ग्रंथसंपदा बहुजन हिताय होती हे मात्र सत्य आहे. यामध्ये १) तृतीय कला,१८५५ २) ब्राह्मणांचे कसब,१८६९ ३) गुलामगिरी,१८७३ ४) शेतकऱ्यांचा आसूड,१८८३ ५) सतसार,१८८५ ६) इशारा,१८८५ ७) सार्वजनिक सत्यधर्म,१८९१ ८) छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोवाडा ९) असंख्य काव्यरचना इ. चा समावेश होतो.

ज्योतिराव फुले यांच्या कार्याची दखल घेत व जनमानसात असणारी खऱ्याखुऱ्या समाजसुधारकाची प्रतिमा व आस्था यामुळे त्यांच्या विचार व कृतीने प्रभावित होऊन ११मे १८८८ मध्ये मुंबई येथील सार्वजनिक जाहीर सभेत महात्मा ही पदवी बहाल करून त्यांचा गौरव करण्यात आला. वर्तमानात व भविष्यात या ज्योतिराव फुले नामक व्यक्तिमत्वाला व महात्माला कोणीही विसरू शकत नाही हे मात्र सत्य आहे. आज देशातील प्रत्येक चळवळीचा प्रणेता म्हणून महात्मा फुलेंना वंदन केले जाते. हे विश्व समाजसुधारक व क्रांतीसुर्य महात्मा फुले सन २८ नोव्हेंबर १८९० मध्ये कालवश झाले.

**महात्मा ज्योतिराव फुले यांचे शैक्षणिक कार्य :**

**शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा भक्कम पाया :**

ज्योतिराव फुले यांची शैक्षणिक कार्यपद्धती ही स्वातंत्र्य, समता व बंधुता यावर आधारलेली होती. त्यामुळे शुद्र व बहुजन समाजाला सामाजिक,वैचारिक व मानसिक गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी तसेच समताधिष्ठित समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी शिक्षण हा या व्यवस्थेचा मूळ गाभा असून त्याच्यावरच समाजाच्या विकास व प्रगतीची चौकट बळकट होत असते. यासाठी शिक्षणाची ज्ञानगंगा ही घरोघरी पोहचविणे गरजेचे असून या शिवाय समाज परिवर्तन होणार नाही हे महात्मा फुले यांनी ओळखलेले होते. यासाठी शूद्रातिशूद्रासाठी शिक्षणाचा अट्टाहास लावला होता. यासाठी विविध ग्रंथाच्या माध्यमातून अर्थात 'ब्राह्मणांचे कसब' ,'अखंडादी काव्यरचना' व 'विद्याखात्यातील ब्राह्मण पंतोजी' या लिखाणाच्या माध्यमातून त्यांनी शिक्षण प्रसाराचे कार्य केले होते. महात्मा फुले हे महाराष्ट्राचे 'मार्टिन ल्युथर' म्हणून ओळखले जात होते.ते मानवतावादी समाजसुधारक असल्यामुळे मेकॉलेच्या शिक्षण पद्धतीस विरोध करून शिक्षण हे वरच्या वर्गापासून ते खालच्या वर्गापर्यंत पाझरत आले पाहिजे यास त्यांचा कडाडून विरोध होता. त्यांच्या मते शिक्षण हे खालच्या वर्गातील लोकांना देऊन नंतर वरच्या वर्गातील लोकांना द्यावे म्हणजे 'आधी कळस मग पाया' असं न होता 'आधी पाया मग कळस' अशा पद्धतीने शिक्षणप्रणाली असण्याबद्दल महात्मा फुले यांचा प्रचंड आग्रह होता. यासाठी त्यांनी ब्रिटिश सरकारच्या हंटर आयोगासमोर शूद्रातिशूद्र व शेतकऱ्यांच्या शिक्षणाची कैफियत मांडून शिक्षणाबद्दलचे आपले विचार स्पष्ट केले.

त्यांनी सामाजिक व आर्थिक शोषणाचा पंचनामा करताना 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथाचा आधार घेऊन या पुस्तकातील काही काव्यपंक्ती प्रस्तुत करून त्यांनी शिक्षणाबद्दलचे महत्त्व पटवून दिले.

विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली।

गतीविना वित्त गेले वित्तविना शूद्र खचले;

इतके अनर्थ एका अविद्येने केले ।

अशा पद्धतीने शिक्षणविषयक भूमिका व तत्त्वज्ञानाचा पाया मांडून त्यांनी शैक्षणिक क्रांतीला सुरूवात केली.

**प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे :**

प्राथमिक शिक्षण हे प्रत्येक बालकासाठी महत्त्वाचे असून ते मिळणे हा त्यांचा हक्क आहे. तसेच जोतिराव प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत असावे या विचारांचा पुरस्कार करणारे भारतातील प्रथम व्यक्ती होती. कारण एकोणिसाव्या शतकातील शिक्षण व्यवस्थेत शूद्रातिशूद्रांचा सहभाग अत्यंत नगण्यच होता परंतु औपचारिकतेचा भाग म्हणून सरकारच्या धोरणाप्रमाणे काही मुले हजेरी पटावर प्रवेशित आहेत हे दाखवण्यासाठी त्यावेळी व्यवस्था केली होती. त्यामुळे शूद्र व बहुजन समाजातील घटकांना वंचित ठेवण्यात आले होते. या सर्व गोष्टींचा सारासार विचार करून महात्मा फुले यांनी या संबंधित घटकांना शिक्षणाची दारे खुली व्हावीत यासाठी म्हणून १९ ऑक्टोबर १८८२ मध्ये हंटर आयोगापुढे शिक्षणाबद्दलची साक्ष दिली होती. त्यामध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्यावर भर देण्यात आला होता त्यामुळे विद्यार्थ्यांच्या संख्येत प्रचंड प्रमाणात वाढ होणार होती. तसेच गुजराती शूद्रांची मुले दारिद्र्याच्या कारणामुळे शाळेत टिकून राहू शकत नाहीत कारण घर काम किंवा एखादं काम धंदा मिळाले की ती सोडून जातात यावर उपाय म्हणून शिक्षण सक्तीचे असावे असा शैक्षणिक अटाहास लावला. तत्कालीन परिस्थितीमध्ये सरकारी नोकऱ्यामध्ये सर्व वरिष्ठ वर्गाची मक्तेदारी होती त्यामुळे खालच्या वर्गातील लोकांना मुलांना प्राथमिक शिक्षण देऊ केलं त्याचा परिणाम म्हणून या वर्गातील मुलांनाही संधी मिळणार होती. या भावनेने प्राथमिक शिक्षण सक्तीचे मोफत असावे यासाठी आवाज उठवणारे ते पहिले समाज सुधारक होते.

प्राथमिक शिक्षणासंदर्भात महात्मा फुलेंनी काही शिफारशी केल्या होत्या त्या पुढील प्रमाणे आहेत.

१) शाळेत प्रमाणपत्रित शिक्षक नेमावा.

२) प्रमाणपत्रात शिक्षक नेमलेल्या शाळेस शासनाने अनुदान द्यावे.

३) स्थानिक कराच्या निधीपैकी ५० टक्के निधी हा प्राथमिक शिक्षणावर खर्च करावा.

४) नगरपालिकेने आपल्या हद्दीतील प्राथमिक शाळा स्वखर्चाने चालवाव्यात.

५) ज्या भागात ज्या जातीची वस्ती पुरेशी मोठ्या प्रमाणात असेल त्या ठिकाणी स्वतंत्र शाळा उघडाव्यात.

**ग्रामीण भागातील मुला-मुलींचे शिक्षण :**

बहुतांशी शूद्रातिशूद्र व बहुजन समाज हा ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात राहत असल्याने त्यांच्या भविष्याची व शिक्षणाची महात्मा फुले यांना अधिक काळजी वाटत असे. त्यामुळे महात्मा फुलेंनी सन १८८८ मध्ये म्हणाले होते की, आपली बहुतांशी जनता ग्रामीण भागात वास्तव्यास असल्याने शासनाने ग्रामीण लोकांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष केंद्रित करून उत्तम शिक्षण उपलब्ध करून द्यावे.

**राष्ट्रप्रेम निर्माण करण्यासाठी शिक्षणावर भर :**

या हिंदुस्थानातील तमाम जनता ही अडाणी व अशिक्षित असल्यामुळे त्यांचा सामाजिक व आर्थिक विकास होऊ शकत नाही. त्यामुळे हे लोक विविध पातळीवर गुलाम बनले असून असे घटक सक्षम देश उभा करण्यासाठी उपयोगाचा नाही. यासाठी त्यांना शिक्षण देणे गरजेचे आहे कारण शिक्षण हा जीवनाचा मूलाधार आहे.तसेच बलवान राष्ट्र निर्माण करावयाचे असेल तर या घटकांना शिक्षण देणे गरजेचे आहे. अशा प्रकारचा विचार मांडून त्यांनी शिक्षणावर अधिक भर दिला होता.

**शिक्षक हा शेतकरी असावा :**

तत्कालीन काळात शूद्रातिशूद्र घटक हा शिक्षणापासून वंचित होता. ब्राह्मण शिक्षकाकडून पूर्वग्रहदूषितपणामुळे या घटकांना शिक्षण देणे हे धर्मविरोधी आहे. अशा वेळेस या घटकांना शिक्षण देण्यासाठी ब्राह्मण शिक्षकाची नेमणूक केल्यास यांच्याकडून योग्य ज्ञान व विद्या प्राप्त होणार नाही असे स्पष्ट मत महात्मा ज्योतिराव फुले यांचे होते. त्यासाठी बहुजन समाजातील शेतकरी नेमावा.

तरुण सुत्रांनी विद्या संपादावी।। चाकरी करावी ।। शाळाखाती।।

भटावत तुम्ही शिक्षक बनावे ।। त्यांना हरवावे ।। सत्यामध्ये ।।

अशा शूद्रातिशूद्र किंवा शेतकरी शिक्षकांनी शिक्षण प्रसारासाठी योगदान दिल्यामुळे शूद्रातिशूद्रांना उत्तम शिक्षण प्राप्त होईल. तसेच ब्राह्मण वर्गातील लोक धर्मांधतेमुळे इतर कनिष्ठ वर्गाशी शैक्षणिक पातळीवर ते दुजाभाव करतील. मात्र शेतकरी वर्गातील शिक्षक हे सहजपणे इतर वर्गात मिसळून ज्ञानार्जन करण्याचे काम प्रामाणिकपणे करतील. तसेच वेळप्रसंगी कोणत्याही कामाला गौण न मानता ते काम मनापासून करतील अशी धारणा ही महात्मा फुले यांची होती. त्यामुळे बहुजन समाजातील शिक्षक व प्रशिक्षक होणे यावर त्यांनी भर दिला तसेच स्वतः शिक्षक पाभरे, कोळणी, नांगर हाकून दाखवणारे असावेत असे फुले आवर्जून सांगतात.

उपरोक्त माहिती संदर्भात महात्मा फुले यांनी सूत्रबद्ध पद्धतीने काही विचार मांडले आहेत.

१) शिक्षक हा प्रशिक्षक असला पाहिजे यावर त्यांनी अधिक भर दिला होता.

२) प्रशिक्षित शिक्षक असणाऱ्या शाळेला भरीव अनुदान द्यावे.

३) शिक्षकांना चांगले वेतन देऊन त्यांची राहणीमानात सुधारणा घडवून आणावी.

४) उत्तम कार्य व जादा अटी पूर्ण करणाऱ्या शिक्षकास जाता भत्ते देण्यात यावेत.

**कौशल्यवृद्धी संपन्न अभ्यासक्रम असावेत :**

शिक्षण हा जीवनाचा मूलाधार असून मूलभूत शिक्षणाबरोबर कौशल्यवृद्धी निर्माण करणारे शिक्षण अभ्यासक्रमात समाविष्ट असले पाहिजे यावर महात्मा फुले यांनी भर दिला. महात्मा फुले यांना शिक्षणाची व जगण्याची व्यावहारिक बाजू महत्त्वाची वाटत होती यासाठी व्यावहारिक शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असे त्यांना मनापासून

वाटत होते. त्यामुळे अभ्यासक्रमात मोडी, लेखन-वाचन, हिशेबाची माहिती, सर्वसाधारण इतिहास, भूगोल, व्याकरण व बालबोध यांचे प्राथमिक ज्ञान विद्यार्थ्यांना प्राप्त व्हावे अशी त्यांची प्रामाणिक इच्छा होती. तसेच नीतीशील व आरोग्यासंबंधी सोपे धडे अभ्यासक्रमात अंतर्भूत करावेत अशी अपेक्षा होती. ग्रामीण व शहरी अभ्यासक्रमाबाबत ग्रामीण भागात अभ्यासक्रम कमी असावा परंतु व्यावहारिक ज्ञानाच्या बाबतीत दोन्ही भागात समानता असावी अशी त्यांची अपेक्षा होती. तसेच त्यांनी शेतकी अभ्यासाच्या जोडीने प्रत्यक्ष व्यावहारिक ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी म्हणून एक आदर्श शेतीची छोटीशी योजना आखल्यास फायदेशीर ठरणार आहे अशा प्रकारचे ठाम मत यांचे होते. म. फुले यांचा व्यावहारिक शिक्षणावर अधिक जोर होता हे स्पष्ट होते जो बहुजन समाजात कौशल्यवृद्धी घडवून त्यांचे जीवन तारणारा होता. कारण शिक्षण प्रणाली ही कारकून बनवणारी होती त्यामुळे शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल व्हावा या अपेक्षेने कौशल्यपूर्ण अभ्यासक्रम व शिक्षण असावे अशी त्यांची धारणा होती.

**उच्च शिक्षण :**

शूद्रातिशूद्र व बहुजन समाजातील घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच उच्च शिक्षण संपादन करण्यासाठी हा वर्ग पुढे यावा याकरिता स्वतः महात्मा फुले यांनी हंटर आयोगासमोर प्रत्यक्ष साक्ष देऊन काही शिफारशी केल्या.

१) शाळा महाविद्यालये सरकारी नियंत्रणाच्या कक्षेत असावीत.

२) कोणत्याही परिस्थितीत शिक्षण व्यवस्था खाजगी यंत्रणेकडे सोपवू नये.

३) मागासवर्गीय समाजातील मुलांसाठी विशेष शिष्यवृत्त्या देण्यात याव्यात.

४) उच्च शिक्षणाची व्यवस्था सर्वांना सहज व सुलभ उपलब्ध व्हावी.

५) महाविद्यालयातील दिले जाणारे शिक्षण हे व्यवहार उपयोगी असावे.

६) उच्चशिक्षण बहिस्थ विद्यार्थ्यांनाही मिळावे अशी शिफारस केली.

७) उच्च शिक्षण हे तांत्रिक व व्यवहारोपयोगी अभ्यासक्रमाने परिपूर्ण असावेत.

अशा प्रकारच्या शिफारशी करून एक प्रकारे उच्च शिक्षणाची गुणवत्ता वृद्धिंगत व्हावी व बहुजन समाजाला त्याचा लाभ मिळावा अशा पद्धतीची होती.

**स्त्री-शिक्षणावर अधिक जोर :**

महात्मा फुले यांच्या काळात स्त्रीला शिक्षण देणे धर्मविरोधी आहे अशा प्रकारची मानसिकता धर्मांध शक्तीने त्या काळात केली होती त्यामुळे स्त्री म्हणजे चूल आणि मूल अशी व्यवस्था प्रचलित होती. मात्र महात्मा ज्योतिराव फुले यांनी राष्ट्र विकासात स्त्रियांचे महत्व ओळखून त्यांनी त्यांच्यासाठी शिक्षणाची द्वारे एकटाच खुली केली. यासाठी पद्धतशीर मोहीम राबवली. त्यांच्या मते एक पुरुष शिकला की तो एकटाच शिकतो मात्र एक स्त्री शिकली की एक कुटुंब शिकते या भूमिकेतून महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. यासाठी त्यांनी

सत्ताधारी व सनातनवादी विचारांच्या प्रवाहाच्या विरोधात जाऊन स्त्री शिक्षणाच्या ध्येयपूर्तीसाठीचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले. त्यासाठी सुरुवातीस १८४८ मध्ये पहिली शूद्रातिशूद्रांच्या मुलींची शाळा सुरू करून त्यात यशस्वी होऊन त्यांनी १८५१ ला मुलींसाठी दुसरी शाळा सुरु केली. तसेच उपवर स्त्रियांसाठी सन १८५५ रात्रशाळा सुरू करून स्वतः ज्योतिराव फुले व माऊली सावित्रीबाई फुले हे स्वतः शिक्षक म्हणून काम करीत होते. ज्ञानदानाचे पवित्र काम करीत असताना समाजातील प्रतिगामी घटकांकडून अनेक वाईट प्रसंगांना तोंड द्यावे लागले. मात्र दोघेही न डगमगता स्त्री शिक्षणाचे घेतलेले व्रत प्रामाणिकपणे पार पाडले. त्याचबरोबर त्या काळात स्त्रियांना दुय्यम स्थान असल्यामुळे विधवा विवाह निविध्द मानला जात असे. बालविवाह पद्धत सर्रास चालू असे तसेच बाल विधवेचा केशवपण हा धर्माचा भाग मानला जात असे यावर ज्योतिरावांनी आवाज उठवून समस्त स्त्रीजातीला न्याय देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. यासाठी म्हणून पुनर्विवाहास चालना देण्यासाठी सन१८६४ ला पुनर्विवाह घडवून आणला. सन १८६३ मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करून महिलांना न्याय देण्याचा प्रयत्न केला.

स्त्री शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करताना, त्यांनी हंटर शिक्षण आयोगापुढे स्त्रियांचा मागासलेपणा दूर होण्यासाठी व लहानपणीच शिक्षण मिळावे यासाठी साक्ष दिली. तसेच विशेष करून महिलांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात व्हावा अशी मागणी केली. एकंदरीत स्त्री शिक्षण उद्धारकर्ता म्हणून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्याकडे पाहिले जाते.

**शिक्षणाचे अर्थकारण :**

महात्मा फुले यांचे शिक्षण हे आधुनिकतेला स्पर्श करणारे, सर्व घटकांना समाविष्ट करून घेणारे, विकासाभिमुख व परिवर्तनवादी होते. त्यामुळे शिक्षणासाठी प्राप्त होणाऱ्या निधी पासून ते विनियोगा पर्यंतच्या सर्व प्रक्रियेवर भर दिलेला होता. त्यामुळे शैक्षणिक धोरणाची परिपक्वता ही त्यांच्या अर्थ विचारावर अवलंबून होती ती पुढीलप्रमाणे सांगितलेले आहे.

१) शिक्षकी पेशा हा रोजगार निर्मितीचे एक महत्त्वाचं क्षेत्र असून त्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या व बहुजन समाजातील मुलांना शिक्षक म्हणून नियुक्त करावे ज्यामुळे त्याची बेरोजगारी कमी होऊन पर्यायाने दारिद्र्य संपुष्टात येईल.

२) ज्या हेतूने शासनाने निधी निश्चित केलेला आहे त्यावरच तो खर्च होणे यावर त्या धोरणाचे यश अवलंबून असते. जर शेतकऱ्याच्या मुलासाठी तरतूद करण्यात आलेला निधी त्यासाठीच प्रामाणिकपणे खर्च करावा जेणेकरून त्या निधीचा उत्पादक कामासाठी उपयोग होईल असे महात्मा फुले यांना वाटले. अन्यथा त्यांच्यावर अन्याय होण्यासारखा आहे.

३) त्या काळात महात्मा फुले यांनी आदर्श शेती योजनेची संकल्पना मांडत तसेच कौशल्यवृद्धी अभ्यासक्रमावर आधारित ६ वी पर्यंत शिक्षण प्राप्त केलेल्या शूद्रातिशूद्राच्या मुलांना नांगर, पाभर व कोळपी हाकण्याची परीक्षा देऊन जे पात्र होतील अशा मुलांना पाटीलकी देऊन त्यांचा उपयोग शेती व कौशल्यवृद्धी करण्यासाठी व्हावा

आणि जेणेकरून शेतीचे उत्पन्न वाढेल अशी अपेक्षा या माध्यमातून महात्मा फुलेंची होती.

४) महात्मा फुले यांनी स्वतंत्र शिक्षणाचा पुरस्कार करून व्यवहारोपयोगी शिक्षणास प्राधान्य दिले. स्वतंत्र ज्ञान व व्यवसायाभिमुख शिक्षण यामुळे रोजगाराच्या विविध संधी निर्माण होऊन शूद्रातिशूद्र समाजाच्या राहणीमानाचा दर्जा वाढेल.

५) शूद्रातिशूद्र वंचित घटकांच्या शिक्षणाचा विचार करून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून पर्यायाने घटकांचा सांगोपांग विकास करणे या गोष्टीवर म.ज्योतिराव फुले यांनी भर दिला होता.

थोडक्यात महात्मा फुले यांनी शिक्षणापासून दूर असलेल्या स्त्री, शूद्रातिशूद्र घटकांना व शेतकऱ्यांना मुख्य प्रवाहात आणून शिक्षणाची कवाडे खुली करून त्यांना कौशल्यपूर्ण व्यावहारिक ज्ञानाची जोड देऊन त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक परिवर्तन घडवून आणणे यावर जोतीरावांच्या जोर होता.

**म.ज्योतिराव फुले यांचे शेती विषयक विचार :**

महात्मा ज्योतिराव फुले आणि शेती हे उत्तम समीकरण त्या काळात बनलं होते. त्यांनी आपल्या पूर्ण हयातीत शिक्षण विषयक प्रश्नाबरोबरच सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय असणाऱ्या शेतीकडे पूर्ण लक्ष दिले. तत्कालीन काळात १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात प्रचंड मोठे दुष्काळ, शेतीची कमी उत्पादकता, शेतकऱ्याचे अज्ञान, अशिक्षितपणा, शेतीची शास्त्रशुद्ध माहिती नसणे, दैववादावर प्रबल विश्वास व अंधश्रद्धेच्या गर्तेत अडकलेले होते. शेतकरी जीव जगण्यासाठी म्हणून शेती करीत होते. त्यावेळी वरच्या जातीतील लोक म्हणजेच ब्राह्मण घटकाकडून इतर शूद्रातिशूद्रांच्या कडून मोठ्या प्रमाणात विविध यात्रा, सण, जत्रा व उत्सवाच्या निमित्ताने प्रचंड प्रमाणात देवाच्या नावावर दान गोळा करून मोठ्या प्रमाणात आर्थिक पिळवणूक केली जात होती. वर्षभर विविध विधिवत पूजेच्या नावे प्रचंड प्रमाणात आर्थिक व धान्य स्वरूपात लूट केली जात होती. त्याचबरोबर या वर्गाकडे प्रचंड जमिनीचे मालकीत्व, अफाट संपत्ती, मंदिराचे कायमचे पौरात्यपद व शिक्षणामुळे सत्ताधाऱ्यांच्या बरोबर असलेली सलगी व इंग्रजांचे वरदहस्त, नातेवाईक विविध पदावर विराजमान असल्याने या सर्वांचा परिणाम म्हणून जातीमुळे सामाजिक व आर्थिक श्रेष्ठत्व प्राप्त झाल्यामुळे त्यांचे सर्वत्र वर्चस्व होते. हिंदुस्थानातील इतर वर्गातील जातीवर त्यांचे वर्चस्व होते.'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथाच्या माध्यमातून या सर्वांवर भाष्य करणारा व शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे विदारक चित्र या ग्रंथाच्या माध्यमातून समाजासमोर प्रकाशात आणणारा ग्रंथ म.ज्योतिराव फुले यांनी लिहिला.

म.ज्योतिराव फुले यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथाचे असंख्य बाबी या शेतकऱ्यांच्या विविध अंगांना स्पर्श करणाऱ्या घटकांचा समावेश केला होता. तोच धागा धरून धनंजय कीर आणि सं. गं. मालसे या दोन लेखकांनी अत्यंत समर्थपणे मांडलेला आहे. शेतकऱ्यांचा आसूड हा ज्योतिराव फुले यांचा ग्रंथ विविधांगी असल्यामुळे या ग्रंथाच्या माध्यमातून तत्कालीन काळातील शेतकऱ्यांचे विदारक चित्र रेखाटणारा व वास्तव विवेचन करणारा ग्रंथ होता. तसेच शेती सुधारणा विषयक सर्वांगीण उपाययोजना सुचविणारा ग्रंथ म्हणून प्रसिद्ध होता. जमिनीचा पोत सुधारणे, पाटबंधारे व धरणाची निर्मिती करणे, गुरांचे उत्तम संगोपन करणे, जमिनीची धूप

थांबवण्यासाठी उपाय सांगितले. तसेच सर्वात महत्त्वाचे म्हणजे शांततेच्या काळात शेती सुधारणे संदर्भात विधायक कार्यासाठी सैनिकांचा उपयोग कसा करून घ्यावा या बाबतची माहिती त्यांनी या ग्रंथात दिली आहे. परदेशात शेती कशी केली जाते या संदर्भात माहिती व ज्ञान भारतीय शेतकऱ्यांना व्हावी यासाठी शेतकऱ्यांच्या मुलांना विदेशात पाठवून देणे अगत्याचे आहे. शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी वार्षिक कृषी प्रदर्शने भरवून उत्तम पीक काढणाऱ्या शेतकऱ्यास पारितोषिक देऊन त्याचे कौतुक करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर शेतामधून चोरी झाल्यास पोलिसांना दंड का भरावा? सावकार व व्यापाऱ्यावर कडक नजर ठेवावी व पशुधनाच्या रक्षणासाठी नेमक्या काय उपाययोजना कराव्यात याबाबतची माहिती त्यांनी दिली आहे. तसेच शेतकऱ्यांच्या मुलांना न्याय देण्यासाठी कोणत्या उपाययोजना असल्या पाहिजेत. शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या व बळीराजाला संरक्षण देणाऱ्या असंख्य उपायोजना त्यांनी या ग्रंथाच्या माध्यमातून मांडल्या आहेत.

**शेतकरी विषयक विचार :**

महात्मा ज्योतिराव फुले यांनी शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथाची निर्मिती करून तत्कालीन काळातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या विषयी वास्तव विदारक चित्र उभ करून काही उपाय योजनेच्या माध्यमातून त्या कशा सोडवता येतील याची अधिक विवेचन केलेलं होतं. खरं म्हणजे ज्योतिराव फुले हे काही अर्थशास्त्रज्ञ नसले तरी प्राप्त परिस्थितीतील माहिती व अनुभवावर आधारीत शेतकरी व शेती प्रश्नाविषयी आवाज उठविण्याचे काम त्यांनी त्या काळात केलेलं होते. शेती व शेतकऱ्यावर त्या काळातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक व भौगोलिक घटकांचा कसा प्रभाव पडला होता याचे विस्तृत विवेचन त्यांनी केले आहे ते पुढीलप्रमाणे आहे.

**(अ) शेतकऱ्यांविषयी विवेचन :**

१) ज्योतिराव फुले यांचे लिखाण साधारणपणे १८५० ते १८९० या कालखंडातील असून विशेष करून पुणे परिसरातील निगडीत असलेल्या शेती व शेतकऱ्याविषयी सखोल विवेचन आहे.

२) महात्मा फुलेंनी शेतकरी व शेतमजूर यांच्या कल्याणाविषयकची मांडणी केली असून त्यांचे प्रश्न ऐरणीवर घेतले होते. तसेच फुले हे हिंदुस्थानातील पहिले क्रांतिकारक समाज सुधारक होते की, ज्यांनी शेतकरी व शेतमजूर यांना एकत्रित करून स्वतःच्या न्याय व हक्कासाठी प्रेरित केले. तसेच सन १८७७ मध्ये संपूर्ण हिंदुस्थानात प्रचंड मोठा कोरडा दुष्काळ पडला होता लोकांचं जगणं मुश्कील झालं होते. या दुष्काळात सर्वत्र मृत्यूचं तांडव सुरू होते. त्याचवेळी महाराष्ट्रातील दुष्काळ प्रवण क्षेत्रात प्रचंड दुष्काळ पडल्यामुळे शेतकरी व लोकाचे जगणं अवघड बनत चालले होते अशावेळी या थोर महात्माने मुलांना दत्तक घेऊन मुलांच्यासाठी आश्रयस्थाने निर्माण करून त्यांच्या देखभालीचा व संगोपनाचा खर्च स्वतः उचलला होता. तत्कालीन ब्रिटिश सरकारलाही याची दखल घ्यावी लागली.

३) जोतीरावांच्या कालखंडात बळीराजाची सामाजिक व आर्थिक परिस्थिती अत्यंत भयावह होती अशा वेळेस त्यांच्या शोषण व पिळवणुकीचे कोणते मार्ग आहेत याचा वास्तव अभ्यास करून त्यांनी त्या मांडल्या. अ) नोकरशाही घटकाकडून शेतकरी व जनतेची होत असलेली पिळवणूक ब) सावकार व व्यापारी वर्गाकडून

जाणीवपूर्वक केली जाणारी आर्थिक लुबाडणूक  क) धर्म व धर्मांधशक्तीकडून दैववादाच्या खोट्या भावनिक बंधनाद्वारे  व मानसिक गुलामगिरी द्वारे होत असलेले आर्थिक व सामाजिक शोषण होय.

४) ब्रिटिश सरकारचे पाठबळ आणि वडीलोपार्जित सावकारी व व्यापाऱ्यांच्या द्वारे शेतकरी बांधवाची होत असलेली पिळवणूक त्यांनी जगासमोर आणली. याबाबत स्थानिक आणि ब्रिटिश सरकारला वेळोवेळी या जुलमी व शोषित व्यवस्थेचा पाठपुरावा करून या पद्धतीला आळा घालण्याविषयी महत्कार्य म. ज्योतिराव फुले यांनी केलेले होते.

५) ब्रिटिश शासकाकडून शासन व्यवस्था ही प्रगत व उत्तम पद्धतीची होती. परंतु ब्रिटिशांनी भटुकशाही व्यवस्थेला जवळ केल्यामुळे त्याने धर्मांध गोष्टीचा आधार घेत असंख्य पदावर ब्राह्मण जातीतील लोक असल्यामुळे त्यांच्या माध्यमातून भ्रष्ट प्रशासन चालविले जात होते. त्या काळात कुलकर्णी, चिटणीस, मामलेदार, दप्तरदार व महालकारी अशा विविध अधिकारपदावरून ब्राह्मणलोक इंग्रजी व्यवस्थेचा लाभ घेत. भारतीय लोकांची म्हणजेच शूद्रातिशूद्रांची विविध पातळीवर पिळवणूक करीत होते. तसेच लाचलुचपत मोठ्या प्रमाणात बोकाळली होती. एक उदाहरण घ्यायचं असेल तर तत्कालीन शूद्रांच्या कडून खोट्या हजेरी पटलावर सह्या घेऊन त्याचा मेहनताना मात्र स्वतःच्या खिशात टाकण्याचा गोरखधंदा सर्रासपणे चालू होता. याबाबत महात्मा फुलेनी न्याय देण्याचा प्रयत्न केला.

६) महात्मा फुले हे स्वतः शेतकरी असल्यामुळे शेती, शेतकरी व शेतीशी संबंधित व्यवस्था त्यांनी जवळून पाहिली होती. त्यामुळे त्यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथाच्या माध्यमातून शेतकरी, शेती, शेती व्यवस्था व शेतकऱ्यांच्या बायका-मुले याविषयी सविस्तर मांडणी केली आहे. त्याचबरोबर शेतकरी वर्गाविषयी लिखाण करत असताना त्यांचं शोषण व त्यांचे प्रश्न या विषयी व्यवस्थित मांडणी करून त्या काळातील प्रश्नांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

७) त्या काळात अनुत्पादक म्हणून पाहिल्या जाणाऱ्या धर्म व धर्मांध शक्तीकडून शूद्रातिशूद्र व शेतकरी यांना विविध माध्यमातून लुटण्याचा प्रयत्न तत्कालीन वरच्या जातीतल्या ब्राह्मण व्यवस्थेने केले होते. देव या संकल्पनेला आत्यंतिक महत्त्व देऊन  ईश्वर प्रतिमा, भक्ती, भीती, स्वर्ग व पुनर्जन्म या संकल्पना जोडून त्याची सदासर्वकाळ भीती घालून या बहुजन घटकाकडून आर्थिक लुबाडणूक केली जात होती. तसेच धर्मशास्त्र व ग्रंथाचे अस्तित्व दाखवून, भीती घालून स्वतःच्या अन्न-वस्त्र-निवारा याची व्यवस्था या घटकाकडून केली जात असे. धार्मिक सण, उत्सव, जत्रा, यात्रा व इतर अन्य धार्मिक कार्यक्रमाच्या माध्यमातून शूद्रातिशूद्र व शेतकरी वर्गाकडून त्यांच्या उत्पन्नातील काही हिस्सा मिळवण्याची व्यवस्था त्यांनी केली होती याचं वास्तवदर्शन शेतकऱ्यांना महात्मा फुले यांनी घडवून दिले व धार्मिक थोतांड जगासमोर आणले.

**(ब) शेतीविषयक :**

१) म. फुलेनी मूलतः शेतीविषयक तीन वर्गात विभागणी करून त्यापैकी पहिला जो सुरवातीपासून शेती व्यवसाय करणारा वर्ग म्हणजे कुणबी, दुसरा वर्ग हा माळी जो पारंपरिक शेतीबरोबर बागायत शेती करतो. तिसरा वर्ग हा धनगर असून शेती करण्याबरोबर शेळी व मेंढीपालन व्यवसाय करतो अशा पद्धतीने मूळ शेती व्यवसायात

काळानुरूप परिस्थितीनुसार  बदल होऊन त्याची अशा प्रकारे श्रमविभागणी झाली आहे.

२) शेती परिस्थिती सुधारण्यासाठी सरकारने ताब्यात घेतलेले गायरान व  वनजमीन शेतकऱ्याला परत देऊन त्याच्या नावावर करावी. ज्यामुळे तो शेतकरी शेतीची मशागत मनापासून करून शेतीचे उत्पादन व उत्पादकता वाढवेल.

३) पशुधनाच्या माध्यमातून शेती विकास करणे आवश्यक आहे हे ज्योतिरावांनी ओळखले होते यासाठी चांगल्या जातीच्या पशु व जनावरांची पैदास व संगोपन करणे यासाठी विदेशातून चांगले पशुधन आयात करून त्याची जोपासना करावी. तसेच ब्रिटिश शासकाकडून चोरी होते त्यास आळा घालून गो-बंदी कायदा करावा अशा प्रकारच्या सूचना ही त्यांनी त्या काळात केल्या होत्या.

४) शेती व्यवसाय विकसित करण्यासाठी शेतीला जोडधंद्याची आवश्यकता असून यासाठी शेळीपालन, मेंढीपालन व कुक्कुटपालन व्यवसाय सुरु करावेत अशा प्रकारच्या उपाययोजना त्यांनी सुचविल्या.

५) शेती आर्थिकदृष्ट्या लाभदायक व किफायतशीर करण्यासाठी महात्मा फुलेनी शेती चिरंतन विकासाचा दृष्टिकोण डोळ्यासमोर ठेवून काही कायमस्वरूपाच्या  योजना सुचविल्या आहेत. जलसंधारण, जलसिंचन व जल साक्षरतेच्या माध्यमातून शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या पाण्याची कायमची व्यवस्था करण्यासाठी ह्या  दूरगामी योजना सांगितल्या. यामध्ये पाणी अडविणे, नवीन जलसाठे निर्माण करणे, विहीर खुदाई, छोटे बंधारे यासारखे जलस्त्रोत साठे याविषयी नव्याने निर्मिती करणे अशा प्रकारच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच जमिनीची धूप होऊ नये यासाठी देशातील सैनिकांच्या मदतीने बांधबंदिस्ती करणे, पाणी अडविणे व त्याची व्यवस्था करणे हे शासनाचे काम आहे.

६) शेतकऱ्यांच्या पिकांचे संरक्षण करणे ही शासनाची जबाबदारी असून कोरड्या व ओल्या दुष्काळाने किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत असेल, तसेच जनावरांच्यामुळे पिकांची नासधूस होत असेल तर त्याला सर्वस्वी शासन जबाबदार असणार आहे.

७) जमिनीचे तुकडीकरण व विभाजन याला आळा घालण्यासाठी तसेच शेती किफायतशीर बनविण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या कुटुंबाची संख्या मर्यादित ठेवावी, बाल विवाह टाळावेत व लग्नाची वयोमर्यादा वाढवावी अशा प्रकारच्या लोकसंख्यात्मक उपाययोजना सुचविल्या.

८) देशातील जमिनीची सुपीकता वाढवायची असेल तर यासाठी नदी,नाले, तलाव व विहिरी यामधील गाळ काढून शासनाने तो लोकांना मोफत द्यावा यामुळे जमिनीची सुपीकता वाढेल व उत्पादनात भरघोस वाढ होईल. तसेच शेतकऱ्यांनी नैसर्गिक खतांचा वापर करून शेतजमिनीचा कस वाढवावा.

९) शेतीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी व शेतीला अडथळा ठरणाऱ्या नोकरशाहीतील ब्राह्मणांचे वर्चस्व कमी करण्यासाठी शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण क्षेत्रात व सरकारी नोकरीत संधी उपलब्ध करून द्यावी जेणेकरून शूद्रातिशूद्र हे आर्थिक व सामाजिक विषमतेपासून दूर राहतील. तसेच नोकरीमुळे राहणीमानात बदल होऊन विकासाच्या मुख्य प्रवाहात येतील.

१०) ब्रिटिश शासनाकडून आकारण्यात येणारा शेतीवरील कर हा जाचक व शेतकऱ्यांच्या विकासाला बाधक ठरणारा आहे त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती जैसे थे राहते. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी म्हणून परिस्थिती व उत्पादनानुसार शेतसारा व कर गोळा करावा. त्यांचे मनोबल वाढवून शेती उत्पादन व उत्पादकता वाढविण्यास प्रवृत्त करावे असे रचनात्मक उपाय सुचविले.

११) आर्थिक विषमता कमी करण्यासाठी म्हणून त्यानी सरकारी नोकरदारांच्या भत्ते व वेतनात कपात करावी मात्र शेतकरी व तसेच संबंधित असणाऱ्या घटकाच्या मेहतान्यामध्ये कपात करू नये.

१२) शेती विकास व प्रगतीसाठी शेतकऱ्यांच्या मुलांना शेती शिक्षणासाठी विदेशात पाठवून शेती शिक्षण संपादन करावे व त्याचा लाभ समस्त शेतकरी वर्गाला व्हावा यासाठी शासनाने त्यासाठी येणाऱ्या खर्चाची तजवीज करावी अशा प्रकारची सूचना महात्मा फुले यांनी केली होती.

१३) तत्कालीन काळात शेती व शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती बिकट होत चालली होती. त्याच कारण म्हणजे शेतकऱ्यांचा अशिक्षितपणा व दैववादी प्रवृत्ती यामुळे शेतीची दुरावस्था झाली होती. यासाठी म्हणून शासनाने शेतकरी कुटुंबातील स्त्री व पुरुष या दोघांनाही शेतीविषयक शिक्षण देऊन शेती विकासाला चालना द्यावी. यासाठी त्यांनी शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथाच्या माध्यमातून अज्ञानामुळे काय होऊ शकते याचे विवेचन केलेले आहे.

**सारांश :**

प्राथमिक शिक्षण हे प्रत्येक बालकासाठी महत्त्वाचे असून ते मिळणे हा त्यांचा हक्क आहे. तसेच जोतिराव प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत असावे या विचारांचा पुरस्कार करणारे भारतातील प्रथम व्यक्ती होती.महात्मा फुले यांचे शिक्षण हे आधुनिकतेला स्पर्श करणारे, सर्व घटकांना समाविष्ट करून घेणारे, विकासाभिमुख व परिवर्तनवादी होते. तसेच स्त्री शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करताना, त्यांनी हंटर शिक्षण आयोगापुढे स्त्रियांचा मागासलेपणा दूर होण्यासाठी व लहानपणीच शिक्षण मिळावे यासाठी साक्ष दिली. तसेच विशेष करून महिलांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात व्हावा अशी मागणी केली. महात्मा फुले यांनी तत्कालीन काळात शेतकरी व शेती विषयक असंख्य प्रश्न व त्यासाठीच्या उपाययोजना याचे विवेचन शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकाच्या माध्यमातून केले. खरं म्हणजे ज्योतिराव फुले यांनी शूद्रातिशूद्र व शेतकऱ्यांना शिक्षण व किफायतशीर शेतीच्या माध्यमातून विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी केलेले प्रयत्न समाजोपयोगी आहेत. एकंदरीत थोर समाज सुधारक, आर्थिक व सामाजिक विचारवंत, राजकीय व वैचारिक प्रगल्भता असणारा नेता, शेतकरी कैवारी, शूद्रातिशूद्रांचा मसीहा, उत्तम प्रगतशील शेतकरी, शिक्षणाचे प्रश्न मांडणारा शिक्षण तज्ञ, असंख्य चळवळीचा प्रणेता, महिला विकासाचा उद्धारक, पुरोगामी विचारवंत, अज्ञानाचे रुपांतर ज्ञानात करणारा ज्ञानवान गुरु, पर्यावरणवादी, शिवप्रेमी, लेखक, भरकटलेल्या समाजाला दिशा देणारा मार्गदर्शक, इतिहास तज्ञ अशा विविध रूपात कार्य करणाऱ्या महात्मा ज्योतिराव फुले हे महाराष्ट्राला किंबहुना देशाला दीपस्तंभासारखे दिशा देणारे क्रांतीसूर्य आहेत.

**पारिभाषिक शब्द :**

* शेतकऱ्यांचा आसूड : तत्कालीन काळातील शेती व शेतकरी यांच्याविषयी भाष्य करणारा ग्रंथ

* शुद्रातिशुद्र : सामाजिक, आर्थिक, इतर सर्व गोष्टी पासून वंचित व गुलामगिरीत राहणारा समाज होय.

**स्वयं अध्ययनांसाठीचे प्रश्न :**

१. महात्मा फुले यांचा ................ हा ग्रंथ शेती व शेतकरी प्रश्नाविषयी चर्चा करणारा आहे.

अ) ब्राह्मणाचे कसब ब) शेतकऱ्यांचा आसूड क) गुलामगिरी ड) सत्सार

२. महात्मा फुले यांनी ................आयोगासमोर शिक्षणाविषयी साक्ष दिली.

अ) हंटर ब) चर्चिल क) विल्सन ड) लिंकन

३. महात्मा फुले यांच्या मते, शिक्षक हा ....................

अ) उत्तम वक्ता असावा ब) मुलत: शेतकरी असावा क) उत्तम अभ्यासक असावा ड) यापैकी नाही

४. म. फुल्यांनी पुण्यात मुलीसाठी पहिली शाळा ......... या साली स्थापन केली.

अ) १८४८ ब) १८४९ क) १८५० ड) १८५२

५. ...................... यांनी शैक्षणिक तत्वज्ञानाचा पाया घातला.

अ) म. फुले ब) डॉ. आंबेडकर क) शाहू महाराज ड) दादाभाई नौरोजी

**सरावासाठी स्वाध्याय :**

१) महात्मा फुले यांच्या शिक्षण विषयक विचारांची सविस्तर चर्चा करा.

२) महात्मा फुले यांचे शेती विषयक विचार स्पष्ट करा.

३) म. फुले यांच्या कार्याचे सविस्तरपणे मूल्यमापन करा.

४) महात्मा फुले यांचे शेतकरी विषयक विचार स्पष्ट करा.

**संदर्भ ग्रंथ :**

१) जोतीराव गोविंदराव फुले - विकिपीडिया

२) पाटील जे.एफ.(२०१६), 'आर्थिक विचारांचा इतिहास भाग २', फडके प्रकाशन, कोल्हापूर

३) कंकाळे वैशाली शा. शिक्षण संक्रमण

## २.२ छ. राजर्षी शाहू महाराज यांचे शेती व सहकार विषयक विकासात्मक धोरण

**(Rajarshi Shahu Maharaj : Policy for Agricultural Development and Co-operative Development)**

**जीवन परिचय :**

रयतेचा व लोकदिलाचा राजा श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म २६ जून १८७४ रोजी जयसिंगराव उर्फ आबासाहेब महाराज व महाराणी राधाबाई या दांपत्यांच्या पोटी कागल येथील घाटगे या राजघराण्यात झाला. मुळात शाहूराजांचे जनकपिता आबासाहेब घाटगे हे कागलचे जहागीरदार आणि कोल्हापूर संस्थानचे रिजंट होते. छत्रपती शाहू राजांचे पूर्वाश्रमीचे नाव यशवंत जयसिंगराव घाटगे असून दत्तक विधानानंतर त्यांचे नाव शाहू असे नामकरण केले. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे छ. शिवाजी महाराजांच्या मृत्यूपश्चात त्यांची धर्मपत्नी महाराणी आनंदीबाई यांनी घाटगेपुत्र यशवंत यांना विधीपूर्वक १७ मार्च १८८४ मध्ये दत्तक घेतले. त्यानंतर छत्रपती शाहू राजांचे बालपण व शिक्षण धारवाड व राजकोट येथे पूर्ण झाले. शाहू राजे अभ्यासाव्यतिरिक्त कुस्ती, घोडेस्वारी, कवायत, कसरत, नेमबाजी व मर्दानी खेळात पारंगत झाले होते. त्यांच्या शिक्षण प्रवासात योजनाबद्ध अभ्यासक्रम आणि विविध उपक्रमाद्वारे एक उत्तम राज्यकर्ता व माणूसपण घडविण्याचे काम त्यांचे गुरुवर्य स्टुअर्ट फ्रेझर या इंग्रज अधिकाऱ्याने केले. फ्रेजर यांनी शाहू राजांच्या व्यक्तिमत्वाला आकार देताना देशाची, देशबांधवांची,ऐतिहासिक स्थळांची व महत्त्वाच्या धार्मिक स्थळांची माहिती आणि संपर्कातून शाहू राजांचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे छ. शाहू हे अनुभव संपन्न व नव विचारांनी प्रेरित झाले.त्यानंतर १ एप्रिल १८९१ रोजी बडोद्याचे गुणाजीराव खानविलकर यांची कन्या लक्ष्मीबाई यांच्याशी शाहूराजे विवाहबद्ध झाले. या दांपत्याच्या पोटी राजकन्या राधाबाई व तनुजा आणि पुत्ररत्न राजाराम व प्रिन्स शिवाजी यांनी जन्म घेतला.

२ एप्रिल १८९४ रोजी राज्यकारभाराची सूत्रे अधिकृतपणे स्वीकारल्यानंतर खऱ्या अर्थाने कोल्हापूर संस्थानाच्या सर्वांगीण विकासाला सुरुवात झाली.सन १८९४ ते १९२२ या २८ वर्षाच्या कालखंडात त्यांनी कोल्हापूर संस्थान व परिसर कृषी-औद्योगिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय, कला व क्रीडा ही क्षेत्रे क्रांतीमय व परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी संपूर्ण हिंदुस्थानात कोल्हापूर संस्थानाच्या माध्यमातून सामाजिक व ऐतिहासिक क्रांती घडवून आणली. महात्मा ज्योतिराव फुले यांना गुरु मानून सामाजिक क्रांतीचे बीजारोपण संस्थांनाबरोबर संपूर्ण हिंदुस्थानात करण्याचा प्रयत्न केला. शाहू राजांनी शेतकरी व शेती विकासासाठी उचललेली पावले व धोरण हे कृषी क्रांति व शेती विकास घडवून आणणारी होती. त्यामधील शेतीसाठीचे चहा व कॉफीचे नव-नवीन प्रयोग, कृषी प्रदर्शन, शेतीची आधुनिक पद्धती,राधानगरी धरणाची निर्मिती, मधुमक्खी पालन, जनावरांची पैदास, कृषी महाविद्यालय व कृषी शिक्षणाच्या माध्यमातून चौफेर केलेली प्रगती ही क्रांतिकारक आहे. तसेच व्यापार, सहकार, राजस्व, उद्योग क्षेत्र, मूलभूत क्षेत्र,सेवाक्षेत्र,जाती व्यवस्था निर्मूलन व आरक्षण यामध्ये केलेली प्रगती उल्लेखनीय आहे.

एकंदरीत कृषीशिक्षण व कृषीप्रगती यासाठी छत्रपती शाहू राजांनी केलेले वेगळे प्रयोग हे तत्कालीन काळात व आज वर्तमानातही बहुपयोगी आहेत हे मात्र सत्य आहे. करवीर नगरीचा बहुजनांचा कर्तबगार राजा अशा या बहुआयामी, आपल्या कार्यातून अजरामर झालेले व जनतेचा राजा ५ मे १९२२ रोजी कालवश झाले.

खालील घटकात छ. शाहू महाराज यांचे शेतीविषयक विचार व जल व्यस्थापन - धोरण या विषयी सविस्तर अभ्यासपूर्ण मांडणी केली आहे.

**कृषीविषयक दृष्टीकोण :**

राजश्री शाहू यांनी करवीर संस्थानाची सूत्रे स्वीकारल्यानंतर शेतीप्रगती विषयक धोरण डोळ्यासमोर ठेवून आपल्या राज्य कारभाराला सुरुवात केली. त्याची सुरुवात त्यांनी १९०२ मध्ये युरोप दौऱ्यावर असताना रॉयल ॲग्रिकल्चरल सोसायटी ऑफ इंग्लंड या सुप्रसिद्ध शेती संशोधन संस्थेचे स्वतःहून सभासदत्व स्वीकारले यातून शाहू राजांचा शेतीविषयक दृष्टिकोण उघड होतो.

शाहू राजे यांचा शेती व शेतकरी यांना केंद्रस्थानी मानून त्यांच्याबद्दल संवेदनशीलता ठेवून आपले संस्थान कृषी संपन्न करण्याचा प्रयत्न खूप महत्त्वाचा होता. त्या काळात करवीर संस्थानाची लोकसंख्या ८ ते ९ लाख होती.संस्थान हे कृषिप्रधान असल्यामुळे शेतकऱ्यांचे हित, कल्याण, शेतीची प्रगती करणे हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून महाराज संस्थानाच्या शेती प्रगतीसाठी सातत्याने कार्य करीत होते.

छ. शाहू राजांचे एक वैशिष्ट्य म्हणजे शेतकऱ्यांचा सन्मान करण्यासाठी राजा असूनही संस्थानात दौऱ्यावर असताना शेतमाल व इतर प्रकारचे जिन्नस शेतकऱ्यांकडून विकत घेत व त्याचा पैसा संस्थानकडून अदा केला जात होता. तसेच ते जाणीपूर्वक मुक्कामाच्या ठिकाणी त्या गावातील किंवा परिसरातील बाजारपेठेतून बोकड, कोंबड्या, मसाले व इतर प्रकारचे वस्तू ते पैसे देऊन विकत घेत असत. यामधून संस्थानातील रयतेचा विचार करून त्यांचा सन्मान राखला जात होता.

शाहू राजांचे कार्य शेती विकासासाठी पावलोपावली प्रकर्षाने दिसून येते. कोणतेही काम करत असताना भविष्याचा वेध घेत भावीपिढीचा समग्र विचार करून केले जात असे. शेतीकडे पाहण्याचा पारंपारिक दृष्टीकोनाचा त्याग करून शेती व शेतकरी राजा आधुनिक शेती पद्धतीची कास धरून प्रगतिशील शेती करावी अशी अपेक्षा होती. यासाठी त्यांनी शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करण्याचा प्रयत्न केला होता त्यामध्ये काही पातळीवर ते यशस्वी झाले.

अखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय परिषद सन १९१९ मध्ये कानपुर मध्ये आयोजित करण्यात आली होती या परिषदेस शाहुराजांना अध्यक्ष म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. या परिषदेत शेती व्यवसायाचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न शाहू राजांनी केलेला होता. या परिषदेत ते सर्व कुर्मी बांधवांना उद्देशून म्हणाले होते की, माझे वाडवडील शेती व्यवसाय करत होते आणि माझे पूर्वज हाच व्यवसाय करत होते. त्यामुळे मी पहिला शेतकरी असून नंतर राजा आहे. शेतीची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी त्यांनी चक्रवती राज्याचे उदाहरण दिलं, चक्रवर्ती राजा व त्याचे मंत्री वर्षातून एकदा नांगर हाकत असे. ज्यामुळे जमिनीत एक दाना टाकून हजारो दाने उत्पादित होत असतात तसेच या शेतीवर संपूर्ण मनुष्यजात उपजीविका करीत आहेत त्यामुळे शेतकरी हा अन्नदाता असून तो हलका नाही. त्याचबरोबर कृषीचे महत्व ओळखून मी माझ्या युवराजला शेती ज्ञान होण्यासाठी अलहाबादला कृषी शाळेमध्ये व परदेशात पाठविले होते. शेतकरी हा साधा नसून तो राजा आहे कारण तो जगाचा पोशिंदा आहे अशा प्रकारचा

विचार त्यांनी या सभेत मांडून शेती व शेतकऱ्याचा मान-सन्मान वाढविला होता. त्यांचा शेतकऱ्याविषयी असलेला मनाचा मोठेपणा आणि त्यांनी केलेले विधायक कार्य ही शेतीविषयक धोरणाच्या अनुषंगाने समर्थनीय आहेत.

**२) शेती व शिक्षण :**

छत्रपती शाहू राजे हे जोतिरावांच्या सामाजिक चळवळीने प्रेरित होऊन शेती व शिक्षण या विषयक दोघांच्या झाल्याने विचारात साम्य होते. शाहूराजे हे एका संस्थानचे प्रमुख असल्यामुळे त्यांच्यावर संस्थानाच्या सर्वांगीण विकासाची मोठी जबाबदारी होती. यासाठी संस्थानाचा मूलाधार व कणा म्हणून शेतीकडे पाहिले जात होते. त्यामुळे शेतीचा विकास करण्यासाठी प्राथमिक व कृषी शिक्षण देणे अनिवार्य होते हे त्यांनी ओळखलं होते.

शाहू राजांनी संस्थानाची सूत्रे हाती घेतल्यानंतर सन १८९१ साली राजाराम हायस्कूलमध्ये शेती हा नवीन विषय सुरु केला होता ज्याचा हेतू विद्यार्थ्यांना बालपणीच शेतीविषयक गोडी निर्माण व्हावी असा होता. त्यानंतर महाराजांनी आधुनिक शेती विकासाचा विचार करून त्याचा लाभ कोल्हापूर संस्थानातील शेतकऱ्यांना मिळावा यासाठी म्हणून सन १९०६ साली पी.सी. पाटील या मुलास पुणे येथील 'ॲग्रिकल्चर कॉलेजमध्ये' शेती शिक्षणासाठी पाठविले होते.

शेतीचा सर्वांगीण विकास करण्यासाठी स्वतः महाराजांनी आपल्या युवराज यांना शेती शिक्षणासाठी विदेशात धाडले होते. तसेच शेतीमधील बदलते प्रवाह शेतकऱ्यांना माहित होण्यासाठी शाहूनी १९१२ साली 'द किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूटची' स्थापना कोल्हापूरात करून त्यांनी शेती विकासाविषयकचा असलेला आपला मनसुबा जाहीर केला. त्याचबरोबर सन १९१३ मध्ये शेती सुधारणा या पुस्तकाच्या १०० प्रतीं विकत घेऊन त्यांनी संस्थानातील ग्रंथालयामध्ये ठेवण्याची व्यवस्था केली. त्यामुळे वाचकांना शेतीतील नवनवीन प्रयोग व शेतीविषयक नवीन सुधारणेची माहिती प्राप्त होईल. तसेच त्यांनी विदेशात शेती विषयक पदवी संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक सहकार्य व बिनव्याजी कर्ज देण्याची व्यवस्थाही केली होती.

शेतकऱ्यांच्या अशिक्षितपणा व अज्ञानामुळे त्यांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती बिकट होत होती. यातून बाहेर येण्याचा एकमेव मार्ग म्हणजे शिक्षण होय हे महाराजांनी ओळखलं होतं. यासाठी म्हणून त्यांनी सन २५ जुलै १९१७ मध्ये संस्थानातील मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. शिक्षणामुळे मुलांना शेतीज्ञान प्राप्त होऊन उत्तम व किफायतशीर शेती करतील अशी अपेक्षा होती. संस्थानातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती दयनीय असल्यामुळे ते आपल्या मुलास शाळेत पाठवत नव्हते. त्यामुळे हे विद्यार्थी त्यापासून वंचित राहतील अशी महाराजांना भीती वाटत होती. त्यामुळे त्यांनी सन १९१९ मध्ये दिवसातून सकाळी व रात्री या दोन्ही वेळेस १ ते २ तास शिक्षण देण्याची व्यवस्था केलेली होती. सन १९९४ साली एकूण शिक्षण संस्था २२४ होत्या सन १९२२ सली ५५९ इतक्या वाढल्या होत्या. तसेच शिक्षणासाठी येणाऱ्या खर्चात सातत्याने वाढ होत गेली. राजांच्या धोरणामुळे कॉलेज शिक्षण घेणाऱ्या ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांची संख्या पाच पटीने तर; अस्पृश्य विद्यार्थ्यांची संख्या नऊ पटीने वाढली आणि शिक्षणावर खर्च तीन पटीने वाढला. या सर्व खर्चाची तरतूद राजाने दूरदृष्टिकोन

डोळ्यासमोर ठेवून केली होती कारण बहुजन समाजाच्या उद्धारासाठी व शेती विकासासाठी शिक्षण हा प्रमुख मार्ग आहे हे सत्य त्यांनी ओळखले होते.

शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे; शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो. त्यामुळे या बहुजन समाजाने शिक्षण घ्यावे यासाठी म्हणून संपूर्ण हिंदुस्तानासाठी शिक्षण सक्तीचे व मोफत करावे असे त्यांचे मत होते. याला अनुसरून शाहू राजांनी प्रत्येक खेडे गाव एक घटक मानून गाव तेथे शाळा असा आदर्श उपक्रम बाळगून प्रत्यक्षात त्याची कृती होण्यासाठी कायद्याचा वापर केला. शिक्षण व शेती याचे महत्त्व जाणल्यामुळे त्यांनी मुलांना शाळेत न पाठवणाऱ्या आई-वडिलांना दरमहा १ रुपये दंड करण्याचे आदेश काढले होते. सर्वात महत्वाचे म्हणजे मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा खर्च भागविण्याची तजवीज म्हणून शहरातील व्यापारी व श्रीमंत वर्गावर शिक्षण कर लादला होता. हे भारताच्या शैक्षणिक इतिहासामध्ये प्रथमच घडले होते.

**सहकार क्षेत्रातील नेत्रदीपक कामगिरी :**

शाहू राजांनी तत्कालीन काळात सहकार क्षेत्राचे महत्व ओळखून त्यांनी जाणीवपूर्वक करवीर संस्थानातील रयतेचा विचार करून सन १९१२ साली 'सहकारी संस्थाविषयक कायदा' पारित करून तो जारी करण्यात आला. सन १९१३ मध्ये भास्करराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली 'दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि.' या पहिल्या सहकारी संस्थेची मुहूर्तमेढ रोवली, आणि अल्पकाळात सन १९२१ मध्ये संस्थानात ३७ सहकारी संस्था औद्योगिक क्षेत्रात स्थापन झालेल्या होत्या. या जिल्ह्यात शेतकऱ्यांना अर्थपुरवठा करणारे व विविध साधनांची पूर्तता करणाऱ्या कार्यकारी संस्था, शेती पाणीपुरवठा करिता सहकारी उपसा जलसिंचन संस्था, दूध संकलन व प्रक्रिया करणाऱ्या सहकारी दुग्ध संस्था होत्या. तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या अर्थचक्राला चालना देण्यासाठी निर्माण झालेल्या ग्रामीण पतपुरवठा संस्था अशा हजारो सहकारी संस्थांच्या माध्यमातून तयार झालेले विकासाचे जाळे हे कोल्हापूर जिल्ह्याच्या उत्कर्षामध्ये प्रचंड मोठे योगदान देत आहे. याची सुरुवात शाहूराजांनी अत्यंत दूरदृष्टीने केलेली होती.

**शेती व कर्जपुरवठा :**

शाहू राजानी संस्थानाची सूत्रे हाती घेतल्यापासून करवीर संस्थानाच्या विकासासाठी प्रगती करण्याचा ठाम निश्चय केलेला होता. त्या काळात ओल्या व कोरड्या दुष्काळाचं सावट मोठ्या प्रमाणात असल्यामुळे शेती करण्यासाठी करवीर जनतेने तात्पुरत्या काळासाठी व्यापारी व सावकाराकडून अवाच्या सव्वा व्याज दराने मोठ्या प्रमाणात कर्ज उचलले होते. परंतु एकदा सावकाराकडून कर्ज घेतलं की त्या कर्जाच्या सापळ्यात हा शेतकरी अडकत असे. तसेच शेतकरी नाडल्यामुळे हे सावकार त्याचा गैरफायदा घेत, व्याज व मुद्दलापायी दुभती जनावरे व बैल ओढून नेत प्रसंगी जमिनी काढून घेतल्या जात होत्या. तसेच इतर शारीरिक व मानसिक प्रकारे ही त्रास दिला जात होता. शाहूराजांनी हे सर्व ओळखून या व्यापाऱ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी योग्य तो फतवा काढलेला होता. परंतु कायमची सावकारशाहीतून या रयतेची मुक्तता व्हावी यासाठी सहकारी तत्त्वावरील सहकारी पतपुरवठा करणाऱ्या संस्थाची निर्मिती करून दुष्काळजन्य परिस्थितीत नाडलेल्या या शेतकऱ्यांना वाजवी व्याजदरात कर्ज पुरवठा केला जात होता. एका आकडेवारीनुसार राजांनी शेतकऱ्यांना भरीव आर्थिक सहाय्य व कर्जपुरवठा केलेला

होता तर काही पातळीवर व्यापारी व सावकारांच्या तावडीतून जमिनी सुरक्षित केल्या होत्या

शाहूराजांनी सन १९०४ मध्ये संस्थानातील जनतेच्या माध्यमातून व सहकार्यातून 'व्हिक्टोरिया मेमोरियल फंडाची' उभारणी करून या फंडातील रकमेतून गरीब व गरजू शेतकऱ्यांना व्याजदराने पत पुरवठ्याची सोय केलेली होती. या यशस्वी मेमोरीयल फंडाच्या नंतर त्यांनी नवीन 'द किंग एडवर्ड फंडाची'उभारणी संस्थानात केली.अशा असंख्य फंडांची निर्मिती करून गरजू शेतकऱ्यांना कर्जपुरवठा व संस्थानला व्याजदराची व्यवस्था केली होती. त्या काळात सन १९०६ ते १९२२ या कालखंडात शाहू राजांनी संस्थानातील आर्थिकदृष्ट्या पिचलेल्या शेतकऱ्यांना शेती विकासासाठी एकूण २५,५३,२८० रू.चा कर्ज पुरवठा केलेला होता.आजच्या घडीला ही रक्कम अत्यंत कमी वाटत असली तरी त्या काळात प्रचंड होती हे मात्र सत्य आहे.

तसेच शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला शेतमाल विकण्यासाठी सबन संघटनेचा अभाव होता. याचा फायदा घेत व्यापारी, दलाल व सावकार यांनी शेतकऱ्यांचे शोषण केलं होते यावर सक्षम उपाय म्हणून शाहू राजांनी शेतकरी संघटनांचे महत्त्व लक्षात घेऊन सवलतीच्या दरात कर्ज पुरवठा व उत्तम कृषी संघटनेची बांधणी व्हावी या हेतूने सन १९१२ साली कोल्हापूर संस्थानासाठी सहकारी कायदा लागू केला होता.या माध्यमातून कृषी संघटनेच्या बांधणीला चालना मिळाली आणि अल्पावधीतच सध्या अस्तित्वात असलेल्या शाहू मार्केट यार्डची उभारणी झाली.

**जमिनीचे विभाजन व तुकडीकरणाला विरोध :**

हिंदुस्थानातील शेती उत्पादनाच्या प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा अडसर म्हणजे जमिनीचे विभाजन व तुकडीकरण. त्यामुळे जमिनीमध्ये कोणत्याही प्रकारच्या आधुनिक यंत्रे तंत्रज्ञानाचा वापर करता येणार नाही यासाठी शाहू राजांनी जमिनीचे विभाजन व तुकडीकरण या संदर्भात केलेले विवेचन पाहण्यापूर्वी महात्मा फुलेनी याबाबतीत लोकसंख्या नियंत्रण व लहान कुटुंबाची कल्पना मांडलेली होती त्याचा प्रथम अभ्यास केला. त्यामुळे जमिनीचे विभाजन होऊ शकत नाही हाच धागा धरून छ.शाहू राजांनी कोल्हापूर संस्थानात जमिनीचे होणारे विभाजन व तुकडीकरण पाहता यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना यामध्ये लक्ष घालून जमिनीचे विभाजन व तुकडीकरण का होते? याचा संशोधनात्मक अभ्यास करण्यास सांगितले. डॉ. आंबेडकरांनी याचा संशोधनात्मक व वास्तव अभ्यास करून असे निष्कर्ष मांडले की, वाढती लोकसंख्या हे याचे मुख्य कारण असून अन्य प्रकारच्या रोजगाराच्या संधी उपलब्ध नसणे हे ही त्याचं दुय्यम कारण आहे. यामुळे हे विभाजन होते. अशा प्रकारचा युक्तिवाद केला. यावर शाहूराजांनी संस्थानात लोकसंख्या नियंत्रण व छोटे कुटुंबाची संकल्पना स्वीकारली.

यापुढे जाऊन महाराजांनी या सर्व गोष्टींचा सारासार विचार करून संस्थानातील सर्व इनाम जमिनी हे अविभाज्य असून त्याचं विभाजन व तुकडीकरण होणार नाही अशा प्रकारचा क्रांतिकारक निर्णय घेतला. तसेच त्यांनी सन १९२० मध्ये डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली माणगाव येथे अस्पृश्य समाजाची परिषद भरवली होती. या परिषदेत प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना शाहू राजे रयतेला उद्देशून म्हणाले, सर्व महार व बलुतेदारास वगैरे वतनदारास अशी विनंती करतो की, सर्व जनता ही वतनाच्या मागे लागत असून वतने म्हणून

दिलेल्या जमिनीच्या माध्यमातून आपली प्रगती होणार नाही. उलट त्याचं विभाजन होऊन जमिनीचा पर्याप्त वापर व आधुनिक यंत्र व तंत्रज्ञानाचा वापर करता येणार नाही. यासाठी पर्याय म्हणून बाहेरगावी व्यापार व धंदा करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही अशा प्रकारचा ठाम विचार त्यांनी मांडला.

अशा प्रकारे प्रबोधनात्मक व काही पातळीवर बंधनात्मक उपाययोजना करून अंशत: का होईना जमिनीच्या विभाजनास प्रतिबंधात्मक उपायाद्वारे यश मिळवले.

**शेतीत आधुनिकता व प्रयोगशील उपक्रम :**

शेती हा करवीर संस्थानच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असून शेतीचा उद्धार केल्याशिवाय शेतकऱ्यांचा पर्यायाने देशाचा विकास होऊ शकणार नाही. हे मूलभूत विचार डोळ्यासमोर ठेवून महाराजांनी शेतीचे उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी शेतीमध्ये आधुनिकतेची कास धरणे व प्रयोगशील उपक्रम राबवणे असा दुहेरी हेतू डोळ्यासमोर ठेवून त्यांनी संस्थानच्या शेतीचा कायापालट करण्याचा प्रयत्न केला.

प्रारंभिक शाहूराजांनी हिंदुस्तानातील शेतीच्या विकासातील अडसरचा अभ्यास करून आपल्या संस्थानात पारंपारिक पद्धतीने सुरू असलेली शेती मध्ये बदल करून त्याला आधुनिकतेची जोड देणे हे त्यांनी ओळखले. यासाठी म्हणून सन १९१२ मध्ये संस्थानात 'द किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूटची' स्थापना करून ज्याद्वारे आधुनिक शेती संदर्भातील सर्व प्रकारचे उत्तम व प्रयोगशील शिक्षण देता येईल यासाठी प्रयत्न केले. तसेच त्यांनी हुशार बुद्धिमान विद्यार्थ्यांना शेतीतील नवनवीन प्रयोग व शेती शिक्षण प्राप्त करावे यासाठी विदेशात पाठवून त्यांना आर्थिक सहकार्य केले. त्यांच्या शिक्षण संपादणुकीनंतर करवीर संस्थानच्या आधुनिक शेती प्रयोगासाठी उपयोग करून घेतला. तसेच महाराजांनी शेतीचे नवनवीन प्रयोग आणि संशोधन याचा मागोवा घेतला. शेतीच्या उत्पादन वाढीसाठी जुन्या शेती अवजाराच्या ऐवजी नवनवीन अवजारे आणण्यासाठी प्रयोग केले. त्यासाठी त्यांनी संस्थानातील तोफांचा वापर करून शेती उपयुक्त अवजारांची निर्मिती केली. तसेच शेतीत मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणण्यासाठी तज्ञांची प्रात्यक्षिके तसेच कृषी प्रदर्शने भरवून आधुनिकतेची कास धरून उत्तम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना बक्षिसे देण्यात आली व शेती संस्थांची निर्मिती व शेतीला उपयुक्त जनावरांची प्रदर्शने भरवून शेती विकासासाठी प्रयत्न केले. शेती विकास व शेतीपूरक उद्योगांना त्यांनी प्रोत्साहन दिले. शेतीसाठी आवश्यक असणारी हत्यारे व अवजारांचे उत्पादन करणाऱ्या उद्योगधंद्यांना देखील आर्थिक सहकार्य करून प्रोत्साहन दिले.

शाहू राजांनी करवीर संस्थानातील शेती व पूरक उद्योगांच्या विकासासाठी नव-नवीन प्रयोग करुन प्रयोगशीलतेला प्राधान्य दिले. यासाठी मोठ्या प्रमाणात कृषी प्रदर्शने भरवण्यात आली. त्याच बरोबर पन्हाळा व भुदरगड या ठिकाणी चहा व कॉफी लागवडीचे यशस्वी प्रयोग करण्यात आले. शिवाय ताग, अंबाडी, रबर, वेलदोडे, कोको, लाख व कंबोडियन कापूस आदीची लागवड करून शाहूराजांनी एक प्रकारे प्रगतीचे व प्रयोगशीलतेचे मापदंड निर्माण केले. तसेच शाहू राजांनी गरजेनुसार आवश्यक असणाऱ्या रोपांची रोपवाटिका तयार केल्या. त्याचबरोबर राजाराम कॉलेज लगत असणाऱ्या जमिनीवर 'आदर्श शेती प्रयोग' करून नवीन शेती प्रयोग व विकासाला चालना दिली. आधुनिक शेतीची माहिती व ज्ञान प्राप्त होवून त्यामधून नवीन प्रयोगशीलतेला

वाव मिळावा यासाठी संस्थानातील विविध ग्रंथालयांमध्ये शेती संदर्भातील पुस्तके ठेवण्यात आली.

**कृषी प्रदर्शने :**

संस्थानातील शेती व शेतकरी राजाचा विकास केल्याशिवाय संस्थानाचा किंबहुना देशाचा विकास होणार नाही हे त्यांनी ओळखलं होते. यासाठी नवनवीन प्रयोग त्यांच्या माध्यमातून संस्थानात सुरू होते. मुळात शाहू राजांनी शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून त्यांच्याविषयी संवेदनशीलता दाखवून शेतीत आमूलाग्र बदल करण्याचा कदाचित संकल्प केला असावा असे वाटते.

युरोप दौऱ्यावेळी त्यांनी विदेशातील कृषी उत्पादन व कृषी प्रदर्शने पाहून ते भारावून गेले होते. अशा प्रकारचे कृषी प्रदर्शन आपल्या करवीर संस्थानात दर वर्षी भरविले तर त्याचा निश्चित लाभ करवीर संस्थानातील व आजूबाजूच्या परिसरातील लोकांना होईल हे त्यांनी जाणले.तसेच जगात होणाऱ्या शेती बदलाची माहिती करवीर वासियांना व्हावी या हेतूने त्यांनी  कृषी प्रदर्शने भरविण्याचे निश्चित केले. त्यानुसार सर्वप्रथम 'चिंचणी' या ठिकाणी शेती व जनावरांचे प्रदर्शन भरविले. यामध्ये एका भागात शेती उत्पादन व शेती अवजारे व दुसऱ्या भागात घोडे व इतर जनावरांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

चिंचणी मधील कृषी प्रदर्शन यशस्वीरित्या संपन्न झाले. मात्र त्याचा लाभ हे चिंचणी व चिंचणी लगत असणाऱ्या कर्नाटकातील लोकांना झाला. हे महाराजांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी कोल्हापुरातील खासबाग मैदान या ठिकाणी कृषी प्रदर्शन भरवण्याचा निश्चय केला व त्यानुसार कृषी प्रदर्शनाला औद्योगिक प्रदर्शनाची जोड देऊन हे प्रदर्शन यशस्वी करण्याचे निश्चित करण्यात आले. दर वर्षी ज्योतिबा यात्रेच्या तोंडावर कृषी प्रदर्शने भरवून संस्थानातील शेतकऱ्यांना कृषी ज्ञानाचा व माहितीचा खजाना देण्यात आला. यानुसार शाहूराजांनी प्रदर्शन काळात शाळा-कॉलेजना तीन दिवस सुट्ट्या देण्यात आल्या. तसेच या प्रदर्शनात लोकांची रुची वाढावी या हेतूने मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून शेतकरी व विद्यार्थी यांचा लाभ मोठ्या प्रमाणात व्हावा हा त्यांचा हेतू सफल झाला. कृषी प्रदर्शनासाठी प्रचंड प्रमाणात संस्थानाच्या वतीने खर्च करण्यात येत असे.

आजच्या परिस्थितीत देशात व महाराष्ट्रात विविध स्वरूपाची कृषी व जनावरांची प्रदर्शने भरविण्यात येत आहेत, याची प्रेरणा ही १२५ वर्षांपूर्वी महाराजांनी सुरू केलेल्या या कृषी प्रदर्शनातून होत आहे हे मात्र उघड सत्य आहे.

**शेती व जोड व्यवसाय :**

कोल्हापूर संस्थानातील लोकसंख्या प्रचंड प्रमाणात असल्यामुळे व शेती हाच मुख्य व्यवसाय असल्याने मान्सूनमुळे शेती हा व्यवसाय जुगार बनला होता. त्याला पर्याय म्हणून शेतीपूरक उद्योगधंदे व जोड व्यवसाय सुरू करणे गरजेचे होतं यासाठी महाराजांनी आपली कल्पकता वापरून व विदेशातील अनुभव लक्षात घेऊन त्यांनी रेशीम उद्योग, मेंढी पालन, कुक्कुटपालन या व्यवसायाबरोबर बदक पालन यासारखे जोड व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रेरणा व आर्थिक  सहकार्य केले. कोल्हापूर संस्थानातील बराच भाग जंगलांनी व्यापलेला असल्यामुळे तेथील

लोकांना रोजगाराच्या नवीन संधी मिळाव्यात व शेतीला जोड व्यवसाय उपलब्ध व्हावा या हेतूने त्यांनी इटलीमधील पाहिलेला मधुमक्षिका पालन व्यवसाय आपल्या संस्थानात सुरू केला तसेच हा व्यवसाय सुरू करण्याचे जनकत्व शाहू राजांना जाते.

उपरोक्त शेती व शेतकरी विषयक संवेदनशीलता दाखवून शेतीचा विकास पर्यायाने संस्थानाच्या विकासाने झपाटलेल्या या लोकराजाने जे नवनवीन प्रयोग व उपक्रमशीलता दाखवली त्यामुळे त्यांचं कार्य हे प्रेरणादायी व आजच्या पिढीला आदर्श घेण्यासारखे आहे. सरतेशेवटी शाहूराजे हे युक्ती पेक्षा कृतीला महत्त्व देणारा कृतिशील राजा म्हणून त्यांची ओळख संपूर्ण हिंदुस्तानात होती.

**छ. शाहू महाराज व जलव्यवस्थापन :**

तत्कालीन हिंदुस्थानातील करवीर संस्थान हे ऐतिहासिक व छ.शिवाजी राजांची गादी म्हणून या संस्थानकडे पाहिलं जात होते. सन १८९६ मध्ये शाहू राजांच्याकडे या गादीची सूत्रे आल्यानंतर त्यांनी संस्थान विकासाचा संकल्प करून आपला हेतू स्पष्ट केला. यासाठी सर्वप्रथम त्यांनी कोल्हापूर संस्थानाचा भौगोलिक अभ्यास करून या संस्थानातील पूर्वेकडील निम्मा भाग हा दुष्काळ प्रवण क्षेत्र असून उर्वरित भाग हा मुसळधार पावसाचा होता. परंतु कोणत्याही प्रकारचे जलनियोजन नसल्यामुळे या संस्थानातील रयतेला पिण्यासाठी व शेतीसाठी बारमाही पाणी उपलब्ध होत नव्हते. यावर सखोल विचार करून व युरोपमधील पाणी व्यवस्थापनाचा अभ्यास करून त्यांनी करवीर संस्थानासाठी जल आराखडा निश्चित केला. त्यानुसार जुन्या विहिरी, नाले, तलाव व बंधारे या मधील गाळ काढून हे सर्व जलसाठे पुनर्भरणासाठी उपलब्ध केले. तसेच नव्याने विहिरी, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे व तलावांची निर्मिती करण्यात आली. एका उपलब्ध आकडेवारीनुसार त्याकाळी जलसिंचन सुविधावर येणारा प्रतिवर्षी खर्च हा रू. ७५,९६० इतका होता. त्यानुसार त्यांनी आपला जलनियोजन विषयक दृष्टिकोन समोर आणून एक कृतिशील राजा काय करू शकतो हे संपूर्ण हिंदुस्तानाला दाखवून दिले.

**राधानगरी धरण योजना :**

शाहू महाराज सन १९०२ ला युरोपला गेले असताना तेथील भौतिक प्रगतीने ते भारावून गेले जे यूरोपमध्ये विकासमय पायाभूत गोष्टी व रोजगार निर्माण करणाऱ्या योजना आहेत त्या सर्व गोष्टी आपल्या कोल्हापूर संस्थानात असाव्यात असे त्यांना मनोमनी वाटत असे.

शाहू राजांनी संस्थानातील सन १८९६-९७,१८९९-१९०० व १९१८-१९ या काळातील भयानक दुष्काळजन्य परिस्थितीचा वाईट अनुभव लक्षात घेऊन दुष्काळावर व जलसिंचनावर केलेला खर्च हा अपूर्ण वाटत असल्यामुळे यासाठी चिरंतन व दूरगामी परिणाम करणारी जलसिंचन योजना राबविणे गरजेचे आहे हे त्यांनी ओळखले.

सन १९०५ साली महाराजांनी महाराणी लक्ष्मीबाई तलाव अर्थात राधानगरी धरण बांधण्याचा निर्णय पक्का केला यासाठी त्यांनी जलसिंचन खात्यातील तज्ञांशी व मुंबई सरकार यांच्याशी विचार विनिमय करून सन १९०९ मध्ये प्रत्यक्षात धरण बांधण्यास सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी फेजिवडे गावच्या सीमेतील धरणासाठी जागा

निश्चित केली. सर्वात महत्त्वाचं म्हणजे हा परिसर सरासरी १५० इंच पाऊस पडणारा होता मात्र पाण्याखाली बुडणाऱ्या शेतीचे उत्पन्न अवघे त्या काळातील रू. ३००० होते त्यामुळे येथील लोकांचे खूप मोठे नुकसान होणार नव्हते. तसेच हे लोक विस्थापित झाल्यामुळे त्यांचे खूप मोठे नुकसान होणार नव्हते असा विचार करणारे छ.शाहू राजे होते.या भव्य धरणाच्या सुरवातीचा अपेक्षित खर्च हा जवळपास रू. ३० लाख होता. खरं म्हणजे संस्थानचे एकूण वार्षिक उत्पन्न जेमतेम २० ते ३० लाख इतके कमी असतानाही उत्पन्नाच्या तुलनेत हा खर्च संस्थानला न परवडणारा इतका होता परंतु 'संस्थानाचा विकास हा एकच ध्यास' पूर्ण करण्यासाठी महाराजांनी सुरुवात केली होती.

आरंभिक टप्प्यामध्ये उत्पन्नापेक्षा खर्चाचे प्रमाण सातत्याने वाढत होते, न झेपणारा अवाढव्य खर्च व ३००० इतके मजूर काम करीत होते. या खर्चाची अंशत तरतूद व्हावी म्हणून राजांनी संस्थानातील व इतर अन्य संस्थानातील दानशूर व्यक्तींना आर्थिक मदत व दान करण्यासंदर्भात आवाहन केले. याकामी महाराजांना शारीरिक व मानसिक खूप मोठा त्रास होत होता. असे असतानाही 'एकच ध्यास संस्थानाचा विकास' याप्रमाणे महाराज आपल्या कामाशी व तत्वाशी प्रामाणिक होते. यामुळे संस्थानातील पाण्याचा गंभीर प्रश्न मिटून कायमचा विकास होणार होता. मात्र सन १९१७ मध्ये पैशा अभावी व पहिल्या महायुद्धाचा परिणाम म्हणून धरणाचे काम मध्येच बंद करावे लागले. मात्र शाहू राजांच्या हयातीत हे धरणाचं काम पूर्ण होऊ शकलं नाही. त्यानंतर त्यांचे पुत्र राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानाचे राधानगरी धरणाच्या माध्यमातून पाहिलेलं स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करून सन १९५७ साली धरणाचे बांधकाम पूर्ण केले आणि कोल्हापूर जिल्ह्याच्या विकासाच्या जल व हरित क्रांतीला सुरुवात झाली. सुखी व समृद्ध कोल्हापूर ही ओळख प्राप्त होण्याचे एकमेव कारण म्हणजे छत्रपती शाहू राजांचे राधानगरी धरण होय.

**संस्थानातील विहीर, तलाव व अन्य जलस्त्रोत :**

सन १८९६-९९ या कालखंडात पडलेल्या भयंकर दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन शाहू राजांनी अन्नधान्याचा, गवत व चाऱ्याचा पुरवठा करून हजारो लोकांचे प्राण वाचविले होते. वारंवार पडणाऱ्या दुष्काळाची चिकित्सा करून या संकटावर एक सक्षम व प्रभावी मार्ग त्यांनी शोधला, त्यानुसार 'सार्वत्रिक पाटबंधारे धोरण' जाहीर केले व या खात्यासाठी इरिगेशन ऑफिसरची नेमणूक केली. या खात्याअंतर्गत प्रत्येक गावातील पाटबंधारे वैज्ञानिक दृष्टीने तपशीलवार पाहणी करण्यात आली व त्यानुसार नव्या जुन्या विहिरी, छोटे-मोठे तलाव व लहान-मोठे बंधारे या सर्वांच्या नोंदणी करून त्याच्या दुरुस्ती करण्यात आल्या. मुळात शाहूंच्या काळात विहिरी व तलाव हे जलसिंचनाचे प्रमुख जलस्त्रोत होते त्यामुळे या घटकावर जास्त लक्ष केंद्रित करण्यात आले.

त्यानंतर सर्व नवीन जलसाठा योजना तातडीने कार्यान्वित करण्यात आल्या. सन १९२१-२२ मध्ये १२०५७ विहिरी अस्तित्वात होत्या. त्याचं सातत्याने पुनर्जीवन करण्याचे काम करण्यात आले. तसेच त्यांनी पावसाच्या प्रत्येक पाण्याचा थेंब अडविण्यासाठीचे धोरण लक्षात घेऊन सुमारे कोल्हापूर पद्धतीचे २० बंधारे बांधले. या सर्वांचा परिणाम म्हणून सन १९२१-२२ मध्ये कोल्हापूर संस्थानातील जवळपास २७ हजार एकर जमीन ही जलसिंचनाखाली होती हे छ.शाहू राजांच्या जलनीती योजनेचे उत्तम यश म्हणून पाहिले जाते.

कोल्हापूर संस्थानांमध्ये तलावांची संख्या ही सुरुवातीपासून अधिक होती. मात्र शाहूराजांनी कोल्हापूर संस्थानातील विविध ठिकाणी नवीन तलावांची निर्मिती केली त्यासाठी सायफन पद्धतीचा वापर करून बारमाही पाणी उपलब्ध होईल याची व्यवस्था केली. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे सध्याचे शिरोळ नगरपरिषदेतील शाहू तलाव होय. तसेच त्यांनी कळंबा तलावातून सायफन पद्धतीने पाण्याचा खजिना येथे पाणी आणले आणि तेथून सर्व शहराला पाणीपुरवठा केला हे त्यांच्या जलनीती व व्यवस्थापनाचे उत्तम उदाहरण आहे.

**जल व्यवस्थापनावरील खर्च :**

सन १८९४ ते १९२२ या २८ वर्षाच्या कालखंडातील शाहू राजांचा जल व्यवस्थापनावर जवळपास एकूण खर्च रू. २१,२६,८८९ एवढा होता. खरं म्हणजे शाहुराजांच्या या एकूण कारकिर्दीतील सार्वजनिक खर्चावर होणाऱ्या खर्चापैकी हा खर्च जवळपास १८.३३ टक्के होता. याचा अर्थ छत्रपती शाहूंनी कोल्हापूर संस्थानाचा सर्वकष विकास करण्यासाठी जलनीती व व्यवस्थापनाला प्राधान्य देऊन कोल्हापूर जिल्ह्याच्या चिरंतन विकासाचा हेतू प्रकर्षाने लक्षात येतो. आजच्या परिस्थितीत हा खर्च कमी वाटत असला तरी त्या काळात तो प्रचंड व अवाढव्य होता हे मात्र सत्य आहे. रयतेचा व संस्थानाचा विकासाचा ध्यास धरून संस्थानाचा कायापालट करण्याचा विचार मनात येणे व प्रत्यक्षात कृतीत आणणारे असे कृतिशील राजे मात्र या पृथ्वीतलावर हाताच्या बोटावर मोजण्याइतपत दिसतात.

अशाप्रकारे शाहू राजांनी आपल्या तह हयातीत कोल्हापूर संस्थानातील शेती व शेतकरी केंद्रबिंदू मानून त्यांच्या पाण्याची व्यवस्था करून त्यांच्यासाठी सातत्याने झटणारा व जाणता राजा आहे हे लक्षात येते.

**सारांश :**

शाहू राजांनी शेतकरी व शेती विकासासाठी उचललेली पावले व धोरण हे कृषी क्रांति व शेती विकास घडवून आणणारी होती. त्यामधील शेतीसाठीचे चहा व कॉफीचे नव-नवीन प्रयोग, कृषी प्रदर्शन, शेतीची आधुनिक पद्धती, राधानगरी धरणाची निर्मिती, मधुमक्खी पालन, जनावरांची पैदास, कृषी महाविद्यालय व कृषी शिक्षणाच्या माध्यमातून चौफेर केलेली प्रगती ही क्रांतिकारक आहेत. तसेच व्यापार, सहकार, राजस्व, उद्योग क्षेत्र, मूलभूत क्षेत्र, सेवाक्षेत्र, जाती व्यवस्था निर्मूलन व आरक्षण यामध्ये केलेली प्रगती उल्लेखनीय आहे.महात्मा फुले यांना गुरुस्थानी मानणारा, संस्थानाच्या विकासाचा विशाल दृष्टिकोन, शेती व शेतकरी विकासाचा ध्यास असणाऱ्या, माझं जीवन कार्य म्हणजेच राधानगरी धरण असे मानणारा राजा, सहकार क्षेत्रातील दैदिप्यमान कामगिरी, उद्योग-व्यापार क्षेत्रात घेतलेली उंच भरारी, लोककल्याणकारी दृष्टी, असंख्य चळवळीचे जनक, शिक्षण तज्ञांचा मेंदू, ब्राह्मणेतर चळवळीचा पाठीराखा, कलावंतांचा आश्रयदाता, मानवतावादी दृष्टिकोन जपणारा व सत्यशोधकी पद्धतीने कार्य करणारा राजा माणूस म्हणजे छत्रपती शाहू महाराज होय. सरतेशेवटी अशा या असंख्य व्यक्तीमत्वाच्या पैलूनी बनलेला हा बहुआयामी जाणता लोकराजा होय.

**पारिभाषिक शब्द :**

* अस्पृश्यता : कनिष्ठ जातीतील माणसाने वरिष्ठ जातीतील माणसाला स्पर्श न करणे होय.

* राजर्षी : शाहू राजांनी सामान्य व बहुजन समाजासाठी केलेल्या योगदानाबद्दल कानपूरच्या कुर्मी समाजाने ही पदवी बहाल केली.

* विभाजीकरण : तुकडीकरण

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

१. शाहू राजांनी ............. साली संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले.

अ) १९१५ ब) १९१६ क) १९१७ ड) १९१८

२. ............. साली शाहू राजांनी राजाराम हायस्कूलमध्ये शेती हा नवीन विषय सुरु केला.

अ) १८९५ ब) १८९६ क) १८९७ ड) १८९८

३. छ. शाहू राजांचा जन्म २६ जून ............... रोजी झाला.

अ) १८७२ ब) १८७४ क) १८७६ ड) १८७८

४. शाहू राजांनी .............. साली संपूर्ण कोल्हापूर संस्थानात सहकारी कायदा लागू केला.

अ) १९१० ब) १९१२ क) १९१४ ड) १९१६

५. .............. साली कोल्हापूर संस्थानात चिंचली येथे शेती व जनवारांचे प्रदर्शन भरविले होते.

अ) १८९५ ब) १८९६ क) १८९७ ड) १८९८

६. शाहू राजांनी शेती उत्पादकता वाढविण्यासाठी ............ समर्थन केले आहे.

अ) जमीन विभाजन विरोधास ब) रासायनिक खतांचा वापरचे

क) पाणी पुरवठा करण्याचे ड) यापैकी नाही

७. छ.शाहू राजांनी सिंचन कार्यक्रमात सर्वाधिक महत्व ......... या घटकाला देण्यात दिले.

अ) राधानगरी धरण ब) विहीर क) तलाव ड) यापैकी नाही

**स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे :**

१. क) १९१७ २. ब) १८९६ ३. ब) १८७४ ४. ब) १९१२

५. ब) १८९६ ६. अ) जमीन विभाजन विरोधास ७. अ) राधानगरी धरण

**दीर्घोत्तरी प्रश्न :**

१) छत्रपती शाहू महाराज यांच्या आर्थिक विचारांचे मूल्यमापन करा.

२) छत्रपती शाहू महाराजांचे कृषीविषयक धोरण स्पष्ट करा.

३) छ. शाहू महाराजांचे पाणी व्यवस्थापन यावर सविस्तर चर्चा करा.

**टीपा लिहा :**

१) शाहू महाराजांचे शेतीविषयक विचार

२) शाहू महाराज व जल व्यवस्थापन

३) शाहू महाराज व सहकार

४) शेतीचे आधुनिकीकरण व प्रयोगशील वृती

५) शाहू महाराज व कृषी शिक्षण

**संदर्भ ग्रंथ :**


१) बळीराजा.. शाहू महाराज शेती व शेतकरी byonline lokmat/ published : June २६,२०२०

२) शाहू महाराज कृषी, उद्योग प्रणेते byonline lokmat / published : June 26, 2015.

३) शाहू महाराज : विकिपीडिया

४) पाटील जे.एफ.(२०१६), 'आर्थिक विचारांचा इतिहास भाग २', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

## २.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चलन, शेतीविषयक विचार व विकासात्मक धोरण

## (Dr.Babasaheb Ambedkar : Views on Money, Agriculture and Development Policy)

**प्रस्तावना :**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे वंचित व पददलित यांचे कैवारी असून त्यांनी आपल्या हयातीत बहुजन घटक डोळ्यासमोर ठेवून यथोचित कार्य केले. त्यांच्या कार्याची सुरुवात ही चवदार तळ्यापासून सुरू झाली आणि बौद्ध धम्म दीक्षा घेऊन त्यांनी हिंदू धर्माला पूर्णविराम दिला. डॉ.आंबेडकर यांच्या गुरुस्थानी गौतम बुद्ध,म.ज्योतिराव फुले व कबीर हे सामाजिक, धार्मिक परिवर्तन व मानवतावादी विचारांची प्रस्तुती करणारे महामानव होते. डॉ. आंबेडकरांनी या महामानवानी सांगितलेल्या स्वातंत्र्य, समता व बंधुत्व ही तत्वे उराशी बाळगून समतावादी समाज रचना निर्माण करण्यासाठी त्यांनी सांगितलेल्या मार्गावरून मार्गक्रमण करीत समाजातील दलित, मुस्लिम, स्त्री, गुलाम या वंचित व शोषित घटकांसाठी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक व राजकीय प्रवास केला. त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून राष्ट्र निर्माण करण्याचं कार्य व विविध चळवळीच्या माध्यमातून दलित व सर्वसामान्यांचे सामाजिक व आर्थिक प्रश्न मार्गी लावण्याचे जिवापाड प्रयत्न केले व शेवटी भारतीय संविधानाच्या माध्यमातून तमाम भारतीय जनतेला लोकशाहीद्वारे एक माणूस म्हणून जगण्याचा मार्ग व घटनेद्वारे तमाम नागरिकांना न्याय व हक्क देण्याचा प्रयत्न केला. जीवनाच्या शेवटच्या प्रवासात त्यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन मानवतावादी सेवेचे कार्य अखंडितपणे करीत राहिले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ६ डिसेंबर १९५६ रोजी कालवश झाले. त्यांच्या जाण्याने सर्व वंचित घटकांचा बापरूपी उद्धारकर्ता निघून गेला.

**डॉ. आंबेडकरांचा जीवन परिचय :**

मूळ नाव भीमराव रामजी आंबेडकर, परंतु आपल्या कार्यकुशलतेच्या माध्यमातून ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या नावाने परिचित झाले. डॉ. आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी एका दलित पण सुशिक्षित कुटुंबात झाला. त्यांचे वडील रामजी आंबेडकर तत्कालीन ब्रिटिश फलटण येथे सुभेदार या पदावर कार्यरत होते. मुळात रामजी गणित व इंग्रजी विषयात हुशार व ज्ञानी असल्यामुळे त्याचे बाळकडू बाबासाहेब आंबेडकरांना दिले. आंबेडकरांचे इंग्रजी भाषेवरील उत्तम प्रभुत्व व पुस्तक प्रेम व लिखाणाची उत्तम शैली प्रदान करण्याचे काम रामजी आंबेडकर यांनी केलेले आहे.

डॉ. आंबेडकर यांचे प्राथमिक शिक्षण सातारा हायस्कूल, सातारा येथे झाले. त्यानंतर पुढील शिक्षण एलफिस्टन हायस्कूल मुंबई व त्यांचे  त्यांचे उर्वरित पदवीपर्यंतच्या शिक्षणासाठी सर्व खर्च सयाजीराव गायकवाड महाराज यांनी उचलला आणि त्यांनी महाराजांचा लष्करी कार्यवाह म्हणून त्यांना बडोद्यास नियुक्त केले. सामाजिक व आर्थिक अडचणीवर मात करून सन १९१२ मध्ये, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या विषयातील महाविद्यालयीन पदवी मिळविणाऱ्या दलितांच्या पहिल्या पिढीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. सन १९१३ मध्ये, श्रीमंत सयाजीराव गायकवाड व छत्रपती शाहू महाराजांनी दिलेल्या स्कॉलरशिपच्या आर्थिक मदतीने पुढील शिक्षणासाठी 'लंडन स्कूल ऑफ इकॉनामिक्स अँड पॉलिटिकल सायन्स' इंग्लंड येथे प्रवेश घेतला. त्यानंतर त्यांचा इंग्लंडमधला शैक्षणिक प्रवास अत्युच्च शिखरावर पोहोचला. सन १९२१ मध्ये एम.एस्सी. व सन १९२२ मध्ये बॅरिस्टरची पदवी

संपादित केली. त्यानंतर सन १९२३ मध्ये 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी' या प्रबंधासाठी लंडन विद्यापीठाने त्यांना डॉक्टर ऑफ सायन्स व 'द इव्होल्युशन ऑफ प्रोविन्शियल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया' या विषयासाठी कोलंबिया विद्यापीठाकडून त्यांना मानाची सर्वोच्च पीएच.डी. पदवी संपादन केली.

भारतात आल्यानंतर त्यांनी मूळ वकिली व्यवसायाबरोबर देशातील विविध समाजाचा सामाजिक व आर्थिक अभ्यास करून देशातील दलित व अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या वर्गाच्या न्याय-हक्कासाठी चळवळीत उतरले.खऱ्या अर्थाने तेथून त्यांच्या चळवळीच्या प्रवासाला सुरुवात झाली आणि मृत्यूपर्यंत त्यांनी चळवळीसाठी स्वतःला झोकून देऊन समाजासाठी अव्याहतपणे कार्य सुरू ठेवले. बाबासाहेबांनी 'बहिष्कृत हितकारणी' सभेची स्थापना व १९२७ मध्ये 'बहिष्कृत भारत' नावाचं पाक्षिक सुरू करून सामाजिक परिवर्तनाची सुरुवात केली. त्यांची गुणवत्ता व कर्तुत्व पाहून तत्कालीन सरकारने विधिमंडळाच्या सदस्यपदी त्याची नेमणूक केली. बाबासाहेबांनी या पदाचा गरिमा राखीत खूप मोठं योगदान दिले.धार्मिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, इतिहास व अन्य विषयावर असंख्य ग्रंथ लिहून समाज प्रबोधन व परिवर्तनाचे काम केले. 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' या त्यांच्या शिकवणीने दलित समाजाबरोबर इतर वंचित समाज ही शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी धडपडू लागला. विविध प्रकारच्या संघटना बांधून संघटित होऊ लागले आणि स्वतःच्या व समाजाच्या न्याय हक्कासाठी संघर्ष करू लागला हे त्यांच्या या व्यक्तिमत्व व शिकवणीमुळे शक्य झाले. मात्र हे सर्व करण्याची प्रेरणा त्यांचे गुरु ज्योतिराव फुले यांच्याकडून प्राप्त झाली आहे.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ते जगभर प्रसिद्ध आहेत मात्र जगातील विविध धर्मांचा तौलनिक अभ्यास करून भारतीय संस्कृतीशी जुळणाऱ्या बौद्ध धम्माची दीक्षा लाखो अनुयायांसह डॉ. आंबेडकर यांनी घेतली. त्यांचे संपूर्ण जीवन समाज, मानवता व देशासाठी अर्पित होते. त्यांच्या या स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तत्वांची व विचारांच्या समग्र कार्याची दखल घेत सन १९९० मध्ये, भारत सरकारने मरणोत्तर 'भारतरत्न' ही सर्वोच्च पदवी बहाल करून त्यांना सन्मानित करण्यात आले. देश-विदेशात आंबेडकर प्रेमी व अनुयायांनी एकच मोठा जल्लोष केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित चळवळीचे प्रणेते असून अनेक चळवळींना त्यांनी जन्म दिला. त्यांच्या या सामाजिक व राजकीय कार्याबरोबर एक जगविख्यात अर्थतज्ञ म्हणूनही त्यांनी केलेलं काम देशात व विदेशात उल्लेखनीय आहे. आंबेडकरानी अर्थशास्त्रीय लिखाण प्रचंड प्रमाणात केले. या अर्थशास्त्रीय विषयाच्या वेगवेगळ्या शाखेच्या माध्यमातून त्यांचे देश विकासाचे धोरणात्मक निर्णय घेतले ते दूरगामी स्वरूपाचे होते. राष्ट्र निर्माण कार्यात त्यांनी दिलेले योगदान अत्यंत महत्वाचे आहे. हे योगदान तत्कालीन परिस्थितीत व आजच्या अशा स्थितीत मैलाचा दगड ठरलेला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार :**

डॉ.आंबेडकर यांनी अर्थशास्त्र विषयाच्या माध्यमातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर धोरणात्मक व रचनात्मक कार्य केले आहे त्यांच्या आर्थिक विचारांची मांडणी चार टप्प्यांमध्ये करण्यात येते.

१)  चलनविषयक विचार   २) शेतीविषयक विचार

३)  सार्वजनिक आयव्ययविषयक विचार   ४) इतर आर्थिक विचार

**१)  चलनविषयक विचार :**

डॉ. आंबेडकरांनी विदेशी अर्थशास्त्रीय अनुभव, वैचारिक प्रगल्भता, संशोधनात्मक परिपक्वता व अर्थशास्त्रीय ज्ञानाच्या जोरावर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर एक सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रज्ञ म्हणून नावलौकिक मिळविले. अर्थशास्त्रातील विविध ज्ञान शाखेचा प्रचंड अनुभव, प्रचंड विद्वत्ता व गुणवतेच्या जोरावर ते शासनाच्या विविध पद व समित्यावर विराजमान झाले होते. ब्रिटिश शासनाने बँकिंग व्यवस्थेशी संबंधित नेमलेल्या 'हिल्टन यंग कमिशन' समोर अभ्यासू साक्ष देताना चलन निर्मिती करणाऱ्या रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या चलननिर्मितीवर अंकुश ठेवण्याची आवश्यकता आहे हे त्यांनी स्पष्ट केले.

सन १९३२ मध्ये 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी इटस ओरीजन अँड इट्स सोल्युशन' हा अभ्यासपूर्ण प्रबंध लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सला सादर करून डी.एसस्सी.पदवी संपादन केली. या प्रबंधामुळे ब्रिटिश राज्यकर्त्यांसमोर भारतीय चलनविषयक प्रश्न गंभीर स्वरूपात मांडला गेला. तसेच सन १९४७ मध्ये 'हिस्ट्री ऑफ इंडियन करन्सी अँड बँकिंग'या नावाने पुनर्प्रकाशित झालेल्या संशोधनात्मक लेखाने भारतासाठी कोणती पद्धत उत्तम व आदर्शवत आहे याविषयी अभ्यासपूर्ण व संशोधनात्मक विचार मांडले.

सन १८०० ते सन १८९३ या कालखंडातील विनिमयाचे एक साधन म्हणून भारतीय रुपयाची उत्क्रांती कशी होत गेली व भारताला कोणती परिमाण पद्धत अधिक उपयुक्त आहे याबाबत अतिशय सखोल व अभ्यासपूर्ण मांडणी केली आहे.तत्कालीन काळात सुवर्ण परिमाण आणि रुपयाचे परिमाण या दोन पद्धती अस्तित्वात होत्या. यापैकी कोणती पद्धत भारतीय व्यवस्थेला अर्थव्यवस्थेला उपयुक्त होईल याबाबत अर्थशास्त्रज्ञांमध्ये मतांतर होते. त्यावेळचे प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ केन्स यांचे असे मत होते की, भारतीय अर्थव्यवस्थेसाठी सुवर्ण परिमाण पद्धत हीच उपयुक्त ठरणारी पद्धत आहे कारण त्यामध्ये लवचिकता असल्यामुळे कोणत्याही वेळेस कागदी चलनाचे सोन्यामध्ये रूपांतर करता येऊ शकते. परंतु डॉ. आंबेडकरांना यांचे हे चलनविषयक मत मान्य नव्हते. डॉ.बाबासाहेबांच्या मते ही पद्धत लवचिक असल्यामुळे या पद्धतीतील लवचिकता हा गुणधर्म जरी वरकरणी चांगला वाटत असला तरी भारतातील या चलननिर्मितीवर अप्रत्यक्षपणे याचे नियंत्रण राहू शकणार नाही. त्यामुळे अर्थव्यवस्थेत अतिरिक्त चलन निर्मिती होऊन देशांतर्गत प्रचंड मोठी महागाई वाढण्याची शक्यता होती. याचा अर्थ भारतीय रुपयाची क्रयशक्ती कमी होईल आणि परिणामस्वरूप विनिमयाचे साधन म्हणून रुपया हे चलन अस्थिर होईल अशा प्रकारचे मत त्यांनी व्यक्त करून एक प्रकारे त्यांनी केन्सच्या चलनविषयक धोरणाला विरोध दर्शविला होता.

डॉ. आंबेडकर आपल्या मुद्द्याचं समर्थन करताना म्हणाले की, रुपयाला सोन्याच्या किमती बरोबर असलेलं साम्य मूल्य कायम ठेवण्यात अपयश आले आहे त्यामुळे त्याची क्रयशक्ती कमी झालेले आहे. त्यामुळे त्यांचे ठाम असे मत होते की, रुपयाचे मूल्य स्थिर राहण्यासाठी चलननिर्मितीवर नियंत्रण असणे गरजेचे आहे.

नाहीतर भविष्यात आर्थिक संकट येण्याची शक्यता आहे असे प्रामाणिक व प्रांजळ मत त्यांनी व्यक्त केले. तसेच रुपयाच्या घसरणीची अनेक कारणे व घटक कसे जबाबदार आहेत ते सिद्ध करून दाखविले. अर्थव्यवस्थेत विनिमय स्थिरतेपेक्षा किंमत स्थिरता कशी महत्त्वाची आहे हे व्यवहारातून व कृतीतून दाखवून दिले. त्यांनी ब्रिटिशांची भारतीय अर्थव्यवस्थेत पब्लिक ट्रेझरी कशी अपयशी ठरली त्याची कारणे शोधून काढली. तसेच भारतीय अर्थव्यवस्थेच्या दुर्बलतेचे मुख्य घटक म्हणून ब्रिटिश कसे जबाबदार आहेत हे पटवून दिले. मात्र डॉ. आंबेडकरांच्याच चलनविषयक मतांचा विचार न करता त्यांनी केन्स या ब्रिटिश अर्थतज्ज्ञांच्या मताचा स्वीकार केला परंतु आजच्या विद्यमान परिस्थितीत डॉ. आंबेडकरांचे मत व धोरण योग्य होते असेच म्हणावे लागेल.

**डॉ. आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे वंचित घटकातील असल्यामुळे त्यांनी सुरवाती पासूनच शेतमजूर, दलित, शेतकरी, महिला, कामगार, आदिवासी व वंचित घटकांचा विचार करून आपले आयुष्य त्यासाठी अर्पण केलेलं होते. त्यामुळे साहजिकच त्यांनी देशातील शेतकऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर आणून त्याविषयी लिखाण व काही प्रसंगी आंदोलन-मोर्चाच्या माध्यमातून शेतकरी घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला होता. याचा अर्थ डॉ. आंबेडकरांची शेतकरी व शेतीविषयक असलेली संवेदनशीलता व त्यासाठी दिलेले योगदान हे खूप महत्त्वाचे आहे.

अ) भारतीय शेती विषयक प्रश्न मांडताना भारतातील लहान धारण क्षेत्र व त्यावरील उपाय या सन १९१८ मध्ये प्रकाशित झालेल्या लेखातून भारतीय कृषी प्रश्नाविषयी सबल व प्रचंड लिखाण केले. सुमारे १०० वर्षांपूर्वी लहान धारणक्षेत्र हेच भारतातील शेती विकास व उत्पादनासाठी मोठा अडथळा ठरत होते त्यामुळे असंख्य प्रश्न त्यामधून निर्माण झाले होते; शेतकरी मेटाकुटीला आलेला होता.

कोल्हापूर संस्थानाचे अधिपती राजर्षी छ. शाहू महाराज यांनी जमिनीचे विभाजन व तुकडीकरण कशामुळे निर्माण होते याचे संशोधन करण्यासाठी डॉ. आंबेडकर यांना जबाबदारी दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शाहू राजांचा सन्मान राखीत ते संशोधन पूर्ण करून व यावर जालीम उपाय शोधला.

डॉ. आंबेडकर यांच्या मते जमिनीचे लहान धारण क्षेत्र हे वारसा हक्कामुळे निर्माण होत नसून देशाची 'वाढती लोकसंख्या व त्याचा अतिरिक्त ताण' हा शेती व्यवसायावर पडत असल्यामुळे जमिनीचे लहान आकारमान होत आहे. यासाठी लोकसंख्येला पर्यायी व्यवसाय म्हणून उपजीविकेसाठी अन्य पर्यायी साधन शोधून देणे गरजेचे आहे. याशिवाय जमिनीच्या विभाजनात बदल होणार नाही. यासाठी किफायतशीर शेती, भांडवलातील वाढ व इतर शेती उपयोगी साधनसामुग्रीची व्यवस्था करून उत्पादनात प्रचंड वाढ करता येते. तसेच त्याच्या जोडीला शेतीमधील वाढत्या लोकसंख्येला पर्यायी व्यवसायामध्ये म्हणजेच उद्योगधंद्यांमध्ये गुंतवून ठेवणे, त्याद्वारे शेतीवरील अतिरिक्त ताण कमी होऊन शेतीच्या उत्पादनात वाढ व जमिनीचे धारण क्षेत्र जैसे थे राहू शकते. तसेच सरकारने औद्योगिकीकरणाला चालना देऊन शेतीतील बेकारीच्या फौजेला उद्योग-धंद्यात रोजगार द्यावा अशा प्रकारचा शेती विकासात्मक उपाय त्यांनी सुचविला.

डॉ. आंबेडकरांच्या मते, औद्योगिकरण व कृषी उद्योगाच्या साहाय्याने भारतीय अर्थव्यवस्थेची उन्नती होऊ शकते. याकरिता कृषी उद्योगात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणे आवश्यक आहे, कारण कृषी उद्योग हाच देशाचा मूलभूत उद्योग आहे अशा प्रकारचं मत त्यांनी व्यक्त केले. माजी कृषीमंत्री शरदचंद्रजी पवार यांच्या मते, डॉ. आंबेडकरांनी यातून शेतीविषयक विकासाचा दृष्टिकोन जाणलेला होता जो सध्या सरकारच्या अन्नसुरक्षा धोरणाला उपयोगी पडतो आहे. त्यांनी समाजाच्या आर्थिक व सामाजिक विकासाच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीला पाठिंबा दिला होता त्यासाठी हे धोरण खूप महत्वाचे होते.

**ब) सामुदायिक शेती :**

तत्कालीन कालखंडात जाती व्यवस्थेवर आधारीत अर्थव्यवस्थेची रचना करण्यात आली होती. त्यामुळे आर्थिक व सामाजिक शोषणाचे मार्ग त्या व्यवस्थेमुळे निर्माण झाले होते हे आंबेडकरांनी ओळखलं होते. त्यामुळे बहुसंख्येने असणाऱ्या लोकांच्याकडे जमिनीचा कमी वाटा व मूठभर लोकांच्याकडे मात्र जमिनीचा सर्व ताबा होता. त्यामुळे ग्रामीण भागातच आर्थिक व सामाजिक विषमतेची दरी निर्माण झालेली होती. त्यामुळे अस्तित्वात असलेल्या शेती पद्धतीद्वारे शेतकऱ्यांचे हित होईल असं त्यांना वाटत नव्हते. त्याकरिता त्यांनी देशातील जमिनीच्या राष्ट्रीयीकरणाची मागणी केली. त्यानुसार शासनाने शेत जमिनी ताब्यात घेऊन त्या विकसित कराव्यात त्याच बरोबर सिंचित शेतजमिनी संबंधित शेतकऱ्यांना काही अटीवर कसण्यासाठी शासनाने द्याव्यात यामुळे एका अर्थाने सामुदायिक शेतीचा प्रयोग होतो. अशी शेती करण्यासाठी शासनाने शासन पातळीवर ती काही नियमावली तयार करावी त्यामुळे कोणत्याही एकाच पिकाखाली मोठे क्षेत्र येऊन शेतमालाच्या उपलब्धतेविषयी विषमता येणार नाही. तसेच अर्थशास्त्रीय नियमानुसार मागणी व पुरवठा यामध्ये समतोल साध्य होत शेतमालाला योग्य हमीभाव मिळेल. याचा अर्थ डॉ. आंबेडकरांनी शेतीसाठी अधिनियम व कायदा असावा असे मत व्यक्त केले. यावरुन त्यांचा शेती विकासाबाबत असा विचार अधोरेखित होतो.

डॉ. आंबेडकर यांनी शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून शेती उत्पादन वाढीसाठी विस्तृत शेती, यंत्रप्रधान शेती, सहकारी व सामुदायिक पद्धतीच्या शेतीचा आग्रहाने पुरस्कार केला. त्यांच्या स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा या बाबी त्यांनी ठळकपणे उल्लेखित केल्या आहेत.

**क) जमीन महसूल :**

देशातील सर्व घटकाकडून एक सारखा कर आकारणी करणे योग्य होत नाही. त्यासाठी विशिष्ट रकमेपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या शेतकऱ्याकडून जमीन महसूलात सवलत किंवा माफी मिळावी. तसेच जमीन महसूल संहितेचे १०७ वे कलम रद्द करून जमीन महसूल प्राप्तिकराच्या कक्षात आणावे असा विचार त्यांनी व्यक्त करून भांडवलदार व जमीनदारांना धक्का दिला होता. त्यामुळे उत्पन्नावर जमीन महसूल आकारणे अन्याय आहे असे मत होते.

**ड) महार वतने रद्दबातल :**

महार वतन ब्रिटिश कालखंडात वतन कायद्याप्रमाणे गावचे कामगार कामगार म्हणजे पाटील, कुलकर्णी

आणि महार असे होते. त्यापैकी महार वतनात असंख्य दोष असल्यामुळे त्यांची विविध पातळीवर पिळवणूक होत होती. कारण महारांचे कामाचे तास व कामे निश्चित नसल्यामुळे सरकारी व आमदार सूचना करतील त्याप्रमाणे त्यांना कामे करावी लागत होती. तसेच एखादा महार लवकर कामावर जाऊ शकला नाही तर कुटुंबातील एका व्यक्तीला ते काम करावे लागे. या कामाकरिता त्यांना एखादा जमिनीचा तुकडा किंवा दर महिन्याला मुशाहिरा मिळत असे. डॉ. आंबेडकरांनी या महार वतनाचा सखोल अभ्यास करून महार वतन खालसा करण्यासंदर्भात त्यांचं ठोस मत होते, कारण या वतनामुळे महारांची महत्वकांक्षा व स्वाभिमान शून्य झालेला होता तसेच सामाजिक सुधारणेला या महार वतनामुळे अडथळा निर्माण होत होता.

डॉ. आंबेडकरांनी सन १९२८ मध्ये मुंबई विधिमंडळात या वतनदारी कायदा दुरुस्ती सुचविणारे विधेयक मांडले. या विधेयकाच्या माध्यमातून महार वतनदारास लाभ होणार होता परंतु १९२९ मध्ये ते मागे घेण्यात आले. शेवटी सन १९३९ मध्ये पुन्हा आंबेडकरांनी महाराना सरकारी कनिष्ठ नोकरी समजून मासिक वेतन अदा करावे. महाराच्या वतनी जमिनी या रयतवारी जमिनीत रूपांतर करावे तसेच फक्त सरकारी कामे त्यांना सांगावीत अशा सूचना विधेयकात केल्या. तसेच असेच वतनापोटी आलेल्या जमिनीच्या लहान तुकड्यावर उदरनिर्वाह फक्त न करता पडीक जमिनी लागवडी खाली आणाव्यात.

### इ) सहकारी शेती :

तत्कालीन काळातील शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती अत्यंत भयावह होती हे डॉ. आंबेडकरांनी ओळखलं होते. त्यामुळे मूळात शेतजमिनीचा आकारमान लहान, भांडवलाची कमतरता, बियाण्यांची टंचाई, बारमाही पाण्याचा अभाव, आधुनिक शेती उपयोगी साधनांचा अभाव, किफायतशीर शेतीचे पुरेसे ज्ञान नसणे, शेतमालाच्या योग्य किंमतीचा अभाव व अशिक्षितपणा या सर्व अडचणीतून मुक्त व्हायचं असेल तर त्यासाठी सर्वांनी एकत्रित येऊन सहकारी शेती करणे योग्य वाटते. सहकारी शेतीमुळे शेतकऱ्यांना जमिनीवरील मालकी हक्क मिळेल, लहान धारण क्षेत्राला मोठा आकार प्राप्त होऊन जमीन सलगपणे कसता येईल. त्यामुळे त्याचा निश्चितच शेती उत्पादन व आर्थिक लाभ होण्यास होईल अशा प्रकारचा विचार त्यांनी सहकारी शेती पद्धतीबाबत व्यक्त केला आहे.

### ई) शेतकऱ्यांच्या मोर्चात सहभाग व खोती पद्धती :

मुळात खोती पद्धत महाराष्ट्रातील कोकणामध्ये प्रकर्षाने दिसून येत होती. या खोती पद्धतीनुसार सरकार व शेतकरी यांच्यातील दुवा म्हणून या खोताने काम करायचं होतं. परंतु खोती म्हणून काम करणारे हे घटक सरकारला अंदाज न देता अव्वाच्या सव्वा पद्धतीने कोकणातील शेतकऱ्यांकडून अमानुषपणे शेतसारा गोळा करीत. त्यामुळे येथील शेतकरी हा पिचलेला, अडवणूकीच्या जाळ्यात अडकलेला व अन्यायाविरुद्ध असंतोष मनात भरलेला होता. हा खोत शेतसाऱ्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी जबरदस्तीने बळकावल्या होत्या.

या सर्वाला कंटाळून काही शेतकऱ्यांनी डॉ. आंबेडकर यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचा पहिला संप सन १९२८ ते १९३४ या कालखंडात रायगड जिल्ह्यातील चरी या ठिकाणी सलग ७

वर्ष चालला. मुळात आंबेडकरांनी या अगोदरच शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले होते मात्र कोकणातील शेतकऱ्यांची खोताच्या अन्याय व जाचातून मुक्तता व्हावी म्हणून मोठी चळवळ उभी केली. त्याचा परिणाम होऊन १७ सप्टेंबर १९३७ रोजी खोतीपद्धत नष्ट करणाऱ्या कायद्याचं विधेयक बाबासाहेबांनी मुंबई विधिमंडळात मांडले होते. त्यानंतर २५००० शेतकऱ्यांचा मोर्चा डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली सन १९३८ मध्ये विधिमंडळावर नेण्यात आला. ही चळवळ अधिक सुदृढ करण्यासाठी डॉ.बाबासाहेबांनी कोकण दौरा काढून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला. विविध सभा व जनसंपर्काच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांना आधार देण्याचा प्रयत्न केला. खरं म्हणजे ज्यांच्यासाठी हा लढा उभा केला ते शेतकरी मराठा, कुणबी आणि मुसलमान होते. मात्र त्यांनी जातीपातीचा विचार न करता वंचित घटकाला न्याय देण्यासाठी खोती विरुद्धचा प्रयत्नांचा लढा शेवटी यशस्वी झाला.

### ३) सार्वजनिक आयव्यय :

डॉ. आंबेडकरांची अर्थशास्त्रीय मांडणी ही सार्वजनिक आयव्यय विषयक प्रकर्षाने दिसून येते. त्यांनी एम.ए. पदवी संपादनासाठी 'अडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया कंपनी' हा शोध निबंध सादर केला होता. तसेच सन १९२५ मध्ये 'द इव्होल्युशनस ऑफ प्रोव्हीन्शियल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया' हा प्रबंध सादर करून त्यांनी पीएच.डी. पदवी संपादन केली. अर्थशास्त्रातील पीएच. डी. पदवी परदेशात संपादन करणारे ते पहिले भारतीय विद्यार्थी होते. जगप्रसिद्ध प्राध्यापक सेलिग्मन ज्यू धर्मीय असून हे ते आंबेडकरांचे मार्गदर्शक होते. सन १९१३ ते १९१७ या कालावधीत सातत्यपूर्ण विद्याभ्यासाच्या परिश्रमाने लिहिलेला प्रबंध होता. डॉ. आंबेडकरांनी ब्रिटिश साम्राज्यशाहीचे भारत सरकार हजारो मैल असलेल्या ब्रिटिश पार्लमेंटमधील भारतमंत्री यांच्यामार्फत कसा कारभार करत होते आणि त्यामुळे चाललेल्या सरकारी उधळपट्टी आणि बेजबाबदारपणा भारतीय जनतेस कसा पिळून काढत होता यावर प्रकाश टाकला. तसेच ब्रिटिश साम्राज्य केंद्र सरकारचे कर व स्थानिक स्वराज्य संस्थेचे कर याचे विश्लेषण त्यावेळच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून समग्रपणे केले. त्यांनी लिहिलेला हा प्रबंध जगभर प्रसिद्ध झाला व त्याची एक प्रत बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांना अर्पण केली.

सन १७९२ ते १८५८ या कालखंडात ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि वित्तव्यवस्थेमध्ये कसे बदल झाले व त्याचा भारतीय अर्थव्यवस्था खिळखिळी करून टाकण्यासाठी कसे प्रयत्न करण्यात आले. याविषयी त्यांनी आपले मत व आर्थिक विचार व्यक्त केले. तसेच ब्रिटिश शासन विविध मार्गानी स्वतःचा फायदा करुन घेऊन भारतीय आर्थिक स्थिती कोलमोडून टाकण्याचा कोणता डाव होता ते त्यांनी दाखवून दिले. या कालखंडात जवळपास ब्रिटिश सरकारचा महसूल ५५ लाख पौंडावरून ३१७ लाख पौंडावर पोहोचला. त्यामुळे भारतीय जनता व शेतकऱ्यांचे कसे आर्थिक शोषण झाले याचे त्यांनी अभ्यासपूर्ण विवेचन केले. ब्रिटिशांनी कर्जापोटी ७० लाख पौंडा वरून ६०७ लाख पौंडा पर्यंत कर्ज उचलले आणि भारतीय अर्थव्यवस्था मोडखळीस आणली.

सन १८५८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त झाल्यानंतर ६९३ लाख पौंडाचा बोजा दरिद्री भारतावर टाकून कसा अन्याय केला आहे. तसेच महसुली संबंधित विनियोग संबंधित नसलेल्या आर्थिक बाबी वर कसा करण्यात येत आहे हे दाखवून दिले.

सन १८३३ ते १९२१ या प्रदीर्घ कालखंडात ब्रिटिश केंद्रसरकार आणि त्यावेळचे घटक राज्य यांच्यातील आर्थिक संबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. तसेच या काळात वित्तव्यवस्थेचे संपूर्ण केंद्रीकरण भारत सरकारच्या हाती आलं आणि त्यांच्याकडून मनमानी पद्धतीने कारभार सुरू झाला. या काळात शेतसारा मोठ्या प्रमाणात आकारून उत्पादनाला खीळ बसली तसेच उत्पन्नापैकी निम्मा भाग लष्करावर खर्च करून शिक्षण व आरोग्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.सन १८७१ मध्ये केंद्र व घटक राज्य यांच्यासाठी स्वतंत्र अर्थसंकल्पाची पद्धत चालू झाली.

महसुलाचा हिस्सा वाटपावर आधारित अंदाजपत्रकाची पद्धत प्रचलित होती या पद्धतीनुसार घटक राज्य व केंद्र सरकार यांनी संकलित केलेल्या महसुलाचा निश्चित केलेला हिस्सा एकमेकांना देण्याची तरतूद करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, प्रचलित व्यवस्थेला नवीन वित्त व्यवस्थेच्या माध्यमातून बदलणे काळाची गरज होती. तसेच आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली सन १९५१मध्ये कलम २८० नुसार वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली. त्यानुसार केंद्र व राज्य यांच्यातील आर्थिक संबंध याविषयीचे विचार व्यक्त केले. सद्य परिस्थितीत ही भारतीय राज्यघटनेनुसार राज्य सरकार व केंद्र सरकार यांचे हितसंबंध ठरविण्यासाठी दर ५ वर्षांनी वित्त आयोग नेमला जातो. या कामी डॉ. आंबेडकरांचे यासंबंधीतील कार्य मूलभूत मानावे लागतील हे सत्य आहे.

**इतर आर्थिक विचार :**

**अ) जातिव्यवस्था व श्रमिकांची विभागणी :**

बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यता व जातीव्यवस्था या सारख्या दुर्धर आजारांचे विविध आर्थिक स्वरूपाचे पैलू उलगडून दाखवले. महात्मा गांधींनीही जातिव्यवस्थेचे अस्तित्व मान्य केले होते. मात्र आंबेडकरांनी 'जातीचे विध्वंसन' (Elimination of Class) या आपल्या ग्रंथात या व्यवस्थेविरुद्ध प्रखर टीका करून जातिव्यवस्थेमुळे केवळ श्रमाची विभागणी केली नसून श्रमिकांची विभागणी केली आहे हे त्यांनी निदर्शनास आणून दाखविले. या व्यवस्थेने चातुर्यवर्ण पद्धतीचा स्वीकार करून समाजात खालच्या समजलेल्या जातींना जनावरांप्रमाणे वागणूक दिली जाते हे स्पष्ट होते. ही व्यवस्था माणसाला माणूस म्हणून जगू न देणारी व संपूर्ण मानव जातीला काळीमा फासणारी अघोर व्यवस्था आहे. ही चातुर्यवर्ण व्यवस्था म्हणजे पायऱ्या नसलेल्या चार मजली इमारती सारखी आहे. या व्यवस्थेने इमारतीत राहणाऱ्या प्रत्येक मजल्यावरील प्रत्येक वर्णाला प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे असे कडक निर्बंध लादले आहेत की, इच्छा असूनही तो कुठल्याही मजल्यावर जाऊ शकत नाही त्यामुळे या देशाची आर्थिक प्रगती व विकास खुंटलेला आहे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निदर्शनास आणून दिले होते. सद्यपरिस्थितीत त्याची प्रचिती पावलोपावली येते.

**ब) अस्पृश्यता आर्थिक शोषणाचा एक मार्ग :**

हिंदुस्थानातील जातीव्यवस्था व अस्पृश्यता या सामाजिक विषयावर म. ज्योतिराव फुले यांनी या अगोदर भाष्य व विरोध केला होता. त्यानंतर मात्र खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या गंभीर विषयावर वास्तववादी आर्थिक विश्लेषण केले. अस्पृश्यता ही धार्मिक रचनेचा फक्त एक भाग नसून गुलामगिरीपेक्षा भयंकर व पिळवणूक करून टाकणारी आर्थिक व्यवस्था आहे. कारण गुलामगिरीत मालक जगण्यासाठी का होईना

गुलामाला मदत करीत असतो मात्र या व्यवस्थेत मालक जबाबदारी स्वीकारायला तयार नाही पण समाजाची आर्थिक पिळवणूक होते. या व्यवस्थेमुळे समाजाची मानसिकता मारली गेली आहे.

**क) विकासाचे धोरण :**

स्टेट्स अँड मायनॉरिटी नावाने ब्रिटिश सरकारला सन १९४७ साली सादर केलेल्या टिपण्या मध्ये भारताच्या आर्थिक विकासाचे योग्य धोरण कोणते हे सांगितले आहे यामध्ये त्यांनी उत्पादन क्षमतेचा विचार करून लोकांच्या आर्थिक जीवनाचे नियोजन करणे तसेच खाजगी उत्पादक कोणतीही आडकाठी न आणता संपत्तीचे समान वाटप होईल अशा रीतीने आर्थिक नियोजन करणे ही सरकारची प्राथमिकता आहे असे त्यांनी नमूद केलेलं होतं या द्वारे गरिबी हटाव, विषमता निर्मूलन आणि शोषण मुक्तता यावर भर दिला होता.

डॉ. आंबेडकर यांनी राष्ट्रीय धोरणाचा पुरस्कार मर्यादित अर्थाने केला तसेच शेत जमीन व अवजड उद्योग धंद्यावर सामुदायिक मालकी असावी असे ठळकपणे त्यांनी नमूद केले. त्याचबरोबर लोकशाही पद्धतीने कोणताही भेदाभेद न करता उत्पादनाचे निकोप पद्धतीने वाटप करावे असे मत त्यांनी मांडले.

**डॉ. आंबेडकर यांचे जलधोरण व विकासात्मक विचार :**

औद्योगिक कामगारांचा विकास करण्यासाठी या क्षेत्रात सन १९३६ मध्ये डॉ.आंबेडकरानी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करून कामगार वर्गाचा आवाज बुलंद करून त्यांना न्याय मिळवून दिला. तसेच धोरणात्मक पातळीवर सन १९४२ ते १९४६ या कालखंडात कामगार विषयक धोरणात आमुलाग्र बदल घडवून आणले.तसेच आंबेडकरांनी ऊर्जा, सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे खाती सांभाळत देशाच्या विकासात महत्त्वाचे योगदान दिले.

सन १९४२ ते १९४६ या कालखंडात त्यांच्याकडे सिंचन व वीज खात्यांचे मंत्रीपद होते. आंबेडकर यांनी विविध खात्यांच्या कारभाराबरोबर जलनियोजन खात्याचे काम ही उत्तम पद्धतीने पार पाडले. या खात्याअंतर्गत त्यांनी विविध योजना राबवून कल्याणकारी काम करण्याचा सपाटा लावला होता. त्यामध्ये देशातील जलमार्गाचा पर्याप्त पद्धतीने वापर कसा करता येईल, त्याचे नियोजन करण्यासाठी 'केंद्रीय तांत्रिक ऊर्जा मंडळ' स्थापन केले. त्याचबरोबर उत्तर भारतातील दामोदर नदीवर धरण बांधण्याच्या दृष्टीने त्यांनी उचललेले पाऊल व केलेले सर्व्हेक्षण हे खूप महत्त्वाचे आहे. कारण सिंचन सुविधा निर्माण केल्याशिवाय शेती उत्पादन व उत्पादकता वाढवता येणार नाही हे त्यांनी ओळखलं आणि त्यानुसार दामोदर प्रकल्प हा बहुउद्देशीय असल्यामुळे त्या माध्यमातून सिंचन, वीजनिर्मिती आणि जलवाहतूक हे हेतू साध्य होणार होते. तसेच हा प्रकल्प बंगाल व बिहार या राज्यांच्या सहकार्याने पूर्णत्वास आणण्याचा प्रयत्न केला.

भारतातील जंगले आणि नद्या केंद्र सरकारच्या अखत्यारीत आल्यास पूरनियंत्रण आणि जमीन संधारण समस्या वर कायमचा उपाय शोधता येईल. दामोदर नदीवर धरण बांधल्याने वीज निर्मिती, शेतीला मुबलक पाणी व पूर नियंत्रण ही उद्दिष्टे साध्य होईल. ओरिसा राज्यातील बहुउद्देशीय नदी प्रकल्प हा त्यांच्या महत्वकांक्षी योजनेमुळे त्या भागाचा विकास साध्य झाला आहे. संपूर्ण देशाच्या विकासासाठी दूरगामी व कायमचा पाणीप्रश्न

दूर करण्यासाठी राष्ट्रीय जल धोरण असणे गरजेचे होते. त्यानुसार पाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी 'नदीजोड प्रकल्प' ही महत्वकांक्षी योजना त्यांच्या कल्पक बुद्धीतून पुढे आली. एकंदरीत डॉ.आंबेडकरांच्या अथक प्रयत्नामुळे मध्यम व  मोठे धरण प्रकल्प पूर्णत्वास येऊ शकले. यामध्ये दामोदर प्रकल्प सर्वात महत्त्वाचा असून त्याच्या पूर्णत्वानंतर महानदी, सोनी तसेच कोसी या प्रकल्पाचा प्रारंभही याच काळात झाला. तसेच डॉ. आंबेडकर यांचे कायद्याचे ज्ञान व त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या प्रभावामुळे भारतीय घटनेत आंतरराज्य नद्यांचा नियमन व विकास हा विषय केंद्र यादीमध्ये टाकण्यात आला आणि राज्यांतर्गत पाण्यासंदर्भातील वाद मिटविण्याच्या दृष्टीने सन १९५६ मध्ये आंतरराज्य जलतंटे कायदा पारित झाला. हे सर्व डॉ.आंबेडकरांच्या बुद्धिचातुर्य व दूरदृष्टीमुळे शक्य झाले होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जलनियोजन धोरणाची ३ वैशिष्ट्ये सांगितली आहेत.**

१) बहुउद्देशिय जल प्रकल्पासाठी नदी पाणलोट प्राधिकरणाची स्थापना केली.

२) नदी पाणलोट क्षेत्रावर आधारित जलसंसाधन विकासासाठी बहुउद्देशीय दृष्टीकोनाचा स्वीकार केला .

३) केंद्रीय तांत्रिक वीज मंडळाची स्थापना करण्यात आली.

अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांनी देशाच्या जलसंसाधन विकासाच्या निर्मितीसाठी केलेले अथक परिश्रम,दूरगामी दृष्टीकोन व याकामी त्यांनी कायद्याचं दिलेले पाठबळ या मुळे स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्यानंतर ही त्याची फळ चाखता येत आहेत. त्याचबरोबर आजच्या काळात धोरणकर्त्यांना व राजकर्त्यांना जलसंसाधन विषयक धोरणे मार्गदर्शक ठरतात.

**सारांश :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे वंचित घटकातील असल्यामुळे त्यांनी सुरवाती पासूनच शेतमजूर, दलित, शेतकरी, महिला, कामगार, आदिवासी व वंचित घटकांचा विचार करून आपले आयुष्य त्यासाठी अर्पण केलेलं होते. त्यामुळे साहजिकच त्यांनी देशातील शेतकऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर आणून त्याविषयी लिखाण व काही प्रसंगी आंदोलन-मोर्चाच्या माध्यमातून शेतकरी घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला होता. याचा अर्थ डॉ. आंबेडकरांची शेतकरी व शेतीविषयक असलेली संवेदनशीलता व त्यासाठी दिलेले योगदान हे खूप महत्त्वाचे आहे. भारतीय शेती विषयक प्रश्न मांडताना भारतातील लहान धारण क्षेत्र व त्यावरील उपाय या सन १९१८ मध्ये प्रकाशित झालेल्या लेखातून भारतीय कृषी प्रश्नाविषयी सबल व प्रचंड लिखाण केले. सुमारे १०० वर्षांपूर्वी लहान धारणक्षेत्र हेच भारतातील शेती विकास व उत्पादनासाठी मोठा अडथळा ठरत होता त्यामुळे असंख्य प्रश्न त्यामधून निर्माण होऊन शेतकरी मेटाकुटीला आलेला होता.

सन १८०० ते सन १८९३ या कालखंडातील विनिमयाचे एक साधन म्हणून भारतीय रुपयाची उत्क्रांती कशी होत गेली व भारताला कोणती परिमाण पद्धत अधिक उपयुक्त आहे याबाबत अतिशय सखोल व अभ्यासपूर्ण मांडणी केली आहे.सन १८३३ ते १९२१ या प्रदीर्घ कालखंडात ब्रिटिश केंद्रसरकार आणि त्यावेळचे घटक राज्य यांच्यातील आर्थिक संबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. तसेच या काळात वित्तव्यवस्थेचे संपूर्ण केंद्रीकरण भारत

सरकारच्या हाती आलं आणि त्यांच्याकडून मनमानी पद्धतीने कारभार सुरू झाला. या काळात शेतसारा मोठ्या प्रमाणात आकारून उत्पादनाला खीळ बसली तसेच उत्पन्नापैकी निम्मा भाग लष्करावर खर्च करून शिक्षण व आरोग्याकडे दुर्लक्ष करण्यात आले यावर प्रकाश टाकण्याचा पद्धतशीरपणे प्रयत्न केला. आजच्या काळात धोरणकर्त्यांना व राजकर्त्यांना जलसंसाधन विषयक धोरणे कशी उपयुक्त व मार्गदर्शक ठरू शकतात यासाठी प्रचंड काम केले.

अस्पृश्यता ही धार्मिक रचनेचा फक्त एक भाग नसून गुलामगिरीपेक्षा भयंकर व पिळवणूक करून टाकणारी आर्थिक व्यवस्था आहे. कारण गुलामगिरीत मालक जगण्यासाठी का होईना गुलामाला मदत करीत असतो मात्र या व्यवस्थेत मालक जबाबदारी स्वीकारायला तयार नाही पण समाजाची आर्थिक पिळवणूक होते. या व्यवस्थेमुळे समाजाची मानसिकता मारली गेली आहे.

डॉ. आंबेडकर हे संविधान निर्माता, उत्तम संसदपटू, कुशल मंत्री व प्रशासक, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, विधीतज्ज्ञ, नियोजनकार, धोरणकर्ते, समतावादी समाज व्यवस्थेचे पुरस्कर्ते, शेतकरी व दलित कैवारी, असंख्य चळवळीचे प्रणेते, शेतकरी नेता, कृषी तज्ज्ञ, शिक्षण तज्ज्ञ व ज्ञानाचा महामेरू असे असंख्य पैलू त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये होती आजही त्यांचे व्यक्तिमत्त्व हे सर्वांना दिशादर्शक आहे.

**पारिभाषिक शब्द :**

* **खोती पद्धत :** खोतांच्या प्रशासन पद्धतीला खोती असे म्हणत.खोत हा गावाचा ब्रिटीश काळातील एक प्रशासकीय अधिकारी होता.तो गावातील शेतकऱ्याकडून शेतसारा गोळा करीत असे.

* **महार वतने :** तत्कालीन काळात देशाच्या किंवा गावासाठी केलेल्या कार्याच्या कर्तव्यापोटी महार समाजातील व्यक्तीना उपजीविकेसाठी दिलेली सन्मानार्थ जमिन व वंश परंपरेने चालणारी उत्पन्न म्हणजे महार वतन होय.

* **सार्वजनिक आयव्यय :** सरकारने निश्चित केलेली धोरणे व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सरकारच्या उत्पन्न व खर्चविषयक बाबीचा पद्धतशीरपणे अभ्यास करणारे शास्त्र होय.

* **सुवर्ण परिमाण :** या पद्धतीत विनिमयाचे साधन म्हणून सोन्याची नाणी परिचलनात असतात.

* **हिल्टन यंग कमिशन :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निर्मितीच्या शिफारशी करण्यासाठी हिल्टन यंग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेली समिती होय.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

१. डॉ. आंबेडकरांचा जन्म ............................साली झाला.

अ) १८८९ ब) १८९० क) १८९१ ड) १८९२

२. डॉ.आंबेडकरांचा 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी' हा ग्रंथ ................ साली प्रकाशित झाला.

अ) १९२० ब) १९२२ क) १९२४ ड) १९२५

३. भारतीय शेतीचे प्रश्न सोडविण्यासाठी .................. हा एकच प्रभावी उपाय आहे.

अ) सहकारी शेती ब) औधोगिकीकरण क) सामुदायिक ड) यापैकी नाही

४. डॉ.आंबेडकरानी विखुरलेल्या व धारणक्षेत्राच्या लहान आकारमानाच्या समस्येवर ........ शेतीचा उपाय योग्य वाटत होता.

अ) सहकारी शेती ब) औधोगिकीकरण क) सामुदायिक ड) यापैकी नाही

५. ................. , हे श्रमविभागणी नव्हे श्रमिकांची विभागणी होय.

अ) अस्पृश्यता ब) जातीव्यवस्था क) गरीबी ड) यापैकी नाही

६. ................. प्रभावामुळे भारतीय घटनेत आंतरराज्य नद्याचे नियमन व विकास हा विषय केंद्र यादीमध्ये टाकण्यात आला.

अ) शाहू महाराज ब) डॉ. आंबेडकर क) म.फुले ड) दादाभाई नौरोजी

७. कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्यातील खोती पद्धतीविरुद्ध .............यांनी आवाज उठविला.

अ) शाहू महाराज ब) दादाभाई नौरोजी क) म.फुले ड) डॉ. आंबेडकर

**स्वयं अध्ययनासाठी उत्तरे :**

१. क) १८९१ २. ड) १९२५ ३. ब) औधोगिकीकरण ४. अ) सहकारी शेती

५. ब) जातीव्यवस्था ६. ब) डॉ. आंबेडकर ७. ड)डॉ. आंबेडकर

**अभ्यासासाठी स्वाध्याय :**

**दीर्घोत्तरी प्रश्न :**

१) डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचे सविस्तर मूल्यमापन करा.

**टीपा लिहा.**

१) डॉ. आंबेडकरांचे चलनविषयक विचार

२) डॉ. आंबेडकरांचे शेतीविषयक विचार

३) डॉ. आंबेडकरांचे सार्वजनिक आयव्ययविषयक विचार

४) डॉ. आंबेडकरांचे जलधोरण

**संदर्भ ग्रंथ :**

१) पाटील जे.एफ.(२०१६), 'आर्थिक विचारांचा इतिहास भाग २', फडके प्रकाशन, कोल्हापूर

२) ‘डॉ.आंबेडकरांकडून पाणी, वीज व शेतीचा सुक्ष्म विचार’ लोकसत्ता टीम

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - विकिपीडिया

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची केंद्रीय ऊर्जा,खनिज आणि जल नियोजन मंत्रीपदाची ऐतिहासिक कामगिरी, डॉ. खराट संभाजी, mr.vikaspedia.in

५) सुर्यवंशी उमेश मुरलीधर, (२०१८), ‘राजर्षी’, लोकराजा फोरम, कोल्हापूर

## २.४ दादाभाई नौरोजी : निस्सारण सिद्धांत

**( Dadabhai Nouroji : Drain Theory )**

**प्रस्तावना :**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील व चळवळीतील पहिल्या फळीतील राष्ट्रीय नेते, प्रखर राष्ट्रवादी विचारांचे खंदे समर्थक, सुप्रसिद्ध विचारवंत, भारतीय राज्यशास्त्र व अर्थशास्त्र विषयांचे जनक म्हणून ओळख, कार्य संपन्न उद्यमशील व्यापारी, उत्तम राजकारणी, हिंदुस्थानच्या आर्थिक प्रशासनाबाबतची जाण असणाऱ्या, ग्रंथ प्रेमी, संपादक व लेखक म्हणून सर्वांना सुपरिचित आहेत. तसेच असंख्य सामाजिक व आर्थिक संघटनेचे जनक म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. महाविद्यालयात प्राध्यापकपदी काम करणारे ते पहिले भारतीय, एक सच्चा समाजसुधारक व निष्णात अर्थशास्त्रज्ञ अशी त्यांची ओळख सर्वश्रूत आहे.

**जीवन परिचय :**

ब्रिटिश कालखंडात उद्योग व्यापाराच्या निमित्ताने एक नावाजलेले पारशी कुटुंब अहमदनगर मधून मुंबईमध्ये कायमचे स्थायिक झाले. याच पारशी कुटुंबामध्ये पालनजी दोर्दी व माणकेबाई या सुसंस्कृत मातापित्यांच्या पोटी दादाभाई नौरोजी या महान पुत्राचा जन्म ४ सप्टेंबर १८२५ रोजी झाला. मात्र दुर्दैवाने दादाभाई यांच्या लहानपणीच त्यांच्या वडिलाने हे जग सोडले होते. त्यामुळे त्यांच्या पालनपोषणाची सर्वस्वी जबाबदारी त्यांच्या मातेकडे होती. चांगल्या आचार-विचारांची व संस्कारांची जोपासना करीत वयाच्या ७ व्या वर्षी दादाभाईंचा नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीमध्ये शिक्षणासाठी प्रवेश निश्चित झाला. त्यानंतर लगेचच वयाच्या ११ व्या वर्षी गुलाबी शोराबजी श्रॉफ यांचेशी ते विवाहबद्ध झाले. मात्र विद्या संपादन करण्याची लालसा व प्रखर बुद्धिमत्तेच्या जोरावर ते सन १८४५ मध्ये एल्फिन्स्टन कॉलेजमधून पदवीधर झाले आणि लगेच सन १८५० मध्ये त्याच मातृसंस्थेत गणित व तत्वज्ञान याविषयाचे प्राध्यापक म्हणून अध्यापनाच्या सेवेला सुरुवात केली.

मुळात नौरोजी हा परिवार व्यापार उद्योगासाठी काम करणारा होता. त्यामुळे दादाभाई नौरोजींनी व्यावसायिकतेच्या माध्यमातून आपल्या करिअरला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी कामा बंधूंच्या सहभागीदारीने सन १८५५-५६ मध्ये व्यावसायिक पिढीची उभारणी करून खूप मोठे यश प्राप्त केले. सन १८६५-६६ मध्ये पुन्हा गुजराती विषयाचे प्राध्यापक म्हणून लंडन युनिव्हर्सिटी कॉलेजमध्ये कामाला सुरुवात केली. तदनंतर १८६५ मध्ये डब्ल्यू बॅनर्जी यांच्या साथीने 'लंडन इंडिया सोसायटीची' स्थापना करून प्रचंड मोठे योगदान दिले. ते काही कारणास्तव ते या कंपनीतून बाहेर पडून त्यांनी स्वतंत्रपणे 'दादाभाई नौरोजी अँड कंपनी' अशी स्वमालकीची कंपनी स्थापन करून व्यवसायाला स्वतंत्रपणे सुरुवात केली. अल्पावधीतच या कंपनीने गरुड झेप घेत स्वतःचं अस्तित्व निर्माण केले. त्यानंतर त्यांनी सन १८६६ मध्ये लंडनस्थित 'ईस्ट इंडिया असोसिएशनची' स्थापना केली.

दादाभाईना १८७२ साली कुशाग्र बुद्धीच्या जोरावर बडोद्याचे मल्हारराव गायकवाड यांना व्हाइसरॉयांच्या उजव्या हाताला बसण्याचा मान मिळवून दिला. याबद्दल गायकवाड यांनी त्यांना ५०,०००/- रुपये बक्षीस देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर त्यांच्या ज्ञानाचा लाभ बडोद्या संस्थानास व्हावा यासाठी १८७४

साली त्यांची दिवाणपदी नेमणूक केली. मात्र दोघांमधील वैचारिक मतभेदांमुळे त्यांनी हे पद सोडून मुंबईस स्वगृही परत आले.

दादाभाई नौरोजी यांनी आपला मोठा ग्रंथसाठा 'बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन' या संस्थेस दिला तसेच त्यांनी व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युजिअम, इराणी फंड, पारसी जिम्नॅशियम, मॅरेज असोसिएशन, रॉयल एशियाटिक सोसायटी व फ्रामजी इन्स्टिट्यूट अशा असंख्य संस्था व संघटनेची बांधणी करून समाजव्यवस्था व अर्थव्यवस्था बळकट करण्याचा प्रयत्न केला.

सन १८७५ मध्ये दादाभाई नौरोजी मुंबई नगरपालिकेचे सदस्य म्हणून निवडून आले आणि त्या ठिकाणी आपल्या चमकदार कामगिरीने मुंबई नगरपालिकेला मान-सन्मान मिळवून दिला. सन १८८६,१८९३ व १९०३ यावर्षी ते राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून पद भूषविले होते. या पदावर विराजमान असताना त्यांनी काँग्रेस पक्षाची उत्तम बांधणी व मजबूत उभारणी करण्याचा प्रयत्न केला. ते काही पातळीवर यशस्वीही झाले. सन १९०५ मध्ये ॲम्स्टरडॅम येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महासभेसाठी भारताचे प्रतिनिधित्व त्यांनी केलेले होते.

दादाभाई नौरोजी यांची प्रखर लेखणी व उत्तम मांडणी या माध्यमातून त्यांनी बहुआयामी व्यक्तिमत्व बनवले होते. त्यांनी अनेक वृत्तपत्रे व नियतकालिके मधून त्यांचे संशोधनात्मक लेख व निबंध प्रकाशित झालेले होते. त्यांच्या लेखणीवर त्यांचा विश्वास होता त्यामुळे त्यांच्या विश्वासू मित्रांच्या सहकार्याने सन १८८९ मध्ये 'रास्त गोफ्तार' हे साप्ताहिक सुरू केले होते. दादाभाई नौरोजी यांनी लेखणीच्या माध्यमातून 'पॉव्हर्टी इंन इंडिया' ही पत्रिका सुरू केली होती. अल्पावधीत ही पत्रिका नावारूपास आल्यामुळे त्याचे विस्तारीकरण करून सन १९०१ मध्ये लंडन येथे 'पॉव्हर्टी ॲण्ड अनब्रिटिश रुल इन इंडिया' हा सुप्रसिद्ध ग्रंथ प्रकाशित करून ब्रिटिश लोक भारतीयांना कशा पद्धतीने दरिद्री बनवतात हे त्यांनी या ग्रंथाच्या माध्यमातून मांडले होते. देशसेवेने प्रेरित होऊन देशाच्या व समाजाच्या कामात कार्यमग्न होऊन सातत्याने काम करीत राहिले त्याचा परिणाम म्हणून सन १९०७ मध्ये दादाभाईंची प्रकृती स्वास्थ्य अत्यंत बिघडले. लगेचच त्यांना भारतात आणून त्यांच्या अर्धांगिनीने अहोरात्र सेवा करून त्यांची तब्येत ठणठणीत बनवली. त्यानंतर १० वर्षांनी कामाच्या ओघाने व वार्धक्यामुळे ३० जून १९१७ साली ते काळाच्या पडद्याआड गेले. मात्र हिमालयाएवढे केलेले प्रचंड काम पाहून त्यांना पितामह ही पदवी बहाल करण्यात आली होती.

**नौरोजीचे आर्थिक विचार :**

ब्रिटिशांनी १७५७ च्या प्लासीच्या लढाईपासून ते १९४७ देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत जवळपास २०० वर्षे राज्य केले. ब्रिटिशांचा व्यापार हेतू डोळ्यासमोर ठेवून ईस्ट इंडिया कंपनी पासून सुरू झालेला हा प्रवास १८५८ पर्यंत होता मात्र आता व्यापारी नव्हे तर राजकर्ते बनलेल्या या ब्रिटिशांनी सन १९४७ पर्यंत जवळपास ९० वर्ष हिंदुस्थानाची वाटेल त्या पद्धतीने व मार्गाने लयलूट व शोषण केले आणि अर्थव्यवस्था खिळखिळी करून टाकली.

काळाच्या ओघात कधी ईस्ट इंडिया कंपनीने तर पुढच्या टप्प्यात ब्रिटिश शासनाने हिंदुस्तानाचे सर्व पातळीवर लचके तोडले या ब्रिटिशांच्या वाईट प्रवृत्तीमुळे परिणाम स्वरूप भारतीय अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम

झाला. त्याची विदारक स्थिती तत्कालीन ब्रिटिश व भारतीय समाजसुधारकांनी मांडली. पण त्याची गंभीरता ब्रिटिश शासनाने घेतली नाही परंतु पारशी समाजातून पुढे आलेले एक धाडसी, प्रगल्भ अर्थतज्ञ, समाजसुधारक व विचारवंत दादाभाई नौरोजी यांनी हे ब्रिटिश शासन या देशातील संपत्तीचं शोषण कशा पद्धतीने करीत आहे याचा पद्धतशीर लेखाजोखा त्यांनी 'पॉव्हर्टि ॲण्ड अनब्रिटिश रुल इन इंडिया' या पुस्तकाच्या माध्यमातून मांडली. या पुढे जाऊन इंग्रज भारतीय संपत्तीचे निस्सारण करतात अशा प्रकारचा शब्दप्रयोग त्यांनी केला. या निस्सारण शब्दासाठी त्यांनी पाण्याच्या निस्सारणाचे उदाहरण दिले,जसे की पाणी एका ठिकाणाहून पाटाच्या माध्यमातून दुसऱ्या ठिकाणी वाहत जाते त्या पद्धतीने हिंदुस्थानातील पैसा, संपत्ती व भौतिक वस्तू याचे वहन इंग्रजांनी केलेलं आहे. त्यामुळे हा संपूर्ण हिंदुस्तान दरिद्री, भुकेकंगाल व दयनीय कसा झाला आहे याची सविस्तरपणे व अभ्यासु मांडणी या ग्रंथाच्या माध्यमातून केली होती.

### दादाभाई नौरोजीचा आर्थिक निस्सारण सिद्धांत :

ब्रिटिश शासकाकडून चालवलेल्या हिंदुस्थानाच्या आर्थिक प्रशासनाबाबत दादाभाई नौरोजी यांनी कठोर व गंभीर टीका करून आपली भूमिका स्पष्ट केली. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नापैकी एक निश्चित उत्पन्नाचा हिस्सा इंग्लंडला जातो पण या शिष्याच्या मोबदल्यात कोणत्याही प्रकारचा परतावा मिळत नाही म्हणजे निस्सारण होय. कारण भारताकडून इंग्लंड कडे सातत्याने उत्पन्न, संपत्ती व भौतिक संपत्तीचे हस्तांतरण होत होते यालाच त्यांनी निस्सारण हा शब्दप्रयोग केला आहे. थोडक्यात, ब्रिटिश कालखंडात हिंदुस्तानने ब्रिटिश सरकारला विनासायास व परत न देण्याच्या अटीवर दिलेली संपत्ती होय.

### निस्सारण सिद्धांत (The Drain Theory)

दादाभाई नौरोजी यांनी 'पॉव्हर्टी आणि अनब्रिटिश रुल इन इंडिया' या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या ग्रंथांमध्ये आर्थिक निस्सारणाचा सिद्धांत मांडून तत्कालीन काळातील इंग्रज व्यवस्थेला मोठा धक्का दिला होता. यामध्ये ब्रिटिश शासन भारतीयांना जबरदस्तीने असंख्य वस्तूंची निर्यात युरोपला करण्यासाठी प्रवृत्त करते. या माध्यमातून ब्रिटिशांना खूप मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळत होते त्याच पद्धतीने इंग्रज व्यापारी मोठ्या प्रमाणात मालाची खरेदी करून ते इंग्लंडला विकत होते आणि या दोन्ही पद्धतीमुळे त्यांचे उत्पन्न व संपत्तीत प्रचंड वाढ होत होती. मात्र भारतीयांच्या उत्पन्नात वाढ होत नव्हती. तसेच भारतातून इंग्लंडला जाणारे इंग्रज अधिकारी व नागरिक ही आपल्या बरोबर सोने-चांदी, पैसा व अन्य स्वरूपातील संपत्तीचे वहन करीत होते. याचा अर्थ इंग्रजानी भारतीयांकडून विविध स्वरूपातून भांडवल व संपत्तीचे वहन करून अर्थव्यवस्था पोकळ करून टाकली होती. त्यामुळे साहजिकच भांडवलाचे व संपत्तीचे निष्कासन झाल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत विविध क्षेत्रात गुंतवण्यासाठी भांडवलाची कमतरता जाणवू लागली. याचा गैरफायदा घेत इंग्रजांनी स्वतः भांडवल गुंतवून त्याचा परतावा पुन्हा इंग्लंडला घेऊन जाऊ लागले. त्यामुळे भारतीय विकासाच्या प्रक्रियेत मोठे अडथळे निर्माण होत होते. ब्रिटिशांकडून फक्त स्वतःचा व देशाचा फायदा व नफा याचा विचार केला गेला. त्यामुळे भारतीय उद्योगधंदे पंगू व नष्ट झाले त्याचा परिणाम म्हणून एकेकाळी सुजलाम-सुफलाम असणारा भारत देश दरिद्री बनला. याबाबत दादाभाई नौरोजीनी ब्रिटिश संसदेमध्ये संपत्तीच्या निस्सारना बाबत प्रश्न मांडले होते यामुळे त्यांना प्रखर राष्ट्रवादी पुरुष म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो.

इंग्रज शासनाकडून कोणत्याही अडथळ्याशिवाय भारतीय संपत्तीचे वहन जवळपास २०० वर्ष केलेले होते या बदल्यात त्यांना कोणताही परतावा दिलेला नाही. तसेच दादाभाई नौरोजी यांनी केलेल्या अभ्यासानुसार सन१७५७ ते १८३९ या काळात भारताचे आर्थिक शोषण त्याकाळातील राष्ट्रीय उत्पन्नाच्या जवळपास २ ते ३ टक्के होते हे अत्यंत दुर्दैवी आहे. याचा अर्थ इंग्रजांनी भारतीय संपत्तीचं प्रचंड प्रमाणात निस्सारण केलेले आहे हे स्पष्ट होते.

दादाभाई नौरोजी यांनी आपल्या ग्रंथांमध्ये दोन पद्धतीने भारताचे आर्थिक शोषण होत आहे असे मत मांडले होते.

१) ब्रिटिश अधिकाऱ्यांचे वेतन व निवृत्तिवेतन हे भारतातून पाठविले जात होते.

२) अन्य स्वरूपातील संपत्ती व युरोपीयांनी पाठवलेला पैसा होय.

दादाभाई नौरोजी यांनी हा निस्सारण सिद्धांत मांडून तमाम भारतीयांच्या डोळ्यात अंजन घातले. त्याचबरोबर भारत हा दारिद्र्याच्या दृष्टचक्रात कसा अडकत गेला याचं विदारक व वास्तव चित्र या माध्यमातून जगासमोर आणले. पुढील काळात अनेक अर्थशास्त्रज्ञानी आपापल्या शैलीमध्ये संपत्ती निस्सारणाबाबत विवेचन केलेले आहे. मात्र याबाबतीत नौरोजी यांची शैली सर्वांना प्रेरणादायी व दिशादर्शक आहे.

**आर्थिक निस्सारणाचे मार्ग :**

भारताच्या गौरवशाली परंपरा असणाऱ्या इतिहासात इंग्रजांनी प्रवेश केल्यानंतर सन १९५७ पासून ते १९४७ पर्यंत वाटेल त्या मार्गाने या देशातील संपत्तीचं वहन करण्यात आले होते. त्यामुळे समृद्ध असणाऱ्या या देशात आर्थिक निस्सारणाच्या माध्यमातून आर्थिक पोकळी व दारिद्र्याच्या दुष्टचक्राची निर्मिती करून दिली. ब्रिटिशांनी या देशाच्या विकासापेक्षा स्वतःची व देशाची संपत्ती कशी वाढेल याची दृष्टव्यवस्था २०० वर्षाच्या काळात केली. दादाभाई नौरोजी यांनी खालील पद्धतीने/ मार्गाने ब्रिटिशांनी भारतीय अर्थव्यवस्थेचे शोषण व संपत्तीचे निस्सारण केले होते.

**१) गृह खर्च (Home Charges)**

संपत्ती निस्सारणा मधील शोषणाचा सर्वात मुख्य घटक म्हणून गृह खर्चाकडे पाहिले जाते. यामध्ये इंग्रज अधिकाऱ्यांचे वेतन, निवृत्ती वेतन, बोर्ड ऑफ कंट्रोल आणि बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांचे वेतन व भत्ते, ब्रिटिश भांडवलावरील लाभांश,ब्रिटिश सैन्यावरील खर्च व भारत सरकार मार्फत सेक्रेटरी ऑफ स्टेट कडून ग्रेटब्रिटन कडून केला जाणारा खर्च या सर्वाचा अंतर्भाव या गृह खर्चामध्ये केला जातो. प्रा. सी. एन. वकील यांच्या मते, १८३४ ते १९३९ या कालखंडात भारताचे आर्थिक शोषण जवळपास ८५० दशलक्ष पौंड इतके झाल्याचे कळते.

**२) युद्ध खर्चाची तोंडमिळवणी :**

भारतात ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटिश सरकारने विविध युद्धासाठी झालेल्या खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी भारतातून प्रचंड प्रमाणात संपत्तीची लूट व खर्च दाखविण्यात आला. तसेच ब्रिटिशांची साम्राज्यशाही

विस्तारीकरणाच्या धोरणामुळे वाढत असणाऱ्या खर्चाची व्यवस्था भारताकडून केली जात होती. त्याचबरोबर अफगाण,मराठा व म्हैसूरचा युद्धाचा खर्चही भारतीयाकडून वसूल करण्यात आला.

**३) कर्जावरील व्याज :**

ब्रिटिशांनी भारतात चांगल्या सेवा प्रदान करता याव्यात तसेच प्रशासकीय व्यवस्था कायदा आणि न्यायव्यवस्था सक्षम बनवण्यासाठी प्रचंड प्रमाणात खर्च केला जात होता. यासाठी ब्रिटिशांनी इंग्लंडकडून प्रचंड प्रमाणात कर्ज घेतले होते या कर्जापोटी व्याज व मुद्दल खर्च भारताला भरावा लागत असे.

**४) भांडवलदारांना गुंतवणुकीचा लाभ व नफा :**

ब्रिटिश भांडवलदारांनी भारतात विविध क्षेत्रात रेल्वे बांधणी, कालवे बांधणी, जहाज निर्मिती, रस्ते व पुल निर्मिती तसेच चहा, कॉफी, कागद, साखर, तंबाखू , कोळसा, अन्य कृषी व कृषीजन्य लाभदायक क्षेत्रात केलेल्या गुंतवणूकीमुळे भांडवलदारांच्याकडून लाभ व नफ्याच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात संपत्तीचे निस्सारण इंग्लंडला होत होते.

**५) ब्रिटिश अधिकाऱ्यांनी पाठवलेली स्वगृही बचत व संपत्ती :**

ब्रिटिश अधिकारी भारतातील विविध उच्चपदावर कार्य करीत असताना विविध मार्गाच्या माध्यमातून मिळवलेल्या काळीसंपत्ती व साठवलेली बचत स्वगृही विविध कारणांसाठी पाठविली जात होती.

**६) भारताला दरिद्र बनविणारे व्यापारी धोरण :**

ब्रिटिश व्यापाऱ्यांकडून नफा मिळवण्यासाठी वाटेल त्या वाममार्गाचा वापर केला जात होता. तत्कालीन काळात इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीमुळे उद्योगधंद्यांच्या संख्येत वाढ झाली होती. त्यामुळे लागणारा कच्चामाल हा भारतातून अत्यंत अत्यल्प किंमतीत खरेदी केला जात होता. त्याच बरोबर इंग्लंडमध्ये कच्च्या मालावर प्रक्रिया करून तयार झालेल्या वस्तू किंवा माल भारताला महागड्या किंमतीमध्ये विकला जात होता. त्यामुळे त्याचा दुहेरी फायदा ब्रिटिश व्यापाऱ्यांना व उत्पादकांना होत होता. याद्वारेही भारताचे आर्थिक शोषण व संपत्तीचे निस्सारण होत होते.

**७) सेवाक्षेत्र :**

ब्रिटिशांनी भारतात मोठ्या प्रमाणात बंदरे, रस्ते व लोहमार्गाचे जाळे निर्माण करून भारतीयांना सेवा प्रदान करण्याचे कार्य केले होते त्याचबरोबर विमा, पोस्ट ऑफिस, दूरसंचार व अन्य सेवा उपलब्ध करून दिल्या, मात्र या सेवेच्या भाडेपोटी प्रचंड प्रमाणात संपत्ती खर्च करावी लागत होती त्यामुळे या मार्गाद्वारे ही संपत्तीचे निस्सारण इंग्लंडला झाले होते.

**८) अन्य वाम मार्ग :**

ब्रिटिशांनी दोनशे वर्षाच्या काळात भारतातील राजे महाराजे,नवाब या राज्यकर्त्यांना सत्तेचे व संपत्तीचे आमिष दाखवून अत्यंत धूर्तपणे आर्थिक लाभ डोळ्यासमोर धरून राज्यकर्ते बदलले जात होते. त्या पायी या

राज्यकर्त्यांकडून प्रचंड प्रमाणात संपत्ती उकळली जात होती. तसेच ब्रिटिश काळात वाममार्ग व भ्रष्टाचार बोकाळला असल्यामुळे त्याचा लाभ हे ब्रिटिश अधिकारी घेऊन संपत्तीचे शोषण करीत होते.

अशाप्रकारे उपरोक्त कारणामुळे या देशातील संपत्तीचे शोषण व आर्थिक निस्सारण प्रचंड प्रमाणात झाल्यामुळे देश आर्थिक संकटात सापडला. या देशातील आर्थिक व्यवस्था कोलमडून सर्व उद्योगधंदे लयास गेले. ब्रिटिशांनी हे सर्व हेतुपुरस्करपणे केलेले होते.

**निस्सारणाचे आर्थिक परिणाम :**

ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटिश सरकारने भारताचे आर्थिक शोषण प्रचंड प्रमाणात केले त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था लयास जावून अर्थव्यवस्थेतील प्रत्येक घटक अर्थहीन बनला त्यामुळे विकासाचे मार्ग खुंटले.

**१) शेतीप्रधान अर्थव्यवस्था व इतर घटकांचाही शेतीवर भार वाढला :**

इंग्रजानी जाणीपूर्वक व स्वार्थी हेतू डोळ्यासमोर ठेवून आर्थिक शोषणाच्या विविध मार्गाच्या माध्यमातून प्रचंड प्रमाणात संपत्ती निर्माण केली. यामध्ये शेतीव्यवसाय हा फक्त ब्रिटिश व्यापाऱ्यांना कच्चा माल पुरविणारे व अन्य चहा-कॉफी, मसाल्याचे पदार्थ व तंबाखू हे शेती उत्पादित माल याची निर्यात करणारे क्षेत्र बनविले. त्याचबरोबर ब्रिटिशांच्या बनवलेल्या माला समोर भारतीय हस्त व्यवसाय टिकू शकले नाही त्यामुळे त्यांचा ऱ्हास होत गेला.

**२) भांडवलाच्या कमतरतेमुळे इंग्रज भांडवलदारांची मक्तेदारी वाढली :**

ब्रिटिश शासनाकडून जाणीपूर्वक व स्वार्थी भावनेने संपत्तीचे निस्सारण व आर्थिक शोषण करण्यात आले त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेची दुर्दशा झाली. भांडवल कमतरतेमुळे शेती, उद्योगधंदे व व्यापाराचा वेग मंदावला व विकास प्रक्रिया स्थिर झाली. त्यामुळे साहजिकच भारतीय अर्थचक्र सुरू करण्यासाठी ब्रिटिश भांडवलदाराना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. त्याचा गैरफायदा घेत त्यांनी स्वतःची मक्तेदारी निर्माण करून पुन्हा भारतीय अर्थव्यवस्था पोखरून काढण्याचे काम केले.

**३) बेकारी व दारिद्र्याच्या प्रमाणात वाढ :**

इंग्रजांनी जवळपास २०० वर्ष भारतीय अर्थव्यवस्थेचे लचके तोडले त्यामुळे अर्थव्यवस्था दिशाहीन होऊन थंडावली व आर्थिक चक्रांचा वेग मंदाविला. त्याचा परिणाम म्हणून उद्योगधंदे व हस्तव्यवसायांचा ऱ्हास झाल्यामुळे बेकारीच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली त्यामुळे न भेदणारे दारिद्र्याचे दुष्टचक्र निर्माण झाले.

**४) करांचा वाढता भार व राहणीमानात घट :**

ब्रिटिश सत्ताधाऱ्यांकडून विविध क्षेत्रावर व घटकावर होणाऱ्या खर्चाची तजवीज करण्यासाठी प्रचंड प्रमाणात भारतीय लोकांवर विविध पद्धतीचे कर लादण्यात व आकारण्यात आले. या व्यवस्थेने सर्वत्र भयावह दृष्टचक्र तयार करून दारिद्र्याच्या सापळ्यात भारतीयांना अडकविले होते. त्यामुळे रोजगाराअभावी उत्पन्नात प्रचंड घट होवून राहणीमानाचा दर्जा घसरत गेला.

## ५) कुटिर, हस्तउद्योग व उद्योगधंद्यांचा ऱ्हास :

गुलामीचे जीवन जगणाऱ्या या देशात ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटिशांनी जाणीवपूर्वकपणे अर्थव्यवस्था उद्धवस्त करून श्रमप्रधान असणाऱ्या कुटीर व हस्त उद्योगांचा ऱ्हास घडवून आणला.कारण क्षमता, गुणवत्ता व मागणीचा अभाव यामुळे ब्रिटिश उद्योगासमोर हे उद्योग टिकू शकले नाहीत आणि या सर्वांचा परिणाम म्हणून हे उद्योगधंदे लयास गेले.

## ६) इतर परिणाम :

ब्रिटिशांनी भारतीय शेतकऱ्यांना शेतमाल व पूरक असणाऱ्या वस्तूंच्या मागणीसाठी मर्यादित ठेवले त्यामुळे अन्य उत्पादन व उद्योगधंद्याकडे दुर्लक्ष झाले. त्याचबरोबर भारतीयांची जाणीपूर्वक संकुचित मानसिकता बनविल्यामुळे मूलभूत उद्योगाकडे दुर्लक्ष झाले त्याचा परिणाम म्हणून अर्थव्यवस्था ढेपाळली.

## सारांश :

इंग्रज भारतीय संपत्तीचे निस्सारण करतात अशा प्रकारचा शब्दप्रयोग त्यांनी केला. या निस्सारण शब्दासाठी त्यांनी पाण्याच्या निस्सारणाचे उदाहरण दिले, जसे की पाणी एका ठिकाणाहून पाटाच्या माध्यमातून दुसऱ्या ठिकाणी वाहत जाते त्या पद्धतीने हिंदुस्थानातील पैसा, संपत्ती व भौतिक वस्तू याचे वहन इंग्रजांनी केलेलं आहे. त्यामुळे हा संपूर्ण हिंदुस्तान दरिद्री, भुकेकंगाल व दयनीय कसा झाला आहे याची सविस्तरपणे व अभ्यासु मांडणी या ग्रंथाच्या माध्यमातून केली होती. संपत्तीचे निस्सारण व आर्थिक शोषणामुळे भारतीय अर्थव्यवस्था कमकुवत बनली त्यामुळे भारतीय समाजसुधारकांनी व तज्ञानी इंग्रज हे भारतीयांचे रक्त पिणारे पशु आहेत अशा प्रकारचा उल्लेख केला आहे. एकंदरीत पाहता दादाभाई नौरोजी यांनी लिहिलेल्या पुस्तकाच्या माध्यमातून ब्रिटिशांनी भारतीय संपत्तीचं शोषण किती व कसे केले आहे याचे वास्तव चित्रण केल्यामुळे ब्रिटिशांचा खरा चेहरा जगासमोर येऊ शकला. प्रगतीचा, पुरोगामित्वाचा व खुल्या व्यापारीपणाचं धडे देणाऱ्या ब्रिटिशांनी भारताला मात्र अप्रगत व गुलामगिरीत राहण्यासाठीची व्यवस्था केल्याचे चित्र दिसते.

## पारिभाषिक शब्द :

**निस्सारण :** पाणी एका ठिकाणाहून पाटाच्या माध्यमातून दुसऱ्या ठिकाणी वाहत जाते त्याला निस्सारण म्हटले आहे.

**गृह खर्च :** ब्रिटीश काळात अधिकाऱ्यांचे वेतन, सैन्यावरील खर्च, निवृती वेतन व अन्य स्वरूपातील बाबीवर भारतीयांच्या कडून केला जाणारा खर्च होय.

**सेवा खर्च :** रेल्वे, जहाज, बंदरे, विमा, तार व टपाल हे ब्रिटीश सरकारच्या मालकीचे असल्यामुळे याच्या भाड्यापोटी केला जाणारा खर्च होय.

## स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

१. दादाभाई नौरोजीनी आपल्या ग्रंथात ............. हा सिद्धांत मांडला.

अ) आर्थिक समतेचा ब) आर्थिक विषमतेचा क) आर्थिक निस्सारण ड) यापैकी नाही

२. भारतीय राजकारणातील भिष्माचार्य म्हणून ............ यांचा उल्लेख केला जातो.

अ) म. गांधीजी ब) लोकमान्य टिळक क) म.फुले ड) दादाभाई नौरोजी

३. भारतीय अर्थशास्त्राचे जनक .................. हे आहेत.

अ) गोविंद रानडे ब) डॉ.आंबेडकर क) दादाभाई नौरोजी ड) धनंजय गाडगीळ

४. इंग्रजांच्या मतदार संघातून निवडून येणारे व हाऊस ऑफ कॉमन्सचे सभासद बनणारे पहिले भारतीय .. ...... होय.

अ) गोविंद रानडे ब) डॉ.आंबेडकर क) दादाभाई नौरोजी ड) धनंजय गाडगीळ

५. दादाभाई नौरोजी मुंबईच्या ............ महाविद्यालयात पहिले भारतीय प्राध्यापक म्हणून रुजू होते.

अ) सिडनहम ब) एल्फिन्स्टन क) विल्सन ड) यापैकी नाही

६. आर्थिक निस्सारणामध्ये ................ हे सर्वात महत्त्वाचे कारण आहे.

अ) गृहखर्च ब) कर्जावरील व्याज क) संरक्षणावरील खर्च ड) व्यापारी धोरण

७. 'पॉव्हर्टी ॲण्ड अनब्रिटीश रूल ऑफ इंडिया' हा ग्रंथ ................ साली प्रकाशित झाला.

अ) १९०० ब) १९०१ क) १९०२ ड) १९०३

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

१. क) आर्थिक निस्सारण २. ड) दादाभाई नौरोजी ३. क) दादाभाई नौरोजी

४. क) दादाभाई नौरोजी ५. ब) एल्फिन्स्टन ६. अ) गृहखर्च ७. ब) १९०१

**टीपा लिहा.**

१) आर्थिक निस्सारण

२) आर्थिक निस्सारणाची कारणे

३) आर्थिक निस्सारणाचे परिणाम

४) आर्थिक शोषणाचे मार्ग

**दीर्घोत्तरी प्रश्न :**

१) दादाभाई नौरोजी यांचा आर्थिक निस्सारण सिद्धांत सविस्तरपणे स्पष्ट करा.

**संदर्भ ग्रंथ :**

1) Masani, Rustom Dadabhai Naouroji, Bombay,1939

2) https://www.prabhasakshi.com

3) Dadabhai and Wikipedia

***

# घटक : ३
# महात्मा गांधी
# ( Mahatma Gandhi )

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ ग्राम विकासाची संकल्पना

३.२.२ विकेंद्रीकरणाचे महत्त्व

३.२.३ स्वदेशी - विकासाचे मुलभूत तत्त्व

३.२.४ ग्राम स्वराज्याची संकल्पना

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.५ स्वयं अध्ययन प्रश्न

३.६ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ क्षेत्रीय कार्य

३.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

**१.० उद्दिष्ट्ये :**

सदर घटकांच्या अभ्यासाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे :

१) महात्मा गांधी यांचा जीवनपट संक्षिप्तात समजून घेता येईल.

२) ग्राम विकासाची संकल्पना स्पष्ट होईल.

३) विकेंद्रीकरणाचे महत्त्व समजून घेता येईल.

४) विकासामधील स्वदेशीचे महत्त्व लक्षात घेता येईल.

५) ग्राम स्वराज्याची संकल्पना स्पष्ट होईल.

६) महात्मा गांधीजींचे शेतीविषयक विचार समजून घेणे.

७) महात्मा गांधीजींचे एकंदरीतच अर्थविषयक विचार लक्षात घेणे.

**३.१ प्रस्तावना :**

महात्मा गांधींचा जन्म २ ऑक्टोंबर १८६९ मध्ये गुजरातमधील पोरबंदर मध्ये झाला. गांधीजींचे प्राथमिक शिक्षण हे खेड्यातच झाले. त्यानंतर १८८७ मध्ये गांधी कायद्याच्या शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. तिथे त्यांनी कायद्याची पदवी मिळवली. १८९३ ते १९१४ पर्यंत गांधीनी दक्षिण आफ्रिकेतील वंशवादासंबंधी समानतेसाठी मोठा लढा दिला. आफ्रिकेत भारतीयांवर होणाऱ्या अन्यायकारक छळाविरुध्द ते उभे राहिले. जवळपास दोन दशके गांधीजीनी आफ्रिकेतील विविध प्रश्नांवर लढे दिले व आफ्रिकेतही गांधीजींचे नेतृत्त्व सर्वमान्य झाले होते.

गांधीजींच्या जीवनाला कलाटणी देणाऱ्या परदेशी दौऱ्यात टॉलस्टॉय, रास्केन आणि थोरो यांच्या विचारांचा त्यांना जवळून परिचय झाला. रस्किनच्या 'अन् टू धिस लास्ट', टॉलस्टॉयच्या 'किंगडम ऑफ गॉड' या पुस्तकामुळे गांधीजींना जीवनाचे तत्त्वज्ञान समजले. गांधीजींनी अन टू धिस लास्ट चे गुजरातीत सर्वोदय असे भाषांतर केले. दक्षिण आफ्रिकेतच गांधीजींना सत्यग्रहाचा मार्ग गवसला. आफ्रिकेतील हिंदी लोकांना न्याय मिळवून देण्याचे त्याचे प्रयत्न म्हणजेच 'सत्याचे प्रयोग' होते. २० वर्षाच्या आफ्रिकेतील रहिवासाच्या काळात अहिंसात्मक लक्ष्यामुळे गांधीजींचे नेतृत्त्व जसे प्रस्थापित झाले त्याचबरोबर अहिंसात्मक चळवळीचे एक नवे साधन जगासमोर आले.

गोपाळ कृष्ण गोखलेंना गांधीजी आपले राजकीय गुरू मानत असत. गोखलेंच्या विनंतीवरून गांधी भारतात आले. १९१७ चया चंपारण्य सत्याग्रह, अहमदाबाद गिरणी कामगारांचा लढा, नील सत्याग्रह, १९२० चा असहकार, १९३०ची सविनय कायदेभंग चळवळ, १९४२ चा चले जाव ते १९४७ च्या स्वातंत्र्यापर्यंत गांधीजींनी देशाचे नेतृत्त्व केले. स्वातंत्र्यलढ्यात गांधीजींनी देशाला सर्वमान्य नेतृत्त्व दिले. त्यांनी आपल्या कार्यशैलीतून छोट्या छोट्या गोष्टींमधूनही व्यापक लढे उभे केले. ते स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीत अत्यंत फायदेशीर ठरते.

१९१५ ला गांधीजी जेव्हा भारतात आले तेव्हा सर्वप्रथम त्यांनी संपूर्ण देशाचा दौरा केला. देशातील दु:ख, दारिद्र्य त्यांनी जवळून पाहिले व ते दूर करण्यासाठी स्वत:ला पूर्ण वेळ वाहून घेण्याचे ठरविले. सामान्य व्यक्तीच्या जीवनात बदल घडावयाचा असेल तर तो आर्थिक बाबतीत सक्षम बनायला हवा ही गांधीजींची धारणा झाली. यावरील उपाय व प्रश्न सोडविण्याचे मार्ग म्हणजेच गांधीजींचे आर्थिक विचार आहेत. म्हणून गांधीजींच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे ही काळाची गरज आहे. शिवाय गांधीजींचे आर्थिक विचार फक्त अभ्यासून चालणार नाहीत तर ते प्रत्यक्षात अंमलात आणावे लागतील. भारतासारख्या लोकशाही देशासमोरील आजचे प्रश्न पाहता अनेक प्रश्नांची उत्तरे गांधीजींच्या आर्थिक विचारांमध्ये सापडतील हे नक्की.

**१.३.१ ग्राम विकासाची संकल्पना : (Concept of Village Development)**

भारताच्या इतिहासात गांधीजींचे योगदान महत्त्वाचे आहे. अखंड मानवजातीसाठी त्यांनी केलेले काम मोलाचे आहे. महात्मा गांधीजींनी सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह ही तत्त्वे समोर ठेवून ग्रामस्वराज्य, रामराज्य आणि

विश्वकल्याणासाठी समग्रता ही संकल्पना मांडून खेड्यांचा विकास होईल व त्यातून देशाचा विकास होईल असा विचार मांडला. परंतु प्रत्यक्षात आपणास आज हे स्वरूप दिसत नाही. आज देशासमोर अनेक आव्हाने उभी आहेत. त्यामध्ये भ्रष्टाचार, बेरोजगारी, महागाई, आर्थिक विषमता, प्रदूषण, दहशतवाद यामुळे अराजकता पहावयास मिळेल. या परिस्थितीमध्ये सकारात्मक बदल घडवून आणायचा असेल तर आपणांस गांधीजींचे ग्रामीण विकासाबाबतचे विचार फक्त अभ्यासून चालणार नाहीत तर कृतीमध्ये आणावे लागतील.

**गांधीजींचे ग्रामीण विकासाबाबतीत विचार :**

भारत स्वतंत्र झाल्यानंतर आपला देश कसा असावा याचे चित्र गांधीजींनी आपल्या मनात तयार केले होते. परंतु स्वातंत्र्यानंतर ते गांधीजींचे स्वप्न मागे पडताना दिसते. खेड्यांकडे चला हा गांधीजींचा मंत्र बाजूला पडून झपाट्याने शहरीकरण होताना दिसत आहे. अशा परिस्थितीमध्ये खेडी पुन्हा ओस पडू लागली आहेत. शेतीचे लहान-लहान तुकडे पडत आहेत. खेड्याकडून रोजगारानिमित्त शहरांकडे लोंढेच्या लोंढे निघाले आणि साहजिकच त्यामुळे शहरांवरील ताणही वाढत चाललाय. ग्रामीण अर्थव्यवस्था ढासळत चालली आहे हे असेच चालत राहिल्यास परिस्थिती भयावह स्थितीला पोहचेल तेव्हा आता गांधीजींच्या ग्रामीण विकासाच्या संकल्पनेला नव्याने अभ्यासण्याची गरज निर्माण झाली आहे असेच म्हणावे लागेल.

भारत देश अनेक खेड्यांचा मिळून बनलेला आहे. आकडेवारीचा विचार करायचा झाला तर स्वातंत्र्यानंतर १९५९ च्या जनगणनेनुसार जवळपास साडेपाच लाख (५.५०) खेडी या देशात होती. आज ती संख्या साडेसहा लाखांच्या वर (६.५० लाख) गेली आहे. आजही देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ६५-६६% लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते. एवढ्या मोठ्या प्रमाणावरील लोकसंख्येच्या सर्वांगीण विकासाचा विचार करताना ग्रामीण विकासाचे धोरण किती गरजेचे आहे हे यावरुन स्पष्ट होते.

**१) ग्रामीण आरोग्य :**

गांधीजींच्या मते ग्रामीण भागातील लोकांचे आरोग्य सुदृढ हवे असेल तर गाव निरोगी असले पाहिजे. निरोगी आरोग्य मानसिक व शारीरिक स्वास्थ्य उत्तम राहण्यास मदत करते. ग्रामीण भागातील लोकांमध्ये असणाऱ्या व्यसनाधीनतेमुळे आरोग्यावर दुष्परिणाम होतात. तेव्हा व्यसनाधीनता समाप्त व्हावी असेही गांधीजी सांगतात. तसेच व्यसनाधीनतेमुळे अनावश्यक खर्चही होतो. तो बंद झाला पाहिजे. त्यासाठी गाव पातळीवर सर्व आरोग्यविषयक सुविधा असाव्यात असे ते सुचवितात त्यासोबतच गावात स्वच्छता असावी, स्वच्छता असल्यास दुर्गंधी पसरणार नाही व साथीच्या रोगावर अटकाव बनेल व ग्रामीण आरोग्य चांगले राहण्यास मदत होईल.

**२) ग्रामीण उद्योग :**

औद्योगिक क्रांतीनंतर भांडवलशाही सुरु झाली. मोठ-मोठे कारखाने, उद्योगधंदे सुरु झाले. या कारखानदारांचा हेतू नफा मिळविणे हाच असल्याने महिला कामगार (विशेषत:), बाल कामगार इ. पिळवणूक होत होती. कमी मजुरीमध्ये रात्रंदिवस काम करुन घेतले जात होते. गांधीजींचे ग्रामीण उद्योगांबाबतचे धोरण स्पष्ट होते. ते म्हणतात की, ग्रामीण भागात शेतीतून निर्माण होणारा जो कच्चा माल आहे त्यावर प्रक्रिया उद्योग निर्माण करावेत. मोठ्या

उद्योगांपेक्षा लघु उद्योग उभे करावेत, कुटीर उद्योग निर्माण व्हावेत व यातूनच लोकांचे उत्पन्न वाढून त्यांचे राहणीमान सुधारण्यास मदत होईल. दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, बेकारी दूर होऊन ग्रामीण विकासात हातभार लागेल. खेडी स्वयंपूर्ण झाल्यास लोक शहरांकडे येणार नाहीत व शहरीकरणाची होणारी वाढ कमी होण्यास मदत होईल.

**३) शेती व शेतकरी :**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्था शेतीवर आधारीत आहे. तेव्हा शेतीवर अधिक लक्ष केंद्रित करावे असे गांधीजी सांगतात. ग्रामीण अर्थव्यवस्था आजही मोठ्या प्रमाणावर शेतीवरच (शेतीपूरक व्यवसाय) आधारीत आहे. म्हणून शेतीपूरक व्यवसायांमध्ये वाढ घडवून आणावी. त्यामध्ये पशुसंवर्धनात वाढ करणे, दुग्धउत्पादन वाढवणे, प्रक्रिया उद्योग स्थापावेत. शेतीतून शेतकऱ्याला कच्च्या मालातून अधिक उत्पन्न मिळेल, पशुसंवर्धनातून शेणखतही मिळेल व याचा उपयोग शेतीउत्पादन वाढविण्यात होईल. त्यासोबतच रासायनिक खतांचा वापर कमी होऊन शेतीचा पोत चांगला राहिल.

**४) ग्रामशिक्षण :**

व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षण होय. गांधीजींच्या मते गावात प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे व नि:शुल्क असावे तसेच ते मातृभाषेतूनच दिले जावे जेणेकरुन विद्यार्थ्यांना समजण्यास सोपे जाईल. त्याचबरोबर शिक्षणपध्दतीमध्ये ‘कमवा आणि शिका’ हे तत्त्व अंमलात आणावे.

**५) ग्रामन्यायालय :**

गांधीजींच्या मते गावात निर्माण होणारे तंटे, वादविवाद हे गावाताच सामोपचाराने मिटवावेत. यासाठी त्यांनी ग्रामपंचायत नावाची संकल्पना मांडली. ग्रामपंचायतीमार्फत गावातील प्रमुख लोकांद्वारे तंटे सोडवावेत व पंचांनी नि:पक्षपणे न्यायनिवाडा करावा. त्याने गांव तंटामुक्त होईल असे गांधीजी सुचवितात व ग्रामन्यायालया मुळे इतर मोठ्या न्यायालयावरील ताणही कमी होईल व लोकांचा वेळ व पैसा दोन्हीही वाचेल.

**६) सर्वोदय :**

गांधीजींनी अन् टू धिस लास्ट चे गुजरातीत केलेले भाषातर म्हणजेच सर्वोदय होय. त्यांच्या मते आर्थिक विषमता कमी करण्यासाठी भांडवलदारांजवळ किती संपत्ती असावी याला मर्यादा असावी. अधिकची संपत्ती त्यांनी राष्ट्राला अर्पण करावी. विकास हा शेवटच्या घटकापर्यंत पोहचला पाहिजे. शोषणविरहित समाज निर्माण होण्यासाठी गांधीजींनी सर्वोदय संकल्पना मांडली.

८) खेड्यात जातीय व्यवस्था असू नये.

९) गावाचा बहुतांश कारभार हा सहकारी पध्दतीने चालावा.

१०) लोकांसाठी करमणुकीची साधने गावात असावीत.

११) गावात पिण्याचे शुध्द पाणी असावे. सार्वजनिक पाणपोईची व्यवस्था करावी.

१२) जनावरांच्या निवाऱ्याची योग्य व्यवस्था असावी, गायीसाठी गोठे बांधले जावेत इ.

**सारांश :**

गांधीजींनी स्वराज्याच्या ज्या कल्पना मांडल्या त्या आजही सत्यात उतरल्याचे दिसत नाही. मोठ्या प्रमाणावर आजही ग्रामीण भागात व्यसनाधीनता आहे. पिण्याचेशुध्द पाणी मिळत नाही. शेती व शेतकऱ्यांची अवस्था दयनीय आहे. उद्योग हे शहरी भागात स्थापित झाल्याने शहराकडे रोजगारानिमित्त होणारे स्थलांतर मोठे आहे. अजूनही दुर्गम भागात शिक्षणाच्या सोयी उपलब्ध नाहीत. आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसते आहे. शासन स्तरावर राबवल्या जाणाऱ्या विविध योजना आजही लोकांपर्यंत पोहचत नाहीत.

एकंदरीत गांधीजी व त्यांचे ग्रामीण विकासाबाबतीतले विचार पाहिजे तेवढ्या प्रमाणात रुजलेले दिसत नाहीत. परंतु भविष्यात गांधीजींचे विचार घेवून ग्रामीण भागाचा विकास केल्याशिवाय देशासमोर दुसरा पर्याय उरणार नाही हे नक्की.

## ३.२ **विकेंद्रीकरणाचे महत्त्व :** (Importance of Decentralization)

विकेंद्रीकरण या शब्दातच खऱ्या अर्थाने याचा अर्थ दडलेला आहे. कुठल्याही प्रकारची सत्ता अथवा अधिकार एका व्यक्तीच्या हाती न ठेवता त्या सत्तेचे अथवा अधिकाराचे विभाजन करुन अनेक व्यक्तींना/संस्थांना निर्णयप्रक्रियेत सामावून घेणे याला ‘विकेंद्रीकरण’ म्हणतात.

महात्मा गांधींनी नेहमीच विकेंद्रीत अर्थव्यवस्थेचे समर्थन केले. त्यांच्या मते भारतीय अर्थव्यवस्थेत श्रमप्रधान उत्पादनतंत्राचा वापर केला जातो. उत्पादनाच्या घटकांपैकी (श्रम, भूमी, भांडवल, संयोजन) श्रम हा उत्पादनाचा घटक भारतात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. त्याचा पुरेपूर वापर उत्पादन प्रक्रियेत करायचा असेल तर विकेंद्रीत उत्पादन पध्दतीचा वापर भारतीय अर्थव्यवस्थेत करणे अनिवार्य आहे. गांधीजींच्या मते उत्पादनाचे विकेंद्रीकरण करावे. एकाच केंद्रीत व्यवस्थेद्वारे उत्पादन करण्यापेक्षा ते लहान लहान भागात अनेक ठिकाणी व्हावे.

गांधीजी अहिंसवादी विचाराचे असल्याने त्यांचा असा समज होता की केंद्रीत अर्थव्यवस्था ही हिंसेवर आधारीत असते. उत्पादनाची लहान एकके असावीत जी कमी श्रमिकांच्याही साहाय्याने ही चालविता यावीत व त्यासाठी लागणारी यंत्रसामुग्रीसुध्दा सहज वापरण्यायोग्य असावी व ती लहान ठिकाणीसुध्दा ठेवता यावी. अगदी एखाद्या कुटुंबामध्येही उत्पादन निर्मिती व्हावी हा गांधीजींच्या विकेंद्रीकरणाचा मुख्य हेतू होता. ‘आर्थिक विकेंद्रीकरण’ हे त्यांच्या ग्रामीण विकास व ग्रामस्वराज्य संकल्पनेतच दडलेले आहे.

गांधीजींच्या मते भारतीय अर्थव्यवस्थेला वेगाने विकसित करण्यासाठी लघुउद्योग व कुटिरउद्योगाची संख्या अधिक असणे उपयोगाचे ठरेल. याचा अर्थ गांधीजी पूर्णत: यांत्रिकीकरणाच्या विरोधात हेते असा अजिबात नाही. ते म्हणतात उद्योगांचे यांत्रिकीकरण मंद गतीने व्हावे. उद्योगाचे यांत्रिकीकरण होत असताना लघु/कुटिरोद्योग बंद होणार नाहीत याची काळजी घ्यावी. ग्रामीण भागातील लहान उद्योगांवरती या यांत्रिकीकरणाचा विपरीत परिणाम होवू नये. स्वातंत्र्यपूर्व काळात गांधीजींचा विद्युतशक्ती व मोटार वाहतूकीसही विरोध होता. कारण ते लहान उद्योगाच्या विकासासाठी हानीकारक सिध्द होतात. त्याचबरोबर गांधींचा मोठ्या उद्योगांच्या राष्ट्रीयीकरणासही

विरोध होता. त्यांच्या मते राष्ट्रीयीकरण हे लोकशाहीतील समस्या सोडविण्यास सक्षम ठरत नाही व त्यातून अतिरिक्त शहरीकरणाची समस्या निर्माण होवू शकते, त्याचप्रमाणे ते लहान उद्योगांना व्यक्तिगत स्वातंत्र्याला व स्वयंशासनाला घातक ठरते.

थोडक्यात, गांधीजी अर्थव्यवस्थेत अशा उत्पादनप्रक्रियेचे समर्थन करतात की, जिथे अधिकाधिक श्रमिकांचा वापर होईल, कमी यंत्राचा वापर होईल. छोट्या उद्योगांमधून अधिक वेगाने, अधिक उत्पादन करता येईल व जिथे कमीत कमी पिळवणूक होईल व गांधींना अशा वस्तू व सेवांचे उत्पादन अधिक अभिप्रेत होते की, त्या मानवाच्या मुलभूत गरजांना प्राधान्य देतील.

**विकेंद्रीकरणाचे महत्त्व :**

**१) लघु / कुटिरोद्योगांमध्ये वाढ :**

अर्थव्यवस्थेत उत्पादनप्रक्रियेत मोठ्या उद्योगांपेक्षा लहान उद्योगांची संख्या विकेंद्रीकरणामुळे अधिक होईल. जेणेकरुन अनेक ठिकाणी अनेक वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होईल व ज्यातून एकूण उत्पादनातही मोठी वाढ होईल.

**२) शेतकऱ्यांना मोकळ्या वेळेत काम मिळेल :**

लघु /कुटिरोद्योग प्रामुख्याने शेतीतून निघणाऱ्या कच्च्या मालावर आधारीत असल्याने व कमी यंत्रे आणि अधिक श्रमप्रधान उत्पादने निर्माण होत असल्याने ग्रामीण भागात शेतकऱ्यांना शेती सोबत एखादा कुटिरोद्योग करता येईल व त्यांच्या हाताला कामही मिळेल व सहजरीत्या वस्तूंचे उत्पादनही होईल.

**३) खेडेगावातील लोकांच्या उत्पन्नात वाढ :**

गांधींचा मोठ्या प्रमाणावरील औद्योगिकरणाला विरोध होता. कारण मोठे उद्योग हे शहरीकरणाच्या वाढीस पूरक ठरतात व ग्रामीण भागाकडून शहराकडे होणारे स्थलांतर वाढते. त्या तुलनेत लघुउद्योग श्रमप्रधान असतात. ग्रामीण भागातील लोकांना गावातच रोजगार मिळेल व त्यांना अधिकचे उत्पन्न मिळून त्यांच्या मुलभूत गरजाही पूर्ण होतील.

**४) प्राथमिक स्वरूपाची यंत्रसामुग्री :**

विकेंद्रीकरणामुळे लहान उद्योग निर्माण होतील त्यामध्ये मोठ्या यंत्राचा वापर केला जाणार नाही. मोठी यंत्रे ही भांडवलप्रधान अर्थव्यवस्थेत अधिक वापरली जातात. त्यामुळे कामगारांची संख्या कमी केली जाते. लहान उद्योगात कमी खर्चिक व सहजरीत्या एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाता येणारी यंत्रसामुग्री वापरता येईल जी वापरण्यासही गुंतागुंतीची नसेल जसे की गांधीजींनी चरख्याचे उदाहरण आपल्यासमोर ठेवले आहे.

**५) लोकांच्या मुलभूत गरजा पूर्ण होतील :**

विकेंद्रीकरणामुळे लहान उद्योगांमधून वेगवेगळ्या वस्तू मोठ्या संख्येने निर्माण होतील व अशा वस्तूंचे उत्पादन घेतील की त्या ग्रामीण भागातील लोकांच्या मुलभूत गरजा पूर्ण करतील.

### ६) कारखाना (फॅक्टरी) संस्कृती निर्माण होणार नाही :

विकेंद्रीकरणामुळे एकाधिकारशाही निर्माण होणार नाही. मोठ्या उद्योगसंस्था या नफा मिळविण्याच्या हेतूनेच निर्माण होत असतात व त्यातून अधिक उत्पादनाच्या हव्यासाने अधिक यांत्रिकीकरण केले जाते. कमीत कमी मजुरांच्या पिळवणुकीस वाव मिळतो. गांधीजींच्या मते कारखानदारी ही हिंसेच्या तत्त्वावर आधारीत असते. म्हणून गांधीजींनी यावर विकेंद्रीकरण हा उपाय सांगितला आहे.

### ७) मानवी साधनसामुग्रीचा पुरेपुर वापर :

भारतात मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. तेव्हा या साधनसामुग्रीचा पुरेपूर वापर होणे गरजेचे आहे. म्हणून अशाच उत्पादन प्रक्रियेचा वापर करणे अधिक योग्य होईल तिथे श्रमिकांचा वापर अधिक होईल. मोठ्या उद्योगांपेक्षा लहान उद्योग हे अधिक श्रमप्रधान असतात म्हणून लहान उद्योग अधिक हिताचे ठरतील. कारण भारतात भांडवली साधनसामुग्रीही कमी आहे. त्यादृष्टीने ही श्रमप्रधान तंत्राचा वापर अधिक सोयीस्कर ठरतो. जो विकेंद्रीकरणामुळे शक्य आहे.

### ८) उत्पादन खर्च कमी :

विकेंद्रीकरणामुळे छोट्या उद्योगधंद्याचे प्रमाण अधिक असेल व त्यासाठी लागणारा कच्चा मालही ग्रामीण भागात सहज उपलब्ध होऊन वाहतूक खर्चही वाचेल. त्यासोबतच श्रमप्रधान उत्पादनप्रक्रियेत यंत्रावरील खर्चही जवळपास नसतोच. उद्योगांची संख्या अधिक शिवाय मुलभूत गरजांच्या वस्तूंचे उत्पादन जास्त त्यामुळे उत्पादन खर्चही कमी येतो परिणामी वस्तूंच्या किंमतीही कमी राहतील.

### ९) खेडी स्वयंपूर्ण बनतील :

गांधीजींच्या स्वप्नातील भारत हा खेड्यांमध्ये आहे. 'खेड्यांकडे चला' हा संदेश गांधीजीनी देशाला दिला.विकेंद्रीकरणामुळे खेड्यातील लोकांना तिथेच रोजगार मिळेल. त्यांचे उत्पन्न वाढेल, खेड्यातील बेकारी व दारिद्र्य दूर होऊन लोकांच्या प्राथमिक गरजाही गावातच पूर्ण होतील व खेडी स्वयंपूर्ण बनतील. त्यामुळे शहरांवरील ताण कमी होईल व देशाच्या औद्योगिक क्रांतीस हातभार लागेल असे गांधी सांगतात. कारण आजही ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे.

### १०) भारतीय अर्थव्यवस्था वेगाने उभारण्यास मदत :

विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून उत्पादन प्रक्रियेचे छोट्या छोट्या घटकात विभाजन झाल्याने अधिक उत्पादन निर्मिती होईल, श्रमिकांना रोजगार मिळेल. उत्पादन खर्च कमी होईल, शेतीपूरक व्यवसायांची संख्या वाढेल, शहरांवरील ताण कमी होईल, ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक चालना मिळून लोकांच्या मुलभूत गरजाही पूर्ण होतील व अर्थचक्र गतिमान होण्याचे विकेंद्रीकरण हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे असे गांधीजींना वाटते.

## ३.३ स्वदेशी विकासाचे मुलभूत तत्त्व : Basic Principle of Development of Swadeshi

स्वदेशीचा साधारण अर्थ असा होतो की, एतदेशीय वस्तू, सुविधा, विचार मूल्ये यांना समाजाने प्राधान्य द्यावे. एकोणिसाव्या शतकात जेव्हा भारतात औद्योगिक क्षेत्र जवळपास अस्तित्वात नव्हते तेव्हा नव्याने उभा राहणाऱ्या भारतीय उद्योगांना बाजारपेठ मिळावी म्हणून स्वदेशीचा पुरस्कार कामी आला. तीच स्वदेशी संकल्पना भारताला स्वातंत्र्य चळवळीत एका टप्प्यावर महत्त्वाची ठरली. स्वावलंबन करुन आर्थिक धोरणाशी संबंधित अशी संकल्पना आहे जी विकसनशील देशानी अनेकदा वापरलेली आपण पाहतो.

गांधीजींनी स्वदेशीचा हा मुद्दा आर्थिक बाजूच्या बरोबरीने तात्त्विक मुद्यांशी जोडला. समाजाच्या गरजा आणि प्रचलित काळात त्या समाजाला उत्पादित करता येणाऱ्या वस्तू / सुविधा यांची सांगड घालून त्यांनी उपभोग प्रधान जीवनपध्दतीपेक्षा वेगळ्या जीवनपधद्तीचा पुरस्कार केला. गांधीजींनी कमी गरजांवर आधारलेले आयुष्य आणि देशीवाद म्हणजेच स्थानिक स्थिती व उत्पादनक्षमता यांच्याशी निगडीत स्वदेशीचा पुरस्कार केला.

गांधीजींची स्वदेशीची संकल्पना फक्त राष्ट्रीय भावना वाढीस लावणे व ऐक्य घडवून आणणे इ. पुरती मर्यादित नव्हती तर ती त्यांच्या ग्रामीण विकास व ग्रामस्वराज्य या संकल्पनांशीही निगडीत होती. ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देवून स्वावलंबी व स्वयंपूर्ण व्यवस्थेसाठी महत्त्वपूर्ण होती.

### १) देशी संसाधनांचा पुरेपूर वापर :

स्वदेशीमुळे देशातील संसाधनांचा पर्याप्त वापर होण्यास सुरुवात झाली. मोठ्या प्रमाणावर लघुउद्योग उभारुन उत्पादन वाढीस चालना मिळाली व ग्रामीण भागातील कच्च्या मालाची मागणीही वाढू शकते.

### २) देशी उद्योगांना प्रोत्साहन :

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीनंतर साहजिकच इंग्लंडमध्ये वेगाने उत्पादन वाढत होते. शिवाय भांडवलशाही अर्थव्यवस्थेमुळे इंग्लंडमध्ये उत्पादन खर्चही कमी येत होता. त्यामानाने भारतात उत्पादन खर्च अधिक येत होता व भारतीय उद्योग इंग्लंडमधील वस्तूंशी स्पर्धा करु न शकल्याने डबघाईस आले होते. स्वदेशीने देशी वस्तूंनाच भारतीयांनी प्राधान्य दिल्याने साहजिकच देशी उद्योगांना प्रोत्साहन मिळाले.

### ३) रोजगार निर्मितीत वाढ :

स्वदेशीच्या पुरस्काराने देशात वाढलेल्या मागणीमुळे वस्तूंचा पुरवठा वाढणार होता. लघु/कुटिरोद्योग श्रमप्रधान असल्याने कामगारांची गरज निर्माण होवून रोजगार वाढला.

### ४) उद्योगांच्या संख्येत वाढ :

स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर निर्माण होणाऱ्या कच्च्या मालाचा वापर करुन वेगवेगळ्या वस्तूंचे उत्पादन करणे शक्य होते. कमी खर्चात, कमी मनुष्यबळात अगदी छोटं कुटुंबही कुटिरोद्योग उभा करु शकत होते व त्या माध्यमातून वस्तूंचे उत्पादन घेऊ शकत होते. स्वदेशीमुळे देशात निर्माण होणाऱ्या वस्तूंना मोठी मागणी निर्माण झाली व त्यातून उद्योगांच्या उभारणीस मदत झाली.

**५) शैक्षणिक सुधारणा :**

भारतीयांनी देशात उभारलेल्या शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेण्याची शपथ अनेक विद्यार्थ्यांनी घेतल्याने नवीन शाळा, कॉलेजेस उभी राहिली. त्यामध्ये देशी भाषेतून शिक्षण मिळण्यात सुरवात झाली व या माध्यमातून शैक्षणिक प्रगती भारतीयांमध्ये घडून येण्यास मदत झाली.

**६) इंग्लंडकडे होणारे संपत्तीचे हस्तांतरण कमी :**

इंग्लंडमधील मालाला भारत ही एक मोठी बाजारपेठ होती. स्वदेशीच्या तत्त्वामुळे इंग्लंडमधील मालाला मागणी कमी झाली व त्यामुळे भारतातून मोठ्या प्रमाणावर इंग्लंडमध्ये जाणारा पैसा देशातच थांबला व देशी उद्योगांना त्याचा लाभ मिळू लागल्याने इंग्रजांच्या आर्थिक नाड्या आवळण्यास मदत झाली.

**७) सामाजिक जागृती :**

स्वदेशीमुळे देशप्रेम, राष्ट्राभिमान या बाबी वाढीस लागल्या. शैक्षणिक प्रगतीमुळे लोकांमध्ये जागृती घडून आल्याने सामाजिक जागृती घडून येण्यास मदत झाली.

**८) शेती व शेतीपूरक व्यवसायांना चालना :**

शेतीतून उत्पादित होणारा कापूस, नीळ, ज्यूट अशा उत्पादनांना कच्चा माल म्हणून मागणी वाढली. जो कच्चा माल पूर्वी इंग्लंडला कमी किंमतीत नेला जायचा. स्वदेशीमुळे देशातच छोटे-मोठे नवे उद्योगधंदे निर्माण झाले व त्यामध्ये या मालाला मागणी वाढली व शेतकऱ्यांना चांगला भावही मिळू लागला

स्वदेशी ही केवळ स्वातंत्र्य लढ्यातील एक चळवळ नव्हती तर देशाच्या अर्थकारणात मोठा बदल घडवून आणणारी एक संकल्पना होती. प्रामुख्याने ग्रामीण अर्थव्यवस्था गतिमान झाली. देशातील उपलब्ध संसाधनांचा वापर होवू लागला. अनेक नवे उद्योग, वेगवेगळ्या संस्था निर्माण झाल्या. बँका, सहकारी संस्थांच्या उभारणीतही मदत झाली. देशातील संपत्तीचे इंग्लंडकडे होणारे हस्तांतरण कमी झाले व देशाच्या विकासास हातभार लागला.

## ३.४ ग्रामस्वराज्याची संकल्पना : Concept of Gramswarajya

गांधीजींचे देशासाठी असणारे योगदान, त्यांचे विचार, त्यांची कार्यपध्दती आजही केवळ भारतासाठीच नव्हे तर जगासाठी सुसंगत, दिशादर्शक व अर्थपूर्ण आहे. गांधीजींनी जगासाठी सोडलेला सर्वात महत्त्वाचा वारसा कोणता असेल तर 'सत्याग्रही संकल्पना' आणि भारतासाठी त्यांनी दिलेला राजकीय वारसा व अमूल्य ठेवा काय, तर तो 'ग्रामस्वराज्य' अर्थातच 'पंचायतराज' जर चांगल्या पध्दतीने हा प्रयोग देशात यशस्वी झाला तर एक उत्तम व आदर्श शासनव्यवस्था निर्माण होईल व प्रगल्भ लोकशाही रूढ होईल.

महात्मा गांधीजींच्या नावाचा करिश्मा आजही संपूर्ण भारतात आपणात पहावयास मिळतो आणि विशेष म्हणजे गांधीजींना सुशिक्षित, सधन, लोकांपेक्षा निरक्षर, अडाणी, गरीब, अर्धपोटी, सामान्य लोकांचा अधिक पाठिंबा होता. या पाठीमागचे गमक त्यांच्या कार्यशैलीमध्ये दडलेले आहे. ज्या गावात रस्ते, वीज, शिक्षण या सुविधा नाहीत तिथेही गांधीजी पोहचले होते. कारण त्यांची सत्याग्रहाची पध्दत, अहिंसेचे तत्त्व, आंदोलनाची

साधी, सोपी आणि सरळ पध्दत जी लोकांच्या सहज गळी उतरत होती आणि यासोबतच गांधीजी खेड्यांपर्यंत पोहचण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजेच 'भारतातील पंचायतराज'.

भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था या प्राचीन काळापासून अस्तित्वात आहेत आणि या व्यवस्थेचे केंद्रस्थान होते ते म्हणजे खेडे. पूर्वी खेडे हा ग्रामीण समुदाय एखाद्या लहान प्रजासत्ताकाप्रमाणे स्वयंपूर्ण होता. परकीयांच्या संबंधापासूनही वेगळा होता. वैदिक काळामध्ये गाव प्रमुखाला 'ग्रामणी' म्हटले जायचे. मनुस्मृती व नारदस्मृतीमध्येही ग्रामपंचायतीचा संदर्भ आहे. तसेच कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही ग्रामपंचायतीचा उल्लेख आपणास पहावयास मिळतो. मुघल काळातही सत्तेचे विकेंद्रीकरण गावघटकांपर्यंत होते. पुढे ब्रिटिश काळात मात्र गाव ऐवजी जिल्हा हा प्रशासनाचा घटक मानला गेला. हिंदुस्थानात ब्रिटिश राजवट आल्यापासून जे काही अनिष्ट परिणाम झाले. त्यातला सर्वात सोचनिय परिणाम म्हणजे ज्या ग्रामपंचायती या देशात जगातील सर्व राष्ट्रांना आधी निर्माण झाल्या. विकास पावल्या आणि शतकानुशतके टिकल्या. त्या संस्थांचे उच्चाटन केले गेले असे गांधींना वाटत होते. आशियातील राज्ये सतत बदलत गेली. पण भारतातील समाजाचे स्थैर्य मात्र टिकून राहिले हा विरोधाचा विलक्षण नमुनाच आहे असे गांधीजींना वाटे.

गांधीजींच्याच शब्दात मांडायचे झाले तर उत्पादन, उपयोग, विभाजन या क्रिया जवळजवळ समयान्वयेच्छेने (एकाच वेळी घडणारे) करुनच चालतात आणि प्रथाभिलाषी अर्थकारणामुळे एक दुष्ट परंपरा आपणावर ओढवते. एखाद्या वस्तूला पुढे चांगला भाव मिळावा म्हणून अशा वस्तूंचे उत्पादन न करता तत्कालीन आवश्यक गरजा भागवल्या जाण्याच्या उद्देशानेच शेती केली जात होती. गांधीजींचे ग्रामस्वराज्य केवळ जुन्या गावांचे पुनर्निर्माणासाठी आधारभूत मानलेल्या अटींपैकी एक होते. उत्पादन हे सहकारी तत्त्वावर आधारलेले असायचे. अशाच ग्रामसंस्थांचे पुनरुज्जीवन झाले पाहिजे असे गांधीजींना वाटायचे.

गांधीजी आपल्या 'व्हिलेज स्वराज्य' या पुस्तकात म्हणतात. आधुनिक संस्कृतीत वावरणाऱ्या लोकांनी शरीरसुख हेच जीवनाचे उद्दिष्ट समजण्यात कसोटी मानली आहे. आपल्या गरजा वाढवून घेतल्या तरी साधनेही शोधली त्यामुळे जगाला आपले उद्दिष्ट साध्य करता आले नाही ही पिसाट वृत्ती आहे. या गोष्टीचा आपण त्याग केला पाहिजे. भौतिक सुखाच्या मागे लागल्यामुळे शोषण, साम्राज्यवाद जगाला भेडसावत आहे. हा स्वार्थ कमी होवून भुकेली, अर्धपोटी जनता आणि श्रमिक वर्ग यांच्यातली दरी कमी व्हायला हवी. श्रीमंतांनी स्वत:ला आपल्या संपत्तीचे विश्वस्त समजावे असे गांधीजी म्हणतात. भारतासाठी अशाच प्रकारचे ग्रामस्वराज्य खेड्यातील माणसाच्या जीवनामध्ये सुख व समाधान आणेल. देशाची सेवा म्हणजे गरीब माणसाची सेवा, अज्ञान, दारिद्र्य, विषमता यांचा शेवट व्हावा हे गांधीजींचे खरे स्वप्न होते. हे साध्य व्हायचे असेल तर खेडे हा विकासाचा केंद्रबिंदू मानून प्रशासन चालविण्याची गरज गांधीजींनी प्रतिपादित केली. लोकांचा शासनव्यवस्थेत सहभाग असावा. खेडी ही राजकीयदृष्ट्या स्वयंशासित असावीत, स्वतंत्र असावी असे गांधीजींचे मत होते.

**सारांश :**

महात्मा गांधीजींची १५० वी जयंती आपण नुकतीच साजरी केली. गांधीजींचे विचार त्यांची ग्रामस्वराज्याची संकल्पना आजही आपणा सर्वांना दिशादर्शक आहे. आपण जेव्हा आत्मनिर्भर भारताचा विचार करतो तेव्हा

सुरवात ही आत्मनिर्भर खेड्यांपासून करावी लागेल. तेव्हाच आत्मनिर्भर भारताचे स्वप्न सत्यात उतरु शकेल. गांधीजींनी मांडलेली प्रशासकीय विकेंद्रीकरणाची संकल्पना, सत्तेचे विकेंद्रीकरण अशा कल्पना स्वयंपूर्ण व आत्मनिर्भरतेच्या दिशेने वाटचाल करेल यात शंका नाही.

गांधीजींच्या ग्रामस्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणायची असेल तर लोकचळवळ निर्माण होणे गरजेचे आहे. मेंढा-लेखा, राळेगणसिध्दी, हिवरेबाजार, पाटोदा या गावांनी जे करुन दाखविले त्याचे अनुकरण अन्य गावांनी केल्यास खऱ्या अर्थाने गांधीजींच्या स्वप्नातील ग्रामस्वराज्य प्रत्यक्षात उतरल्याशिवाय राहणार नाही.

### ३.४ पारिभाषिक शब्द :

उद्योगाचे विकेंद्रीकरण : वेगवेगळ्या ठिकाणी उद्योगधंदे स्थापन करणे.

श्रम संस्कार : सामुदायिकरित्या श्रम (काम) करणे.

ग्राम शिक्षण : गावामधील औपचारिक शिक्षण

ग्रामन्यायालय : गावातील तंटे मिटवण्याची व्यवस्था.

ग्रामीण शहरी स्थलांतर : रोजगारासाठी ग्रामीण भागातून शहरात जाणे.

कुटीरोद्योग : लहानात लहान उद्योग.

श्रमप्रधान : श्रमाचा अधिकाधिक वापर

### ३.५ स्वयंअध्ययन प्रश्न :

**(अ) विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

१) गांधीजी उद्योगाच्या केंद्रीकरणाच्या बाजूने होते.

२) गांधीजी शेतीपूरक व्यवसायांना महत्त्व देत.

३) स्वदेशीमुळे रोजगारात वाढ होते.

४) गांधीजीनी अमेरिकेत वंशवादाविरुध्द लढा दिला.

५) गांधीजी मोठ्या उद्योगांच्या बाजूने होते.

६) गांधीजींचा जन्म महाराष्ट्रात वर्धा येथे झाला.

७) गांधीजींच्या मते ग्रामोद्योगांना संरक्षण दिले पाहिजे.

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) ग्रामस्वराज्य ही संकल्पना कोणी मांडली ?

२) गांधीनी सर्वोदय योजनेत कोणती संकल्पना मांडली?

३) लोकसंख्या नियंत्रणासाठी गांधीजी कोणता उपाय सुचवतात?

४) गांधीजींचे राजकीय गुरू कोण?

५) कोणत्या पुस्तकाने गांधीजींच्या जीवनात रचनात्मक फेरफार घडवून आणला?

६) स्वदेशीचा अर्थ काय?

७) भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थेचे केंद्र काय होते?

**रिकाम्या जागा भरा.**

१) गांधीजींवर पुढीलपैकी कोणत्या विचारवंतांचा प्रभाव नव्हता?

अ) टॉलस्टॉय ब) रास्केन क) थोरो ड) डॅनियल वेल

२) गांधीजींनी कोणत्या पुस्तकाचे गुजरातीत 'सर्वोदय' नावाने भाषांतर केले?

अ) किंगडम ऑफ गॉड ब) ड्युटी ऑफ सिव्हिल डिसोसिटियन्स

क) अन् टू धिस लास्ट ड) यापैकी नाही

३) महात्मा गांधीजींचे राजकीय गुरु कोण होते?

अ) म. गो. रानडे ब) गो.ग. आगरकर क) गो. कृ. गोखले ड) बेहरामजी मलबारी

४) गांधीजींची सर्वोदय संकल्पना कशाशी संबंधित आहे?

अ) स्त्री-पुरुष विषमता ब) आर्थिक विषमता क) ग्रामीण उद्योग ड) पंचायतराज

५) गांधीजीनी ................ हा विकासाचा केंद्रबिंदू मानला?

अ) जिल्हा ब) तालुका क) गाव ड) शहरे

६) गांधीजी .................... चे समर्थक होते.

अ) यांत्रिकीकरण ब) विकेंद्रीकरण क) केंद्रीकरण ड) नागरीकरण

७) ब्रिटिशांनी .................. ला प्रशासनाचा केंद्रबिंदू मानले.

अ) गाव ब) तालुका क) जिल्हा ड) वरीलपैकी नाही

८) वैदिक काळात गावच्या प्रमुखाला काय म्हणून संबोधले जात होते?

अ) ग्रामणी ब) ग्रामपती क) ग्रामकुट ड) वरीलपैकी सर्व

९) गांधीजींनी 'ग्रामस्वराज्य' ही संकल्पना कोणत्या पुस्तकात मांडली आहे?

अ) यंग इंडिया ब) हिंद स्वराज्य क) माझ्या स्वप्नातील भारत ड) व्हिलेज स्वराज्य

११) खालीलपैकी कोणते तत्त्व गांधीजींचे आहे?

अ) सत्य   ब) अहिंसा   क) समानता   ड) वरीलपैकी सर्व

१२) गांधीजी आफ्रिकेतून भारतात कधी आले?

अ) १९१५   ब) १९२०   क) १९१७   ड) १९१२

**३.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

अ) १) चूक   २) बरोबर   ३) बरोबर   ४) चूक

५) चूक   ६) चूक   ७) बरोबर

ब) १) महात्मा गांधी

२) स्वावलंबी अशा प्रादेशिक उद्योगधंद्याचा विकास

३) स्वयं नियंत्रण व ब्रम्हचर्य

४) गोपाळकृष्ण गोखले

५) रास्केनच्या 'अन् टू धिस लास्ट'

६) देशी साधनांचा अधिकाधिक वापर

७) खेडे

क) १) ड - डॅनियल बेल

२) क - अन टू धिस लास्ट

३) क - गोपाळकृष्ण गोखले

४) ब - आर्थिक समानता

५) क - गाव

६) ब - विकेंद्रीकरण

७) क - जिल्हा

८) ड - वरीलपैकी सर्व

९) ड - व्हिलेज स्वराज

१०) ड - वरीलपैकी सर्व

११) अ - १९१५

**३.७ सरावासाठी स्वाध्याय :**

**अ) टीपा लिहा.**

१) स्वदेशी

२) विकेंद्रीकरणाचे महत्त्व

३) ग्राम स्वराज्य

४) सर्वोदय

५) ग्राम न्यायालय

६) ग्रामविकास व लघुउद्योग

**ब) दिर्घोत्तरी प्रश्न :**

१) गांधीजींचे ग्रामीण विकासाबाबत विचार स्पष्ट करा.

२) विकेंद्रीकरणाचे महत्त्व सविस्तर समजवा.

३) गांधीजींचे आर्थिक विचार सविस्तर समजवा.

**३.८ क्षेत्रीय कार्य :**

१) आज जागतिकीकरणाच्या युगात गांधीजींच्या आर्थिक विचाराची युक्तता आदर्श ग्रामला भेट देऊन समजून घ्या.

२) विद्यापीठामधील गांधी अध्यासन केंद्राला भेट देऊन कार्य समजून घ्या.

३) महाराष्ट्रातील राळेगणसिध्दी, हिवरेबाजार, मेढा-लेखा, पाटोदा अशा आपल्या जवळील आदर्श ग्रामना भेट देऊन तेथील ग्रामविकास लक्षात घ्या.

**३.९ अधिक वाचनासाठी पुस्तके :**


१) मो. क. गांधी - मराठी अनुवाद

सीताराम पुरुषोत्तम पटवर्धन - सत्याचे प्रयोग - आत्मकथा १९९७ ५वी आवृत्ती

२) पाटील जे. एस्. - म. गांधींचे आर्थिक विचार व सद्य:स्थिती - २०१५.

३) Y. A. Panditrao - Gandian Approach to Economic Development, Himalaya Publication 1999.

४) M. K. Gandhi - Hind Swarajya - 1908

५) J. J. Anjaria - An Essay on Gandhian Economics - 1944.


***

# घटक : ४
# आधुनिक भारतीय अर्थशास्त्रज्ञांचे आर्थिक विचार
## ( Economic Thoughts of Modern Indian Economists )

**अनुक्रमणिका :**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ गोपाळ कृष्ण गोखले
- ४.२.२ डॉ. धनंजयराव गाडगीळ
- ४.२.३ डॉ. वि. म. दांडेकर
- ४.२.४ डॉ. अमर्त्य सेन

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द : शब्दार्थ

४.५ स्वयंअध्ययन प्रश्न

४.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


### ४.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे :

१) गोपाळकृष्ण गोखलेंचा सार्वजनिक वित्ताबाबतचा दृष्टिकोन समजून घेणे.

२) डी. आर. गाडगीळ यांचा सहकार विकासासंबंधी, सत्तेचे विकेंद्रीकरणासंबंधी विचार समजून घेणे.

३) वि. म. दांडेकरांच्या दारिद्र्यविषयक दृष्टीकोनाचा आढावा घेणे.

४) आधुनिक भारतीय अर्थतज्ज्ञांचे विचार समजून घेणे.

## ४.अ गोपाळकृष्ण गोखलेंचा सार्वजनिक विकाससंबंधी दृष्टिकोन :

### अ.१ प्रस्तावना :

मवाळांचे नेते, न्या. म. गो. रानडेंचे शिष्य आणि म. गांधींचे राजकीय गुरु अर्थात गोपाळकृष्ण गोखले यांचा जन्म ९ मे १८६६ रोजी झाला. प्राथमिक शिक्षण कोल्हापूरमधील कागल मधून झाले व पुढील शिक्षण कोल्हापूरमधून झाले. लहानपणीच वडिलांचा मृत्यू झाल्याने दारिद्र्याचा अवमानकारक अनुभव गोखलेंना भोगावा लागला. मॅट्रिकनंतर कोल्हापूरचे राजाराम कॉलेज, पुण्याचे डेक्कन कॉलेज व नंतर मुंबईच्या एल्फिन्स्टन मध्ये त्यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण घेतले. गणित विषयात त्यांचे विशेष प्राविण्य होते. त्यासोबतच इंग्रजी वाङ्मयातही त्यांना प्रचंड रुची होती. बुध्दी आणि श्रमाच्या जोरावर त्यांनी आपले शैक्षणिक जीवन यशस्वी केले.

घरची परिस्थिती बेताची असतानाही बी.ए. नंतर सरकारी नोकरी न करता पुण्यात विष्णुशास्त्री चिपळूणकर-टिळक, आगरकरांच्या सहकार्याने स्थापन झालेल्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये गोखल्यांनी २० वर्षे शिक्षकांची नोकरी केली. ते अध्यापन कार्य अत्यंत प्रामाणिकपणे करीत असत. याच काळात त्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीला आर्थिक स्थैर्य प्राप्त करुन दिले.

१९०२ ला गोखलेंनी देशसेवेच्या विशाल क्षेत्रात प्रदीर्घ पदार्पण करण्याचा संकल्प केला. गोखले फर्ग्युसनला असताना त्यांची व रानडेंची भेट झाली. गुरू शिष्याची ही जोडी भारताच्या इतिहासात सुवर्णपान ठरली. रानडेंच्या सहवासात गोखलेंच्या प्रतिभेला अनेक पैलू पडेल. राजकीय प्रश्नांच्या बिनचूक अभ्यास करायला ते आपल्या गुरूंकडून शिकले. गुरूंबद्दल या शिष्याला प्रचंड आदर होता. रानडेंबाबत बोलताना, प्रचंड सामर्थ्याच्या या पुरुषाशी आपल्या भाग्यवशात संबंध चुकून आला असून आपल्यात त्यांच्या पासंगालाही लागण्याची योग्यता नाही असे गोपाळराव म्हणतात.

काँग्रेसची अधिवेशन, सभा-संमेलने त्यांच्या वक्तृत्वाने गाजत होती. रानडेंनी त्यांना डेक्कन सभा काढून दिली. त्या माध्यमातून वेल्बी कमिशनसमोर साक्ष देण्यासाठी ते विलायतेत गेले. ही साक्ष त्यांच्या कार्यातील एक महत्त्वाचा टप्पा ठरली. १९०५ ला ते राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष झाले व याच वेळी त्यांनी होतकरू तरुणांनी एकत्र यावे व देशसेवेच्या आपल्याला आवडणाऱ्या शाखेत शक्य ते कार्य करण्यासाठी स्वत:ला वाहून घ्यावे अशा हेतूने 'सर्व्हंटस् ऑफ इंडिया' (भारतसेवक समाज) सोसायटीची स्थापना केली. १९१२ मध्ये लोकसेवा आयोगाचे सदस्य म्हणून त्यांची निवड झाली. वेल्बी कमिशनसमोर व विकेंद्रीकरण कमिशनसमोर साक्ष देण्यासाठी गोखले सात वेळा इंग्लंडला गेले. १९०२ नंतर दहा वर्षे कोलकत्ता, दिल्लीच्या कनिष्ठ कायदेमंडळात सदस्य म्हणून त्यांनी काम केले.

सार्वजनिक कार्यात शेवटपर्यंत त्याच धडाडीने व अखेरीस प्रकृती ठीक नसतानाही खंबीरपणे उभा राहिलेले हे आदर्श समाजसेवक १९ फेब्रुवारी १९१५ रोजी दिवंगत झाले. मृत्यूच्या काही दिवस आधी मुंबईच्या गर्व्हनरांनी त्यांना नव्या सुधारणांचा आराखडा तयार करण्याचे काम सांगितले होते. १७ फेब्रुवारी रोजी त्यांनी हा आराखडा स्वत:च्या हाताने लिहून काढला. त्यांनी लिहून काढलेल्या या सुधारणांच्या रुपरेषेला पुढे 'गोखल्यांचे राजकीय मृत्यूपत्र' असे नाव पडले.

गोखलेंच्या मृत्यूनंतर स्टेटस्मनने असे म्हटले की, आजवरच्या हिंदी नेत्यांमध्ये गोखले हे सर्वश्रेष्ठ होते. हिंदुस्थानचे ते सर्वश्रेष्ठ सुपुत्र होते. टागोर गोखलेंबाबत म्हणतात, तुमच्यासारख्या माणसाचे केवळ अस्तित्व ही देखील देशाची मोठी सेवा आहे. ही गोष्ट तुम्ही लक्षात घेतली पाहिजे. गोखलेंच्या मृत्यूने झालेला शोक व्यक्त करण्यासाठी गांधी एक वर्षभर अनवाणी राहिले.

**गोखलेंचा सार्वजनिक वित्तासंबंधी दृष्टिकोन :**

सार्वजनिक वित्ताबाबत गोखलेंनी विस्तृतपणे आपले विचार मांडले आहेत. त्यांच्या मते सोळा वर्षांमध्ये उत्पन्नावरील कर, मिठावरील कर, जकात आकारणी, कायद्यावरील जकात यामध्ये वाढ होत गेल्याने इतकेच नाही तर देशाच्या विविध भागात अतिवृष्टी, दुष्काळ असूनही जमीन महसूलाची वसूली वाढत गेली असे त्यांनी दाखवून दिले. करांचे ओझे कमी करावे, मिठावरील करात कपात करावी, सुती धाग्यावरील जकात रद्द करावी असेही त्यांनी सुचविले. 'दारिद्र्याने पीडित लोक व ओसंडून वाहणारी तिजोरी' याकडे त्यांनी लक्ष वेधले. कर कमी केल्यानंतरही उत्पन्न अधिक राहिल व अंदाजपत्रक शिलकीचे राहील त्यामुळे कर कमी करणे सरकारला परवडू शकते हे त्यांनी पटवून दिले.

एकूण करांचे केंद्र सरकार, प्रांतिक सरकारे व स्थानिक सरकार त्यांच्या जनतेच्या आधारे वाटप व्हावे असे सांगितले. सोबतच आर्थिक आणि सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याचीही शिफारस केली. लष्करावरील खर्च कमी केला तर एका बाजूला कर कमी करुनही देशबांधणीच्या कामासाठी अधिक पैसा उपलब्ध होईल असा युक्तिवाद केला. त्यांच्या मते हिंदुस्थानातील सैन्यावर होणाऱ्या खर्चाचा काही भाग इंग्लिश खर्चामध्ये समाविष्ट करावा. तसेच लष्करी फौजा कमी करुन लष्करावरील खर्चही कमी करण्याचे सुचविले.

लोकांच्या आर्थिक स्थितीची कल्पना केली जाऊ शकेल असे दोन कर गोखलेंनी सांगितले.

१) आयकर  २) मिठावरील कर

आयकर हा उच्च व मध्यम वर्गाच्या स्थितीचे दिर्शक तर मिठावरील कर सर्वसामान्य गरीब व्यक्तीच्या स्थितीचे निर्देशक आहे. या दोन्ही करांमधून मिळणारी रक्कम तेवढीच राहिली तर याचा अर्थ हिंदी अर्थव्यवस्थेची क्रांती खुंटलेली आहे असे स्पष्ट केले. जकातीचे प्रमाण वाढत चालले असेल तर ते लोकांच्या आर्थिक भरभराटीचे निदर्शक आहे. हा फायनान्स मेंबरचा दावा त्यांनी खोटा ठरवला.

**शिक्षणाचे अर्थशास्त्र :**

देशाच्या इतिहासात शिक्षणाचे अर्थशास्त्र आणि देशाचा आर्थिक विकास यांचा संबंध स्पष्ट करणारे गोखले पहिलेच अर्थतज्ञ होते. त्यांचे मते शिक्षणासाठी विशेषत: व्यावसायिक शिक्षणासाठी आणि उद्योगधंद्यांच्या विकासासाठी सरकारने अधिक रकमेची तरतूद करावी. त्यासाठी त्यांनी काही जाणकार अभ्यासकांनी जपानचा दौरा करण्यास सांगितले. कारण जपानने व्यवसाय शिक्षण आणि उद्योगधंदे यात लक्षणीय प्रगती केली होती.

तसेच गोखलेंनी व्यापार व संरक्षणविषयक धोरण ही देशाची सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थिती विचारात घेवून मांडावे असे सुचविले. उद्योगधंद्यांना संरक्षण देणे, त्यांना मदत करणे तसेच योग्य रितीने मुक्त

व्यापाराचा अवलंब करणे आपल्या दृष्टीने सुरक्षिततेचे धोरण होय. फ्रेडरिक लिस्टच्या मते गोखलेंनी राष्ट्रीय संरक्षणविषयक धोरणाचा पुरस्कार केला होता. या दोन्हींच्या चांगल्या बाजूंचा विचार केला व बहिष्कार इ. बाबतही आपले धोरण सविस्तरपणे मांडले आहेत.

### ४.अ.४ सारांश :

भारतीय अर्थव्यवस्थेतील समस्यांचा सखोल अभ्यास हा देशाची स्थिती आणि गरजांच्या संदर्भात केला पाहिजे असे गोखले स्पष्टपणे सांगतात. त्यांचे भारताच्या वित्तीय नियंत्रणाच्या बाबतीत अभ्यासपूर्ण योगदान आहे. ते म्हणतात की, देशात जमा होणारा महसूल हा अपवादात्मक परिस्थिती सोडता देशाबाहेर खर्च केला जाऊ नये. सोबतच त्यांनी प्रांतीय स्वायत्ततेचा पुरस्कार केला होता. कारण या पध्दतीत अनेक लोकांच्या कल्याणासाठी जास्त खर्च केला जाऊ शकतो. यामुळे सर्वसामान्यांचे हित जोपासले जाते. अर्थसंकल्पातील शिल्लक ही कल्याणविषयक विविध योजनांवर खर्च केला जावा असे त्यांनी सांगितले. सरकारच्या सार्वजनिक खर्चाचा हेतू हा लोकांची आर्थिक स्थिती सुधारणे हा असला पाहिजे. देशांमध्ये उत्पन्नाचे समान वाटप व्हावे असे त्यांचे मत होते. गोखलेंचे आर्थिक विचार हे देशाच्या वर्तमानकालीन वित्तीय आणि आर्थिक धोरणांना उपयुक्त ठरत आहेत आणि भविष्यातही आर्थिक धोरणाला ते मार्गदर्शक ठरणार आहेत.

## डी. आर. गाडगीळ : सहकार विकासाचा दृष्टिकोन, विकेंद्रीकरण (सत्तेचे) आणि सहकारी लोकराज्य :

### प्रस्तावना :

देशाच्या तसेच महाराष्ट्राच्या आर्थिक उभारणीत प्रा. धनंजयराव गाडगीळ यांचे महत्त्वाचे योगदान राहिलेले आहे. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रात त्यांनी मांडलेले विचार आजही मोलाचे सिद्ध होतात. त्यांनी मांडलेल्या विविध संकल्पना म्हणजेच फलप्रामाण्यवाद, सहकारी लोकराज्य, हिंदी अर्थशास्त्र, सत्तेचे विकेंद्रीकरण इ. नावीन्यपूर्ण विचार त्यांनी मांडले अशा या थोर व्यक्तींच्या आर्थिक विचारांचा अभ्यास आपण करणार आहोत.

### परिचय :

जन्म १० एप्रिल १९०१ रोजीचा शालेय शिक्षण नागपूरमधून घेतले. १९१६ मध्ये सिनियर केंद्रीय परीक्षा उत्तीर्ण झाले. १९१८ साली ते इंग्लंडला गेले. १९२१ मध्ये केंब्रिजची एम.ए. अर्थशास्त्र ही पदवी प्राप्त केली. 'हिंदुस्थानचा औद्योगिक इतिहास १८५०-१९१४' हा प्रबंध केंब्रीज विद्यापीठात सादर केला व डी.लिट. पदवी प्राप्त केली. भारतात परतल्यानंतर १९२४ साली मुंबई प्रांताच्या विभागात अधिकारी म्हणून नेमणूक झाली. १९२५-३० या कालावधीसाठी सुरत मधील महाविद्यालयात त्यांनी प्राचार्य म्हणून काम पाहिले. त्यासोबतच १९३० मध्ये पुणे येथे गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था स्थापन करण्यात पुढाकार घेतला. १९३१-३२ साली पुणे जिल्ह्यातील फळांची पैदास व विक्री यांचा सखोल अभ्यास केला. सरकारी कर्मचाऱ्यांचा पगार हा त्यांच्या अभ्यासाचा महत्त्वाचा विषय होता.

संयुक्त महाराष्ट्र परिषद (१९४६) चे सदस्य होते. देशात सहकारी तत्त्वावर उभारलेल्या अहमदनगर जिल्ह्यामधील प्रवरानगर सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीत गाडगीळांचा पुढाकार होता. गाडगीळांनी १९५१ मध्ये भारतीय रिझर्व्ह बँक नियुक्त अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीचे सदस्य म्हणून सहकारी चळवळीला दिशा देण्याचे काम केले. तसेच १९६६-६७ या कालावधीत पुणे विद्यापीठाचे 'कुलगुरू' म्हणून काम पाहिले. भारतातील योजना आयोगाचे उपाध्यक्षपदही त्यांनी सांभाळले. नेहरुंच्या निधनानंतर ढासळलेली राजकीय व आर्थिक व्यवस्था सावरण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. अशा या विचारवंताचा मृत्यू रेल्वेप्रवासा दरम्यान ३ मे १९७१ रोजी झाला.

प्रा. गाडगीळ यांनी मराठी व इंग्रजी भाषेत विपुल लेखन केलेले आहे. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय समित्यांवर काम केले.

**सहकार विकासाचा दृष्टिकोन :**

प्रा. धनंजयराव गाडगीळ यांचे सहकारातील योगदान उल्लेखनीय आहे. सहकारी चळवळ चालली पाहिजे, शिकली पाहिजे. तसेच ती दिवसेंदिवस वाढली पाहिजे असे गाडगीळ सांगतात. भारतासारख्या लोकशाही देशात सरकारी चळवळ किती महत्त्वाची आहे ते गाडगीळांनी सांगितले आहे.

**१) शेतीचा विकास :**

भारतात लहान शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. लहान शेतकरी आर्थिक संकटात राहतो तेव्हा या आर्थिक गुलामगिरीतून जर शेतकऱ्यांची सुटका करायची असेल तर 'सहकारी शेती' हा पर्याय गाडगीळांनी सुचवला आहे.

**२) सावकारी व खासगी व्यापाऱ्यांना पायबंद :**

ग्रामीण भागात खासगी व्यापारी हे शेतकऱ्यांच्या अडचणींचा व किंमती तसेच उत्पादनाच्या चढउताराचा गैरफायदा उठवितात म्हणून सहकाराच्या माध्यमातून कर्जपुरवठा करणारी व व्यापाराची स्वतंत्र यंत्रणा उभी करावी. गरजू शेतकऱ्यांची सावकाराच्या व खासगी व्यापाराच्या तावडीतून सुटका सहकाराच्या माध्यमातून करता येईल.

**३) शेती उत्पादनास योग्य भाव :**

सहकारी विपणन संस्थांच्या माध्यमातून शेतकऱ्यांची सौदाशक्ती वाढविणे व त्याच्या उत्पादनास योग्य भाव मिळविण्यासाठी महत्त्वाची भूमिका निभावली जाईल.

**४) आर्थिक समानता :**

सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील दुर्बल घटकांच्या परिस्थितीत सुधारणा होईल. परिणामी आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होईल व समानता आणता येईल.

**५) संघटन भावना वाढीस लागेल :**

लहान शेतकरी सहकाराच्या माध्यमातून एकत्र येतील. एकत्र शेती (गट शेती) च्या माध्यमातूनही मोठे

उत्पादन घेता येईल व योग्य ठिकाणी विक्रीस नेऊन चांगला भावही मिळेल. सोबत सहकारी भावना वाढेल.

**६) मोठ्या उत्पादनाचे फायदे :**

देशात लहान शेतकऱ्यांना वैयक्तिक पातळीवर आधुनिक उत्पादन तंत्र परवडत नाही. तेव्हा एकत्रितरित्या सहकारी भावनेतून ते उत्पादन तंत्र वापरणे शक्य आहे व त्याचे फायदेही अधिक प्रमाणावर दिसून येतात. उत्पादनातही अपेक्षित वाढ घडून येते.

**७) मध्यस्थांची साखळी तोडणे :**

भारतात शेती उत्पादक व ग्राहक यांच्यात मध्यस्थ साखळी मोठी आहे. मध्यस्थ शेतकऱ्यांकडून कमी किंमतीला माल खरेदी करुन ग्राहकांना अधिक किंमतीला विकून स्वत: मोठा नफा मिळवितात हे टाळण्यासाठी सहकाराचा विकास घडून येणे आवश्यक आहे. अशी चांगली विपणन व्यवस्था असेल पर्यायाने शेतकऱ्यांची हा ग्राहकांची अधिक तूट कमी होण्यास मदत होईल.

**८) औद्योगिक विकास :**

ग्राहक सहकारी संस्थांचे देशभर जाळे निर्माण करावे. कृषी व्यवसायांना लागणारा पतपुरवठा सहकाराच्या माध्यमातून करावा. तसेच खरेदी-विक्री यंत्रणा उभी करुन शेती उत्पादन व औद्योगिक उत्पादन संलग्न करावे. परिणामी औद्योगिक व शेती विकासास चालना देता येईल.

**९) मक्तेदारी नियंत्रण :**

भारतात पूर्वीपासून खासगी व्यापारी, जमीनदार व सावकार यांची प्रचंड मक्तेदारी प्रवृत्ती आहे. ही मक्तेदारी प्रवृत्ती रोखायची असेल तर पर्यायी यंत्रणा उभी करणे आवश्यक होते. त्यानुसार सहकारी पतसंस्था, खरेदी-विक्री संस्था विकसित करणे गरजेचे होते.

**१०) ग्रामीण आर्थिक विकास :**

गाडगीळांच्या मते ग्रामीण भागाचा आर्थिक विकास घडून यायचा असेल तर सहकार हा उत्तम मार्ग आहे. भारत हा खेड्यांचा देश आहे. सहकाराच्या माध्यमातून शेती, व्यापार, औद्योगिक विकास, वाहतूक, शिक्षण या क्षेत्रांचा विकास साधता येतो.

**११) संस्थात्मक वित्तपुरवठा आणि खरेदी-विक्री व्यवस्था :**

व्यापारी बँका राष्ट्रीयकरणापूर्वी ग्रामीण भागासाठी संस्थात्मक वित्तपुरवठा उपलब्ध करत नव्हते. ग्रामीण लोकांना सावकार व व्यापाऱ्यांवर अवलंबून रहावे लागत होते. म्हणून ग्रामीण भागासाठी संस्थात्मक वित्तपुरवठा करावा व विक्री व्यवस्था विकसित करण्यासाठी सहकार हाच एकमेव मार्ग आहे. जेणेकरुन पिळवणूक व आर्थिक शोषण कमी होईल.

**१२) अतिरिक्त लोकसंख्या व तुलनेने अपुरी साधनसामुग्री :**

गाडगीळ सांगतात जेथे लोकसंख्येच्या मानाने साधनसंपत्ती व विस्तार संधी मर्यादित आहेत आणि जो समाज विषमता व विभिन्नता यामुळे परस्परांबद्दल अविश्वास व संशय यांनी त्रस्त आहे. अशा समाजात स्पर्धेला व चढाओढ मनोवृत्तीला उत्तेजन देणे धोक्याचे असते. दाट लोकसंख्या व मर्यादित संधी असलेल्या समाजाचा सर्वसमावेशक विकास घडवून आणावयाचा तर परस्परांच्या हितसंबंध जपणूक, परस्पर सहकार्यावर सतत भर आणि इतरांचे हित डावलून स्वार्थ साधू पाहणाऱ्याना कडक शासन केल्यासच ते साधू शकेल. किमान यासाठी तरी भारताच्या सद्य:स्थितीत, सहकाराचे तत्त्वज्ञान हेच अधिक योग्य मानले पाहिजे.

**१३) नीतिमुल्यांची जपणूक :**

इंग्रजांनी भारतात आणलेल्या भांडवलशाही पध्दतीमुळे जमीनदार, मोठे भांडवलदार, व्यापारी व सावकार उदयास आले. नीतीमुल्यांचा ऱ्हास होवू लागला. तर सहकारी चळवळ ही विशिष्ट तत्त्वावर आधारीत असते परिणामी नीतीमुल्यांची जपणूक करता येते.

**१४) संघराज्य पध्दती बळकट करणे :**

भारतासारख्या विविधता असणाऱ्या देशात संघराज्य पध्दतीच योग्य ठरते. संघराज्य व्यवस्था मजबूत करण्यासाठी राज्यांना स्वातंत्र्य देणे गरजेचे आहे. ही घटकराज्ये भाषिकदृष्ट्या एकात्म असणे अधिक गरजेचे आहे. सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण पातळीपासून एकात्मतेची भावना वाढीस लावता येते.

**१५) आर्थिक लोकशाही :**

ग्रामीण भागात जमीनदार, व्यापारी सावकार यांची हुकूमशाही चालत होती. त्यांना सहकाराच्या माध्यमातून पर्यायी यंत्रणा उभी करता येते व प्रत्यक्ष सहभागी करुन घेऊन आर्थिक लोकशाही प्रस्थापित करता येईल असा गाडगीळांना विश्वास होता.

**१६) पर्यावरण संरक्षण :**

ब्रिटिश राजवटीत नैसर्गिक साधनसंपत्ती सांभाळण्याची पारंपारिक व्यवस्था कोलमडली व नवीन व्यवस्था उभी न केल्याने निसर्गाची अवनती होवू लागली. त्यासाठी संघटनात्मक पातळीवर प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्यासाठी सहकार संघटन विकसित करणे आवश्यक आहे.

**सत्तेचे विकेंद्रीकरण :**

गाडगीळ सांगतात की, भारतासारख्या विविधता असलेल्या देशात शासनाची भूमिका खूप महत्त्वाची आहे. विकासासाठी आवश्यक शिक्षण, आरोग्य व मूलभूत सोयीसुविधा पुरवण्याची जबाबदारी ही शासनाची आहे असे त्यांचे मत होते. देशाच्या सर्वांगीण विकासात शासनाची भूमिका आणि पुढाकार असला पाहिजे. म्हणून गाडगीळांनी सत्तेचे विकेंद्रीकरण विकासासाठी आवश्यक असल्याचे सांगितले आहे. त्यांनी विकेंद्रीकरणाचे दोन महत्त्वाचे हेतू मांडले आहेत.

१) लोकशाही पध्दतीने विकास करणे.

२) लोकांच्या हातात सत्ता असल्याने सत्ता चालविण्याचे व वापरण्याचे ज्ञान प्राप्त होते. गाडगीळ म्हणतात की, संघराज्य पध्दत उपयुक्त आहे. ज्यामध्ये केंद्र पातळीवर केंद्र सरकार तर राज्य पातळीवर राज्य सरकारांना स्वायत्तता देणे आवश्यक आहे. राज्य पातळीवर पुन्हा सत्तेचे विभाजन करुन उपप्रांत स्थापन करावेत. या उपप्रांतांना व्यापक सत्ता द्यावी अशी सूचना केली. विकासासाठी स्वावलंबन हाच महत्त्वाचा मार्ग आहे असे त्यांनी स्पष्ट केले. विकासप्रक्रियेत लोकांचा सहभाग आवश्यक आहे. त्यांचे मते स्थानिक पातळीवर साधने व विकासाच्या संधी तिथे राहणाऱ्या लोकांना अधिक माहित असतात. परिणामी त्यांना सत्तेत सहभागी करुन घेतल्यास ते आपला विकास कार्यक्रम सक्षमपणे आखू शकतात.

गाडगीळांच्या मते एकच भाषा असेल तर लोक अधिक जवळ येतात. विचारांची देवाणघेवाण होते. भारताच्या संदर्भात ते सांगतात, 'विविधत्व, भिन्नत्व कितीही असले तरी मुलभूत परंपरा व संस्कृती यातील एकता मानणारे व जाणणारे हे राष्ट्र आहे. भाषावार प्रांत रचनेसाठी गाडगीळांनी पुढाकार घेतला.

**सहकारी लोकराज्य :**

गाडगीळांनी विविध देशांमधील सहकारी चळवळीचा अभ्यास केला. प्रत्येक देशामध्ये सहकाराचा उगम, सहकाराची तत्त्वे ही काळ परिस्थितीनुसार वेगळी असतात. पंजाब विद्यापीठात स्व. प्रा. ब्रिज नारायण स्मृती व्याख्यानमालेत 'Towards Co-operative Common Wealth' या विषयावर तीन व्याख्याने दिली. १९६१ मध्ये पंजाब विद्यापीठाने ती व्याख्याने पुस्तकरुपाने प्रकाशित केली. या व्याख्यानातून गाडगीळांनी सहकारी लोकराज्य संकल्पनेचे विवेचन केले. आर्थिक व सामाजिक न्यायासाठी सहकार हाच एकमेव मार्ग आहे असे गाडगीळांचे ठाम मत होते. पहिल्या व्याख्यानात गाडगीळ परदेशातील सहकारी चळवळीच्या यशाबद्दल सांगतात. यामध्ये त्यांनी प्रामुख्याने इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी इ. देशांमधील सहकारी चळवळ यशस्वी होण्याचे कारण सांगताना या देशांनी प्रामाणिकपणे सहकारी तत्त्वांचा अवलंब केल्याचे सांगतात. यामध्ये प्रमुख तत्त्वे - लोकशाही नियंत्रण, खुले सभासदत्व, भांडवलावर मर्यादित व्याज, व्यवहाराच्या प्रमाणात लाभाचे /अधिक्याचे वाटप, शुध्द व विनाभेसळ व्यापार, सभासद शिक्षण व राजकीय आणि धार्मिक तटस्थता इ. होय. त्यांनी फ्रान्समधील कामगार सहकारी संस्था, जर्मनीतील ग्रामीण भागातील रायफेजन संस्था, शहरी भागातील सहकारी विक्री व पतसंस्था डेन्मार्कमधील दुग्ध व कुक्कुटपालन सहकारी संस्था यांचा अभ्यास केला. गाडगीळांच्या मते सहकार म्हणजे समाजवाद नव्हे. त्यांचे मते ज्या देशांनी विकासाची एक किमान पातळी गाठली आहे अशा देशांत स्वयंप्रेरित सहकार चळवळ यशस्वी होऊ शकेल.

दुसऱ्या व्याख्यानात त्यांनी भारतातील सहकाराबाबत मत मांडले ते म्हणतात की, भारतात विकासाच्या सुरवातीच्या अवस्थेत शासनाचे साहाय्य आवश्यक आहे. कारण भारतातील विकास पातळी व इतर देशांतील विकास पातळी, सामाजिक व राजकीय परिस्थिती यात तफावत आढळते. शासनाचा सहभाग सुरवातीस अधिक असावा व संस्थेच्या प्रगतीबरोबर तो कमी होत जावा.

तिसऱ्या व्याख्यानात त्यांनी सहकारी लोकराज्याची संकल्पना मांडली. या माध्यमातून आदर्श समाजव्यवस्था निर्माण करता येईल. असा त्यांना विश्वास होता. गाडगीळांनी सहकारी लोकराज्याची तीन आधारभूत तत्त्वे सांगितली आहेत.

अ) लहान आर्थिक घटकांची अंगभूत कार्यक्षमता विकसित करणे.

ब) लहान सहकारी संस्थांनी एकमेकांच्या सहकार्याने मोठे लाभ मिळवावेत.

क) दुर्बलातील दुर्बल घटकांच्या उध्दारासाठी सहकाराचा मार्ग महत्त्वाचा आहे.

गाडगीळांनी सहकारी लोकराज्यात पुढील तत्त्वांचे महत्त्व स्पष्ट केले.

१) गट, समूह व सामाजिक मर्यादांची व जबाबदारींची मान्यता २) स्वेच्छा आत्मनियंत्रण ३) समता तत्त्व ४) मक्तेदारी प्रवृत्ती नियंत्रण ५) आर्थिकेत्तर प्रेरणांचे महत्त्व ६) मालकी व नियंत्रणे यांची समाजोपयोगी विभागणी ७) सार्वजनिक लेखापरिक्षण ८) शिक्षण व सांस्कृतिक मुल्यांची जपणूक ९) न्याय व नैतिकता.

**सारांश :**

भारतासारख्या लोकशाही देशात सहकारी चळवळ वाढणे व विकास पावणे अत्यंत आवश्यक आहे. प्रादेशिक विविधता, भाषीय विविधता, अशा परिस्थितीत देशाला एकसंघ ठेवण्याची व विकासाच्या मार्गावर वेगाने मार्गक्रमण करण्यासाठी सहकारी चळवळीचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. प्रा. धनंजयराव गाडगीळांचे सहकारातील योगदान मोठे आहे. त्यांनी फक्त विचार मांडले नाहीत तर अनेक सरकारी संस्था या देशात उभ्या राहण्यासाठी हातभार लावलेला आहे. सहकारी चळवळीच्या बाबतीतली ध्येयधोरणे ठरविण्यातही गाडगीळांनी मोलाचा वाटा उचलला आहे. शुध्द हेतूने सहकारी चळवळ चालवली गेली सहकारी चळवळ ही राजकारणापासून अलिप्त ठेवली गेली व सहकारी चळवळीला पोषक ध्येयधोरणे सरकारने तयार केली तर अत्यंत चांगली पर्यायी व्यवस्था या देशात उभी राहील. जी राजकारण, भ्रष्टाचार, अन्यायी वागणूक याला फाटा देवून लोककल्याण व विकास यांच्या घोडदौडीस पूरक ठरेल हे नक्की.

**वि. म. दांडेकरांचा गरीबविषयक / दारिद्र्यविषयक दृष्टिकोन :**

**प्रस्तावना :**

वि. म. दांडेकर अर्थात विनायक महादेव दांडेकर यांचा जन्म ८ जुलै १९२० मध्ये झाला. दांडेकर हे महाराष्ट्रातील जागतिक किर्तीचे अर्थतज्ज्ञ अशी त्यांची ओळख. संख्याशास्त्रात त्यांचे विशेष प्राविण्य होते. दांडेकरांनी राष्ट्रीय उत्पन्न, प्राथमिक शिक्षणातील त्रुटी, खेडेगावाचा व शेतीचा विकास इ. विषयांचा संख्याशास्त्रावर आधारीत विश्लेषणात्मक अभ्यास केला. दांडेकर हे पुणे येथील गोखले अर्थशास्त्र संस्थेचे संचालक आणि लोणावळा येथील 'इंडियन स्कूल ऑफ पॉलिटिक्स इकॉनॉमी' या संस्थेचे संस्थापक आहेत. ते मूळचे सातारा जिल्ह्यातील आहेत.अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय समित्यांवर त्यांनी तज्ञ सल्लागार म्हणून कामगिरी केली आहे. 'इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रीकल्चरल इकॉनॉमिक्स १९६७' व इंडियन इकॉनॉमिक असोसिएशन १९७३ या संस्थांच्या अधिवेशनांच्या अध्यक्षपदाचा मानही त्यांना लाभला आहे.

दांडेकरांचा मूळ अभ्यास विषय संख्याशास्त्र हा असल्याने त्यांच्या अर्थशास्त्रीय लेखनाला नेमकेपणा आलेला आहे. दांडेकरांचे बहुतांश लेखन हे इंग्रजीतून झाले आहे. मराठीतूनही त्यांनी महत्त्वाचे लेखन केले आहे. शेती, सहकार, अन्नधान्य, लोकसंख्या, छोटे उद्योगधंदे, भारताची आर्थिक परिस्थिती, शेतीविषयक विविध कायदे इ. विषयांवर त्यांनी संशोधनपर लेख लिहिले आहेत. सामान्य माणसाला समजेल असे लेखन दांडेकरांनी केले. 'गोमाता की गोधन', 'भारतीय बुध्दिमत्तांची निर्यात', 'ललाटरी (सरकारी सोडत)' इ. त्यांचे गाजलेले लेख आहेत. त्यांचे लेखन सुगम, सोपे व स्पष्ट आहे. 'गरिबी हटाव', पण कशी?, भिक्षापात्र अवलंबणे, शेतीस पाणी, पाटाने की उपसा करुन?, सेक्यूलॅरिझम, अन्वय व अर्थ

पॉव्हर्टी इन इंडिया (सहलेखक डॉ. निळकंठ रथ) हा त्यांचा आर्थिक विषयावरील इंग्रजीमधील एक महत्त्वाचा गाजलेला ग्रंथ. त्याचा मराठीत अनुवाद 'भारतातील दारिद्र्य' १९९३ ह्या शीर्षकाने पुण्याच्या समाजप्रबोधन संस्थेने प्रसिध्द केला आहे. अल्प राष्ट्रीय उत्पन्न, उत्पन्नाचे विषम विभाजन, विकासाचा मंद वेग व विकासापासून होणाऱ्या मर्यादित फायद्याचे विषम प्रमाणात वाटप हे या पुस्तकातील महत्त्वाचे मुद्दे प्रश्नांची व्याप्ती, त्यांचे वाढते गांभीर्य व त्यातून निर्माण झालेल्या भयावह परिस्थितीवर उपायांची चर्चा, लिखाणाचा विधायक उपयोग होण्यासाठी जो समतोल साधावा लागतो तो दांडेकरांनी साधला. निर्भयता हेही दांडेकरांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे.

**दारिद्र्याचा दृष्टिकोन :**

मुलभूत गरजांचा अभाव म्हणजे दारिद्र्य, दुसऱ्या शब्दात मुलभूत गरजा भागविण्यासाठी व्यक्तीची असमर्थता म्हणजे दारिद्र्य अशा आपण सर्वसाधारणपणे दारिद्र्याच्या व्याख्या करतो. आंतरराष्ट्रीय पातळीवर उष्मांक हा दारिद्र्याचा निकष मानला गेला व तेवढे उष्मांक न मिळणे म्हणजे दारिद्र्य व ती मिळविण्यासाठी किमती उत्पन्नाची गरज आहे यावरुन आंतरराष्ट्रीय पातळीवर दारिद्य संकल्पना मांडली गेली. अलीकडे यात सुधारणा करुन मुलभूत गरजा (अन्न, वस्त्र, आरोग्य, निवारा व शिक्षण) पूर्ण करु न शकणारा म्हणजे दरिद्री अशी व्याख्या करण्यात आली.

भारतातील दारिद्र्याचे प्रमाण मोजण्यासाठी आजपर्यंत अनेक अर्थतज्ज्ञ, संस्थांनी व योजना आयोगानेही प्रयत्न केले. दारिद्र्याचे मोजमाप करण्यासाठी या विचारवंतांनी वेगवेगळी पध्दत वापरली, वेगवेगळे प्रतिमान तयार केले असे असले तरी या सर्वांच्या मते भारतातील उष्ण हवामानात जीवमान जगण्यासाठी दररोज २२५० उष्मांकाची गरज असते.

वि. म. दांडेकरांनीही दारिद्र्याची संकल्पना स्पष्ट करताना किमान उष्मांकाचाच आधार घेतला आहे. दांडेकर व रथ यांचा 'भारतातील दारिद्र्य' (Poverty in India) हा ग्रंथ १९७१ मध्ये प्रसिध्द झाला. त्यामध्ये त्यांनी भारतातील दारिद्र्याचे सविस्तर विवेचन केले आहे. दांडेकरांच्या मते प्रत्येक भारतीयास दररोज किमान २२५० कॅलरी उष्मांक मिळाला पाहिजे. ज्या व्यक्तीस तो मिळू शकणार नाही. तो व्यक्ती दारिद्र्यात जीवन जगतो आहे असे मानावे. त्यांनी काढलेल्या निष्कर्षानुसार १९६०-६१ च्या स्थिर किंमतीनुसार ग्रामीण भागातील व्यक्तीस १७० रुपये तर शहरी भागातील व्यक्तीस २७१ रु. एवढा वार्षिक खर्च करावा लागेल. ग्रामीण भागातील

व्यक्तीस प्रतिमहा १४ रुपये तर शहरी व्यक्तीस २२.५० रुपये खर्च करावा लागेल आणि या आधारे त्यांनी काढलेल्या निष्कर्षानुसार १९६०-६१ मध्ये भारतात ग्रामीण भागात ४६% तर शहरी भागात ५०% लोक दारिद्र्यात जीवन जगत.

१९६७-६८ मध्ये दांडेकरांनी ग्रामीण लोकसंख्येमधील गरिबीच्या विषयावर व्यापकतेने अंदाज बांधले. दांडेकरांनी भारतातील गरीबीचे मोजमाप करताना निरपेक्ष मोजमाप पध्दती वापरली. जी लोकांच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्याची पर्याप्त ऊर्जा मिळण्यासही असमर्थ ठरते. दांडेकरांनी गरीब किंवा दरिद्री कोणास म्हणावे. गरीब ठरविण्याचा प्रयत्न डॉ. रथ व मिल्हास यांचे साहाय्याने केला. या सर्वांच्या मते पुढील वर्गातील लोकांचा समावेश गरीब किंवा दरिद्रीमध्ये करावा.

१) भूमिहीन शेतमजूर

२) अल्प आणि सीमांत भूधारक

३) ग्रामीण भागातील असे श्रमिक की, जे शेतमजूरी करीत नाही व त्यांच्याकडे शेतजमीनही नाही.

४) ग्रामीण कारागीर ज्यांचे परंपरागत व्यवसाय बंद झाले आहेत.

**सारांश :**

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आजही दारिद्र्यरेषा ठरविताना आहाराचा विचार घेतला जातो. १९६०-६१ च्या काळामध्ये तत्कालीन भारताची परिस्थिती पाहता इतर मुलभूत गरजांपेक्षा अन्न ही गरज प्राधान्याने विचारात घेणे आवश्यकच होते. देश विकासाच्या पहिल्या अवस्थेत होता, अन्नधान्यांची प्रचंड टंचाई होती. त्या काळातच हरितक्रांतीला सुरुवात झाली होती. दांडेकरांनी मांडलेला दारिद्र्याचा दृष्टिकोन आजही अनेक देशात विशेषत: (अविकसित व विकसनशील) लागू पडतो. प्रचंड लोकसंख्या असणाऱ्या देशांमध्ये आजही मोठ्या प्रामणावर भूकबळी आणि कुपोषणाचे बळी आपण पाहतो. शासकीय स्तरावर आजही खरी आकडेवारी दिली जात नाही व त्यावर धोरणेही आली जात नाहीत. प्रत्येक वेळी दारिद्र्य मोजमापाचे निकष बदलून मूळ आकडेवारी लपवण्याचा प्रयत्न केला जातो. व्यक्ती जीवित राहण्यासाठी, चांगले आरोग्य राहण्यासाठी किमान उष्मा ही अट महत्त्वपूर्ण ठरते. दांडेकरांनंतर अनेक अर्थतज्ञांनी काळानुसार, वाढलेल्या गरजानुसार दारिद्र्य मापणाच्या अटी वाढवत नेल्या. व्यक्तीस चांगले जीवनमान जगण्यासाठी आवश्यक किमान गरजांमध्येग अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण अशी वाढ होत गेली. परंतु किमान उष्मांक ही अट कायम आहे आणि ती ठेवावीच लागेल.

**४ अमर्त्य सेन :**

**सामाजिक निवड-संकल्पना निवडीचे तंत्र, सेन यांचा गरिबी दृष्टिकोन :**

**प्रस्तावना :**

डॉ. अमर्त्य सेन यांचा जन्म ३ नोव्हेंबर १९३३ रोजी शांतिनिकेतन येथे झाला. गुरूश्रेष्ठ रविंद्रनाथ टागोर यांच्या सांगण्यावरुन त्यांचे नाव अमर्त्य सेन ठेवण्यात आले. रवींद्रनाथ टागोरांनी डॉ. अमर्त्य सेन यांचेबद्दल

बोलताना ‘हा मुलगा ज्ञात जगाच्या पलीकडे जाईल आणि एक दिवस असामान्य माणूस म्हणून नावारुपास येईल’. डॉ. अमर्त्य सेन यांची आई अमिता ही उच्चशिक्षित कवयित्री व साहित्यिक तर वडील रसायनशास्त्राचे प्राध्यापक होते. त्यांचे बालपण शांतिनिकेतन येथेच गेले. तेथे शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी प्रेसिडेन्सी महाविद्यालयात आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. पुढे त्यांनी केंब्रीजमध्ये प्रवेश घेतला. आपल्या मित्राच्या आग्रहाखातर संस्कृत व तत्त्वज्ञानाऐवजी अर्थशास्त्र हा विषय घेतला. केंब्रीजमध्ये प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ जोन रॉबिन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी पदवी घेतली.

अर्थशास्त्र विषयास विविध सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय समस्यांचे विश्लेषण करणारे व त्यावर उपाययोजना सुचविणारे एक उपयुक्त शास्त्र हा दर्जा प्राप्त करुन देण्याचे श्रेय प्रथम अमर्त्य सेन यांना दिले जाते. जगातील सर्वच देशाना कमीअधिक प्रमाणात भेडसावणाऱ्या दारिद्र्य, दुष्काळ, भूक, स्वातंत्र्य, आर्थिक विकास आणि मानवी कल्याण या समस्यांचे त्यांच्या इतके समाधानकारक आर्थिक विश्लेषण, अर्थशास्त्रात याअगोदर कोणी मांडलेले नाही. त्यांच्या या कामाची पावती म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर मानाचा मानला जाणारा अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कार १९९८ मध्ये त्यांना मिळाला. अर्थशास्त्रात नोबेल मिळविणारे सेन हे पहिलेच भारतीय आणि आशियाई व्यक्ती होते. शरीराने विदेशात परंतु मनाने भारतात असणाऱ्या या विचारवंताला भारत सरकारने १९९९ मध्ये ‘भारतरत्न’ देवून गौरविले. त्यांच्या सर्व अर्थशास्त्रीय अभ्यासाचा आधार व उद्देश हा समाजातील सर्वात तळातील माणसाच्या सर्वांगीण विकासाभोवती केंद्रीत असल्याचे दिसून येते. डॉ. सेन यांनी अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांचे अध्यक्षपद भूषविले आहे. त्यांनी विविध पारितोषिके मिळविली आहेत. त्यामध्ये ॲडम स्मिथ पारितोषिक, स्टीव्हनसन पारितोषिक, भारतातील महालनोबिस पारितोषिक, मॅन ऑफ द इयर, तेरा विद्यापीठांची डॉक्टरेट इ. विशेषत: त्यांनी अजूनही भारतीय नागरिकत्व सोडलेले नाही. त्यांना भारताविषयी आदर व प्रेम आहे. मानवी कल्याणाशी निगडीत असणाऱ्या सामाजिक निवडीच्या व क्षमताबुध्दी घडवून आणणाऱ्या घटकांबाबत त्यांनी मांडलेला दृष्टिकोन खूप महत्त्वाचा मानला जातो. आपण त्याचा सखोल अभ्यास करणारच आहोत. अर्थशास्त्राची सद्‌सद्‌विवेकबुध्दी जपणारा अर्थतज्ञ म्हणजे अमर्त्य सेन असे त्यांच्याबद्दल गौरवोद्‌गार रॉबर्ट सोलो यांनी काढले.

**सामाजिक निवड : संकल्पना**

डॉ. अमर्त्य सेन यांनी ‘सामाजिक निवडीचा सिध्दांत’ मांडून अर्थशास्त्रात मोठे योगदान दिले आहे. सेन यांचा सामाजिक निवड सिध्दांत, त्यांचे काम बंगाल दुष्काळावर आहे. त्यांचे प्रयत्न असमानता व दारिद्र्याच्या खोलीशी संबंधित आहेत. अमर्त्य सेन यांनी 'Collective Choice and Social Welfare' या ग्रंथामध्ये सामूहिक निवड आणि सामाजिक कल्याण यांमधील संबंध स्पष्ट केला आहे. यामध्ये सेन यांनी केथेन ॲरो यांनी मांडलेल्या अशक्यता सिध्दांताचे खंडन करुन सामूहिक निवड व सामाजिक कल्याण यामधील अंतर्गत संबंधाचे विश्लेषण केले आहे. ॲरोंच्या मते, सर्व व्यक्तींच्या निवडीची बेरीज म्हणजे सामाजिक निवड नव्हे. त्यांचे मते प्रत्येक व्यक्तीच्या पसंती/ प्राधान्य लक्षात घेवून त्यांची गोळाबेरीज करताना अडचणी येतात. मतभिन्नता आढळते. हे सर्व टाळण्यासाठी हुकूमशाही पध्दतीनेच स्वातंत्र्य व समता या तत्त्वांचा पुरस्कार करणारे सेन यांनी लोकशाही राज्यपध्दतीतही लोकांचे

स्वातंत्र्य अबाधित ठेवून सामाजिक निवड करता येते. तसेच स्वातंत्र्य कायम ठेवून सामाजिक निवडीद्वारे सामाजिक कल्याणात वाढ घडवून आणता येते असा अमर्त्य सेन यांच्या मांडणीचा अर्थ आहे.

ॲरोच्या मते प्रत्येक व्यक्तीची एखाद्या बाबतची निवड अथवा प्राधान्य यात थोडाफार फरक असू शकतो. त्यामुळे त्यांची गोळाबेरीज करुन ती सामूहिक निवड ठरविताना अडचणी येतात. याबाबतीत समाजातील व्यक्तींमध्ये मतभिन्नता आढळून येते. अशा परिस्थितीत समाजाने व्यक्त केलेल्या निवडींची पूर्तता हुकूमशाही प्रकारच्या शासन व्यवस्थेद्वारेच करणे शक्य असते. त्यासाठी हुकूमशाही पध्दतीच्या शासनव्यवस्थेचा स्वीकार करुन हुकूमशाहाने केलेली निवड हीच सर्व समाजाची निवड मानावी लागेल.

तर सेन यांचे मते, लोकशाही व्यवस्थेअंतर्गत सामूहिक निवडीबाबत निर्णय होण्याची शक्यता कमी असते म्हणून केवळ हुकूमशाही व्यवस्था मान्य करणे अयोग्य आहे. लोकशाही व्यवस्थेत येणाऱ्या निवडीबाबतच्या अडचणी कमिट्या सोडवू शकतात. त्यांचे मते निवडीबाबत नेमण्यात आलेल्या कमिट्या पसंती अथवा प्राधान्य यांची गोळाबेरीज करुन त्यावरुन सामुहिक निवडीचा कल निश्चित करु शकतात व त्यातून सामाजिक निवड निश्चित करुन त्यांची लोकशाही मार्गाने, अंमलबजावणी करु शकतात. सेन यांचे अर्थशास्त्र कल्याणकारी अर्थशास्त्र आहे. ते प्रत्यक्षवादी असून आदर्शवादी नाही. अशी सामाजिक निवडीबाबत यंत्रणा राबविल्याने लोकांचे स्वातंत्र्य राखूनही सामाजिक निवड निश्चित करता येते आणि अशा सामाजिक निवडीबाबतच्या निर्णयाची अंमलबजावणी करुन त्याद्वारे सामाजिक कल्याणात भर टाकली जाते.

**सामाजिक निवडीचे तंत्र :**

सामाजिक निवड करत असताना सेन यांनी पाच अटी सांगितल्या आहेत. या अटींची पूर्तता झाल्यास सामाजिक निवड करता येते असे मत मांडले. लोकशाही व्यवस्थेत व्यक्ति स्वातंत्र्य व व्यक्तीचे हित यांना बाधा न आणता विशिष्ट परिस्थितीत अटींची पूर्तता झाल्यास व्यक्तीच्या निवडीवरुन सर्व समाजाची निवड करणे / ठरविणे शक्य आहे. अशी सामूहिक निवड लोकशाही व्यवस्थेत आर्थिक धोरणात समाविष्ट केल्यास त्यातून समाजाच्या कल्याणात भर पडू शकेल.

१) सामूहिक निवड अधिक पध्दतशीरपणे मोजणे.

२) व्यक्तीगत पसंतीवर मर्यादा नसणे.

३) व्यक्तीगत पसंती व सामूहिक पसंती यामधील साधर्म्य, समानता पाहून निर्णय घेणे.

४) इतरांची कल्याण पातळी स्थिर असताना कमीत कमी एका व्यक्तीच्या कल्याणात वाढ होणे.
(पॅरोर्ट नियम)

५) पसंती प्रक्रियेत व्यक्तीचे महत्त्व कमी करुन कोणीतरी पसंतीचे समूह तयार करु शकणे (कमिट्या) आणि त्यांनी तयार केलेले पसंतीचे समूह बहुतांश व्यक्तींच्या पसंतीवर आधारीत असणे.

थोडक्यात यातून असा निष्कर्ष निघतो की, विविधता, मतभिन्नता, संघर्ष असतानाही लोक आर्थिक घोषणाबद्दल सामुदायिक पसंती दर्शवू शकतात व परिणामी आर्थिक कल्याण साधता येते. अर्थशास्त्राच्या आदर्शवादाची जोड देणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले.

**सेन यांचा दारिद्र्य दृष्टिकोन :**

डॉ. अमर्त्य सेन यांनी दारिद्र्य मापनासाठी वस्तुनिष्ठ निर्देशांक तयार केले आहेत. दारिद्र्य निर्मुलनासाठी दारिद्र्याचे अचूक मापन करणे गरजेचे आहे असे ते म्हणतात. त्यांच्या अगोदर काही अर्थतज्ञांनी दारिद्र्यरेषा ही संकल्पना मांडली. तर काहींनी आहारातील उष्मांक प्रमाण सांगितले. विशिष्ट आर्थिक उत्पन्न पातळीपेक्षा ज्यांचे उत्पन्न कमी आहे किंवा आहारातील उष्मांक प्रमाण सांगितले जे लोक दारिद्र्यरेषेखालील लोक आहेत असे म्हणतात. किंबहुना ज्या लोकांना प्रतिदिनी एकवेळचे पोटभर अन्न मिळत नाही ते दारिद्र्यरेषेखाली आहेत असे संबोधले जाते. सेन यांचे मते दुष्काळात उपासमार अभिप्रेत असते. पण उपासमार म्हणजे दुष्काळ नव्हे. उपासमारीने दारिद्र्य अभिप्रेत असते. पण दारिद्र्य म्हणजे उपासमार नव्हे. दारिद्र्यरेषेची वरील संकल्पना सेन यांना मान्य नसल्याने त्यांनी अचूक दारिद्र्यमापनासाठी पुढील सूत्र दिले आहे.

$$S = H \{ I + (1 - I) G \}$$

S = Sen Poverty Index

H = Head Count ratio =

$H = g / n$

g = दारिद्र्यरेषेखालील लोक

n = एकूण लोक

1 - I = Income gap उत्पन्न तफावत

G = Gini Co-efficient विषमता मापन गुणोत्तर

हा मोजण्यासाठी पुढील समीकरण लक्षात घेतले जाते.

$$G = \left\{ \frac{(g+1)}{g} \right\} - \frac{2}{g^2 m} \sum_{i=1}^{g} (g+1-i) \; Y i$$

G = दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या x ( दारिद्र्यरेषा ( z ) गरिबांचे सरासरी उत्पन्न (M)

Y i = गरीब माणसाचे दारिद्र्यरेषेखालील असलेले उत्पन्न हेच समीकरण पुढे

$$S = \left(\frac{g}{n}\right) \left(\frac{g}{z}\right) \left[ (z + M) + \left\{ \frac{g}{(g+1)} \right\} (GM) \right]$$

जेव्हा दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या फार मोठी असते. तेव्हा g / g + 1 किंवा g + 1 = g + 1 असते, त्यामुळे सेन निर्देशांक पुढीलप्रमाणे लिहता येतो.

$$S = \left(\frac{g}{n}\right) \left(\frac{1}{2}\right) \; [\, z - M(1 - G)\,]$$

प्रारंभीच्या समीकरणातील जो I घेतलेला आहे ते $g / g^2$ समीकरणाने व्यक्त होतो.

या समीकरणातील संकल्पना स्पष्ट करण्यासाठी सेन यांनी काल्पनिक उदाहरणे दिली आहेत.

उत्पन्न तफावत (दारिद्र्य तीव्रता) = Z - Yi

z = (दारिद्र्य रेषा) Yi = व्यक्तीचे उत्पन्न

z = 15000 रु. ( अ = 10000 रु., ब = 12000 रु., क = 9000 रु.)

S = 13000 रु.,

अ = 15000 - 10000 = 5000

ब = 15000 - 12000 = 3000

क = 15000 - 9000 = 6000

ड = 15000 - 13000 = 2000

$$\frac{16000}{4}$$

सरासरी तफावत = 4000 रूपये

सेनच्या विश्लेषणाप्रमाणे गरीबांची संख्या मोठी असल्यास सुरवातीला दिलेल्या सुत्राप्रमाणे दारिद्र्य निर्देशांक मोजता येतो. प्रत्यक्षात S ही संख्या सेनच्या मताप्रमाणे 0 ते 1 च्या मर्यादेत असते. कारण जेव्हा सर्वच लोकांना दारिद्र्यरेषेपेक्षा जास्त उत्पन्न मिळते तेव्हा $g = 0$ येतो. याउलट काही उत्पन्न मिळत नाही तेव्हा गरीबांचे सरासरी उत्पन्न म्हणजेच M हे 0 होते. तसेच $g = n$ होते. म्हणूनच या सूत्राप्रमाणे दारिद्र्यरेषेखालील दरिद्री लोकांच्यातील दारिद्र्याचे वाटप सेन निर्देशांकाप्रमाणे होते.

समाजाचे कल्याण साध्य करण्यासाठी केवळ विषमता कमी करणे व वस्तूंचे हस्तांतरण उपयुक्त ठरत नाही तर लोकांना सक्षम / सबल बनविणे आवश्यक आहे. आर्थिक मदतीने केवळ दारिद्र्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. तर लोकांच्या अंगी असणाऱ्या क्षमतांचा विकास करणे आवश्यक आहे. दुसऱ्यांवर अवलंबून राहण्याची सवय लावण्याऐवजी स्व-संरक्षण क्षमता विकसित केल्या पाहिजेत असे सेन यांना वाटते. विकासाच्या समान संधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. प्रत्येकाची क्षमता भिन्न असते. या क्षमतांचा विकास करुन आपले जीवन निर्भयपणे जगता येणे आवश्यक आहे. आणि या अनुषंगाने शासनाची भूमिका महत्त्वाची आहे. शासनाने हस्तक्षेप करुन सामाजिक क्षमतांचा विकास केला पाहिजे. क्षमता विकसित करणारे तीन महत्त्वपूर्ण घटक सांगितले आहेत. १) शिक्षण २) आरोग्य ३) सकस आहार

**सारांश :**

सेन यांनी आजच्या खुल्या अर्थव्यवस्थेत आर्थिक विषमता कमी करण्यासाठी दुर्बलांना सबल बनविण्याची गरज असल्याचे सांगितले. यासाठी सरकारी हस्तक्षेपाचे महत्त्व स्पष्ट केले. जागतिकीकरणाच्या युगात मानवतावादाचा पुरस्कार डॉ. अमर्त्य सेन यांनी केला. म्हणूनच त्यांना कल्याणाचा कारागीर, तिसऱ्या जगाचा कैवारी, गरीबांचा हितचिंतक असे संबोधले जाते.

शिक्षण, आरोग्य व सकस आहार या पातळीवरील व्यक्ती / समाजाची स्थिती, सामाजिक पातळीवरील व्यक्ती / समाजाची स्थिती, सामाजिक क्षमता निर्धारित करीत असतात. लोकांचा मानवी विकास किती झालेला आहे, ते मोजण्यासाठी (मानव विकास निर्देशांक) त्यांची शिक्षण, आरोग्य आणि आहार पातळी यांचा उपयोग करावा लागतो असे त्यांनी सुचविले आणि त्याची दखल घेवून युनोने मानवी विकासाचा निर्देशांक तयार करताना सेन यांनी सुचविलेल्या तीन निकषांचा त्यात समावेश केला आहे. यावरुन सेन यांच्या अर्थशास्त्रीय विचारांचा आवाका आपल्या लक्षात येतो.

**४.२ स्वयंअध्ययन प्रश्न :**

**सुयोग्य पर्याय निवडा.**

१) सामाजिक क्षमतांमुळे ............. मध्ये वाढ घडून येते असे सेन यांना वाटते.

अ) सामूहिक निवड ब) आरोग्य क) सामाजिक कल्याण ड) शिक्षण

२) अमर्त्य सेन यांना नोबेल पारितोषिक कधी मिळाले ?

अ) १९९९ ब) २००० क) १९९५ ड) १९९८

३) गो. कृ. गोखलेंनी .................. कमिशनसमोर साक्ष दिली.

अ) इंटर कमिशन ब) वेल्बी कमिशन क) सायमन कमिशन ड) रॉयल कमिशन

४) होतकरु तरुणांना एकत्र करुन देशसेवेच्या कार्यात सहभागी करुन घेण्यासाठी गोखलेंनी कोणती संघटना स्थापन केली?

अ) सर्व्हंटस् ऑफ इंडिया ब) बॉम्बे असोसिएशन क) स्वतंत्र मजूर पक्ष ड) सार्वजनिक सभा

५) गाडगीळांच्या मते भारतातील सहकारी चळवळीच्या विकासाच्या कोणत्या अवस्थेत सरकारचे सहकार्य अपेक्षित आहे.

अ) प्रथम ब) द्वितीय क) तृतीय ड) यापैकी नाही

६) वि. म. दांडेकरांचे कोणत्या विषयात विशेष प्राविण्य होते?

अ) राज्यशास्त्र ब) अर्थशास्त्र क) मानसशास्त्र ड) संख्याशास्त्र

७) वि. म. दांडेकरांनी .................... हा ग्रंथ लिहिला.

अ) द प्रॉब्लेम ऑफ द रुपी ब) आर्थिक समानता

क) पॉव्हर्टी इन इंडिया ड) पॉव्हर्टी ॲन्ड अनब्रिटिश रुल इन इंडिया

८) दांडेकरांची दारिद्र्य संकल्पना ................ वर आधारलेली आहे.

अ) शिक्षण ब) कॅलरी क) आरोग्य ड) उत्पन्न

९) .................... हे गाडगीळांच्या सहकारी तत्त्वात येत नाही.

अ) खुले सभासदत्व ब) समता तत्त्व क) न्याय व नैतिकता ड) वरीलपैकी नाही

१०) अर्थशास्त्राची सद्सद्विवेकबुध्दी जपणारा अर्थतज्ञ असे गौरवोद्गार सेन यांचेबद्दल कुणी काढले?

अ) जॉन रॉबिन्सन ब) रॉबर्ट सोलो क) जे. बी. क्लार्क ड) फिशर

**४.३ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

१) सामाजिक कल्याण
२) १९९८
३) वेल्बी कमिशन
४) सर्व्हन्टस ऑफ इंडिया
५) प्रथम
६) संख्याशास्त्र
७) पॉव्हर्टी इन इंडिया
८) कॅलरी
९) वरीलपैकी नाही
१०) रॉबर्ट सोलो.

### ४.४ सरावासाठी प्रश्न / स्वाध्याय :

**दिर्घोत्तरी प्रश्न :**

१) गोपाळकृष्ण गोखले यांचे सार्वजनिक वित्तासंबंधी, विचार सविस्तर स्पष्ट करा..

२) धनंजयराव गाडगीळ यांचे सहकारविषयक विचार विषद करा.

३) वि. म. दांडेकर यांचे दारिद्र्यविषयक विचार स्पष्ट करा.

४) डॉ. अमर्त्य सेन यांचे आर्थिक विचार स्पष्ट करा.

५) दुष्काळ व दारिद्र्य याबाबत सेन यांच्या विचारांचा आढावा घ्या.

६) गाडगीळांच्या विकेंद्रीकरणाबाबतच्या विचारांचा आढावा घ्या.

**टीपा लिहा :**

१) सहकारी लोकराज्य

२) लोकाभिमुख आर्थिक विकास

३) विकेंद्रीकरण

४) सामाजिक निवड

५) सेन-दुष्काळ व दारिद्र्य

६) हिंदी अर्थशास्त्र

७) फलप्रामाण्यवाद

८) गाडगीळ-सहकार पंडीत

### ४.४ पारिभाषिक शब्द / शब्दार्थ :

१) श्रम सहकार : सामुदायिकरित्या काम / श्रम करणे.

२) हरीत क्रांती : शेती उत्पादनासाठी नवे तंत्रज्ञान व पध्दतीचा वापर

३) विकेंद्रीकरण : वेगवेगळ्या ठिकाणी

४) पासंग : नगण्य

५) सुवर्णपान : अत्यंत महत्त्वाचे

६) दिवंगत : निधन पावलेला

७) ओसंडून : भर-भरुन

८) तफावत : फरक

९) कैवारी : बाजूने उभा राहणार

### ४.५ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१) Dandekar V. M. & N. Nath (1971) 'Poverty in India' - Indian School of Political Economy

२) Gadgil B. N. (1977), Indian Economic Thought, A - 19th Century Perspectives, Tata M.C. Grow Hill, New Delhi.

३) प्रा. रायखेळकर, डॉ. दामजी (२०११), आर्थिक विचारांचा इतिहास, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद

४) डॉ. विजय कविमंडन : आर्थिक विचारांचा इतिहास

५) डॉ. जे. एफ. पाटील - (२०१५), आर्थिक विचारांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६) प्रा. डॉ. अनिलकुमार वावरे, प्रा. संजय धोंडे व डॉ. अनिल सत्रे (२०१४)
आर्थिक विचारांचा इतिहास, एज्युकेशन पब्लीशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद.

७) प्रा. रा. म. गोखले, आर्थिक विचारांचा इतिहास.

८) के. एच. ठक्कर, (१९९९), अमर्त्य सेन आणि आर्थिक विकासाची वाया गेलेली पन्नास वर्षे
प्रगती प्रकाशन, मुंबई.

***